

# खेकडे आणि खेकटी

भीमराव कुलकर्णी

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ..........
क्र. 3229
REFBK-0025396
REFBK-0025396

तसे न केल्यास घटना नियम क्र. ९ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

28 FEB
28 FEB 1990
14 MAR 1990
21 MAR 1990
25 APR 1990
12 MAY 1990

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

३२२९
२५५३९६
विबोध रुगपदे

3229
२५३९६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे

3229
२५३९६

# खेकडे आणि खेकटी

भीमराव कुलकर्णी

REFBK-0025396

सुरेश एजन्सी, पुणे

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© सौ. कुंदा कुलकर्णी

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती
जून १९८७

मूल्य ५० रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव-पार्वती ’
टिळक रोड, पुणे ४११०३०

**डॉ. हेमंत विष्णु इनामदार यांस**

*अहंकाराचा वारा लागू न देता सगळ्यांचे*
*'भले' करण्याच्या विष्णुदासी बाण्याबद्दल...*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ३२३९
विषय
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# हार्द-सौहार्द

'महाराष्ट्र टाइम्स', 'रविवार सकाळ', (पुणे व कोल्हापूर), 'विवेक', 'सोबत' व 'माणूस' इ. नियतकालिकांतून गेल्या तीन-चार वर्षांत लिहिलेल्या लेखांतील काही निवडक लेखांचा हा संग्रह.

यातले काही तत्कालीन कारणांनी लिहिले गेले असले तरी त्यांचा आस्वाद केव्हाही घेता यावा, या दृष्टीने ते लिहिले आहेत. खेळकरपणाची, क्रीडेची व उद्‌बोधनाची भूमिका त्यांमागे आहे.

असंख्य वाचकांनी हस्तेपरहस्ते हे लेख आवडल्याचे मला कळवून उपकृत करून ठेविले आहे. पुस्तकरूपाने त्यांतील काही लेख एकत्रित वाचावयास मिळाल्याने त्यांचा आनंद द्विगुणित होईल अशी आशा आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक श्री. गोविंदराव तळवलकर व त्यांचे सहकारी श्री. दि. वि. गोखले, दिनकर गांगल व भालचंद्र वैद्य, 'कोल्हापूर सकाळ'चे संपादक श्री. विजय कुवळेकर, पुण्याच्या 'रविवार सकाळ'चे संपादक श्री. एस. के. कुलकर्णी व त्यांचे सहकारी श्री. सदा डुंबरे व अरुण खोरे, 'विवेक'चे संपादक श्री. दिलीप करंबेळकर व त्यांचे सहकारी श्री. ज्ञानेश महाराव, 'सोबत'चे संपादक श्री. ग. वा. बेहेरे व 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांच्या सौहार्दामुळे हे लेख माझ्या हातून लिहून झाले.

या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

सुरेश एजन्सीचे संचालक श्री. बाळासाहेब कारले व कल्पना मुद्रणालयाचे श्री. अण्णासाहेब लाटकर यांचे व माझे दीर्घ काळचे ऋणानुबंध आहेत. या पुस्तकाच्या निमित्ताने त्यांना उजाळा मिळत आहे.

**भीमराव कुलकर्णी**

३२२९
२५३७७
निबंध


## अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | शिवाजीमहाराजांचे हस्ताक्षर | १ |
| २ | पाणीच पाणी चहूकडे, ग बाई, गेला ‘ माधव ’ कुणीकडे ! | ४ |
| ३ | मराठी कथेची कुंडली मांडण्याचा प्रयत्न | ७ |
| ४ | माटेमास्तर कॅन्सरने गेले ! | १४ |
| ५ | स्त्रियांची विनोदबुद्धी | १७ |
| ६ | खेकडे आणि खेकटी | २३ |
| ७ | कथा सत्यनारायणाची | २७ |
| ८ | डॉ. लागूंची ‘ पतंगाची दोरी ’ | ३१ |
| ९ | रंगभूमी : संगीताने गाजलेलीं आणि गांजलेलीही | ३५ |
| १० | कानडीने केला मराठी भ्रतार | ४१ |
| ११ | मराठीं नाटकांनी केलेला बेंटिंकचा पराभव | ४५ |
| १२ | अश्लील ! अश्लील ! ! | ४९ |
| १३ | मास्तर मेला, शिक्षक जिवंत आहे | ५५ |
| १४ | जनासी पडे मोहन ऐसे लिहावे | ६० |
| १५ | चर्चासत्रांचे युग | ६५ |

| | | |
|---|---|---|
| १६ | साहित्य-समीक्षेचा तोंडदेखला पंचनामा | ६९ |
| १७ | आपण सारेच फासेंचे धनी | ७४ |
| १८ | ॥ अथ लग्नपत्रिका पुराणम् ॥ | ७९ |
| १९ | कावळ्यांची शाळा | ८८ |
| २० | मराठी मरणार काय, तरणार कशी ? | ९२ |
| २१ | पिकतं तिथं विकत नाही ! | ९७ |
| २२ | साहित्य-संमेलनाध्यक्षांची निवडणूक | १०१ |
| २३ | या ज्वालामुखीचा स्फोट होणार का ? | १०५ |
| २४ | भोजन म्हणजे भांडणेच | ११० |
| २५ | उंदीर धावपळीचे बळी | ११५ |
| २६ | त्यांच्यापुढे आम्ही किस झाडकी पत्ती ! | १२१ |
| २७ | हे पुण्यपत्तन, ही पुण्यनगरी | १२८ |
| २८ | निवडणुका | १३७ |
| २९ | एक मोती गळत... | १४० |
| ३० | ९४ वर्षांच्या दोन लेखिका | १४७ |

१

# शिवाजी महाराजांचे हस्ताक्षर !



शिरवळ परगण्याचे सुभेदारास पाठविलेल्या पत्राच्या शेवटच्या तीन ओळी. मल्हारजी निगडे देशमुख यांनी आपली पाटीलकी हिरोजी निगडे यास विकली. महाराजांनी ती अमान्य करून देशमुखी जप्त केल्याने पाटीलकी परत घेण्यात आली. त्यामुळे महाराजांनी जप्ती उठविल्याचे हे पत्र लिहिले. (११-८-१६७५) पत्र कारकुनाच्या हस्ताक्षरात आहे. अधोरेखित केलेले "हुजूर मोर्तबसूद" हे शब्द महाराजांच्या हातचे आहेत, असा दावा केला जातो.

डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला पुण्याच्या कौन्सिल हॉलजवळील पुराभिलेखागारात ऐतिहासिक कागदपत्रांचे एक प्रदर्शन जनतेसाठी खुले ठेवण्यात आले होते. हे प्रदर्शन किती जणांनी आवर्जून पाहिले, किती जणांना त्याचे महत्त्व कळले, असा प्रश्न विचारण्यासारखा आहे. परंतु अशा प्रश्नांकडे काहीसे दुर्लक्ष करून, त्यातल्या एका गोष्टीकडे सहज कुतूहल म्हणून जनतेचे लक्ष वेधले पाहिजे.

ही गोष्ट म्हणजे, या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांची म्हणून मांडलेली काही पत्रे. अलीकडे धुळ्याच्या प्रा. देशपांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांचा एक संकलनात्मक संग्रह प्रसिद्ध केला आहे. त्यातील खरी किती, खोटी किती या प्रश्नाची समाधानकारक चर्चा त्यांनी केली नाही. करणे अवघड आहे. परंतु शिवाजीमहाराजांचं हस्ताक्षर म्हणून काही पत्रांकडे प्रदर्शनात लक्ष वेधण्याचा एक लक्षणीय प्रयत्न प्रदर्शनाचे संचालक करीत होते आणि पाहणारे लोक केवळ कुतूहलाने 'वा. वा. असे का!' म्हणून या पत्रांकडे नजर टाकून पुढे जात होते.

ते पाहून एका बाजूने मला गंमत वाटत होती. तर दुसऱ्या बाजूने मनात विचारांचा कल्लोळ दाटला होता! शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षरासंबंधी गेल्या शंभर वर्षांत खूप रामायण घडले आहे! एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला एका इतिहासकाराने अनेक मराठ्यांच्या घराण्यांच्या आपल्या अवलोकनाच्या आधारे असे लिहून ठेवले की, शिवाजीला मुळी लिहिता-वाचता येतच नव्हते. साताऱ्चा रेसिडेंट म्हणून काम करणाऱ्या ग्रँट डफ नावाच्या एका इंग्रजाने मोठ्या परिश्रमाने 'मराठ्यांचा इतिहास' लिहिला. तत्कालीन इंग्रज मुत्सद्यांना ही गोष्ट आवडली नाही. 'इंग्रजांनी केलेल्या भारतीयाच्या पराभवाचा इतिहास', अशा प्रकारचे स्वरूप त्याला दिल्यास तो छापण्याची तयारी जॉन मरे नावाच्या प्रकाशकाने दाखविली. डफने त्याला नकार दिला. आपल्या एका स्नेह्याच्या मदतीने त्याने तो दुसरीकडे छापला. मराठ्यांच्या बद्दलच्या प्रेमापोटी त्याला आपल्या या पुस्तकात जवळची बरीच पुंजी घालवावी लागली. या इतिहासग्रंथात त्याने एका ठिकाणी लिहिले की,

Marathas seldon can write of read. They consider all such learning the business of a Carcoon, and if not degrading at least undignified. Shivaji could never write his name.

(पृ. १०१)

ग्रँट डफच्या या मतावर शिवाजीचे इंग्रजीत चरित्र लिहिणाऱ्या जदुनाथ सरकारांनी शिक्कामोर्तब केले. आता जदुनाथ सरकारांची अव्वल दर्जाची भारतीय इतिहास-संशोधक अशी ख्याती. सरकारदरबारी त्यांच्या शब्दाला मोठा मान. ते उत्तम इंग्रजी लिहिणारे. त्यांनी इंग्रजीत लिहिलेल्या शिवचरित्रातील कित्येक मतांबद्दल मराठीतील अनेक नामवंत इतिहासकारांनी नाके मुरडली व त्यांच्यावर कुत्सितपणाचा, मराठ्यांच्या बद्दलच्या पूर्वग्रहातून त्यांनी हे सारे लिहिल्याचा आरोप केला.

प्रा. जदुनाथ सरकारांच्या मतांबद्दल कितीही मतभेद असले तरी त्यांच्यासारखा इंग्रजी लिहिणारा संशोधक मराठीत नव्हता. आणि त्यांच्याइतका दबदबाही दुसऱ्या कोणाचा नव्हता ही वस्तुस्थिती होती. जदुनाथ सरकार हे बंगाली इतिहासकार होते, एवढे सांगितले की, त्यांच्या मराठ्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणासंबंधाने अधिक

लिहिण्याची गरज नाही. त्यांनी आपल्या शिवचरित्रात लिहिले की, Shivaji was unlettered like three other heroes of medieval India–Akbar, Hyder Ali, and Ranjit Sing.

शिवाजीला लिहिता येत नव्हते म्हणजे काय? शिवाजीमहाराजांचे वडील शहाजीराजे हे संस्कृतमधून ब्राह्मणांना समस्या घालीत होते असे 'राधामाधवविलासचंपू' या संस्कृत ग्रंथात लिहिले आहे. शिवपुत्र संभाजीने 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. शिवाजीला मातुश्री जिजाबाईंनी व दादोजी कोंडदेवांनी दिलेल्या शिक्षणासंबंधीचे बखरींतले उल्लेख अभ्यासकांकरवी धडाधडा उद्धृत करण्यात आले. परमानंद या संस्कृत पंडिताने शिवाजीमहाराजांचे 'शिवभारत' म्हणून जे संस्कृत चरित्र लिहिले आहे. त्यात शिवाजीच्या सुशिक्षितपणाबद्दल बारा श्लोक (अ. ९, ७०–७४; अ. १०. ३४–४०) असल्याचे सांगण्यात आले.

शिवाजीच्या हस्ताक्षराचा शोध घेण्याची जणू अहमहमिका लागून राहिली. शिवाजीचे हस्ताक्षर सापडल्याचे कै. विठ्ठलराव घाट्यांनी 'प्रतिष्ठान' मधल्या एका लेखात जाहीर केले. एवढे सगळे होऊनही जाणकारांच्या मनातील शंका दूर झाली नाही, आणि ती पूर्णतः दूर व्हावी, असे महाराजांच्या हातचे पत्र अद्यापही उपलब्ध झाले नाही.

या धुमश्चक्रीत डफ व सरकार यांना नेमके काय म्हणावयाचे होते इकडे अनेकांचे दुर्लक्ष होते.

त्यांना एवढेच म्हणावयाचे होते की, लिहिता-वाचता येणे ही कारकुनांची, ब्राह्मण, कायस्थांची कामे. घरदाज सरदारांना, मोठमोठ्या राजेरजवाड्यांना लिहिता-वाचता येण्याची आवश्यकता नव्हती. त्यांच्यासाठी लिहिणारे वाचणारे नोकरचाकर त्यांच्याकडे भरपूर होते. त्यांच्या शहाणपणाचे भरणपोषण त्यांच्या बहुश्रुततेत होते. खूप ऐकणे, खूप पाहणे, खूप अनुभवणे ही खरी ज्ञानाची कसोटी. ती त्यांच्याजवळ पुरेपूर होती. उलट लिहिणेवाचणे ही आध्यात्मिकतेपुरती, हिशेबठिशेब ठेवण्यापुरती मर्यादित शक्ती होती. लिहिण्या-वाचण्याची ही मर्यादा काही विशिष्ट बाबतीत विशिष्ट वर्गाकडे सोपवून मोठे राज्यकर्ते आपल्या अनुभवातून शिकत, मोठे होत. त्यांच्या शिक्षणाची परंपरा ही वेगळी होती. ती त्यांच्या समृद्धतेची, संपन्नतेची निदर्शक होती.

क्षत्रियाने हातात नांगर धरणे जसे कमीपणाचे तसे लिहिणे-वाचणेही कमीपणाचे. असा कमीपणा शिवाजीला आपण का द्यावा?

खरेच शिवाजीला लिहितावाचता येत होते (किंवा नव्हते) काय?

# २

# पाणीच पाणी चहूकडे, ग बाई, गेला ' माधव ' कुणीकडे !

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात पुणे येथे झालेल्या नाट्यसमीक्षकांच्या मेळाव्याचे पडघम शमले आहेत. या मेळाव्याने काय साधले असे प्रश्न, उपस्थित असलेल्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेसमोर मांडले. केवळ उत्साहाची एक लाट असे त्याचे नेहमीप्रमाणे वर्णन करून या मेळाव्याचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न बरोबर ठरेल असे मला वाटत नाही. साहित्य-संमेलनास साहित्यिक अभावानेच दिसतात आणि हौसे, नवसे, आणि गवसे यांची जत्रा भरते, हा आरोप झोंबणारा असला तरी नाकारता येणार नाही. नाट्यसंमेलनात नामवंत नट नाटककार अभावानेच दिसतात आणि वृत्तपत्रीय नाट्यसमीक्षकांच्या साक्षीने व कर्त्याधर्त्या मंडळींच्या साहाय्याने ही संमेलने, हिन्दी भाषेत सागायचे म्हणजे, संपन्न होतात, हे कटू सत्यही गिळताना संबंधितांना त्रास होतो. नाट्य समीक्षकाच्या मेळाव्यास मात्र जुने-नवे नाट्यसमीक्षक आवर्जून एकत्रित आले होते. त्यांची व्यवस्था उत्तम ठेवण्यात आली होती व इतर काही झाले न झाले तरी या साऱ्यांच्या एकत्रित येण्याने गप्पा टप्पा, चर्चा-परिचर्चा यांतून उपस्थितांच्यामध्ये एक आंतरिक जिव्हाळा निर्माण झाला, असे संयोजकांना वाटले तर या वाटण्यात तथ्य आहे असे मानून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप जरूर मारली पाहिजे !

परंतु खुद्द मेळाव्यात आणि मेळाव्यानंतर वृत्तपत्रांतून एक सूर जाहीरपणे उमटला. त्याच्याकडे दुर्लक्ष झाले तर मग हा मेळावा भरला होता, याची केवळ नोंद करण्यापलीकडे त्याला काही महत्त्व उरणार नाही !

हा सूर तसा नवीन नाही, अपरिचित नाही आणि दचकवणाराही नाही. त्याची आम्हाला चांगली सवय झाली आहे.

हा सूर, मराठीत नाट्यसमीक्षा नावाची चीज आहे काय ? या वाक्यातून व्यक्त झाला आहे.

हा सूर काहीसा निंदाव्यंजक, मराठी समीक्षाव्यवहाराला डिवचणारा आणि अस्वस्थ करणारा आहे. वृत्तपत्रांतून सातत्याने नव्या नाटकांवर समीक्षणे मोठ्या प्रमाणात येत असताना, नाट्यसमीक्षक म्हणून अनेक नामवंतांचा आपण गौरव करीत असताना, आणि नाट्यसमीक्षेला वाहिलेली नियतकालिके पोटतिडीकीने चालू असताना, मराठीत नाट्यसमीक्षा नावाची चीज आहे काय ? असा प्रश्न उच्चरवाने विचारला जावा, याचा अर्थ काय ?

खरे पाहिले तर, नाट्यसमीक्षक-मेळाव्याला समीक्षकांची जी उपस्थिती होती ती पाहता, या मेळाव्यास नाट्यसमीक्षक हजर नव्हते असे कोणी म्हणणार नाही, आणि तसे कोणी म्हटलेही नाही. मराठीत नाट्यसमीक्षक आहेत काय, असा प्रश्न जर कोणी उपस्थित केला असता तर, त्याला आम्ही उत्तर दिले असते की, 'आहेत निश्चित आहेत' आणि कोणी पुढचा प्रश्न विचारण्याच्या आत आम्ही या मेळाव्यास उपस्थित असलेल्या समीक्षकांची नावे धडाधड म्हणून दाखविली असती. म्हणजे,

वॉटर वॉटर एव्हरीव्हेअर

नॉट ए ड्रॉप टु ड्रिंक

अशी सध्या मराठी नाट्यव्यवहाराची अवस्था आहे. समीक्षक भरपूर आहेत, परंतु समीक्षा कुठे दिसत नाही.

मराठीतल्या नामवंत नाटककारांना विचारा.

नामवंत दिग्दर्शकांना विचारा.

नामवंत नाट्यनिर्मात्यांना विचारा. किंवा नाट्यसमीक्षकांखेरीज इतर नामवंत समीक्षकांना विचारा.

ते सारे एकमुखाने सांगतील, मराठीत अव्वल दर्जाची समीक्षा आहे कुठे ? मराठीत आमच्या नाटकावर जाणकारीने कुठे लिहिले आहे ? पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या नाटककाराला विचारा, ते म्हणतील, मराठीत एखाद्या समीक्षकाला नाटक पाहण्यासाठी पास दिला तर तो मर्तिकाचा पास दिल्याप्रमाणे मख्ख चेहरा करून नाटकाला येतो. दिग्दर्शक-निर्माते म्हणतील, नाटकाच्या नव्या स्थितिगतीची या समीक्षकांना साधी कल्पना नाही आणि ( इतर ) नामवंत समीक्षक म्हणतील, मराठीतील नाट्यसमीक्षा कामचलाऊ, वर्तमानपत्री आहे.

या सर्व आरोपांत, नरसोपंत केळकरांच्या भाषेत सांगायचे म्हणजे, म्हटले तर तथ्य आहे, म्हटले तर नाही. या सर्वांतून सुवर्णमध्य कसा काढायचा ?

तो काढण्यापूर्वी मराठीत नाट्य-समीक्षेची सध्या काय अवस्था आहे, ते थोडक्यात पाहिले पाहिजे. ते पाहण्यापूर्वी आजची बरीच समीक्षा वर्तमानपत्री, कामचलाऊ आहे,

ही वस्तुस्थिती स्वीकारलीच पाहिजे.

आज खरी गरज काय आहे ? गरज आहे ती अभ्यासकांसमोर साऱ्या मराठी नाट्य-वाङ्मयाचा एक विस्तृत व सांगोपांग इतिहास उभे करण्याची. वर्तमानपत्री समीक्षा ही प्राधान्याने रंगभूमीवर होत असलेल्या नित्यनव्या प्रयोगांची असते. आजचे निर्माते हाती आलेल्या नाटकातील उणेपण झाकण्यासाठी नव्या नव्या साधनांचा वापर करण्यात गुंतले आहेत. या नाटकांना उद्देशून के. नारायण काळे ' खिळारी-सुतारांची नाटके ' असे म्हणत. नेपथ्य, देखावे, मांडणीतील विविधता यांच्या पलीकडे ' नाटक ' या नावाची जी वाङ्मयीन शक्ती उभी असते, तिचे यथार्थ आकलन होण्यासाठी नाट्य-संहितेची एक समृद्ध व संपन्न स्वरूपाची समीक्षा निर्माण झालेली असणे आवश्यक असते. तिचाच मराठीत पूर्णपणे अभाव आहे. ही समीक्षा तपश्चर्येतून, अभ्यासांतून सिद्ध होते. साऱ्या मराठी नाट्य-वाङ्मयाचे ऐतिहासिक दृष्टिकोणातून, वाङ्मयीन दृष्टीने, रंगभूमीवरील प्रयोगाच्या संदर्भात, त्याच्यातील बदलत्या स्वरूपांचा शोध घेत विश्लेषण सातत्याने होत राहिले पाहिजे. असा शोध घेण्यासाठी अनुदाने, पारितोषिके, नवी विद्यापीठे, नवी महाविद्यालये यांसारखी भरपूर साधने निर्माण होत असली तरी संशोधनाची, अभ्यासाची, जिज्ञासेची शक्ती कमी होत चालली आहे.

या शक्तीच्या अभावाने नाट्य-समीक्षेच्या क्षेत्रात अनागोंदी निर्माण झाली आहे. समीक्षा ही अभिरुची निर्माण करणारी, नवे-जुने सांधणारी, त्यातला अर्थ शोधणारी, प्रेक्षक व रंगभूमी यांच्यात नाते निर्माण करणारी, किंबहुना ती प्रेक्षक, निर्माते व नाटककार यांना सातत्याने मार्गदर्शन करणारी अशी असावी लागते.

किंबहुना तिचा एक प्रकारचा सन्माननीय धाक असावा लागतो. तो धाक निर्माण करणारी समीक्षा कुठे आहे ? ती नसल्याने ' हिट अँड हॉट ' नाटकांचा रंगभूमीवर धुमाकूळ चालू आहे...

आणि नाट्यसंमेलने आणि नाट्यसमीक्षकांचे मेळावे भरत आहेत.

भरत राहतील.

७६

# ३

# मराठी कथेची कुंडली मांडण्याचा प्रयत्न

साहित्य संमेलनांतून होणाऱ्या साहित्यविषयक चर्चेसंबंधी एक असमाधानाचा सूर नेहमीच प्रकटत राहतो. साहित्य-संमेलनांच्या आजच्या स्वरूपामुळे अशी चर्चा तेथे अपेक्षित नसते हे अशा वेळी लक्षात घेतले जात नाही. गंभीर आणि मौलिक स्वरूपाची साहित्य–चर्चा करण्याचे संमेलन हे काही व्यासपीठ नव्हे, याची यथार्थ जाणीव ठेवली तर त्यासंबंधी वारंवार असमाधान प्रकट करण्याची आवश्यकता नाहीशी होते. अलीकडे गेल्या काही वर्षांत साहित्यचर्चाविषयक जी शिबिरे विद्यापीठ अनुदान मंडळाच्या तुट-पुंज्या आर्थिक पाठबळावर भरविली जात आहेत, त्यांनी खऱ्याखुऱ्या साहित्य–चर्चेला तोंड फुटते आहे. १९७८ मध्ये पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयामध्ये साहित्य-समीक्षेची सर्वांगीण चर्चा करणारे सात दिवसांचे असे एक महत्त्वाकांक्षी शिबिर भरले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळजवळ सारे महत्त्वाचे साठ नवे–जुने समीक्षक एकत्र आले होते. ही एकप्रकारे अभूतपूर्व घटनाच मानावयास हवी. त्यानंतर सांगली ( विलिंग्डन महाविद्यालय ), कोल्हापूर ( शिवाजी विद्यापीठ ) धुळे ( विद्यार्थिनी महाविद्यालय ) इत्यादी ठिकाणची अशा प्रकारची शिबिरे खूपच गाजली. अर्थातच ' मॉडर्न 'प्रमाणे सात दिवसांची शिबिरे घेणे अत्यंत जिकिरीचे असल्याने ही शिबिरे दोन वा तीन दिवसांवर मर्यादित करण्यात आली. गेल्या दोन-तीन वर्षांत अनेक ज्येष्ठ समीक्षकांना काळाने ओढून नेल्याने आणि वृद्धत्वामुळे, अनेक ज्येष्ठ समीक्षकांची अनुपस्थिती आजच्या शिबिरांतून प्रकर्षाने जाणवते.

अगदी अलीकडे बारामतीच्या चतुरचंद महाविद्यालयाने अनेक विषयांवरची शिस्त-बद्ध शिबिरे भरविण्यात चांगलीच आघाडी मारली आहे. या महाविद्यालयात भरलेल्या मराठी कथाविषयक शिबिराने अनेक जाणकारांचे लक्ष वेधून घेतले. ' गेल्या दोन

दशकांतील मराठी कथेतील नवता व परंपरा ' या विषयावर हे शिबिर भरले होते. गंगाधर गाडगीळ, डॉ. स. गं. मालशे, प्रा. वसंत दावतर, डॉ. आनंद यादव, डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. अंजली सोमण, डॉ. ह. वा. कुलकर्णी, प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रसिद्ध कथालेखिका कमल देसाई आणि ह. मो. मराठे, डॉ. तोडमल इत्यादिकांच्या उपस्थितीने आणि त्यांनी उपस्थित केलेल्या मराठीतील कथाविषयक प्रश्नांनी तीन दिवस बारामती महाविद्यालयाचे सारे वातावरण अक्षरशः साहित्यमय बनून गेले होते.

मराठी कथेची कुंडली मांडण्याचा प्रयत्न या चर्चासत्रात करण्यात आला. मराठी कथासाहित्याच्या सूर्यमालेत जे अनेक ग्रह बसलेले आहेत, त्यांची स्थाने कोणती, त्यांतील स्वावलंबी कोण, परावलंबी कोण, ते कोणत्या मासिकाच्या कथेत आले म्हणजे प्रकाशित होतात आणि कोणत्या मासिकांच्या नादाने भरकटत जातात याचा विचार करताना रंजक तपशील हाती आला.

या ग्रहमालेत सूर्याप्रमाणे एखादा प्रखर तेजस्वी तारा आहे का, की ज्याच्याभोवती इतर तारे फिरत राहातात, या प्रश्नाचे उत्तर अर्थातच नकारात्मक निघाले. कथा हा वाङ्मयप्रकारच असा गौण स्वरूपाचा आहे की, त्यामध्ये असा सर्वांना कवेत घेणारा तेजोगोल असू शकणार नाही, हे खरेच आहे. हरी नारायण आपट्यांना असे स्थान द्यायचे का ? नाही, कारण स्वतःच्या कादंबरीलेखनाच्या परिघात त्यांची कथा निस्तेज होऊन जाते. ग्रामीण कथा वाङ्मयात हे स्थान व्यंकटेश माडगूळकरांना व एकंदरीत मराठी कथा वाङ्मयात हे स्थान गंगाधर गाडगीळ यांना दिल्यास इतर ग्रह बंड करून उठतात. चंद्र हा सर्वांत लहान ग्रह परंतु हा पृथ्वीला जवळ असल्याने सूर्यबिंबाइतकाच दिसतो. त्याप्रमाणे गुणवत्तेने कमी परंतु लोकप्रियतेने अधिक असे कथाकारच एकंदर कथावाङ्मयाच्या भरती–ओहोटीचे केंद्रस्थान ठरतात. असे लोकप्रिय कथाकार खूप असतात. त्यांना कथाकथनाची शक्ती प्राप्त झाली तर आपण चंद्र आहोत याचे त्यांचे भान सुटते व सूर्याप्रमाणे स्वतःला तेजस्वी समजायला लागतात. अशा कथाकारांचा नेहमीच धोका संभवतो.

कुंडलीतील बुधाचे स्थान दि. बा. मोकाशी, विद्याधर पुंडलिकांसारख्या कथाकारांचे असते. बुध हा रंगाने पिवळसर असतो. लग्न कुंडलीत कन्येचा किंवा मिथुनेचा बुध असता तो जसा बलवान होतो त्याप्रमाणे ह्या ग्रहातील कथाकारांचा 'सत्यकथा' 'मौज' इत्यादी नियतकालिकांशी संबंध आला असता ते बलवान होतात. या नियतकालिकांच्या अस्तानंतर त्यांनाही सद्‌गती मिळते.

कुंडलीत शुक्रास स्त्रीग्रह मानले आहे. तो वर्णाने पांढरा शुभ्र असतो. विवाह, रतिसुख, सौंदर्य, संगीत, वाद्य, नाट्यकला, सट्टे, शर्यती इत्यादींवर या गृहाचा वचक असतो. ना. सी. फडक्यांच्या वाट्याला हे स्थान काही काळ प्राप्त झाले होते. परंतु रति, मस्ती, मेनका, रंभा इत्यादी मासिके निघाली आणि या ग्रहाने धुमाकूळ मांडला.

चंद्रकांत काकोडकर, शं. ना. नवरे, प्रभाकर तामणे, इत्यादिकांसारख्या अनेक कथाकारांच्या वाट्याला ही राशी आली होती. परंतु अश्लीलमार्तंड कृष्णराव मराठे, काका गाडगीळ व निवृत्त न्यायाधीश द. ब. गोडबोले आणि श्री. के. क्षीरसागर इत्यादी पापग्रहांनी पिच्छा पुरवून या ग्रहाचा पार धुव्वा उडविला !

मंगळ हा ग्रह अतिशय पराक्रमी आणि महत्त्वाचा परंतु तो पापग्रह आहे नववाङ्मयाच्या परिघात हा आला की त्याला राजवैभवासारखे अधिकार प्राप्त होतात. एरवी सनातनी वृत्तीच्या समीक्षकांच्या मते हा वाङ्मयास हानिकारक असा नीच ग्रह होय. चिं. त्र्यं. खानोलकर, दिलीप चित्रे, विलास सारंग, भाऊ पाध्ये, इत्यादी कथाकारांना मंगळाने वेढलेले दिसते.

गुरू हा आणखी एक बलिष्ठ परंतु शुभ ग्रह होय. मराठीच्या कथेच्या जन्मकुंडलीत बहुसंख्य ग्रह निर्बली असल्याने गुरूला श्रेष्ठ स्थान मिळून तो नको तितका उग्र आणि तेजस्वी बनला आहे. त्यातल्या त्यात समाधाची बाब इतकी की, या स्थानावर हक्क सांगणारे पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ आणि जी. ए. कुलकर्णी अशा त्रिवर्गींचे स्वामित्वहक्क प्रस्थापित करण्यासाठी सदैव लठ्ठालठ्ठी चालू असल्याने त्याचे तेज विभागले गेले आहे. आपणास शनीच्या ग्रहापासून मुक्त करून या ग्रहात लेखावे असा एक छुपा प्रयत्न शंकर पाटलांचा नित्य चालू असतो. वा. ल. कुलकर्ण्यांखेरीज त्याची फारशी दखल घेतली जात नाही हे ठीक आहे. नाहीतर समीक्षकांना चौकडी समजून एक भलते विशेषण त्यांच्या मागे लावण्याचा मोह आवरला नसता.

शनि हा पापग्रह. तो ज्या स्थानाला असतो त्या स्थानासंबंधी अशुभ फले प्रत्ययास येतात. मराठीतील किस्सेवजा ग्रामीण कथा लिहिणारे सारे कथाकार या ग्रहाचे धनी आहेत. त्यांनी ग्रामीण जीवन भ्रष्ट, अशुभ करून सोडले आहे.

युरेनस ऊर्फ हर्शल हा ग्रह शनिप्रमाणेच फले देणारा परंतु एक पापग्रहच आहे. त्याचा शोध जसा अलीकडेच लागला, त्याप्रमाणेच आनंद यादवांचा ग्रामीण कथाकार म्हणून शोध अलीकडेच लागला. हा ग्रह शनीला सदैव पाण्यात पाहात असेल परंतु शनीपेक्षा ताकद कमी असल्याने चळवळीच्या मार्गाने तो शनीवर मात करण्याची इर्ष्या धरतो.

मराठी कथावाङ्मयाची कुंडली मांडल्यानंतर हे सारे ग्रह एकामागोमाग स्पष्ट होत गेले. या कुंडलीतील सूर्याच्या अभावाने हा चंद्र सप्तसमुद्राहून आयात करावा लागला, असे कुत्सित उद्गार काही चर्चकांनी काढले. त्यांची दखल घेण्याचे काही कारण नाही !

मराठी कथावाङ्मयात जसा सूर्य नाही, तसा ' प्लुटो ' हाही ग्रह नाही. सामान्यपणे एका राशीस २० वर्षे प्लुटो राहातो हे लक्षात घेतले तर त्याच्या नास्तित्वाचे कारण कळते. वीस वर्षे सातत्याने कसदार कथा लिहिणारा मराठीत कोणी कथाकार नाही, हे खरेच आहे !

एकंदर मराठी कथेच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन दशकांतील मराठी कथावाङ्मयाचा विचार करीत असताना चर्चा अपरिहार्यपणे महायुद्धोत्तर काळातील मराठी कथेच्या बहराकडे पुन्हापुन्हा वळत होती. मराठी कथेला 'कथा' म्हणून सर्वांगाने मुक्त करण्याचे श्रेय गंगाधर गाडगीळांकडेच जाते, याबद्दल कुणाचे फारसे दुमत नव्हते आणि मराठी ग्रामीण कथेतील व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांच्या कामगिरीबद्दलही एखाद-दुसरा अपवाद वगळता बहुतेकांच्या कल्पना अगदी स्पष्ट होत्या. मात्र गेल्या दोन दशकांतील मराठी कथावाङ्मय आणि गेल्या दोन दशकांमध्ये पूर्वीप्रमाणेच अग्रगण्य राहिलेल्या जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेखेरीज केवळ कथा या वाङ्मय-प्रकारात जिद्दीने नवे काही करून दाखविणारा कथाकार अभावानेच दिसतो, याची अनेक वेळा जाणीव करून देण्यात आली. ती देत असताना गेल्या दहा-पंधरा वर्षांत नव्याने लिहीत असलेल्या कथाकारांच्या नावांचा आवर्जून उल्लेख करण्यात आला; त्यांच्यापैकी कोणा एकाचा वा दोघा-तिघांचा ( पूर्वीच्या गाडगीळ-गोखले-भावे-माडगूळकर ) मराठी कथेवर महत्त्वाचा परिणाम घडला नाही, त्याची कारणमीमांसा करण्यात आली. 'सत्यकथा' आणि 'सत्यकथेतर कथा' असे मराठी कथेत उघडउघड दोन तट पडले असून सत्यकथेतील कथाच अलीकडे इतकी दुबळी झाली आहे की, तिची नवे निर्माण करण्याची क्षमताच नष्ट झाली आहे. सत्यकथेतर कथा दिशाहीन असल्याने ती बाजारी बनली आहे असाही एक सूर उमटला. एकंदर चर्चेचे हे ठळक फलित मानावयास हरकत नाही. काही समीक्षकांनी अलीकडच्या कथावाङ्मयाच नेटका आढावा सादर करून या चर्चेला चांगले तोंड पाडले.

काही लेखक कुठल्याच काळातील नसतात. ते स्वतंत्र, स्वयंभू असतात असे म्हणून मराठीतल्या महत्त्वाच्या कथाकारांच्या वैशिष्ट्यांकडे आपल्या उद्घाटनाच्या भाषणातून लक्ष वेधले गंगाधर गाडगीळांनी. मराठी कथेतील अनेक बंदिस्त दालने नव्या उत्साहाने उघडत असताना पन्नास ते साठच्या काळात अनेक कथाकारांनी ज्या उमेदीने कथालेखन केले त्यामुळे मराठी कथावाङ्मय कसे अनेक अंगांनी फुलून आले, हे गाडगीळांनी स्पष्ट केले. मानवी मनाचा मराठी कथेने घेतलेला वेध, ग्रामीण भाषेचे, बोलीचे वैभव पुरेशा कलात्मकतेने सहजगत्या व्यक्त करून सबंध गाव पुनःपुन्हा उभे करण्याचे व्यंकटेश माडगूळकरांचे सामर्थ्य, ग्रामीण कथेला अभिजातता देण्याची शंकर पाटलांची धडपड आणि मानवी जीवनाला व्यापून राहणारी अतिमानुष पातळी-वरील एक वेगळी संगती आविष्कृत करणारी चिं. त्र्यं. खानोलकरांची कथा, पुंडलिकांनी जाणीवपूर्वक केलेली कलाकुसर आणि जी. ए. कुलकर्ण्यांनी जीवनाच्या उग्रगंभीर प्रवृत्तींचे घडविलेले दर्शन यामुळे मराठी वाङ्मयात कथेने वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे, याची कबुली गाडगीळांनी दिली. नैसर्गिक आणि सामाजिक वातावरणाची आणि त्याचप्रमाणे व्यक्तिचित्रांची आणि घटनांची जीएंमधील विविधता

कशी झपाटून टाकते यासंबंधीचे गाडगीळांचे विवेचन मार्मिक होते; परंतु त्यांच्या पक्क्या बांधणीच्या कथांनी नवकथेतील मुक्तींची कोंडी झाली आहे आणि जीएंना ग्रासणाऱ्या एका विशिष्ट प्रकारच्या मनोविकृतीने त्यांच्या प्रतिभेला आपली बटीक केली आहे. त्यामुळे जीएंसारख्या प्रतिभेचे मोठे लेणे लाभलेल्या कथाकाराने एका मनोगंडाचे गुलाम व्हावे, ही दुर्दैवी घटना आहे, या गाडगीळांच्या निदानाबद्दल भरपूर मतभेदास जागा आहे, असा चर्चेचा एक सूर दिसून आला.

अलीकडे दलित आणि ग्रामीण वाङ्मयाचे ( केवळ चर्चेपुरते का होईना ) फड उभे करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न चालू आहेत. वाङ्मयाची चर्चा करण्यासाठी डॉ. आनंद यादव उपस्थित होते. त्यांनी मराठी नवकथेला गाडगीळांनी मनोविश्लेषणाची जी बैठक दिली ती ग्रामीण कथेत जाणीवपूर्वक राबविण्याचा प्रयत्न करणारा कथाकार म्हणून पाटलांचा उल्लेख केला. यादवांचा प्रयत्न मराठी ग्रामीण कथेतील कलावादी दृष्टीचा शोध घेण्याचा होता. त्यांनी माडगूळकर, मिरासदार, शंकर पाटील आणि बोराडे यांच्या कथावाङ्मयाचे मार्मिक दिग्दर्शन केले आणि अलीकडे लिहू लागलेल्या साऱ्या ग्रामीण कथाकारांचा उल्लेख केला. जी. ए. कुलकर्णी, खानोलकर यांच्या काही कथांना ग्रामीण म्हणून संबोधिले. ग्रामीण कथेचा वेगळेपणा त्यातून व्यक्त होणाऱ्या ग्रामीण संवेदनेवर ठरतो, ही त्यांची महत्त्वाची कसोटी. अलीकडच्या वृत्तपत्रांनी सनसनाटी आणि फाजील विनोदाचे आविष्करण करणारे तथाकथित ग्रामीण साहित्य छापून ग्रामीण कथेचा घाट बिघडवून टाकला, हा त्यांचा महत्त्वाचा आक्षेप. सौ. विजया सस्ते यांनी आजचे ग्रामीण कथाकार आजच्या ग्रामीण जीवनापासून कसे दुरावले आहेत, यासंबंधीचे घेतलेले आक्षेप महत्त्वाचे होते. त्या सर्वांचे निराकरण करता यावे, असे आजच्या ग्रामीण कथेचे स्वरूप दिसून येत नाही, हे लक्षात आले.

बारामतीच्या चर्चासत्रात सर्वांत महत्त्वाचे विवेचन झाले ते दलितकथेसंबंधी. त्याचे श्रेय प्रा. वसंत दावतरांना दिले पाहिजे. त्यांनी 'दलित वाङ्मय' कशाला म्हणावे याची नेमकी चौकट आखून दिली आणि दलित वाङ्मयाच्या पुरस्कर्त्यांनी यासंबंधाने निर्माण केलेला सारा संभ्रम क्षणार्धात नाहीसा करून टाकला. जे जे पीडित, शोषित ते सारे दलित हे लक्षात घेऊन दलितजीवनासंबंधी कथा ती दलित कथा असे समीकरण त्यांनी मांडले आणि त्या कसोटीवर दलित म्हटली जाणारी सारीच कथा दलित कशी नाही, हे दाखविले. जे थोडेसे दलित म्हणून शिल्लक राहते त्यालाही आपल्या भूमिकेचे पूर्णपणे भान नाही आणि कलात्मकतेच्या दृष्टीने त्यातले किती टिकेल, याचेही त्यांनी दिग्दर्शन केले. दलित साहित्यात आजही मार्क्सयांना महत्त्व का ? यासंबंधी दावतरांची निरीक्षणे महत्त्वाची होती. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बाबूराव बागुल यांच्या कथावाङ्मयाचे विश्लेषण करून दावतरांनी त्यातील 'दलित' म्हणून असणाऱ्या वैशिष्ट्यांचे कच्चेपण उदाहरणांनी सूचित केले. अण्णाभाऊ साठे यांची कथा विभ्रम

असून निश्चित भूमिकेअभावी ती कृत्रिम आणि स्वप्नरंजनात्मक उतरली आहे. त्यातल्यात्यात दलित समाजाच्या समजुती आणि मूल्ये यांची बरीचशी जाण शंकरराव खरातांना दिसते. त्यांचे शब्द, शब्दप्रयोग, वाक्प्रचार यांच्या साहाय्याने त्यांच्या भाषेतील अनोखी व लक्षवेधी चुणूक अनेक उदाहरणांनी दावतरांनी स्पष्ट केली. मात्र त्यांच्या कथेतील व्यक्तींच्या वाट्याला येणारे दुःख आपापसांतील स्पर्धा, भाऊबंदकी, भूक आणि वासना यांच्यामधून येते. ते समाजरचना, सामाजिक भेदभाव, धार्मिक वेड यांतून क्वचितच निर्माण होते. तसेच बहिष्कृततेपासून निर्माण झालेले घनगहिरे प्रसंग-चित्रण आणि व्यक्तित्वाची कुचंबणा दाखविणारी बोलकी चित्रेही त्यांच्या लेखनात फारच कमी आहेत. महार-मांग माणूस आहे ( दौंडी ), म्हारं पायरी सोडून पुढे चालली ( वरात ), चांभार म्हणून पाण्याअभावी तडफडण्याची पाळी ( पाणी ) अशी स्थूलचित्रेही तुरळकच आहेत. त्यामुळे त्यांच्या साहित्याच्या संकल्पनेमध्ये ' दलित '-त्वाला फारच अल्पस्थान आहे. कोणत्याही समाजाचे व त्यातील व्यक्तींचे जीवन समाजरचनेने बांधलेले असते हे खरे असले तरी ही समाजरचना आणि दलितांच्या जीवनातील दारिद्र्य, भूक, वासना, स्पर्धा, संघर्ष यांमध्ये या समाजामधून उद्‌भवलेल्या मूल्यांचा संदर्भ आणि संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न खरातांच्या कथेमध्ये कसा नाही, हे दावतरांनी सोदाहरण स्पष्ट केले. त्या दृष्टीने बाबूराव बागुलांचे कथाविश्व आणखीनच दुबळे कसे आहे, हेही त्यांनी दाखविले. बागुलांच्या ' जेव्हा मी जात चोरली ' आणि ' दसऱ्याचा रेडा ' या कथांमधून समाजजीवन आणि व्यक्ती यांचा संबंध चांगल्या रीतीने स्पष्ट होतो; पण अशा त्यांच्या कथा अपवादात्मक असून त्यांच्या बहुसंख्य कथा खालच्या किंवा भ्रष्ट अशा व्यक्तींच्या जीवनातील व्यक्तिनिष्ठ प्रसंगांनी युक्त आहेत. या व्यक्ती ज्या जातींतून जन्मल्या त्या जातीतील भाषेचा, प्रतिमांचा बागुल उपयोग करीत नाहीत. त्यांची भाषा पात्रांच्या भावच्छटांशी संवाद निर्माण करू शकत नाही, त्यामुळे ती कृतक कशी वाटते हे दावतरांनी असंख्य उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

दलित कथांतील उदाहरणे देऊन, ज्या जीवनप्रसंगांना या कथांतील व्यक्तींना तोंड द्यावे लागते ते दलित नसते तर तोंड द्यावे लागले नसते, अशी अपरिहार्यता दलित कथाकारांना निर्माण करता आली नाही. व्यक्तिगत हेवेदावे, दारिद्र्य, अज्ञान आणि समाजातील दुराव्याची बव्हंशी काल्पनिक जाणीव यातून हे सारे निर्माण झाले असल्याने दलित वाङ्मय हा लक्षणीय लेखनविभाग ठरत नाही. त्यातील कथावाङ्मय तर अगदी तुरळक आणि तुटपुंजे; आणि संपन्न, कलात्मक कथा तर अपवादात्मकच; असे भेदक निरीक्षण दावतरांनी सादर केले.

दावतरांच्या या विवेचनाने दलित वाङ्मयाच्या अनेक नकारात्मक वैशिष्ट्यांना अभ्यासपूर्ण आणि ठामपणे स्पर्श केल्याने नेहमीच्या आक्रस्तळी चर्चेला शिबिरात

पायबंद बसला.

दलित वाङ्मयाच्या चर्चेला वादविवादात्मक स्वरूप येऊ शकले नाही; परंतु 'मराठी कथेतील कलात्मकतेचा पुनर्विचार' या कमल देसाई यांच्या निबंधाने उलटसुलट विचारांची वादळे खूपच प्रकटली. मर्ढेकरांच्या कलाविचाराने मराठी वाङ्मय आणि समीक्षा बंदिस्त झाली आणि सामाजिक परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची मराठी कथेची क्षमताच नष्ट झाली, असा कमल देसाईंच्या म्हणण्याचा मथितार्थ होता. तत्कालीन परिस्थितीत आव्हान पेलण्यासाठी एखादी कलाकृती समर्थ नसेल तर ती कलात्मकता दुबळी ठरते, मग अशी कला खड्ड्यात गेली तरी चालेल, असे त्यांना वाटते. कमल देसाई यांच्या विचारातील सामाजिक बांधिलकीचे नवे भान .कुठून आले असावे, अशी आपापसात कुजबूज होत राहिली, कारण त्यांच्या लेखनात ती कुठेही प्रतिबिंबित झालेली दिसली नव्हती! कलामूल्ये आणि जीवनमूल्ये यांची मर्ढेकरांनी केलेली फारकत यांवर कमल देसाईंनी जोराचा आघात करून साहित्याचा समाज-जीवनाशी अपरिहार्य संबंध आहे आणि समाजजीवनाची आजची मूल्ये अपरिहार्यतेने स्वीकारून लेखन केले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. या भूमिकेवर अनेक आक्षेप निष्पन्न झाले. शेक्सपियर, कालिदासांमध्ये आजच्या जीवनमूल्यांचे कोणते आव्हान आहे? मग त्याला मोठेपण का निर्माण होते? अशासारख्या निरूत्तर करणाऱ्या प्रश्नाने चर्चा हेलकावे खात राहिली. गंगाधर गाडगीळांनी जी. ए. कुलकर्णींच्या कथेवर बोलताना या भूमिकेवर कमालीचा औपरोधिक हल्ला केला. कलासमीक्षेतील या यक्षप्रश्नाला समोरे जाण्याऐवजी बगल देण्यात आली अशासारख्या प्रश्नांची चर्चेतून तड लागणे शक्य नाही, हे त्यावरून लक्षात आले.

अस्तित्ववाद आणि मराठी कथा, कथावाङ्मयप्रकारची नेमकी व्याख्या इत्यादी आणखी काही महत्त्वाचे प्रश्न या चर्चासत्रामध्ये चर्चिले गेले. त्यातील अस्तित्ववादाची चर्चा अगदी असमाधानकारक होती. समारोपाच्या भाषणात प्रा. दावतर यांनी कोणत्याही ललित लेखकाची व साहित्यप्रकाराची समीक्षकाने कुंडली मांडण्याचा प्रयत्नसुद्धा करू नये, असा महत्त्वपूर्ण इशारा दिला. गेल्या वीस वर्षांत मराठी कथा थंडावली म्हणून पुढील दहा वर्षांत तशीच राहील किंवा नवा कोणी समर्थ कथाकार जन्माला येणार नाही, अशा प्रकारची वांझ भाकिते व्यक्तविण्यापासून समीक्षकाने दूर राहिले पाहिजे, हा बोध त्यातून निघाला.

# ४

# माटेमास्तर कॅन्सरने गेले !

नेहरू-लेडी एडविना माऊंटबॅटन यांच्या ' हार्दिक-संबंधा 'चे चित्रण हा सध्या अनेकांच्या कुतूहलाचा व चर्चेचा विषय बनला आहे. यासंबंधात श्रीपाद महादेव माट्यांसारख्या एका सत्प्रवृत्त माणसाचा बळी गेला या श्री. ज. जोशी यांच्या पत्राला अनुसरून ' महाराष्ट्र टाइम्स 'ने दि. १९ मार्च ८५ च्या अंकात एक अप्रतिम अग्रलेख लिहिला आहे. या प्रकरणी माट्यांची झालेली ससेहोलपट ही, त्यांच्या गांधी-नेहरू यांच्या लेखामुळेच झाली असे नसून त्यापाठीमागे मानवी मनाच्या खेळीचा, गुंतागुंतीचा उद्‌बोधक असा पट उभा आहे.

माट्यांचे महाराष्ट्र साहित्य परिषदेतील आगमन हे माट्यांच्या जीवनातले एक मोठे वादळ ठरले. माटे परिषदेत कार्याध्यक्ष म्हणून १९४३ मध्ये येण्यापूर्वी माधव जूलियनांच्या चाहत्यांनी मोठ्या प्रयत्नाने त्यांच्या स्मृत्यर्थ टुमदार असा ' पटवर्धन हॉल ' बांधला होता. विठ्ठलराव घाटे हे त्याचे मुख्य प्रवर्तक होते. माट्यांनी परिषदेत पटवर्धनांच्या डोक्यावर ' चिपळूणकर हॉल ' बांधण्याची प्रतिज्ञा केली. माट्यांना माधव जूलियनांच्या कवितेबाबतीत अगत्य होते, परंतु नैतिकतेच्या काही सनातन कल्पना मनात पक्क्या होत्या. माट्यांनी देणग्या जमवून आपली प्रतिज्ञा पुरी केली, परंतु त्याचबरोबर पाचशे माणसे असतील असा आणखी मोठा हॉल शेजारीच बांधण्याच्या योजनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी हालचाली सुरू केल्या. घाटेवादी मंडळींना हे एक आव्हान होते आणि चिपळूणकरांच्या नावाने, चिपळूणकरांच्या प्रतिगामी विचाराच्या पार्श्वभूमीवर, पटवर्धनांबद्दल प्रयत्नाने उभे केलेले स्मारक झाकोळले जावे, हे त्यांना आतून अस्वस्थ करण्यास पुरेसे होते. त्यांनी, माट्यांनी उभी केलेली दहा खंडी मराठी वाङ्मयेतिहासाची योजनाच प्रयत्नपूर्वक उधळून लावली. माट्यांच्या अंगी संघटनशक्ती

होती आणि धडाक्याने देणग्या उभ्या करण्याची धमक होती. मास्त्यांच्या योजनेला सुरूंग लागल्याने चडफडून मास्त्यांनी ते काम सोडून दिले. त्या कामाची गेल्या तीस वर्षांत झालेली दैना लक्षात घेता, झाले हे बरे झाले नाही, हे लक्षात येते.

ज्या नेहरू प्रकरणामुळे मास्त्यांना परिषदेतून उठविण्यात आले, त्या प्रकरणाची हकीकत फार गमतीची आहे. मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचे १९४९ च्या डिसेंबरमध्ये माटेमास्तरांचे एक व्याख्यान ठेवण्यात आले. त्या दिवशी बाबासाहेब आंबेडकर मुंबईत होते. त्यांनी निरोप पाठविला की, माटे मास्तरांशी गप्पा मारण्यासाठी आपण येत आहोत. मास्त्यांचे व्याख्यान होईपर्यंत बाबासाहेब ग्रंथालयात बसून होते. व्याख्यानानंतर चहापानाच्या वेळी नेत्यांच्या नैतिकतेचा विषय गप्पांच्या ओघात निघाला.

‘या देशात नैतिकतेच्या दृष्टीने दोघा राजकीय नेत्यांचेच नाव घ्यावे लागेल.’ बाबासाहेब म्हणाले-

‘ते कोण बुवा ?’ मास्त्यांनी विचारले.

‘एक लोकमान्य टिळक आणि दुसरा...’ बाबासाहेब थांबले.

‘दुसरा कोण ?’ मास्त्यांनी अधिरतेने विचारले.

‘दुसरा तुमच्या समोर बसला आहे.’ बाबासाहेब मिष्किलपणाने म्हणाले.

माटे हसले. परंतु त्यांची निराशा झाली होती. दुसरे नाव नेहरूंचे निघेल असे त्यांना वाटत होते. तरुणपणीच पत्नीचे निधन झाल्यानंतर नेहरू विधुर राहिले होते याचे मास्त्यांना मोठे कौतुक होते. त्यांनी तसे म्हटल्यावर बाबासाहेब उपहासाने हसले आणि त्यांनी नेहरू आणि लेडी माऊंटबॅटन यांनी दिल्लीत उघडपणे काय धुमाकूळ घातला आहे; याची वर्णने मास्त्यांना ऐकवली. माटे अस्वस्थ झाले. तेथून पुण्याला गेल्यानंतर नव्या चिपळूणकर हॉलकरता देणग्या गोळा करण्यासाठी त्यांनी रात्री प्रस्थान ठेवले. जाण्यापूर्वी ‘प्रभात’साठी लेख लिहून त्यांनी नेहरूंबद्दल उपाहासाने बरेच काही लिहून टाकले.

अमळनेरला पोचल्यानंतर त्यांच्याबरोबर गेलेल्या म. श्री. दीक्षितांनी त्यांच्या हातात टाइम्सचा अंक देऊन नेहरू – एडविना यांचे पोहण्याच्या पोशाखातील छायाचित्र दाखविले. भडकलेल्या मास्त्यांनी लगोलग दुसरा लेख लिहिला आणि ‘प्रभात’ कडे पाठवून दिला. संध्याकाळी थोडे शांत झाल्यावर हे दोन्ही लेख कडक झाले आहेत हे त्यांच्या लक्षात आले म्हणून ते छापू नका म्हणून त्यांनी पत्र पाठविले. परंतु ते छापले गेले होते आणि भडका उडाला. त्यांच्या हितशत्रूंनी त्यांच्याविरुद्ध काहूर उठविले. त्यांना परिषदेच्या कार्याध्यक्षपदाचा राजीनामा देणे भाग पाडले. मास्त्यांनी माफी मागणारे पत्रक काढून ते दीक्षितांकडे दिले. त्या पत्रकाच्या छापलेल्या प्रती दीक्षितांनी हळूच लकडी पुलावरून नदीत सोडल्या.

संमेलनामध्ये त्यांच्याविरुद्ध निषेधाचा ठराव आणण्यात आला. न. र. फाटकांनी तो थोपवून धरला. मुसलमानांना चिथवण्याचा आरोप ठेवून माट्यांची रवानगी येरवड्याच्या तुरुंगात करण्यात आली. गंमत अशी की, त्यांनी तेथे 'प्रेमिकांचे अंतरंग' हे पुस्तक लिहून जगातल्या अनेक प्रेमिकांचे मनसोक्त गुणगान केले होते. डोके भडकल्याने नेहरूंच्या प्रेमाचे रहस्य त्यांच्या रसिक मनाने जाणण्याचे नाकारले होते.

त्याच्याही पुढची गंमत म्हणजे, मुंबईत फोर्ट विभागात सिद्धार्थ महाविद्यालयाच्या ज्या दोन इमारती आहेत, त्या जपान्यांच्या म्हणजे शत्रूंच्या इमारती म्हणून लिलावात काढल्या होत्या.त्यासाठी तेरा लाख रुपयांची गरज होती. आंबेडकर त्या वेळी भारताचे कायदामंत्री होते. त्यांनी शिक्षणखात्याकडे दहा लाखांच्या कर्जाची तडकाफडकी मागणी केली. हा मागणीअर्ज मंत्रिमंडळासमोर येऊ दिला नाही; कारण तेथे त्यांना विरोध झाला असता. त्यांनी तो लेडी माऊंटबॅटन यांच्याकडे नेला. रविवारी नेहरूंना गाठून एडविनाने त्यावर नेहरूंची सही घेतली आणि सोमवारी चेक बाबासाहेबांच्या हाती ठेवला.

माटे हिंदुत्वनिष्ठ असले तरी माट्यांचे अस्पृश्यता-निवारण्याचे कार्य कित्येक हिंदुत्वनिष्ठांना कसेसेच वाटावयास लागणारे होते. माट्यांची हिंदुत्वनिष्ठा लक्षात घेऊन माट्यांच्याकडे 'हिंदुत्वकोशा'ची उभारणी करण्याचे कार्य न. चिं. केळकरांच्या पुढाकाराने सोपविण्यात आले. पु. ग. सहस्रबुद्धे, अरविंद मंगरूळकर इत्यादी आपल्या विद्यार्थ्यांना व तरुण सहकाऱ्यांना घेऊन, अष्टौप्रहर खपून माट्यांनी या कोशाची उभारणी केली. परंतु त्याच सुमारास शि. ल. करंदीकरांनी लिहिलेल्या 'सावरकर चरित्रा'स केळकरांच्या प्रस्तावनेबद्दल 'झंकार' साप्ताहिकात माट्यांनी प्रतिकूल टीका लिहिली, विशेषतः त्यातील 'एखाद्याला प्रस्तावना लिहावयास सांगितली; पण जर का ती चरित्रविषयक पुरुषाला अपकर्षक असली तर ती (चरित्रकाराने) छापलीच पाहिजे असे नाही', हे वाक्य केळकरांना फार झोंबले. त्यांनीही, 'एखाद्याला एखादे काम करावयास सांगितले तर झालेले काम छापलेच पाहिजे असे नाही', असे म्हणून माट्यांचा हिंदुत्वकोश गाबवटून टाकला.

अस्पृश्यांनी त्यांच्या समाजसेवेच्या कार्यात काही 'बामणी कावा' आहे म्हणून त्यांची हेटाळणी केली आणि ब्राह्मणांनी त्यांना 'महार माटे' म्हणून सदाशिवपेठेत राहावयास जागा मिळू नये अशी व्यवस्था केली. माट्यांना कर्ज काढून टिळक रोडवर स्वतःचे छोटे घर बांधून तेथे राहावे लागले.

सगळीकडे माट्यांची या प्रकारे 'ना घरका ना घाटका' अशी अवस्था झाली.

नुकतेच मी कॅन्सरविषयक एका पुस्तकात वाचले की, दीर्घ मनस्तापाचो परिणती ही कित्येक वेळा कॅन्सरमध्ये होते.

माटेमास्तर कॅन्सरने गेले!

❀

५

# स्त्रियांची विनोदबुद्धी

घाटपांड्यांच्या घरी त्यांच्या मुलाच्या तेराव्यासाठी गेलो होतो. घाटपांड्यांचा इंजिनिअर असलेला कर्तबगार तरुण मुलगा अपघातात मारला गेला होता. नात्यातलेच असल्यामुळे तेराव्याला जावे लागले होते.

घाटपांड्यांचे घर सुधारकी वळणाचे. मुलगा गेल्याचे फारसे जाणवू नये असे वातावरण होते. त्यांची विधवा सूनही घरात हसत खेळत वावरत होती. केशवपनासारख्या मोडीत काढलेल्या गोष्टींचा तेथे मागमूसही नसणे साहजिक होते परंतु कपाळावरचे लालचुटूक कुंकू आणि गळ्यातील ठसठशीत दागिने तसेच ठेवून ती लग्नघरात वावरल्याप्रमाणे हवे नको ते पाहत होती. बावरलो होतो ते आम्ही जमलेले नातेवाईक. मी तर विशेषच.

आपल्या अत्याधुनिक राहणीचा, वृत्तीचा घाटपांड्यांना रास्त अभिमान दिसला. सुनेची हुशारी, तिचे शिक्षण आणि सौंदर्य याचे त्यांना अपरंपार कौतुक दिसले. खाली स्वैपाकाला वेळ होता म्हणून आम्ही वर गप्पा मारीत बसलो होतो. इतक्यात घाटपांड्यांनी फ्रिजमधून थंडगार बियरच्या बाटल्या काढल्या. चिजलिंग्ज आणली. दुपारच्या उन्हात बियर पाहून बरे वाटले. परंतु अशावेळी घाटपांड्यांनी बियर आणावी हे काहीसे चमत्कारिकही वाटले. ग्लास भरून तो तोंडाला लावणार इतक्यात खालून सुनेचा आवाज आला

'अंकल, माझ्या वाट्याची ठेवा बरं का, संपवू नका.'

'हो हो, लवकर ये' सासऱ्यांनी ओरडून सांगितले.

आणि सुनीता आमच्याबरोबर बियर पीत गप्पा मारू लागली.

बोलता बोलता अनेक गोष्टी निघाल्या. शासकीय परिभाषेसंबंधाने पु. ल. देशपांडे

यांनी केलेल्या भाषणातील काही गमती मी सांगून संभाषणात रंग भरीत होतो.

'पोलिस सूत्राकडून विश्वसनीयरीत्या समजते की' अशा पद्धतीच्या नेहमी हटकून दूरचित्रवाणीवरून आणि रेडिओवरून दिल्या जाणाऱ्या बातम्यांना उद्देशून पु. ल. म्हणाले होते.

'हे सूत्राकडून वगैरे काय भानगड आहे याचा मी शोध घेऊ लागलो तेव्हा कळले की इंग्रजी 'सोर्स'चे हे भाषांतर आहे. उद्या मंत्र्याच्या बायकोकडून एखादी बातमी कळली हे सांगताना, मंत्र्यांच्या मंगलसूत्राकडून विश्वसनीयरीत्या कळते की, अशी हे सुरुवात करणार...'

जमलेली मंडळी खळखळून हसत होती. इतक्यात सुनीता फटकन म्हणाली, 'तुमच्या पीएलंना हे कळावयास हवे की, राजकारणातल्या गुप्त गोष्टी कधी मिसेस-कडून म्हणजे मंगळसूत्रांकडून कळत नाहीत, त्या मंत्र्यांच्या किंवा उच्च अधिकाऱ्यांच्या मिस्ट्रेसेसकडून कळतात. त्यामुळे, 'कामसूत्राकडून विश्वसनीयरीत्या कळते की', असे म्हटले पाहिजे.'

सुनीताच्या कामसूत्राच्या कोटीने वरच्या दिवाणखान्यात एकदम शांतता पसरली. डोक्यावर बर्फाचा गोळा पडावा तशी मंडळी गप्पगार झाली.

'खाली भटजींना काय पाहिजे बघून येते' म्हणून सुनीता खाली पळाली.

घाटपांड्यांना सावरण्यास बराच वेळ लागला. सुनीताने काहीही केले तरी चालणारे हे सासरेबुवा तिच्या त्या कोटीने हबकले होते.

'Woman and wit! Fantastic!!' ते म्हणाले आणि बियर प्यायची विसरूनच गेले!

घाटपांड्यांची सून नाजूक नखऱ्याची, घरात सासऱ्याकडून कौतुक करून घेणारी. परंतु इंग्रजीचे प्राध्यापक असल्याने घाटपांड्यांची पक्की समजूत होती की, बायकांना तीन गोष्टी काही केल्या येणार नाहीत.

एक म्हणजे त्या कधी उत्तम विनोदी लेखिका होऊ शकणार नाहीत.

दुसरे म्हणजे त्या कधी मोठ्या नाटक लिहिणाऱ्या होणार नाहीत.

आणि तिसरे म्हणजे, त्या उत्तम गाऊ शकतील, परंतु संगीतातील उत्तम रचना (Musical Compositions) त्या कधी करू शकणार नाहीत.

घाटपांड्यांना Oxford Dictiouary of Quotations मधील स्त्रियांबद्दलची मते (बहुतेक पुरुषांची) जवळजवळ पाठ होती. बायका जगावर राज्य करतील, प्रधानमंत्री, अध्यक्ष होऊ शकतील परंतु विनोदाचे इंद्रिय त्यांना परमेश्वर द्यायलाच विसरलाय, हा ग्रह केवळ वाचूनच नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवानेही घाटपांड्यांचा पक्का होता. हां, त्या घरात गमतीने बोलतील, टोचून बोलतील, पुलंच्या आजी हरितात्यांना उद्देशून बोलत होत्या तशी गंमत करतील, पुरुष जवळपास नाहीत हे पाहून एखादी चार बायकांत

पुरुषांच्या छान नकला करील, परंतु कल्पक, बुद्धिचातुर्याने युक्त अशा कोट्या ती करील किंवा त्या चांगल्या विनोदी लेखिका होतील ही गोष्ट सुतराम शक्य नाही! बायका कशा? तर नाजुक नखऱ्याच्या, प्रेम करायला आणि करवून घ्यायला हपापलेल्या, बारीकसारीक गोष्टींनी हिरमुसणाऱ्या, मनात कोटी जागी झाली असता नवी साडी पाहिल्यावर ब्रह्मांड पाहिल्याच्या आनंदात दंग होणाऱ्या आणि वटसावित्रीच्या दिवशी कितीही शिकल्या तरी मनातल्या मनात का होईना, जन्मोजन्मी हाच पती हवा म्हणणाऱ्या...' इश्श, अय्या ' कधीही न विसरणाऱ्या आणि त्यातच जग हरवून बसलेल्या. The Natural superiority of Women लिहिणाऱ्या ॲशले मॉंटेग्यूनं जगात बायका सारे काही करू शकतील असं हिरीरीनं लिहिलंय, परंतु त्यांच्या विनोदबुद्धीचं नावही काढलं नाही! का बरं?

जॉर्ज मेरिडिथ आपल्या कॉमेडीवरच्या निबंधात म्हणाला होता की, ' सामाजिक समानता असल्याखेरीज विनोद शक्य नाही. जिथे स्त्रियांना सामाजिक दर्जा नाही तिथे विनोदाने तोंड काळे केलेच म्हणून समजावे!'

मेरिडिथच्या या विधानाला कित्येक युगे गेली. आज स्त्रियांना विशेषतः सुशिक्षित स्त्रियांना समान दर्जा नाही असे कोण म्हणू शकेल? तरीही उत्तम विनोदी लेखन करणाऱ्या स्त्रिया का होऊ शकत नाहीत?

' समजतात बरं असली बोलणी!' या एका वाक्याने पुरुषांच्या वादविवादाच्या खुमखुमीला खिळखिळं करणाऱ्या आणि रागाच्या भरात घरातील वस्तूंची आदळआपट करणाऱ्या स्त्रिया पाहिल्या की त्यांच्या बुद्धिमत्तेच्या अफाट कल्पना मनातल्या मनात जिरून जातात. घाटपांड्यांप्रमाणे त्यांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक करण्याच्याच त्या लायकीच्या अशी सर्वसाधारण तमाम पुरुषवर्गाची कल्पना का असावी? साहित्यिकाच्या स्वाभिमानशून्य वृत्तीवर सदा रागावलेल्या दुर्गाबाईंनी साहित्य-संमेलने सहजगत्या उधळली जाऊ शकतात हे दाखविले परंतु थोडेसे हसतखेळत साहित्यिकांना गंमतीने चिमटे घेत, त्यांना ओशाळे करीत साहित्यसंमेलने गाजविण्याचे तंत्र त्यांना का साधू नये? एकंदरीत लग्न न झालेली बाई सदा रागावलेली आणि लग्न झाल्यानंतर सदा धास्तावलेली असे तिने का राहावे? काही कळत नाही.

लॉर्ड चेस्टरफील्ड एकदा आपल्या मुलाला म्हणाला होता ( खरं म्हणजे, आमच्या वडिलांनीही म्हटलं होतं ), ' बाबारे, तुला तुझ्या आईबद्दल आणि आणखी कुणाबद्दल कितीही प्रेम असलं तरी एक गोष्ट लक्षात ठेव की, बायका वरच्या बाजूनं थोड्या कमीच असतात!'

चेस्टरफील्डच्या मुलानं बापाचं म्हणणं मुकाट्यानं ऐकून घेतले. आम्ही मात्र चटकन म्हणालो असतो की,

' म्हणजे बाबा, वरच्या बाजूनं थोडं कमी असणारं म्हणजे उत्कट प्रेम करणारं.

थोडं जास्त असणारं म्हणजे तत्त्वज्ञानाची चऱ्हाट वळणारं आणि भक्कम असणं म्हणणे विनोदी लेखक होणाऱ्या योग्यतेचं असणं, असंच ना!'

'अगदी बरोबर, बेटा तू विनोदी लेखक व्हायला नक्कीच पात्र आहेस!'

पण घोड्यानं कुठं पेंड खाल्ली कुणास ठाऊक!

मी एका बँकेच्या कचेरीत मॅनेजरशी गप्पा मारीत बसलो होतो. इतक्यात एक जोडपं दरवाजा उघडून आत आलं. लोणावळ्याला का कुठं एक रंगाचा छोटा कारखाना त्यांनी काढला होता आणि तो वाढविण्यासाठी त्यांना कर्ज हवं होतं. ओळखी-पाळखी झाल्या. पतीनं पत्नीची ओळख करून देताना म्हटलं, 'या इंद्रायणी सावकार. चांगल्या लेखिका आहेत, वक्त्या आहेत, उत्तम गृहिणी आहेत. आमच्या कारखान्याच्या सचिव आहेत आणि विशेष सांगायचं म्हणजे, त्या विनोदीसुद्धा चांगलं लिहितात बरं का!'

'असं का! वा, वा!! ही विशेषच गोष्ट झाली. मग तुम्हाला कर्ज दिलंच पाहिजे.' मॅनेजर म्हणाले.

सिरीट ह्यू-जोन्स नावाच्या एका लेखिकेची ओळख 'ती विनोदी लेखिका आहे' असं म्हटल्यानंतर पुरुषांची जी प्रतिक्रिया झाली त्याचे वर्णन करताना तिने म्हटले होते. 'एखाद्या कवीला शिंगे आहेत, नाकावर तांबडा गहू आहे, तिला दोन डावेच पाय आहेत आणि जेवण्यापूर्वी पंधरा मिनिटे शीर्षासन करण्याची सवय तिला आहे असं म्हटल्यावर पुरुषांना जितकं आश्चर्य वाटत नाही त्याच्या शतपटीनं 'ती विनोदी लेखिका देखील आहे बरं का?' असं म्हटल्यानं का वरं वाटावं ते कळत नाही. पण वाटतं हे खरं!'

बायकांनी बायकांसारखं असावं. ते सोडून विनोद करणारी ती बाई कसली? असंच साऱ्यांना वाटतं. विनोद करणाऱ्या बाईकडे लोक संशयानं पाहतात आणि तिच्यापासून दूर पळतात. भलत्यावेळी भलतंच काही तरी म्हणून ती रंगाचा बेरंग करील याची त्यांना भीती वाटते.

आणि पुरुषांच्या या वृत्तीलाच बायका घाबरतात. फट म्हणता ब्रह्महत्या व्हायची त्यांना भीती वाटते आणि जिथे भीती वाटते तेथून विनोद पळालाच. म्हणून खुशाल समजावे. मुलाबाळांच्या रगाड्यात वैतागलेली बाई पुरुषाला 'दुसरं लग्न खुशाल करा मी मजेत राहीन' म्हणते परंतु असं म्हणण्याचं धाडस पुरुष करणार नाही हे तिला ठाऊक असतं. म्हणून उगीच विनोद करायला जावं आणि पस्तावण्याची पाळी यावी हे तिला सोसण्यासारखं नसतं. सोसण्यासारखं असणं ही विनोदाची तर पहिली पायरी आहे.

आता सामाजिक समता समता म्हणतो ती स्त्रियांच्या वाट्याला किती येते? खेडोपाडी स्वयंपाकघरांत राबराब राबणाऱ्या लक्षावधी स्त्रियांचे सोडून द्या, परंतु

चांगल्या शिकलेल्या, बुद्धिमान स्त्रियांच्या बाबतीत कुठे समानता दिसते? मुलीच्या बाजूनं सांगून जायचं असतं, मुलगी नेऊन दाखवायची असते, तिचीच पत्रिका मागायची किंवा दाखवायची असते. यांत कुठे आणि कितपत फरक पडलाय? दोघेही नोकरी करणारे असल्यावर सकाळी लवकर उठून पाणी भरून चहा करून नवऱ्याला उठवायचं कुणा बाईच्या नशिबातून सुटलंय. एखादीचं सुटलं असलं तरी भात-पोळी करून डबा घेण्याचं काम तिलाच करावं लागतं! अशावेळी तिनं इब्सेनच्या नोराचा धडा गिरवायचा ठरविलं तर किती मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय कुटुंबं जाग्यावर राहतील?

कोटी किंवा विनोद ही एक शक्ती आहे, सामाजिक शक्ती आहे. दोन्ही बाजू तुल्यबळ असल्या तर खेळात रंगत भरते. परंतु एकंदर जगाच्या समाजरचनेत स्त्रियांचं ऐकून घेण्याबाबतीत पुरुष दुबळा आहे. त्याला या खेळात नेहमी सरसी हवी असते. तशी झाली नाही तर खेळातल्या हट्टी मुलाप्रमाणं तो संसाराचा सारीपाट निष्ठुरपणानं उधळायला बसतो. पुरुषांच्या या वृत्तीची जाणीव असल्यानं बायकांनी विनोदाचे शस्त्र कायमचे शमीच्या वृक्षावर टांगले आहे. जुन्या कहाण्या आणि लोककथा पाहा ना? वाईट मुलगी आळशी स्वार्थी असते आणि चांगली मुलगी सुंदर, सद्‌गुणी, नम्र आणि उत्कट प्रेम करणारी असते. ती हसतखेळत का होईना राजपुत्राला एखादा टोमणा मारते असं दृश्य दिसणार नाही. स्त्री पुरुषाची फजिती करते ती त्याच्याशी अप्रामाणिक राहून. आमच्या फार्समध्ये पाहा. नादान पुरुषांना धडा शिकविण्यासाठी त्यातल्या सगळ्या नायिका व्यभिचारिणी बनतात. झाशीच्या राणीच्या राज्यात एक भंगीण ही पद्मिनी जातीची सुंदर स्त्री होती. ती आपल्याकडे चोरून येणाऱ्या पुरुषाचे जानवे काढून घेत असे. तिच्याबद्दल खूप आरडाओरडा झाला तेव्हा तिने आपल्याकडे भरलेल्या चारपाच रांजणांतून सगळ्या अधिकाऱ्यांची जानवी काढून दाखविली होती! असा विनोद एखादीच करू शकते. याउलट अनेक बायकांच्या नाटकशाळा बाळगणारे पुरुष शेकड्याने सापडतील!

स्त्रियांमधील विनोदबुद्धी ही त्यांच्या कुटुंबातील सामर्थ्याचे, अधिकाराचे कर्तबगारीचे आणि बुद्धिमत्तेचे दिग्दर्शक असते. धैर्य, स्वातंत्र्य, स्वाभिमान, अस्मिता आणि मनाचा खंबीरपणा यांमुळे या विनोदबुद्धीला धार येते.

असे स्वातंत्र्य जिथे असते तिथे स्त्रियांची विनोदबुद्धी निश्चितपणेच धारदार असते. इलिझाबेथ राणीला भाग्यवशात हे स्वातंत्र्य लाभले होते आणि तिनं त्याच्या बळावर तत्कालीन साऱ्या मुत्सद्द्यांना हैराण करून सोडलं होतं. भारताच्या स्त्री पंतप्रधानासमोर सारे मुत्सद्दी नांग्या टाकून बसले आहेत आणि त्यांच्याबद्दलचे विनोद करून करून साऱ्या विनोदी लेखकांची आणि व्यंगचित्रकारांची लेखणी बोथट होऊन बसली आहे, हे दिसतेच आहे. विनोदकारांची अवस्था शिखंडीसारखी करण्याचे हे सामर्थ्य म्हणजे

वैयक्तिक शक्तीचे आणि कर्तृत्वाचे प्रतीक होय.

पुरुषांना अशा शक्तीचा धाक वाटतो आणि स्त्रियांना धाकात, कौतुकात, मुलाबाळात, नटण्यामुरडण्यात गुंतवून ते निर्धास्त होतात आणि वर पुन्हा हाकाटी करावयास मोकळे होतात...

"स्त्रियांना विनोदबुद्धी नसते"...

%

# ६

# खेकडे आणि खेकटी !

जानेवारीच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात नागपूरकरांनी सांस्कृतिक कार्यक्रमांची धमाल उडवून दिली. संत साहित्य संमेलन, मराठी नाट्य संमेलन, विदर्भ साहित्य संघाचा वर्धापन दिन, साहित्य अकादमीने भरविलेली डॉ. केतकर आणि राम गणेश गडकरी यांची चर्चासत्रे, बेहरे व्याख्यानमाला आणि राम गणेश गडकऱ्यांच्या स्मृति-दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाने सावनूर आणि नागपूर येथे केलेले कार्यक्रम...

साहित्य अकादमीने भरविलेल्या चर्चासत्रासाठी आम्ही नागपूरला गेलो ते ऐन मकरसंक्रातीच्या दिवशी ! आदल्या रात्री नाट्यसंमेलनाचे सूप वाजले होते. त्याचे पडसाद अद्याप वातावरणात घुमत होते. नागपूरकरांच्या साक्षीने मराठी नाट्य परिषदेला वयात आणण्याचा कार्यक्रम पुण्या-मुंबईच्या लोकांनी नागपूरला सादर केला होता आणि तो खूप रंगला होता. हा कार्यक्रम मध्यरात्रीला संपवून नागपूरकर रसिक घरोघर पांगले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी विदर्भ साहित्य संघात साहित्य अकादमीच्या चर्चासत्राच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम आहे, हे ते पूर्णतः विसरून गेले ! पुण्याच्या साहित्य-परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहाशी तोडीस तोड म्हणून बांधलेले एवढेसे गडकरी-सभागृह, पण तेथे पटकन मोजता येतील एवढी चर्चासत्रासाठी बाहेरून आलेली मंडळी जमलेली ! डॉ. भाऊसाहेब कोलत्यांना ते दृश्य पाहावले नाही. त्यांनी आपल्या भाषणात आपल्या महानुभावी अभिजात वाणीने नागपूरकरांना चांगलेच फटकारले. ते म्हणाले, " साहित्य अकादमीने मराठी साहित्यिकांचा गौरव करण्यासाठी एवढ्या अगत्याने दिल्लीहून नागपूरला झेप घ्यावी आणि नागपूरकरांनी त्याला प्रतिसाद देऊ नये, याला काय म्हणावे ? अशा महत्त्वाच्या कार्यात अंगचोरपणा करायचा आणि वर पुन्हा आमची उपेक्षा होते म्हणून ओरडत राहायचे.

याला दांभिकपणाखेरीज दुसरे नाव नाही!"

भाऊसाहेबांचे फटकारणे अंगावर झेलत असताना, मला याद येत होती, नागपूरमध्ये वेळोवेळी घालविलेल्या काही प्रसंगांची! बेहेरे व्याख्यानमालेत व्याख्याने देण्यासाठी १९७१-७२ मध्ये मी गेलो होतो तेव्हा 'आजचे व्याख्याते पुण्याहून आलेत, परंतु वृत्तीने मात्र पुणेकर नाहीत' या ओळख करून देणाऱ्यांच्या वाक्याने समस्त श्रोतृवर्ग फक्कन हसला होता. त्यानंतरच्या दोन-तीन दिवसांत पुण्या-मुंबईकडच्या लोकांबद्दलच्या नागपूरकरांच्या भावना सातत्याने कानावर पडल्या होत्या.

कै. भाऊसाहेब माडखोलकरांनी सांगितलेल्या अशा गोष्टींची यादी करायला गेलो तर ती फार मोठी होईल.

नागपूर एक्स्प्रेसकडे जाणाऱ्या गाडीत बायकांच्या डब्यात एक कोळीण खेकड्यांनी भरलेली पाटी घेऊन आली. सगळ्या बायकांच्यामध्ये तिने ती पाटी ठेवली. अगोदर कुतूहल म्हणून बाया ते खेकडे पाहाण्यासाठी अवतीभवती जमल्या. थोड्या वेळात खेकडे वर चढू लागले तेव्हा त्या बायका घाबरल्या.

"ए बाई, तुझ्या पाटीवर झाकण ठेव" त्या किंचाळल्या.

"बायांनो, काय बी होणार नाय, घाबरू नगासा." ती म्हणाली.

पण बाकीच्या बायका खूप घाबरल्या होत्या. खेकडे आंगठा धरतात आणि बोटे रक्तबंबाळ झाली तरी सोडत नाहीत, या धास्तीने त्या गांगरल्या होत्या. एवढ्यात एक नागपुरी बाई म्हणाली.

"घाबरू नका हो, ते खेकडे खरंच काही करणार नाहीत, कारण ते पुण्याचे आहेत!"

आणि ते खरंच होते! कारण एक खेकडा पटीतून वर चढायला लागला तर दुसरे खेकडे लगेच त्याचे पाय ओढीत!

एकदा म्हणे, बापूजी अण्यांकडे एक माणूस आला आणि म्हणाला.

"बापूजी, मी अमेरिकेला जातो आहे. तुमच्या ओळखीचे पत्र द्या."

बापूजींनी त्याला लगेच प्रेसिडेंट रूझवेल्टच्या नावाने चिठ्ठी दिली. व्हाईट हाऊसमध्ये तो मजेत राहिला. बापूजींच्या चिठ्या घेऊन लंडनला १० डाऊनिंग स्ट्रीटमध्ये लोक राहून आले. प्रभाकर पाध्यांना जमले नाही, परंतु बापूजींच्या चिठ्ठीने मुसोलिनीचाही पाहुणचार अनेकांनी घेतला. परंतु एकदा एका गृहस्थास पुण्यामध्ये राहण्यासाठी चिठ्ठी हवी होती. बापूजी त्याच्या पहिल्या वाक्यानेच ताडकन उडाले. काही वेळ बोलेनातच. शेवटी त्या गृहस्थाने खूप आर्जवे केली तेव्हा बापूजींनी चिठ्ठी लिहिली व देताना त्याला म्हणाले,

"हे बघा, ही चिठ्ठी मी लोणावळ्याच्या आगरवाल यांच्यासाठी दिली आहे. तुम्ही तेथे उतरा. कामासाठी लोकलने पुण्यास जा. काम संपले की लगेच पुन्हा मुक्कामास

लोणावळ्यास जा."

पुणेकरांच्या आदरातिथ्याचा कंगालपणा वर्णिण्यात आणि वैदर्भीय आदरातिथ्याचा मारा करण्यात नागपूरकरांना कमालीचा आनंद होतो. वर्धा येथे भरलेल्या साहित्य संमेलनात प्रा. मा. गो. देशमुखांनी आभार मानताना म्हटले होते. "म्हशीपुढे आंबोण ठेवल्यावर ती चांगले दूध देते. हे लक्षात घेऊन आम्ही पुणे-मुंबईकरांच्या भोजनाची व्यवस्था उत्तम ठेवली होती. त्यामुळे तर परिसंवाद कमालीचे रंगले."

या सगळया प्रकरणातील विनोद बाजूला ठेवला तरी. पुण्या-मुंबईकडे ज्या बऱ्याचशा वाङ्मयीन आणि अन्य सांस्कृतिक हालचाली केंद्रीभूत झाल्या आहेत, त्याचे नागपुरकरांना वैषम्य वाटते. विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापनदिनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना गंगाधर गाडगीळांनी, 'नागपूरकडे पुण्या-मुंबईसारख्या प्रकाशनसंस्था मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या पाहिजेत. ग्रंथालीसारखी संस्था निघाली पाहिजे' असे म्हटले तेव्हा नागपूरकरांना पुन्हा सारे काही जाणवले असणार, यात शंका नाही. वास्तविक आज वयाच्या ९५ व्या वर्षी डॉ. मिराशी जे संशोधनकार्य करीत आहेत, ऐंशीच्या जवळपास आलेले डॉ. कोलते, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, डॉ. अ. न. देशपांडे इत्यादी अभ्यासक अविरतपणे आपल्या कामात ज्याप्रकारे गढलेलं आहेत, ते पाहता मन कृतज्ञतेने आणि कौतुकाने भरून येते आणि विदर्भ पुण्या-मुंबईचा वाद हवेत विरून जातो!

नागपूरच्या मुक्कामात नाट्यपरिषदेच्या आणि साहित्य परिषदेच्या अध्यक्षीय निवडणुकीसंबंधाने बोलणे निघाले.

नाट्यपरिषदेच्या अध्यक्षांचा मुंबईत भव्य सत्कार होऊन, त्याच्यातून स्थिर निधीमध्ये मोठ्या रकमेची भर टाकण्यात परिषदेच्या कार्यकर्त्यांना यश आले. नेमकी हीच गोष्ट नागपूरमधल्या संमेलनात भांडणास कारणीभूत होऊन मानापमानाचा प्रयोग रंगमंचावर अतिशय रंगला; आणि त्याचे पडसाद वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहिण्यापर्यंत दुमदुमत राहिले!

साधारणतः साहित्य-परिषदेच्या आणि नाट्यपरिषदेच्या अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षपदाकडे सन्मान म्हणूनच पाहावे आणि वर्षभरात त्या सन्मानात मशगूल राहून परिषदांसाठी काही काम करू नये असा संकेत आहे. या संकेताचा भंग करण्याची पणशीकरांची प्रतिज्ञा इतरांना साहवली नाही. आणि त्यातूनच असंतोषाचा भडका उडाला.

साहित्य-संमेलने भरविणारी 'महामंडळ' नावाची जी संस्था आहे. तिच्याकडे कसलाही निधी नसल्याने केवळ संमेलने भरविणे हे तिचं काम. मध्यंतरी मधुकर आष्टीकरांनी अंतुल्यांकडून थोडा पैसा मिळविला होता, तो औरंगाबादकरांनी कोर्ट-कचेऱ्यात घालवून असल्या भलत्या मार्गाने मिळविलेल्या पैशाचे परिमार्जन केले! पुणे मुंबई विदर्भाच्या भांडणात मराठवाड्याने मारलेली ही पाचर त्यांच्या दूरदर्शित्वाची निदर्शक ठरावी!

पुढच्या वर्षी आहे याच अध्यक्षांचा विळखा पडण्याची नाट्यपरिषदेत चिंता पडली,

तर साहित्य-संमेलनाला अध्यक्ष मिळण्याची मारामार झाली आहे. नांदेडकरांना हवा असलेला अध्यक्ष, अनेक नामवंतांनी संमतिपत्रे देण्याचे नाकारल्यामुळे, मिळणे दुरापास्त असल्याची जाणीव झाली आहे. कदाचित त्यामुळेच त्यांच्या तारखा पुढे पुढे चालल्या असण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यातील काही लोकांचे एक शिष्टमंडळ प्रसिद्ध कवी विंदा करंदीकर यांच्याकडे संमतिपत्र मागण्यासाठी जाणार हे रमेश तेंडुलकर यांच्या कानावर आले. तेंडुलकरांना फार आनंद झाला. 'साहित्य सहवास'मध्ये सकाळी फिरावयास जाताना रस्त्यावर तेंडुलकरांना करंदीकर भेटले आणि नेहमीप्रमाणे त्यांनी तेंडुलकरांना ओरडून विचारले,

"काय गड्या, मराठी साहित्यात सध्या नवी मोठी बातमी कसली आहे?"

"नवी, मोठी बातमी तुमच्याकडेच चालत येत आहे. लवकरच तुम्हाला कळेल ती!" तेंडुलकर म्हणाले.

"कसली बुवा?"

"साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ यंदा तुमच्या गळ्यात पडणार! अभिनंदन!"

"अरे, खुळा का काय तू? मी कसला अध्यक्ष होतोय?"

"म्हणजे?"

"म्हणजे असे बघ. ते लोक माझ्याकडे आले आणि म्हणाले की, एकमताने आम्ही तुमची निवड केली आहे, तर मी म्हणणार, 'गड्यांनो, लोकशाहीत असे करणे बरोबर ठरणार नाही. लोकशाहीत स्पर्धा ही पाहिजेच.' तेव्हा लोकशाहीला मारक अशा प्रथेत मी कधी भाग घेणे शक्य नाही!"

"बरोबरच आहे. आणखी दोनतीन माणसं निवडणूक लढवताहेत, तेव्हा लोकशाहीची काही मुस्कटदाबी होणार नसल्याने तुम्हीच निवडून येणार. कारण सगळ्यांना तुम्हीच हवे आहात." तेंडुलकर उत्साहाने म्हणाले.

"अरे बाबा, पण जिथे निवडणूक आहे, स्पर्धा आहे. तिथे मी कधी जात नाही, हा माझा स्वभाव तुला माहीत नाही काय?"

करंदीकरांचा हा प्रकार झाल्यानंतर रणजित देसाई यांनी राजीनामा दिल्याने रिंगणात जे दोघेही राहिले ते पुणेकरच. नागपूरकरांच्या हे उशिरा लक्षात आले! परंतु त्यातही श्री. ज. जोशी हे अस्सल पुणेकर आणि शंकर पाटील हे पुण्याबाहेरून येऊन बनलेले कडवे पुणेकर असा भेद आहे.

पुण्याबाहेरून आलेल्यांनी पुणं काबीज केले आहे. सारेच पुणेकर मुळात पुण्याबाहेरचे आहेत. गंमत अशी की, देशावरून आणि कोकणातून पुण्यात आलेले लोक आपल्या उद्योगामुळे इतरांच्या टीकेला पात्र होतात आणि हेच लोक नागपूर-मराठवाड्यात वा अन्यत्र स्थायिक झाले की, पुणेकरांचे टीकाकार बनतात

आणि भलती खेकटी निर्माण करण्यात दंग राहतात!

# ७

# कथा सत्यनारायणाची

मुंबई मराठी साहित्य संघाने लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले येथे ‘ माझी कादंबरी माझे मनोगत ’ या विषयावर सात व्याख्याने आयोजित केली होती. त्यातील एक व्याख्यान श्री. जे. जी. माने यांचे ‘ मुक्ती ’ या कादंबरीवर होते. श्री. माने यांनी एक दलित म्हणून आपल्या वाट्याला आलेल्या अनुभवांचे या कादंबरीत पोटतिडीकीने आविष्करण केले आहे. दलितांमध्येही उच्चनीच असा भेद वेगवेगळ्या पातळ्यांवर अद्यापही आहे आणि डॉ. आंबेडकरांच्या दलित मुक्ती चळवळीत सारे दलित सामील झाले नाहीत, फक्त महार समाजच त्यामध्ये सामील झाल्यामुळे या चळवळीला वेग येऊ शकत नाही, ही खंत श्री. माने यांच्या वक्तव्यातून दिसली. त्याचबरोबर भारतीय मनावर जातिभेदाचा व धर्माचा जो पगडा आहे, त्यापासून भारतीय समाज मुक्त झाला पाहिजे, ही भूमिका माने यांनी तळमळीने मांडली. माने यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला नाही, आणि त्याप्रमाणे अनेक चर्मकार व्यक्तींनी बौद्धधर्माचा स्वीकार केला नाही, हे माने यांच्या भाषणावरून लक्षात आले. आपल्या बालपणीच्या आठवणी सांगताना आपले नाव वेगळे असताही गावकरी ‘ रोहिदास ’ अशा उल्लेखाने आपल्या जातीचा कसा उल्लेख करीत हे सांगताना त्यांना चीड आलेली दिसली. आपल्या वडिलांना क्षय झालेला असतानाही तो लक्षात न घेता गंडेदोरे इत्यादिकांच्या उपचारांत गढून आपल्या नातेवाइकांनी विशेषतः आपल्या आईने वडिलांना अकाली मारले, या कल्पनेने आलेले त्यांच्या मनाचे कढ त्यांच्या व्याख्यानातून जाणवत होते. परंतु त्यांचे व्याख्यान ऐकताना त्यातल्या एका उल्लेखाकडे माझे लक्ष वेधले. हिंदू धर्मातील धर्मभोळ्या कर्मकांडाला आपण बळी पडावयाचे नाही या निर्धाराने, नव्या जागेत राहावयास जाताना आपण सत्यनारायण करावयाचा नाही, हे त्यांनी पक्के ठरवून टाकले. परंतु

ते एकदोन दिवसांसाठी बाहेरगावी जात आहेत, हे पाहून त्यांच्या पत्नीने त्यांच्या गैरहजेरीत सत्यनारायणाची पूजा उरकून घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे व्यवस्था केली. सत्यनारायणाची पूजा चालू असताना माने अकस्मात घरी परत आले आणि तो प्रकार पाहून विमनस्कतेने घरी बसून राहिले. प्रसादासाठी आलेल्या स्नेह्यांनी व नातेवाइकांनी त्यांच्या तत्त्वच्युतीचा गवगवा केला व त्यांना नावे ठेवली. ती गोष्ट त्यांच्या मनाला फार लागून राहिलेली दिसली. सत्यनारायण हा हिंदूंचा एक महत्त्वाचा धार्मिक विधी आहे व या विधीत आपण गुंतायला नको होते, या त्यांच्या भावनेची मला गंमत वाटली आणि सत्यनारायणाच्या कथेने आपल्या हिंदुधर्मात कसे मूळ धरले आहे, याचा उद्बोधक इतिहास माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

सत्यनारायणाच्या पूजेचा प्रकार या देशातला अगदी अलीकडचा आहे आणि त्याचा पारंपरिक हिंदुधर्माशी काहीही संबंध नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी एका मुसलमानाच्या पीराची पूजा बंगालमध्ये हिंदू आणि मुसलमान या दोहोंमध्ये मोठ्या भक्तिभावाने केली जात होती. ‘ सत्यपिरेर पूजा ’ या नावाने ती ओळखली जात होती. या पूजेच्या निमित्ताने सारे लोक एकत्र येतात, एकमेकांत मिसळतात, स्पर्शास्पर्शाच्या विचारापासून या ठिकाणी ते मुक्त असतात, प्रसाद भक्षण करीत असतानाही हिंदुधर्मात मध्यंतरी दृढमूल झालेल्या रोटीबंदीचा विचार कोणाच्या मनात येत नाही, हिंदूत असे का असू नये असे कोणा तरी एका हुशार ब्राह्मणाला वाटले. आणि त्याने ‘ सत्यनारायणाची पोथी ’ तयार करून या प्रथेचे हिंदूंमध्ये बीजारोपण केले. दहापंधरा वर्षांपूर्वी संतोषी माँची पूजा जशी वणव्यासारखी देशभर पसरली तशीच हीही कथा सव्वाशे वर्षांपूर्वी देशभर एखाद्या झंझावाताप्रमाणे पसरली. प्रसादभक्षणाच्या आणि लोकसंघटनेच्या दृष्टीने सुधारकांनी त्याचे स्वागत केले आणि पोथीच्या रूपाने या पूजेमध्ये जे एक सनातन धार्मिक वातावरण निर्माण केले होते, त्याचे साऱ्या सनातनी समाजाला आकर्षण वाटले. १८८६ मध्ये प्रसिद्ध सनातनी पुढारी विश्वनाथ नारायण मंडलिकांना पहिल्यांदा अशी पूजा एका ठिकाणी पाहावयास मिळाली तेव्हा ते चक्रावून गेले. त्यांनी आपल्या कारकुनाला तातडीने पत्र लिहिले की,

“ माझ्या माहितीत गेल्या ४५ वर्षांत अशी पूजा कधी पाहिली नाही. ती या महिन्यात कोणी आणि कोणत्या आधारावर चालू केली, ते कळवावे. ”

बिचारा कारकून काय कळविणार होता ? त्याच्या बुद्धीच्या व शक्तीच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट होती ! बघता बघता ही पूजा महाराष्ट्रात घरोघरी पसरली, इतकेच नव्हे तर लग्न झाल्यावर निरनिराळ्या जातीजमातींमध्ये ज्या धार्मिक रीती होत या त्या मागे पडून, त्याऐवजी एक सत्यनारायण घातला की संपले, अशी प्रथा पक्की होऊन गेली. बरे, ही पूजा अगदी सोपी, तिला मुहूर्त लागत नाही, ब्राह्मणभोजन लागत नाही, दानेदक्षिणा द्याव्या लागत नाहीत, होमहवन नाही, वैदिक मंत्रतंत्र नाहीत, वेदोक्ताची

भांडणे नाहीत. स्नानसुद्धा करण्याची गरज नाही! ज्याने त्याने आपल्या ऐपतीप्रमाणे सव्वाशेरापासून सव्वाखंडीपर्यंत प्रसाद करावा, पूजा करावी. पूजेनंतर नृत्यागायनादी हवे ते करमणुकीचे कार्यक्रम करावेत! 'सपादंभक्षभक्त्या नृत्यगीतादिकं चरेत्!' असे मुळी पोथीतच लिहून ठेवले आहे. त्यामुळे आज सत्यनारायण म्हणजे 'सांस्कृतिक एकात्मते'चे एक महत्त्वाचे साधन बनले आहे.

परंतु सत्यनारायणपूजेची म्हणून जी एक पोथी निर्माण केली गेली आहे, तिच्यामध्ये प्रत्येक अध्यायाच्या शेवटी ही कथा स्कंद पुराणातील रेवा खंडात असल्याचे सांगितले आहे. ही एक प्रकारची मनोरम क्लृप्ती आहे. स्कंद पुराणामध्ये ही कथा असण्याचे काही कारण नाही. ही कथा म्हणजे एक प्रकारचे काम्य व्रत आहे. सत्यनारायणाची पूजा केल्याने इच्छिलेले सारे काही मिळते याचे आमिष आहे आणि तिच्याकडे दुर्लक्ष केल्याने हा देव आपले वाटोळे करील अशी उत्तरार्धात धमकी आहे. सत्यनारायणाच्या कृपाप्रसादाने दरिद्री ब्राह्मण व मोळीविक्याचे कल्याण कसे झाले, ते पूर्वार्धात सांगून उत्तरार्धात साधुवाणी व अंगध्वजराजा यांनी पूजेची कदर न केल्याने त्यांच्यावर कशी संकटे आली, याचे मन भयभीत करणारे वर्णन आहे. ही कथा आपल्या पुराणकथेशी सुसंगत नसल्याने चक्रावून जाऊन आपल्या विद्वानांनी या पोथीचा शोध घेतला. कलकत्त्याच्या हरप्रसाद शास्त्र्यांनी ही कथा मुसलमानांच्या 'सत्यपिरेर' पासून कशी आविष्कृत झाली हे सांगितले. कै. ह. रा. दिवेकरांनी व इतर अनेक विद्वानांनी ही कथा स्कंदपुराणात शेवटी कशी चिकटवून दिली आहे, याचे साक्षेपाने संशोधन केले. कै. दिवेकरांना कोकणात या पोथीचे एक हस्तलिखित मिळाले. त्या पोथीत त्यांना 'स्कंद पुराणे' ऐवजी 'स्कन्न पुराणे' असा उल्लेख आढळला (स्कन्न म्हणजे अगदी पुरातन) व राजाचे शंभर पुत्र प्रसादाची अवहेलना केल्याने नष्ट झाले (तस्य पुत्र शतं नष्टं) ऐवजी 'तस्य मित्र शतं नष्टं' म्हणजे त्याचे शंभर मित्र त्याला दुरावले असा उल्लेख आढळला. 'स्कन्न पुराणे–पूर्व खडे' ऐवजी 'स्कंद पुराणे रेवा खंडे' असा फरक होणे शक्य आहे आणि सत्यनारायणाची पूजा राजा करतो आहे, हे पाहून त्याचे शंभर स्नेही त्याला परत मिळाले, असा बुद्धिवादी अर्थ कै. दिवेकरांनी काढला. दिवेकरांनी त्यांना मिळालेली ही पोथी संपादून प्रसिद्ध केली आहे.

परंतु दिवेकरांना वाटते तसे वाटण्याचे वास्तविक काही कारण नाही. सत्यनारायणाच्या पोथीतील कथेचे वळण अशा बुद्धिवादी विवेचनाला अनुकूल नाही. लोकांना एखादा सुटसुटीत, सर्वांना सारख्या प्रमाणात करता यावा असा धार्मिक विधी हवा होता. आपल्या धर्माच्या जातीजमातींत धार्मिक विधी इतके त्या त्या जातीजमातींशी निगडीत आहेत की, त्यामुळे या जातीजमाती अभेद्य तटबंदीमध्ये स्वतःचे अलगपण राखून आहेत. इंग्रजांच्या आगमनानंतर या देशात नव्या दृष्टिकोणातून विचार करणाऱ्या

परंतु धर्मश्रद्ध व्यक्तीने मुसलमानांनी सहजगत्या 'सत्यपिरेर'च्या नावाने एकत्रित येण्याची किमया पाहिली. ही किमया त्यांच्या धर्मविधींतूनच त्यांना स्फुरली होती. असा विधी हिंदूंमध्येही सुरू होणे त्याला आवश्यक वाटले. परंतु बुद्धिवादी दृष्टिकोणातून अशा कथेची माडणी केली असती तर ती कोणी हातात सुद्धा धरली नसती. ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज इत्यादी सुधारणेच्या प्रेरणेतून निघालेल्या समाजांचे काय झाले हे आज दिसतेच आहे!

त्यामुळे 'सत्यनारायणपोथी' संस्कृतमधून लिहिणाऱ्या आणि ही पोथी स्कंद पुराणात आहे म्हणून सांगून तिला धार्मिक प्रतिष्ठा देणाऱ्या कोणा अज्ञात ब्राह्मणाच्या शहाणपणाचे कौतुक जितके करावे तितके थोडेच आहे! साऱ्या हिंदू समाजाने या कथेचा स्वीकार करावा म्हणून या पोथीत निर्माण केलेली कथा सर्वसामान्य व्यक्तीच्या धार्मिक कल्पनांचे पोषण करणारी आहे. या कथेचा अनादर केल्याने येणाऱ्या काल्पनिक संकटापेक्षा या कथेमुळे आपल्या इष्टमित्रांना अगदी साध्यासुध्या कारणासाठी एकत्र आणण्याची व आनंदोत्सव साजरा करण्याची सोय त्याला महत्त्वाची वाटली. बंगालमध्ये मुसलमानांच्या पीराच्या ठिकाणी मलिदा मुक्तपणे प्रसाद म्हणून वाटला जात होता. त्याचे संस्करण करून 'हलुवा वा पजारी'ची म्हणजे आजच्या प्रसादाची त्या ठिकाणी योजना केली. प्रसादासाठी गव्हाचा रवा उपलब्ध नसेल तर (बंगालच्या खेड्यापाड्यांतून सर्वत्र गहू उपलब्ध होत नाही म्हणून) तांदळाचा रवा वापरण्यास हरकत नाही, अशीही सवलत देऊन ठेवली. कै. दिवेकरांना या विधीमध्ये 'निहित ध्येयवादित्व, उच्च विचार, धर्मनिष्ठा, आणि भगवद्भक्ती' या सर्वांचा संगम आढळला. तो योग्यच होय.

धर्मभोळेपणा आणि आधुनिकता यांचा एक विलक्षण स्वरूपाचा समन्वय या सत्यनारायणाने घडविला आहे. त्याचे महत्त्व लक्षात असल्यामुळे शुद्धिसंस्करण करणाऱ्या अनेक घटकांनी या पोथीच्या मूळ रूपाकडे दुर्लक्ष केले आहे. हे दुर्लक्ष मोठे अर्थपूर्ण आहे. संस्कृतीच्या सर्वसमावेशक सहिष्णुतेचे व लवचिकतेचे या विधीत प्रतिबिंब पडले आहे. सत्यनारायणाच्या पूजेमुळे गावोगावच्या पीरांच्या पूजेला आळा बसला.

त्यामुळे आपल्या पत्नीने सत्यनारायण केला म्हणून माने यांच्या सारख्यांनी अस्वस्थ होण्याचे कारण नाही. उलट त्याचे स्वागत केले पाहिजे. या पूजेच्या निमित्ताने नातेवाइकांना व स्नेह्यांना नव्या घरात मोकळेपणाने व सहजपणाने एकत्र येता आले, ही गोष्ट काही साधी नाही. इतर कोणत्याही प्रकाराने व इतक्या सहजपणे ते घडले नसते!

३२२१ १५३८६ निबंध ग्रंथ शाखा

# ८

# डॉ. लागूंची ' पतंगाची दोरी '

' बाइंडरचे दिवस ' या कमलाकर सारंग यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा प्रकाशन–समारंभ–प्रसंगी व्यासपीठावर एका गर्भनाटकाचा प्रयोग झाला. एखाद्या नाटकात आणखी एखादे ' नाटक ' रंगभूमीवर साकार केले जात असेल तर त्याला ' गर्भनाटक ' म्हणतात. नाटकवाल्यांच्या रक्तात रंगभूमीवरच्या हालचाली इतक्या भिनलेल्या असतात, की त्यांच्या एरवीच्या चालण्या बोलण्यातूनही ' नाटका 'चाच भास होत असतो. या अर्थानेही त्यांचे चालणे बोलणे नाटकगर्भ असते हे खरे असले तरी वर उल्लेखिलेले गर्भनाटक काहीसे वेगळ्या प्रकारचे होते.

' सखाराम बाइंडर ' हे विजय तेंडुलकरांचे नाटक मराठीत वेगवेगळ्या अर्थाने गाजले. या नाटकाने तेंडुलकरांना नाटककार म्हणून मोठी प्रतिष्ठा मिळाली. आधुनिक मराठी रंगभूमीवरचे काही ' खास–विशेष ' म्हणून या नाटकाच्या प्रयोगाकडे पाहिले गेले. या नाटकाच्या निर्मितीमागे एक वेगळे नाट्य दडलेले होते आणि निर्मितीनंतर तर या नाटकाने आणखी निरनिराळी ' नाट्ये ' निर्माण केली. त्यामुळे ते मोठे वादग्रस्त ठरले. या साऱ्यांचा एक इतिहासच निर्माण झाला! त्या इतिहासाची रोमांचकारी कहाणी एक निर्माता म्हणून सारंगांनी या पुस्तकात सादर केली आहे. आत्मचरित्रपर लेखनातील अशा प्रकारचे हे एक वेगळे वैशिष्ट्यपूर्ण लेखन ठरावे.

या नाटकाच्या निर्मितीच्या पूर्वावस्थेत जे एक नाटक घडले, त्यातून एक मोठे ' आव्हान ' निर्माण झाले, असे सारंगांना वाटते; आणि ते आव्हान आपण कसे पेलले हे ते मोठ्या आत्मविश्वासाने सांगू लागतात.

नाटकाचे हस्तलिखित सारंगांच्या हवाली केल्यानंतर नाटककार विजय तेंडुलकर सारंगांना डॉ.श्रीराम लागूंना भेटण्यास सांगतात. सारंग त्यांना भेटायला जातात. भेटीमध्ये

नाटकातील नायकाची भूमिका करण्याची सूचना धुडकावून डॉ. लागू हे नाटक दिग्दर्शित करण्याचा आपला मनोदय व्यक्त करतात. अस्वस्थ झालेले सारंग डॉक्टरांच्या हातात दिलेली हस्तलिखित प्रत झडप घालून हस्तगत करतात. छातीशी गच्च आवळून धरतात आणि निकराने म्हणतात 'नाही, नाही!'

या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी या नाटकाच्या यशाचा आपला पतंग आकाशात किती उंच भराऱ्या मारतो आहे, या आनंदात सारंग ही सारी हकीकत मोठ्या कौतुकाने सांगतात आणि मुद्दाम समारंभासाठी मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित असलेले लागू या पतंगाचे दोर कापून टाकण्याचा प्रयत्न करतात.

'नाही बुवा, सारंग म्हणतात असे काही घडल्याचे मला आठवत नाही. माझी त्यांची या संदर्भात मुळी भेटच झाली नाही, असे मला वाटते.'

पुस्तकाच्या निर्मितीच्या गर्भावरच प्रहार करावा असा 'मूले कुठारः'च्या जातीचा हा आघात असतो. सारंग त्याला पुराव्यानिशी उत्तर देतात आणि त्यातून जाणवते की, हा एक शह–काटशहाचा प्रकार आहे! पतंगाचा खेळ आहे!!

एक समर्थ नाटककार आणि एक समर्थ नट...त्या पूर्वीच्या धडपडीतून दोघेही मोठे झालेले असतात. दोघांच्याही मोठेपणात एकमेकांच्या धडपडण्याचा मोठा वाटा असतो आणि त्या मोठ्या झालेल्या नाककाराचे एक महत्त्वाचे नाटक रंगभूमीवर येऊन गाजून जाते आणि या मोठ्या नटाला एका तरुण, नव्या दमाच्या निर्मात्याच्या उसळत्या, वेड्या महत्त्वाकांक्षेमुळे या नाटकाबाहेर राहावे लागते. या कल्पनेच्या व्यथा-यातनांनी अस्वस्थ झालेल्या डॉ. लागूंच्या मनाचा असा भलत्या ठिकाणी स्फोट होऊन तो पेटण्याऐवजी विरून जातो! अधिक ताणून धरून समारंभाचा विरस करू नये आणि आपले संबध बिघडवू नये म्हणून ते गप्प राहिले असावेत! लागूंच्या या कृतीमागचा हा मानसशास्त्रीय अर्थ असावा काय? का दोघांनी ठरवून केलेले हे एक नाटकच होते?

व्यासपीठावर साकार झालेल्या या गर्भनाटकामध्ये आत्मचरित्रपर लेखन ज्या आठवणींवर उभे असते त्या आठवणींच्या स्वरूपावर चांगला प्रकाश पडतो असे मला वाटते. आपण प्रत्यक्ष 'असतो' त्यापेक्षा आपण कसे असावे यासंबंधीचे आपले 'वाटणे' हे आपल्या आठवणींना काही एक वेगळे रूप देत असते. त्यामुळे आपल्या बहुसंख्य आठवणी ह्या 'असणे' आणि 'वाटणे' यांच्या रस्सीखेचीतून नवे रूप धारण करून येत असतात. परंतु जेव्हा 'असण्या'ची प्रेरणा जबरदस्त असते तेव्हा 'वाटणे' त्याच्यामागे मुकाट्याने चालायला लागते. परन्तु असे थोड्या प्रमाणात घडते, म्हणूनच तद्वत सारी आत्मचरित्रे खोटी असतात. (ऑल ॲटोबायोग्राफीज आर लाइज) असे शॉ म्हणून गेला.

'असणे' आणि 'वाटणे' यांचा हा जो पाठशिवणीचा खेळ आत्मचरित्रपर

लेखनातून सातत्याने चालू असतो त्यातून त्या व्यक्तीच्या वाटण्याच्या मानसिक प्रक्रियेवर फार मोठा प्रकाश पडत असतो. हे वाटणे स्मृतीशी निगडित असल्याने आणि ‘ स्मृती ’ ही प्रत्यक्ष सत्यापेक्षा भावसत्याशी निगडित असल्याने तपशिलात नेहमीच घोटाळे होत असतात चिंतामणराव कोल्हटकरांनी ‘ बहुरूपी ’ मध्ये ‘ एकच प्याला ’च्या शेवटच्या प्रवेश लिहून घेतल्याच्या ज्या तारखांचा निर्देश केला आहे, त्या आठवणींवर अवलंबून राहिल्याने प्रत्यक्ष तारखा वेगळ्याच आहेत, हे संशोधनाने लक्षात येते. परंतु त्यामुळे चिंतामणरावांनी गडकऱ्यांनी सांगितलेला प्रवेश लिहून घेतला, हे भावसत्य शिल्लक राहतेच. त्याला बाधा येत नाही.

गडकऱ्यांनी ‘ एकच प्याला ’ हे नाटक गंधर्व नाटक मंडळीसाठी लिहिले. तेव्हा बोडसांच्या भूमिकेला उठाव मिळावा यासाठी ते लिहिले अशी बालगंधर्वांच्या मनाची समजूत त्यांच्या हितचिंतकांनी करून दिली. सिंधूला जुने लुगडे नेसावे लागते आणि रंगभूमीवर सुधाकराचे पाय धरावे लागतात. आता सुधाकराची भूमिका करणारे गणपतराव बोडस हे गडकऱ्यांचे १९०६ सालापासूनचे मित्र. बालगंधर्व किर्लोस्कर नाटक मंडळीत अगदी तरुणपणी नायिकेच्या भूमिका गाजवू लागले, तेव्हा त्यांच्यासाठी काढून ठेवलेले गरम पाणी द्वाररक्षक म्हणून काम करणाऱ्या यत्किंचित गडकऱ्यांसारख्या व्यक्तीने वापरावे, याचा गंधर्वांना राग आला आणि त्यांनी त्यांचं खूप अकांडतांडव केले. त्याचा कुठे तरी वचपा गाढायचे गडकऱ्यांच्या मनात नसेल का, असे बालगंधर्वांना वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा ‘ एकच प्याला ’ नाटक बसविण्याच्या बाबतीत गंधर्वांचे मन डळमळू लागले.

गडकरी त्याच वेळी बलवंत संगीत मंडळीसाठी ‘ भावबंधन ’ लिहीत होते. तेव्हा आपण नाटकांची अदलाबदल करावी, असेही त्यांच्या मनात येऊन गेले. त्यांची ही द्विधा मनःस्थिती नाट्याचार्य खाडिलकरांमुळे नाहीशी झाली. खाडिलकरांनी नाटक वाचून सांगितले की, ‘ तो गणू रंगभूमीवर कितीही रेकला तरी, नारायणराव, तुमच्या कामाचीच मोहिनी प्रेक्षकांवर खऱ्या अर्थाने पडेल हे लक्षात घ्या ! ’ आणि झालेही तसेच ! गडकऱ्यांच्या नाटकांमध्ये जो एक कृत्रिमतेकडे झुकणारा पल्लेदार उच्च स्वर होता, तो लावण्यासाठी चांगल्या चांगल्या नटांना रेकावे लागत असते. तो कमी होऊन सिंधूच्या संवादात जी एक अपार उत्कटता निर्माण झाली होती, ती खाडिलकरांनी नेमकी हेरली होती. गणपतरावांच्या वाट्याला हे रेकणे आले होते आणि गंधर्वांच्या वाट्याला वास्तवप्रधान भावसंपन्न भूमिका आली होती. गुर्जरांच्या हृद्य पदांमुळे ती आणखी उत्कट होऊन उठली.

‘ एकच प्याला ’च्या अपार यशानंतर आपल्या मनातील ओशाळेपणा लपविण्यासाठी बालगंधर्वांनी पश्चातबुद्धीने काही उद्गार काढलेले दिसतात. परंतु त्याचबरोबर गडकरी इतके मोठे होतील असे सुरुवातीला वाटत नसल्यामुळे त्यांच्याबद्दल त्या काळात

आपल्या मनात दुरावा झाला असल्याचे त्यांनी कबूल केले आहे. त्यातूनच एक आख्यायिका निर्माण झाली ती अशी :

" एकच प्याला नाटक गंधर्व मंडळीला देण्याचे गडकऱ्यांनी निश्चित केले. त्यापूर्वी बालगंधर्वांनी विशेषेकरून संपन्न वातावरणातील शृंगारप्रधान नाटकात भूमिका करून रसिकमनावर मोहिनी घातली होती. ' एकच प्याला ' नाटकासंबंधी बोलताना गडकरी बालगंधर्वांना म्हणाले,

" माझ्या नाटकात तुम्हाला फाटकं लुगडं नेसून काम करावं लागेल. "

एका क्षणाचाही विलंब न करता बालगंधर्व म्हणाले,

' फाटके लुगडंच काय ! गोणपाट नेसूनसुद्धा तुमच्या नाटकात काम करायला मी तयार आहे. "

ही आख्यायिका म्हणजे बालगंधर्वांचे आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या चाहत्यांचे ' वाटणे ' आहे. ' असणे ' आहे असे वाटण्याचे कारण नाही !

प्रेसिडेंट रूझवेल्टशी १९१८ मध्ये एक महत्त्वाची मुलाखत झाल्याचे आपणास आठवत नाही म्हणून चर्चिलने १९४१ मध्ये कानावर हात ठेवले होते. तेव्हा रूझवेल्ट अतिशय अस्वस्थ झाला होता. ते चर्चिलचे ' वाटणे ' होते. ' असणे ' नव्हते हे कागदपत्रांच्या साहाय्याने नंतर सिद्ध करता आले !

अर्थात बऱ्याच आठवणी आणि आख्यायिका अशा असतात की त्यांची शहानिशा करता येणे शक्य नसते. सांगणाऱ्यांच्या हकीकतीतून ज्या मानसिक प्रक्रिया प्रकट होतात, त्याच बरेच काही सांगून जातात. डॉ. लागूंची प्रतिक्रिया उत्स्फूर्त असती तर त्यांचा वेगळा अर्थ लावता आला असता !

तेव्हा डॉ. लागूंच्या मांज्याला चांगली धार नव्हती. ते त्यांचे ' वाटणे ' होते... सारंगांचा पतंग त्यामुळे उंच उडत राहिला. सध्या तरी तो तसाच उडत राहणे श्रेयस्कर आहे असे त्यांच्या चाहत्यांना वाटणे साहजिकच आहे !

ॐ

# १

# रंगभूमी : संगीताने गाजलेली आणि गांजलेलीही

मराठी रंगभूमीच्या १३०–३५ वर्षांच्या वाटचालीत संगीताचा वाटा फार महत्त्वाचा आहे. दृश्य आणि श्राव्य अशा दुपेडी स्वरूपाच्या या संकुल कलाप्रकाराने मानवाच्या सर्व प्रकारच्या सर्जक व कृतक कलाशक्तींना मुक्तपणे सामावून घेतले. जगातले सारे त्रैग्युणोद्भव लोकचरित, मानवी मनात उचंबळणारे सर्व रस प्रत्यक्ष समोर दाखवून, स्थलकाल-पात्रादिकांच्या मर्यादित विश्वात अखिल जगत साकार करण्याची एक विलक्षण शक्ती या कलाप्रकारात आहे. मानवाच्या सर्व प्रकारच्या हालचाली, त्याच्या सर्व प्रकारच्या कला, त्याचे सर्व प्रकारचे चातुर्य, त्याच्या सर्व प्रकारच्या विद्या यांचे एकसमुच्चयाने साकार झालेले सुंदर अशा स्वरूपाचे दृश्य व श्राव्द चित्र म्हणते नाट्य ही भारतीय रंगभूमीची भूमिका आहे. त्यामुळे भारतीय रंगभूमीने संगीत आणि शिल्प, नृत्य आणि नाट्य, काव्य आणि अभिनय यांचा रंगभूमीवर समुचित आणि समुच्चयाने परिणाम साधण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. आधुनिक काळातील मराठी रंग-भूमीने मात्र आंग्ल नाट्यवाङ्मयाच्या आणि इकडे तुरळक पाहावयास मिळालेल्या आंग्ल रंगभूमीच्या अनुकरणाने आणि परिणामाने संगीत व नाट्य यांचीच रंगभूमीच्या क्षेत्रात विशेष कास धरली आणि नृत्याकडे बरेच दुर्लक्ष केले. यक्षगान, तमाशा, कीर्तन इत्यादी लोककलांनी मात्र नृत्य, नाट्य व संगीत या तिन्ही वैशिष्ट्यांच्या जिवंत प्रवाहांचा उपयोग करून अगदी बहुजनसमाजाच्या तळागाळापर्यंत आपली कला नित्य वाहती ठेविली. तसे तथाकथित मराठी रंगभूमीचे होऊ शकले नाही. आजची मराठी रंगभूमी पक्क्या बांधलेल्या अशा बंदिस्त नाट्यगृहांच्या आणि पक्क्या लिहिलेल्या बंदिस्त नाट्यवाङ्मयाच्या (ज्यांना 'बुकिश नाटके' असे म्हणण्यात आले आहे) आहारी गेल्यामुळे तिचे आवाहन मोठ्या प्रमाणात नागरी राहिले आहे, ही वस्तुस्थिती लक्षात

घेतली पाहिजे.

नाटक हा वाङ्मयप्रकारच मुळात प्रयोगशरण आहे आणि वर उल्लेखिलेल्या नव्या बंदिस्तीमुळे मुक्त-नाट्यापासून मराठी नाटक सर्वस्वी दूर गेले. तत्कालीन प्रेक्षकांमध्ये एक विशिष्ट अभिरूची निर्माण करून त्याला एकदा नाटकाची गोडी लावल्यानंतर स्वतःच निर्माण केलेल्या संकेतातच ते पूर्णपणे गुरफटून गेले. या गुरफटण्यामध्ये संगीताचा वाटा सगळयात मोठा असल्याने त्याच्या विधायक बाजूबरोबरच विघातक सामर्थ्याचाही थोडा–बहुत विचार करणे अत्यावश्यक आहे.

अण्णा किर्लोस्करांनी नाटकवेडापायी बेळगावसारख्या ठिकाणी राहून रंगभूमीची एक अविरत आणि एकलव्याच्या निष्ठेने साधना केली. तिच्यामुळे नवनिर्मितीचे त्यांना जे स्फुरण झाले आणि त्यातून त्यांनी मराठी रंगभूमीला जे एक वैभव प्राप्त करून दिले, त्याचे सुरुवातीला थोडक्यात सम्यक अवलोकन केले पाहिजे 'शाकुंतला'च्या संस्कृत पाठ्याचे आणि त्याच्या इंग्रजी रूपांतराचे पुण्या-मुंबईस नवशिक्षित मंडळी प्रयोग करण्यात गर्क असताना अण्णांना मात्र बेळगावास त्यांच्या मराठी रूपांतराचा प्रयोग करून पाहावयाचा मोह होतो. त्याने त्यांचे समाधान न झाल्यामुळे कालिदासाचे 'शाकुंतल' पुण्यपत्तनासारख्या संस्कृतीच्या माहेरघरी करून दाखविण्याची त्यांना प्रेरणा आणि संधी प्राप्त होते, तेव्हा नाट्यक्षेत्रातील त्यांच्या साऱ्या धडपडीमुळे प्राप्त झालेली एक नवी दृष्टी आणि पुण्यातील उच्चवर्गीयांना आकर्षित करू शकेल अशा प्रकारच्या प्रगत नाट्यप्रयोगाला गवसणी घालू शकेल असा जबरदस्त आत्मविश्वास त्यांनी 'शाकुंतल'च्या ३१ ऑक्टोबर १८८० च्या प्रयोगाने दाखविलेला दिसतो. या प्रयोगामागे भरतमुनींची विशुद्ध नाट्यदृष्टी परिणावस्थेत उभी असल्याचे दिसते. कालिदासाचे 'शाकुंतल' रंगभूमीवर सादर करताना अण्णांनी कसल्याही प्रकारची रंगभूमीच्या उच्च आकांक्षांची आणि संकेतांची पायमल्ली होऊ द्यायची नाही, असा निर्धार केलेला स्पष्ट दिसतो. ज्ञानेश्वरांनी आपल्या लोकसंस्कृतीचे सूक्ष्म अवलोकन करून, त्या संस्कृतीला स्वतःचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी आपल्या अभिजात प्रतिभासामर्थ्याने गीतेवर टीका लिहून, गीतेच्या मुखातून महाराष्ट्रधर्म वदविला आणि अमृतानुभवाच्या स्वतंत्र निर्मितीच्या रूपाने जागृतीचा मराठी धर्म दुमदुमत ठेविला, तसेच काहीसे कार्य अण्णासाहेबांच्या 'शाकुंतल' व 'सौभद्र' या नाटकांनी केले. अण्णांच्या 'शाकुंतल' मध्ये कालिदासाचे सर्व सामर्थ्य तर आहेच, परंतु त्याचबरोबर त्याच्यामध्ये मराठी कलेची अभिजातता, तिचे सर्वसमावेशकत्व, मराठमोळी अशी विवेकनिष्ठ दृष्टी आणि मराठी मनाची नवनिर्मितीची, प्रयोगशीलतेची आणि प्रगमनशीलतेची जिद्द आहे. शाकुंतलाच्या प्रयोगापूर्वीच किर्लोस्करांच्या या सामर्थ्याचा प्रत्यय आल्यामुळे शाकुंतलाच्या पहिल्या प्रयोगाच्यावेळी रंगभूमीवरील दर्शनी पडदा ओढण्यासाठी आगरकरांच्या पाठोपाठ लोकमान्य टिळक उभे होते आणि डेक्कन

कॉलेजातील गुरुजन 'श्रीरस्तू। जयोस्तु। सिद्धिरस्तु। सुभाग्यमस्तु।' अशा शब्दांत आशीर्वादासाठी हात उंचावून नव्या रंगभूमीवरच्या नव्या नायकांना प्रोत्साहित करीत होते. सौभद्रामध्ये अण्णासाहेबांच्या कर्तृत्वाचा परमोच्च बिंदू गाठल्यामुळे किर्लोस्कर-मंडळीच्या हँडबिलावर सह्या करण्यासाठी पुण्यातील प्रज्ञावंत त्या वेळी अहमहमिकेने सरसावत होते.

किर्लोस्करांनी प्रवर्तित केलेल्या या संगीत रंगभूमीला केवळ पंधरा–वीस वर्षांत विलक्षण गती प्राप्त झाली आणि हजारो वर्षांची परंपरा मागे उभी असावी, इतक्या वेगाने संगीतातील जवळजवळ सर्व प्रकारच्या रागरागिण्यांतून अनेक प्रकारच्या आकर्षक चिजा मराठी रंगभूमीवर दुमदुमू लागल्या. मराठी नजरेला पडतील अशा कानडी, पारशी, गुजराती, उर्दू रंगभूमीवरच्या चाली, नामांकित गवय्यांनी तपश्चर्येने सिद्ध केलेल्या ख्याल गायकीची जोड आणि अण्णांनी विपुलतेने रंगभूमीवर प्रवर्तित केलेल्या लोकसंगीताला पुनःपुन्हा सामोरे जाऊन ओंजळी भरभरून त्याची केलेली उधळण, असे या रंगभूमीवरील संगीताला एक प्रकारचे उधाण भरते आले. पुढेपुढे रंगभूमीवर चालत आहे ते नाटक का संगीत, असा संभ्रम पडावा अशी उलटापालट होऊ लागली. या अतिरेकामुळे मराठी रंगभूमी बरीचशी विचलित आणि किंकर्तव्यमूढ झाली. तिला काही वेळा स्वत्वाचा विसर पडत गेला. मराठी संगीत रंगभूमीच्या शतसांवत्सरिक काळातील हालचालींचा विचार करताना या घटनेकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? मराठी रंगभूमीला पडता काळ आला तो मराठी रंगभूमीच्या या संगीताच्या आंधळ्या अनुकरणाच्या अतिरेकामुळे, असे उघड-उघड लिहिले-बोलले गेले आहे; त्याची दखल घेतली पाहिजे. संगीताच्या अतिरेकाने मराठी रंगभूमीचे कंबरडे मोडलेच होते, त्यामुळे चित्रपटांचा जमाना सुरू झाल्यामुळे थोड्याशा प्रभावाने ती खालीच बसली चित्रपटांच्या परिणामकारकतेमुळे नव्हे, असा निर्वाळाही देण्यापर्यंत या विचाराची मजल गेली आहे. ती अगदीच दुर्लक्षण्यासारखी नाही.

किर्लोस्करांनी 'शाकुंतल'–'सौभद्र'मध्ये निर्माण केलेल्या आणि त्यांचे शिष्यवर गोविंद बल्लाळ देवल यांच्या संगीत रंगभूमीचे इतके अमाप अनुकरण झाले की, त्याचे विडंबन करण्यासाठी १८८९ मध्ये मंगेश रामचंद्र तेलंग यांनी 'संगीत हजामत' लिहून चांगलीच खसखस पिकविली. त्यांनी प्रस्तावनेत लिहिले आहे—

'सं. शाकुंतल व सौभद्र ही नाटके फारच चांगली आहेत; परंतु आज-काल त्या धरतीवर संगीत नाटके पुष्कळ झाली आणि नवीन होत आहेत. त्यापासून साहित्यशास्त्र आणि संगीतकला यांची त्रेधा उडाली. 'साहित्य–संगीतकलाविहीन' लोक देखील संगीत नाटके रचू लागले. त्यामुळे खरी अभिरुची लयास जाऊ लागली. हे संगीत-नाटकरूपी केश (क्लेश) फारच वाढले त्यामुळे असह्य कंडू उत्पन्न झाला. त्याला हजामतीशिवाय दुसरे औषध नाही म्हणून ही 'संगीत हजामत' निर्माण केली आहे.

'यापुढे संगीत नाटक करणाऱ्यांनी संविधनकरचना, रससिद्धी, अर्थगौरव, पदलालित्य, प्रबंधमाधुर्य, रसानुकुल रागविचार यांजकडे विशेष लक्ष देऊन संगीत नाटके रचावी, म्हणजे त्यांना संगीत हजामत करण्याचा प्रसंग येणार नाही.'

तेलंगांचा हा जमालगोटा लोकांनी फारसा लक्षात घेतला नाही, कारण पुढल्या दहा वर्षांत सर्व प्रकारच्या नाटकांत संगीताचा सुकाळ झाला. इतकेच नव्हे तर ऐतिहासिक स्वरूपाची नाममात्र नाटके येऊन त्यात इतिहास नावाला आणि संगीताचा महापूर अशी अवस्था झाली. १८९६ साली प्रसिद्ध झालेल्या बाळकृष्ण जगन्नाथ नाटेकर यांच्या संगीत 'बाजीराव मस्तानी' या नाटकाबद्दल लिहिताना श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी लिहिले, 'यातील पुष्कळ पद्यांतील वाक्ये दुसऱ्या नाटकांतून सर्वथा किंवा थोड्या शब्दांचा बदल करून घेतलेली आहेत. हे सर्वच्या सर्व नाटक मयासुराच्या भूमीप्रमाणे फसविणारे असल्यामुळे जुने कोणते आणि नवे कोणते हे कळण्यास मार्ग नाही.'

अर्थातच किर्लोस्करांप्रमाणेच वासुदेवराव डोंगरे आणि माधवराव पाटणकर यांच्या नाटकांतील संगीताचा या काळातील रंगभूमीवर विशेष परिणाम होता. किर्लोस्करांच्या 'शाकुंतला' मध्ये दोनशे पदे असली तरी रागदारीने गाण्यासाठी केवळ २२ ते २५ पदे आहेत. 'सौभद्रा' चीही तीच अवस्था आहे. मात्र डोंगऱ्यांनी आपल्या 'वेणीसंहार' आणि 'इंद्रसभा' या नाटकामध्ये गाणाऱ्या गवय्यांचा एक जथाच्या जथाच उभा करून रागदारीवर गाण्यासाठी सुमारे ९० ते १०० पदे नाटकात उपयोजिली आणि ती गाण्यावरच आपले लक्ष केंद्रित केले. पाटणकरांच्या नाटकांतून शृंगारिक झगड्यांचा असा काही अतिरेक केला आहे की, नाटक म्हणजे तमाशा असे त्याला रूप आले. 'हात मदंगा लावू नका कर, दूर सरा तुम्ही दूर सरा। खराच नसतो धीर नरा' यासारख्या लोकांना भुलविणारा झगडा हे त्या काळचे लोकप्रियतेचे टोक. काही काळ अण्णासाहेबांच्या पदांनाही त्यांनी मागे टाकले. बाळकृष्ण जगन्नाथ नाटेकर, 'सं. रणसिंह बाजी' व 'सं. छत्रपती संभाजी' लिहिणारे आत्माराम मोरेश्वर पाठारे, हरि परशुराम वागळे यांची 'सं. शिवाजी व 'अफझलवध', अण्णा मार्तंड जोशी यांचे 'शिवछत्रपतिविजय', घाटे यांचे 'अफझुलखानवध', अनंत वामन बरवे यांचे 'मातृशिक्षाप्रभाव', क. कृ. साठे यांचे सं. 'आर्योत्कर्ष,' कुमारी सोनाबाई केरकरीण (वय वर्षे १५) हिचे 'सं. संभाजी' इत्यादी असंख्य ऐतिहासिक नाटकांतून संगीताचा सुकाळ आहे. इतिहास नावाला आहे, जवळजवळ तो नाहीच.

१९११ च्या सुमारास खाडिलकरांनी संगीत नाटकांच्या क्षेत्रात प्रवेश केला व मराठी रंगभूमीवर आणखी एक नवयुग सुरू झाले आणि किर्लोस्कर–देवलप्रणीत नाट्यभावनोत्कर्षपूरक संगीत लोप पावून स्वरविलासी व संगीतोत्कर्षक अशा ख्याल गायकीने सबंध मराठी रंगभूमी व्यापून गेली. खाडिलकरांनी संगीताकडे लक्ष देऊन पदांमध्ये अर्थाकडे जे दुर्लक्ष केले, त्याबद्दल त्यांच्या पदांचे खूप विडंबन झाले आणि 'नाट्य-

कला कवि कृष्णा माला घाली' यातील 'कवि कृष्णा' या उपाधीस खाडिलकर कितपत पात्र आहेत, असा वाद काही काळ माजला. संगीताच्या मराठीकरणाचाही वाद असाच काही काळ माजला. एका नाटकाचे पैसे देऊन दोन-तीन नाटकांचे संगीत ऐकण्याचा एक नवीनच प्रकार रंगभूमीवर सुरू झाला आणि 'वन्समोअर'मुळे मनसोक्त गाऊन घेण्यास गायकनट चटावले. या साऱ्यांचा परिणाम मराठी नाटकाची संविधानकरचना कमालीची दुबळी होण्यात झाली, यात कसलीच शंका नाही. नाटकातील संगीत लोकप्रिय झाले नाही, नाटक चांगले असूनही ते चालत नाही, असा प्रकार होऊन नाटकातील पद गाण्याकरिता की म्हणण्याकरिता असा, संभ्रम निर्माण झाला. किर्लोस्कर–देवलांनी १/१० गाण्याकरिता आणि ९/१० पदे म्हणण्याकरिता अशी पदांची योजना केली होती. खाडिलकरांनी त्याची उलटापालट केली. त्यामुळे नाटक लिहिले जात असताना संविधानपूरक पदे नाटककारांनीच लिहावयाची हा प्रकार थंडावला आणि नाटकातील पदे नंतर व त्यातील संगीताच्या दिग्दर्शनासाठी प्रख्यात गवय्यांची योजना होऊ लागली. नाटकातील पदांच्या रचनेसाठी आता कवित्वशक्तीची गरज राहिलेली नाही. त्यामुळे चांगली गाता येणारी परंतु निरर्थक पदे नाटकांमध्ये येऊन बसली आणि त्यामुळे वाङ्मयीनदृष्टया अशा नाट्यकृतींना काहीच अर्थ राहिला नाही. कोणत्या रागाची कुठे योजना करावयाची यांना सुमार राहिला नाही. भारतीय संगीतातील स्थलकालनिबद्ध विशिष्ट रागदारीची सारी बंधने कोसळून पडली आणि रंगभूमीवरचे नाटक पहाणाऱ्यांच्या संख्येत गुजराथी–पारशी–कच्छी धनिकांची पुढच्या रांगा अडविण्याची धावपळ सुरू झाली. या प्रेक्षकांना नाटकात रस नव्हता, केवळ गाण्यात होता. त्यामुळे पदांची संख्या २०० ऐवजी २५–५० वर येऊनही गाणे बेसुमार वाढले.

१९२० नंतरच्या मराठी रंगभूमीवर नाट्याचार्य खाडिलकरी नाट्यसंगीताचा विलक्षण प्रभाव आहे. खाडिलकरांपूर्वीच शिवाजी–संभाजी–बाजीराव गात असे तो अण्णांच्या आणि पाटणकरांच्या चालीत. आता रंगभूमीवरचा शिवाजी चढ्या आवाजात बेसुमार गाऊ लागला तो खाडिलकरांच्या आवाजात. देवलांच्या 'माडिवरी चल ग सये जाऊ झडकरी' असे अर्धा तास झाला तरी ते पद आळवीत राहिलेल्या अधीर वसंतसेनेला 'बाई एकदा लवकर जा' असे म्हणण्याची पाळी आली तर 'शिक्काकट्यार'मधील गाणाऱ्या शहाजीचे गाणे ऐकून स्वराज्य गेले अशी टीका येऊ लागली.

संगीताला महत्त्व असलेल्या नाट्यकृती संविधानक रचनेच्या दृष्टीने दुबळ्या आहेत हे निःसंशय. गाणारे नट रंगभूमीवर आल्याने अभिनयाकडे दुर्लक्ष झाले. किर्लोस्कर नाटक मंडळी करीत असलेली नाटके अभिनयाच्या दृष्टीने कमकुवत आहेत, असा ओरडा वृत्तपत्रांनी व समीक्षकांनी सातत्याने केला आहे. जवळजवळ साऱ्या संगीत रंगभूमीबद्दल तो खरा आहे. बालगंधर्वांच्या सुरेल गाण्याने मराठी रसिक पुरेपूर

वेडावला गेला हे खरे असले तरी भाऊराव कोल्हटकरांच्या तुलनेने त्यांचे गाणे दळूबाईचे आहे, अशी तक्रार आपल्या आत्मचरित्रात अहिताग्नी राजवाडे यांनी केली आहे, ती अगदीच दुर्लक्षण्यासारखी नाही खास! खाडिलकरांच्या गद्य 'भाऊबंदकी'तील आनंदीबाईचे काम आणि 'मानापाना'तील भामिनीचे वा 'स्वयंवरा'तील रुक्मिणीचे काम यांत संगीतनाटकातील अभिनयाचा कस कसा कमी झाला हे लक्षात येते. आपल्या 'एकच प्याला' किंवा 'भावबंधन' या नाटकात दुसऱ्यांना पदे लिहावयास सांगताना गडकऱ्यांना काय यातना झाल्या असतील, याची कल्पना आज येणार नाही. किर्लोस्करांनादेखील 'शाकुंतल'मध्ये देवलांना शकुंतलेसाठी पदे करावयास सांगितली ती नवी पदे करण्याच्या अनिच्छेने का संगीताचे रंगभूमीवर आक्रमण होईल या भवितव्याच्या जाणिवेने?

कुणी सांगावे?

%

# १०

# कानडीने केला मराठी भ्रतार

२ जानेवारी १९८६ ला मुंबईत, मुंबई मराठी साहित्य संघाच्या डॉ. भालेराव नाट्यगृहामध्ये एक अद्‌भुत घडले. मराठी माणसाशी आपले शतकानुशतकांचे दृढ संबंधाचे नाते अर्थपूर्णतेने व्यक्त करण्यासाठी त्यांच्या शेजारची कानडी माणसे आपला कलेचा वसा घेऊन मुंबईत आली होती. कर्नाटक शासनाने काही दिवसांपूर्वी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या हवाली एक लाख रुपये केले होते. अगदी विनाअट. महाराष्ट्रातील नाट्यकलेची कदर करणे हा त्यामागचा हेतू होता. नाट्य-परिषदेला महाराष्ट्र शासनानेही गडकरी शताब्दीच्या निमित्ताने एक लाख रुपये दिले होते. या एक लाख रुपयांच्या व्याजातून दरवर्षी महाराष्ट्रातील एका नाटककाराला त्याच्या श्रेष्ठ नाट्यकृतीच्या संदर्भात दहा हजार रुपयांचे पारितोषिक देण्याचा निर्णय परिषदेने घेतला. नोव्हेंबर महिन्यात प्रसिद्ध नाटककार वि. वा. ऊर्फ तात्यासाहेब शिरवाडकर यांना 'राम गणेश गडकरी पारितोषिक' देण्याचा एक दृष्ट लागावा असा समारंभ मुंबईत आयोजित करण्यात आला होता. त्या पाठोपाठ नाट्य परिषदेने श्री. अरुण आठल्ये संचालित 'कानडा विठ्ठलु' नावाचा कार्यक्रम कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांच्या उपस्थितीत २ जानेवारीला साजरा केला.

तो पाहत असताना साहजिकच मला तुकाराम महाराजांचा 'कानडीने केला मराठी भ्रतार' हा अभंग आठवत होता. कानडीने मराठी भ्रतार करण्याची परंपरा फार जुनी! ही कर्नाटकवधू तशी कलासंपन्न. तिची संस्कृतीही महाराष्ट्राच्या तुलनेने पुराणी. रामकृष्ण हेगडे यांनी या प्रसंगी जे भाषण लिहून आणले होते. त्यामध्ये तिच्या ज्येष्ठतेच्या साऱ्या खाणाखुणा साक्षेपाने एकत्र केल्या होत्या! राष्ट्रकूटांच्या वंशातील कविराज नृप्तंग किंवा अमोघवर्ष नावाच्या राजाने 'कविराजमार्ग' नावाचा जो ग्रंथ

लिहिला आहे, त्याचा प्रभाव महाराष्ट्रावर अनेक वर्षे होता. मराठी संस्कृतीच्या उदया-पूर्वी हळे गन्नड ( जुनी कानडी ) मध्ये विपुल ग्रंथरचना झाली होती. महाराष्ट्राचे अधिदैवत 'विठ्ठल' हेच मुळी कर्नाटकातून पुंडलिकाच्या भक्तीने लालचावून चंद्रभागेतीरी विटेवरी उभे राहिले आणि त्याने कर्नाटकाकडे कानवडा ( कानाडोळा ) केला. पुरंदरदासांची पदे आणि मराठी संतांची अभंगवाणी यामध्ये एक खोलवर नाते आहे. अकराव्या शतकात ब्राह्मणी संस्कृतीविरुद्ध बंड करण्यासाठी महात्मा बसवेश्वराने लिंगायत पंथाची स्थापना केली आणि त्यापाठोपाठ त्याच धर्तीवर महाराष्ट्रात महानुभाव पंथाचा उदय झाला. मुक्तेश्वराने लिहिलेले 'महाभारत' त्यापूर्वी दीडशे वर्षे अगोदर लिहिल्या गेलेल्या कुमार व्यासाच्या कानडी महाभारताने संपूर्णपणे व्याप्त आहे. कानडी दासरआटा ( दासखेळी ) वरून मराठीत तमाशाचा उदय झाला. १८४३ मध्ये कर्कीच्या हास्यगार मेळाव्याने सांगलीला राजेसाहेब चिंतामणराव पटवर्धन यांच्यासमोर जो यक्षगानाचा प्रयोग केला तो प्रकार पाहून राजेसाहेबांनी अशा प्रकारचे मराठी नाट्यप्रयोग सादर करण्याची आज्ञा आपल्या पदरच्या विष्णुदास भावे यांनी केली आणि त्यातूनच १८४३च्या नोव्हेंबरमध्ये मराठी नाटकाचा जन्म झाला.

कर्नाटक-महाराष्ट्राचा हा अनुबंध इथेच संपला नाही. तो ब्रिटिश राज्यात सातत्याने वाढत गेला. मध्ययुगीन काळात मराठी माणसाने कर्नाटकावर राज्य केले. शहाजी महाराजांची जहागीर 'बंगळूर' ही होती. भाऊबंदकीच्या संघर्षात मोठा मुलगा म्हणून या जहागिरीवरचा शिवाजीचा हक्क होता, तो स्वेच्छेने सोडून त्याने डोंगरदऱ्यांच्या साहाय्याने स्वराज्याची स्थापना केली तरी त्याचे वतनदाराचे रक्त कर्नाटकाकडे सतत ओढ घेत होते. संभाजीला दक्षिणच्या मुलुखावर अधिराज्य देऊन साऱ्या दक्षिणेवर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करण्याचा शिवाजीचा मनसुबा कलशाच्या नादी लागून संभाजीने धुळीला मिळविला नसता तर साऱ्या भारताच्या राजकारणाचा नकाशा वेगळा झाला असता! त्याच्याही रक्तात वतनदारीचा अंश होताच आणि त्यामुळे त्याने महाराष्ट्राचाच हट्ट धरला आणि महाराष्ट्र-कर्नाटक ही विभागणी वज्रलेप होऊन गेली. साऱ्या दक्षिण देशालाच मध्ययुगीन काळात 'कर्नाटक' म्हटले जात होते. हा सारा कर्नाटक एकेकाळी एक होण्याची शक्यता होती. महाराष्ट्राने संभाजीच्या अदूर-दर्शीपणाने ती घालविली.

हे सारे मनात खदखदण्याचे कारण, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेषतः भाषावार प्रांत-रचनेनंतर, महाराष्ट्र कर्नाटक यांच्यामधला दुरावा इतका वाढत गेला की, बेळगावच्या प्रश्नावर या दोन्ही संस्कृतीतील जिव्हाळा जवळजवळ संपुष्टात आल्यासारखा होऊन गेला. बेळगाव जवळच्या गुर्लहोसूर खेड्यात राहून अण्णासाहेब किर्लोस्कर व शेषगिरी चुरमुरीराव हे दोघे एकमेकांच्या सान्निध्यातून एकाच वेळी मराठीतून व कानडीतून कालिदासाचे 'शाकुंतल' आणीत होते. एकमेकांच्या चाली घेऊन आपल्या

नाटकातील पदरचना करीत होते, किर्लोस्कर व गंधर्व मंडळींची नाटके पाहण्यासाठी उत्तर कर्नाटकातून रसिकांचा लोंढा महाराष्ट्राकडे वळत होता, पुण्याच्या डेक्कन कॉलेज किंवा फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकून उत्तर कर्नाटकातील माणसे आपापल्या विभागामध्ये कार्य करण्यासाठी परतत होती, लो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव उरी बाळगून राजकारणात उडी घेत होती.

ते सारे सारे गेल्या पंचवीस वर्षांत संपुष्टात आले. कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमारेषेवरच्या असंख्य खेड्यांची अवस्था 'ना घरका ना घाटका' अशी झाली. एकाच घरामध्ये भिंत घालून एकमेकांचे तोंड न पाहणाऱ्या भाऊबंदाप्रमाणे त्यांची गत झाली. वास्तविक गोव्यापर्यंत सलग मराठी बोलणाऱ्यांचे एकच राज्य अस्तित्वात येणे नैसर्गिक ठरले असते, परंतु द्वैभाषिक संस्कृतीत वाढलेल्या मुलुखाचे पद्धतशीर खच्चीकरण करण्यात आले आणि माणसांची मने कटुतेने आणि द्वेषाने भरून गेली. माणसा-माणसांमध्ये राजकारण्यांनी निर्माण केलेल्या दुराव्याने दावा साधला आणि शेकडो वर्षांच्या कलेच्या साधनेला तडे गेले. ते इतके की, गडकऱ्यांची सारी नाटके कर्नाटकात वर्षानुवर्षे कानडीत होत राहिली आहेत याचे गडकरी जन्मशताब्दीच्या वेळी महाराष्ट्राला विस्मरण झाले होते, याची जाणीव आता झाली! साऱ्या भारतात वि. स. खांडेकरांइतका लोकप्रिय कादंबरीकार दुसरा नसेल! त्यांच्या कादंबऱ्या मराठीत खपल्या नाहीत इतक्या प्रती भातृभाषेत खपल्या आहेत. मराठीने गेल्या काही वर्षांत त्याचा शोध घेण्याची निष्ठा न बाळगता आपल्या लोकप्रिय साहित्यिकांवर चिखल-फेक करण्यातच समाधान मानले. मराठीतून कानडीत, तेलगूत, गुजरातीत किती वाङ्मय भाषांतरित होऊन गेले आणि मराठीने या भाषांतील किती वाङ्मय मराठीत आणले याचा शोध घेतल्यास मराठी आपल्या कर्तव्यात कमी पडली असा निष्कर्ष काढावा लागतो.

दोन वर्षांपूर्वी कै. ग. ह. खरे यांना कर्नाटकामध्ये त्यांनी शिलालेखांच्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल ताम्रपट अर्पण करण्याचा समारंभ झाला. या समारंभामध्ये दक्षिणेतील विद्वानांचे वर्णन करताना माझ्याशी बोलताना खरे म्हणाले, 'हे विद्वान मातृभाषेइतक्याच सुलभतेने तासन्तास अस्खलित संस्कृतातून बोलत होते. महाराष्ट्राने हे भाग्य हरविले आहे या कल्पनेने मी अतिशय खंतावलो. माझी मान खाली झाली.'

महाराष्ट्राने खंतावे असे गेल्या काही वर्षांत खूप घडत चालले आहे; ते थांबावे आणि मराठी आणि कानडी माणसे एकमेकांच्या जवळ यावी यासाठी हेगडे यांनी एक लाख रुपये दिले आणि ते सातत्याने पुढेही देण्याची मनीषा कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविली. 'कानडा विठ्ठलु' या कार्यक्रमाच्यावेळी रामकृष्ण हेगडे यांनी लिहून आणलेले भाषण दूर ठेवून, जे एक उत्स्फूर्त मार्मिक भाषण केले, ते ऐकत असताना 'हा माणूस राजकारणी असला तरी सुसंस्कृत आहे' हे क्षणात जाणवून गेले. ते

म्हणाले, ‘ तीस वर्षांपूर्वी मी विनोबांच्या आश्रमात पवनार येथे होतो. त्यांच्याजवळून मी मराठी शिकलो. मी मराठीतले कादंबरीकार, नाटककार वाचले. गीतारहस्य, गीताप्रवचने मराठीत वाचली. काही मराठी गोष्टींची कानडी भाषांतरे केली. कर्नाटक-महाराष्ट्राचा भ्रातृभाव माझ्या मनात इतका खोलवर रुजला आहे की, कसल्याही राजकारणाने तो दूर होणार नाही. बेळगावपासून मिरजेपासून जी असंख्य खेडी पसरली आहेत, त्यांचे प्रश्न इतके एकसारखे आहेत की, या प्रदेशावर सातत्याने दुष्काळ पडतो, तोही सर्व ठिकाणी सारखा पडतो. केवळ भाषिक प्रश्नामुळे त्यांच्या मध्ये दुरावा करण्याचे पाप राजकारण्यांनी कशाला करावे ? जुने सांस्कृतिक संबंध आठवून कलावंतांनी त्यांची सांधेजोड करावी. ’ खरेच आहे ! परंतु दुरावा निर्माण झाला आहे हेही खरेच. तुकारामांच्या अभंगातील कानडी महिला आपल्या पतीला ‘ इलबा ’ ( जवळ घे ) म्हणून जवळ बोलाविते. परंतु भाषा न कळल्यामुळे तो तिच्यापासून दूर जातो. महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील अवस्था हीच आहे. ही दुरवस्था दूर व्हावी असे कर्नाटकाच्या सुविद्य मुख्यमंत्र्यांना वाटते आणि त्यासाठी ते मराठी नाट्यपरिषदेने सादर केलेल्या कार्यक्रमास अगत्याने येतात. कार्यक्रमास सर्व प्रकारे दाद देतात. कानडी यक्षगानाचा प्रयोग चिंतामणरावांसमोर सादर कसा केला याच्या प्रात्यक्षिकात कानडी नाटकातील भव्य व आकर्षक रंगभूषा व वस्त्रभूषा यांच्या पार्श्वभूमीवर मराठी नाटकातील त्याच्या अभावाची नोंद घेतात. मूळ कानडी पदांच्या चाली व त्या धर्तीवर किर्लोस्कर, वखले आणि गोविंदराव टेंबे यांनी मराठी नाटकास दिलेल्या संगीताचा आस्वाद घेतात. गंगूबाई हनगलांसारखी गायिका केवळ दो मिनिटांचे गाणे म्हणण्यासारखी उपस्थित राहिली आहे हे त्यांच्या लक्षात येते. आपण ज्यांची मुद्दाम राज्यसभेवर व विधानपरिषदेवर कलावंत म्हणून निवड केली, त्यांनी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती लावली आहे या कल्पनेने त्यांना धन्य वाटते आणि जुन्या काळात पौराणिक नाटके करण्यासाठी निर्माण झालेल्या महिला नाटक मंडळीतील हनुमंताचे काम करणाऱ्या महिलेने आल्या आल्याच उच्चारलेल्या पहिल्याच वाक्याच्या दणक्याने सारे प्रेक्षागृह दणाणून उठते हेही पाहतात. आणि म्हणतात की,

‘ पुढच्या वर्षी असाच कार्यक्रम बंगलूरला येऊन करा. ’

महाराष्ट्राचे आणि कर्नाटकाचे मुख्यमंत्री शेजारी शेजारी बसले आहेत आणि असाच कार्यक्रम चालू आहे. त्यासाठी महाराष्ट्रातून भीमसेन जोशी, पु. ल. देशपांडे इत्यादी व्यक्ती गेलेल्या आहेत...

कर्नाटकाने ‘ इलबा ’ म्हटल्यानंतर महाराष्ट्र तिला आलिंगन देण्यासाठी धावून जातो आहे...

# ११

# मराठी नाटकांनी केलेला बेंटिंकचा पराभव

ललित वाङ्मय हे समाजातील प्रगमनशीलतेचा आणि सामाजिक स्थितिगतीचा कितपत वेध घेते, या प्रश्नाचा फारसा सखोल विचार नेहमी केला जातो असे नव्हे. समाजातील सर्व थरांतील चित्रे ललितवाङ्मयात व्यापकतेने प्रतिबिंबित होतात, अशी जी कित्येक अभ्यासकांची समजूत असते, ती कितपत योग्य असते ? साहित्य आणि समाज, साहित्याची सामाजिक बांधिलकी इत्यादी विषयांचा अलीकडे मोठ्या प्रमाणात विचार केला जातो. मार्क्सप्रणीत साहित्याच्या विचारांचा वारंवार उद्‌घोष केला जातो. महाराष्ट्रातील स्त्रीसुधारणेच्या कार्यातील सतीबंदीच्या महत्त्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात या प्रश्नाची पाहणी करण्यासारखी आहे.

इसवी सनाच्या सातव्या–आठव्या शतकांत हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आणि त्याला नैतिकदृष्ट्या मोठे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी हिंदुधर्मातील उच्चवर्णियांनी स्वतःवर काही कडक निर्बंध घालून घेतले. साहजिकच मध्ययुगात चातुवर्णातील पहिल्या दोन वर्णांतील स्त्रियांवर कमालीचे जाचक निर्बंध लादण्यात आले. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी, केशवपन, वारसा हक्कापासून तिची फारकत अशा अनेक मार्गांना ‘ न स्त्री स्वातंत्र्यमर्हती ’ या मनूच्या वचनाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात आली. या तिच्यावर लादलेल्या निर्बंधांमध्ये पतीच्या मृत्यूनंतर वरच्या दोन वर्णांतील स्त्रियांना काही विशिष्ट परिस्थितीत पतीच्या चितेबरोबर सहगमन करावयास लावणे, हा एक सार्वत्रिक प्रकार रूढ झाला स्त्रीचे शील सर्वाधिक महत्त्वाचे व सामाजिक शुद्धतेचा सर्वोच्च दंडक म्हणजे स्त्रीचे पातिव्रत्य, या कल्पनेला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले. दुर्दैव असे की, स्त्रीचे पातिव्रत्य टिकविण्यासाठी तिचे स्वसामर्थ्याने संरक्षण न करता येणाऱ्या समाजाने तिच्यावर अशी सक्ती करण्याचा आपला अधिकार काय, याचा

हिंदुसमाजाने यत्किंचितही विचार केला नाही. पुरुषप्रधान संस्कृतीची ही एक प्रकारे पोकळ व अमानुष अरेरावीच होती. समाजाच्या जाचक निर्बंधामुळे व्यक्तीच्या आपल्या अपत्यावरच्या व जिव्हाळयाच्या व्यक्तीवरच्या उत्कट प्रेमाची क्षणात माती होऊन जात असे.

या देशात इंग्रजांचे राज्य सुरू झाले आणि गावोगावी सती जाणाऱ्या स्त्रियांच्या किंकाळयांनी काही दयाळू इंग्रज अधिकारी अस्वस्थ होऊ लागले. आणि त्यांनी सुरू केलेल्या इंग्रजी शिक्षणाच्या सामर्थ्याने या प्रश्नाकडे आपल्या तरुणांचे लक्ष वेधले जाऊ लागले. सुरुवात बंगालपासून झाली. कारण बंगालवर इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रापूर्वी सुमारे ३५–४० वर्षे अगोदर सुरू झाली होती. राजा राममोहन रॉय दोन दिवसांसाठी बाहेरगावी गेले असता त्यांची लाडकी वहिनी अलकनंदा हिला अचानक वैधव्य प्राप्त झाले आणि स्वतःच्या दीराचे तोंड पाहण्याची तिला संधी न देता समाजाने तिला १८१० मध्ये सती जायला लावले. अस्वस्थ झालेल्या राममोहन रॉयनी या अन्यायी व दुष्ट रूढीविरुद्ध चळवळीला सुरुवात केली. इ. स. १८१८ मध्ये या प्रकाराविरुद्ध त्यांनी धर्मग्रंथांतील वचनाधारे एक पुस्तक प्रसिद्ध केले. या पूर्वी महाराष्ट्रात कॅप्टन हेन्री रॉबर्टसन डंडास या इंग्रज अधिकाऱ्याने पुण्याला अनेक नामांकित शास्त्र्यांची सभा भरवून या दुष्ट रूढीविरुद्ध मानवतावादी दृष्टिकोणाने ब्राह्मणांची मने तयार करण्याच्या कार्याला सुरवात केली. ब्राह्मणांनी धर्माच्या नावावर कानावर हात ठेवले. त्यामुळे धर्मग्रंथामध्ये पर्णकुटी तयार करून तिच्यामध्ये पतीसह जाळून घेण्याच्या सतीच्या तिसऱ्या प्रकाराचे जे वर्णन आहे, त्याप्रमाणे जिच्यावर सक्ती होत होती अशी बाब खुनासारखा गुन्हा समजून संबंधितांना शिक्षा केली जाईल, असे त्याने जाहीर केले. इंग्रजांनी सतराव्या-अठराव्या शतकात, सक्तीने सती जाणाऱ्या स्त्रियांच्या किंकाळयाचे जे वर्णन केले आहे, ते अंगावर काटा आणणारे आहे. अशांसारख्या प्रकारांच्या अवलोकनाने लोकहितवादींनी सात्त्विक संतापाने 'हा अधम हिंदूधर्म' असे म्हटले आहे. हिंदूंच्या धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप न करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या इंग्रज सरकारने, राजा राममोहन रॉयसारख्यांच्या प्रयत्नामुळे, इ. स. १८२९ मध्ये लॉर्ड बुइल्यम बेंटिंक याने कायदा करून या दुष्ट रूढीला कायमची तिलांजली दिली. अर्थातच कायदा केल्यानंतर काही ठिकाणी सती जाण्याचे कित्येक प्रकार चोरून चाललेलेच होते. तेही डोळयात तेल घालून सरकारने बंद केले.

सती जाण्याच्या काही प्रकारांतील निर्घृणता स्पष्ट असली तरी पतिप्रेमाने स्वयंप्रेरणेने सती जाणाऱ्या स्त्रियांची इतिहासकाळामध्ये काही उज्ज्वल चित्रे दिसत होती. वयात आलेल्या आणि पतिसमागम प्राप्त झालेल्या स्त्रीला काही अपत्य नसेल, तर सती जाणे अपरिहार्य असे. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनतर राजाराम लहान होता, म्हणून सोयराबाई सती गेली नाही, परंतु मूलबाळ नसलेली पुतळाबाई स्वेच्छेने सती गेली.

अशाच तऱ्हेचे सतीचे एक उज्ज्वल चित्र चिटणीसांच्या बखरीत आहे. चिमाजी-आप्पांच्या स्त्रीला, माधवराव पेशव्यांच्या स्त्रीला विनापत्यतेमुळे सती जाणे अपरिहार्यच होते. नारायणरावाच्या वधानंतर दिवस गेले असल्यामुळे गंगाबाईला सती जाऊ दिले नाही. पेशवाईतील सतीच्या चित्रणातले सर्वांत उज्ज्वल चित्र बळवंतराव मेहेंदळ्यांच्या पत्नीचे होय. पानिपतपूर्व चकमकीत बळवंतराव मेहेंदळे मारले गेल्यानंतर त्यांची स्त्री ज्या धैर्याने सती गेली, तो प्रसंग अत्यंत हृदयद्रावक होता. आप्पा बळवंत हा त्या वेळी लहान मूल होता. तो आईने सती जाऊ नये म्हणून तिला बिलगून बसला. भाऊसाहेब पेशवे आणि इतर सरदारांनी तिने सती जाऊ नये म्हणून तिची मनधरणी केली तिच्या सहगमनाचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्र भाऊसाहेबांच्या बखरीत रेखाटले आहे. मराठी वाङ्मयातील सतीचे हे सर्वांत परिणामकारक प्रतिबिंब आहे.

परंतु मराठीतल्या ललित वाङ्मयात तिचे हे उज्ज्वल चित्र कोणी रेखाटले नाही. ते भाग्य रमा-माधवांच्या वाट्याला आले. रमाबाईच्या सती जाण्याला माधवरावाच्या कारकीर्दीमुळे मोठे आकर्षण प्राप्त झाले. इतिहासातील या एका प्रसंगाभोवती अलीकडच्या मराठी वाङ्मयात सर्वाधिक उदात्त चित्रे निर्माण झाली आहेत.

त्याचे आद्य श्रेय विनायक जनार्दन कीर्तने या वीस वर्षांच्या तरुणाला द्यावे लागेल. १८६१ मध्ये त्यांनी 'नाटक थोरले माधवराव पेशवे' या नावाची एक नितांतरम्य. ललितकृती निर्माण केली. आधुनिक मराठी वाङ्मयाची सुरुवात या नाटकापासून होते-इंग्रजांच्या प्रभावाने गलितगात्र झालेल्या महाराष्ट्राला १८५४ पासून प्रबोधनाची स्वप्ने पडू लागली. 'प्रभाकर'कर्त्या भाऊ महाजनांनी मराठीच्या स्वाभिमानाचा पहिला हुंकार काढला आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी नावाच्या संन्याशाने 'वेदोक्त हिंदुधर्म हा जगातला सर्वांत श्रेष्ठ धर्म होय', या विचाराने तत्कालीन तरुणांची मने भारून टाकली. राष्ट्रीय स्वाभिमानाची पहिली वहिली जी झुळूक त्यांनी निर्माण केली, त्याचे प्रतिबिंब कीर्तन्यांच्या नाटकात पडले. तरुण माधवराव-रमाबाई यांच्या उत्कट प्रेमाने भरलेल्या कर्तबगार कारकीर्दीचे भव्योज्ज्वल चित्र रेखाटून नाटककाराने शेवटी माधवरावांचा मृत्यू दाखवून रमाबाईच्या सती जाण्याचे तितकेच उत्कट चित्र रेखाटले. १८६२ मध्ये हे नाटक इचलकरंजी नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले. नाटकाच्या शेवटच्या अंकात रमाबाई सती जाते, याचा भव्य देखावा आविष्कृत करण्यात येत असे. या रमाबाईची ओटी भरण्यासाठी पुण्यातील स्त्रियांमध्ये स्पर्धा सुरू झाली. पेटलेल्या चितेवर रमाबाई सतीशिळेवरून उडी मारते या देखाव्याने प्रेक्षक थरारून उठत. या चितेच्या अवशेषांची त्या काळी घरोघर देवघरात पूजा सुरू झाली. इतका या नाटकाचा समाजमनावर विलक्षण पगडा होता.

विसाव्या शतकात कविवर्य साधुदासांनी आपल्या 'पौर्णिमा' या कादंबरीसाठी पुन्हा हाच विषय निवडला आणि रमा-माधवांच्या उज्ज्वल प्रेमाची ही हकीकत सर्वरूढ

केली. १९६२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या रणजित देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीने याबाबतीत लोकप्रियतेचा कळस गाठला., मात्र सती जाण्याच्या प्रसंगातील तिच्या मनातील भावकल्लोळाचे वर्णन करताना कादंबरीकाराने कित्येक आधुनिक कल्पनांचा वापर केला आहे. कीर्तन्यांपासून रणजित देसाईपर्यंतच्या या सतीच्या चित्रणात इंग्रजी शिक्षणाने निर्माण केलेल्या आधुनिक कल्पनांचा प्रादुर्भाव झालेला आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

आधुनिक मराठी ललित वाङ्मयात या सतीप्रकाराचे प्रतिबिंब अनेक ठिकाणी उमटलेले आहे. १९६४ मध्ये चित्रकार द. ग. गोडसे यांनी 'राजियाचा पुत्र अपराधी देखा' या नाटकात संभाजीमुळे कलंकित झालेली नायिका सती गेल्याचे चित्र दाखविले आहे सती जाण्याची चाल बंद झाली तरी पतीवर उत्कट प्रेम करणाऱ्या स्त्रिया 'सती' म्हणून ओळखल्या गेल्या. कै. शांताबाई गोखले यांनी सावरकरांच्या पत्नीचे चित्रण याच भावनेने आपल्या कादबरीत केले आहे. तर विद्याधर पुंडलिकांच्या 'सती' या दीर्घकथेत याच विषयाची आधुनिक मानसशास्त्राच्या बैठकीवर वादग्रस्त स्वरूपाचे परंतु सखोल चित्रण केले आहे.

'सती' या नावाचे व्यंकटेश माडगूळकरांचे नाटक रंगभूमीवर आले. त्याची मूळ कथावस्तू इ. स. १८१८ मधली आहे. सक्तीने सती जात असलेली स्त्री चितेबाहेर पडून पळत असताना एका इंग्रज कॅप्टनने तिला आश्रय दिला आणि रणांगणावर त्याला मृत्यू आल्यानंतर ती सती जाण्याची तयारी करते, असे मोठे नाट्यपूर्ण चित्रण या नाटकात आहे. म्हणजे हिंदू पतीच्या चितेबरोबर जळायला नकार देणारी स्त्री, इंग्रज पतीच्या निधनाने सती जाण्यास तयार होते, यातला विरोधाभास मूळ हेतूचा पराभव करणारा आहे. गंमत ही की, १८६२ मध्ये रंगभूमीवर प्रत्यक्ष सतीचे विलक्षण भव्य चित्र अभिनीत होऊ शकते. मात्र १९६७ मध्ये ते होऊ शकत नाही, त्याची केवळ सूचना देऊन पडदा पडतो, हे चित्र खूपच बोलके आहे.

सतीच्या प्रकाराने अस्वस्थ होऊन हा प्रकार बंद व्हावा, म्हणून तळमळीने चळवळ करणाऱ्यांचा मराठीतील ललित वाङ्मयाने संपूर्ण पराभव केला आहे, हेच या वाङ्मयीन प्रतिबिंबाने दाखवून दिले आहे. भारतातील प्रबोधनयुगावर, पुनरुज्जीवनवादी प्रेरणांनी कशी मात केली, याचे हे एक उत्कृष्ट प्रत्यंतर होय. हरी नारायण आपट्यांनी या प्रकाराला कुठेही वाव देऊ नये आणि त्यानंतर पाऊणशे वर्षांच्या वाङ्मयात त्याचे प्राबल्य असावे, यावरून आजचे मराठी वाङ्मय प्रतिगामी की पुरोगामी, हे जाणकार वाचकांनीच ठरवावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२९ २५३९६
नोंदणी क्रमांक
ग्रंथ ताळा (स्थळ प्रत)

# १२

# अश्लील ! अश्लील ! !

१९८५ च्या मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पुण्याचा उन्हाळा अचानक वाढला. वेधशाळेच्या अंदाजांना नेहमीप्रमाणे त्याने गुगली टाकून चकवा दिला. आता तीनचार महिने आमची भाजणी करण्याचे सूर्यनारायणाने ठरविले आहे, अशी आमची समजूत झाली. परंतु आमची समजूत चुकीची असल्याचे समजून यायला वेळ लागला नाही.

अगोदरच आम्ही 'हिट आणि हॉट' नाटकांनी बेजार झालो होतो आणि त्यात असा भयंकर उन्हाळा अचानक सुरू झाल्याने 'गंडस्योपरी पीटिका' या न्यायाचा प्रत्यय आम्हाला त्या दिवशी विशेषत्वाने आला.

कधी नव्हे तो त्या दिवशी या नाटकांना 'हॉट' का म्हणतात या कल्पनेने आमच्या मनात थैमान मांडले होते. माणसं उन्हाळा असह्य झाल्याने, उकाड्याने बेजार झाल्याने अंगावरचे कपडे काढतात, तेव्हा उलट उन्हाळा थोडा कमी वाटायला लागतो. परंतु असे कपडे बिनदिक्कत काढण्याचे प्रयोग करून दाखविणाऱ्या नाटकांना 'हॉट' का म्हणावे ?

या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळण्यासाठी सूर्यदेवाने अचानक उन्हाळा प्रखर केला होता ! एरवी त्याला आणखी साताठ दिवसांचा अवधी होता !

पुण्यातला उन्हाळा सूर्यदेवामुळे वाढला नव्हता तर !

तो वाढविला होता एका वर्तमानपत्राने ! पुण्यातला 'तरुण भारत'ने एका सुप्रभाती असा शक्तिशाली बॉंब टाकला की, त्यामुळे सारे पुणे खडबडून जागे झाले आणि अचानक रस्त्यावर आले. काय झाले ते पाहण्यासाठी आम्हीही रस्त्यावर आलो तर, पुण्यातला जो तो वाचक 'गांधारी ! गांधारी ! !' म्हणून किंचाळत ग्रंथालयांकडे

जीव तोडून धावताना दिसू लागला.

ग्रंथालयांतून कधी नव्हे ते या पुस्तकाला वाचकांनी नंबर लावला आणि पुस्तकालयांनी तासा–अर्ध्या तासाने पॉप्युलर बुक डेपोकडे 'गांधारी'च्या प्रतींची मागणी केली. पुस्तक न मिळाल्याने अनेक वाचकांची गंभीर निराशा झाली. पुण्याहून मुंबईला येणाऱ्या असंख्य वाचकांनी ते पुस्तक मुंबईत स.गं.मालश्यांकडे किंवा शां.शं. रेग्यांकडे असणारच म्हणून वेळी अवेळी त्यांच्या घरांचे दरवाजे ठोठावले!

एवढा उत्पात होण्याचे कारण तरी काय असावे म्हणून मुद्दाम चौकशी केल्यानंतर कळले की, 'गांधारी' या नावाची एक भयंकर अश्लील कादंबरी प्रसिद्ध कवी ना.धों. महानोर यांनी पंधरा वर्षांपूर्वी लिहिली. तिची पहिली आवृत्ती हजारो वाचकांनी वाचली, पुण्या-मुंबईच्या रेडियोवर तिची परीक्षणे झाली. ती अश्लील असल्याचे अद्याप कुणाच्या लक्षात आले नव्हते. परंतु गेल्या वर्षी ती पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बी.ए.ला लावण्यात आली तेव्हा ती भयंकर अश्लील असल्याचा कुणाला तरी साक्षात्कार झाला! पुण्याच्या 'तरुण भारत'ने पहिल्या पानावर जाड मथळा देऊन ती अश्लील असल्याचे जाहीर केले आणि एखाद्या धर्मयुद्धाप्रमाणे आठवडाभर या बातमीचा पाठपुरावा करून वाचकांना, अक्षरशः ग्रंथालयाकडे रोज सकाळी पळायला लावले. पुण्यातील 'प्रौढांसाठी' म्हणून लावलेले चित्रपट, बुवा, बाई, ॲटीसारखी मुंबईहून आयात केलेली नाटके अक्षरशः ओस पडली.

त्या आठवड्याच्या बुधवारी मुंबईहून निघणाऱ्या डेक्कन क्वीनला प्रचंड गर्दी झाल्याचे पाहून आम्हाला आश्चर्य वाटले. गर्दी शनिवारी व्हायची ती बुधवारी कशासाठी ते कळेना! लागोपाठ आलेल्या सुट्टयांमुळं काय? छे! छे!! आमच्या उपद्व्यापी स्वभावाप्रमाणे आम्ही चौकशी केली तेव्हा कळले की, 'गांधारी' बद्दलच्या पुण्याच्या हवेचा 'फिल' यावा म्हणून बरेच लोक मुंबईहून पुण्याला चालले होते. एरवी मार्चचा शेवटचा आठवडा असूनही मुंबईची हवा थंड होती! अलीकडे मुंबईच्या हवेचा होरा थंडाईकडे चालला आहे, तिथे काही 'गरम', घडेनासे झाले आहे. 'गांधारी' 'सत्तांतर', अशांसारख्या एरवी निरुपद्रवी वाटणाऱ्या पुस्तकांनी पुण्याची हवा गरम होते. एकमेकावर दारूचे प्याले टाकण्याचा खेळ मुंबईस होतो आणि हवा मात्र पुण्याची गरम होते! उगीच नाही पुण्यास 'विद्वत्तेचे माहेरघर' म्हणतात? मुंबईला कोणी म्हणेल काय?

आपणालाही अनायासेच पुण्याच्या हवेचा 'फिल' अनुभवावयास मिळणार या कल्पनेने, गर्दीत तीन तास एका पायावर उभे राहून पुण्यास जाण्याचे परिश्रम बिलकुल जाणवले नाहीत. त्या दिवशी डेक्कन क्वीनही कधी नव्हे ती नेहमीपेक्षा पंधरा मिनिटे अगोदर स्टेशनवर आली. तिलाही नक्की घाई झाली असणार!

शिवाजीनगर स्टेशनवर उतरल्यावर ओळखीच्या दोघा–चौघांनी आमच्यावर

एकदमच हल्ला केला.

"गांधारी यांच्याकडे नक्कीच असणार !" कोणीतरी ओरडले.

"काढा महाराज, काढा एकदा ती कादंबरी !' दुसऱ्याने दमदाटी केली.

"दुप्पट किंमत घ्या. पण द्या बुक !" तिसरा काकुळतीने म्हणाला.

एवढ्यात ओळखीचा एका माणसाने अॅम्बसेडार गाडी उभी केली आणि आम्हाला आत ओढून घेतले व गाडी चालू केली !

थोडेसे स्थिरस्थावर झाल्यावर चक्रचालक म्हणाले,

"हं ! आता तरी दाखवा ती कादंबरी !"

मी त्यांना खूप सांगून पाहिले की माझ्याजवळ 'ती' नाही म्हणून ! परंतु ते ऐकायला तयार नव्हते. त्यांनी सरळ माझ्या बॅगेला हात घातला.

हा सारा प्रकार सुन्न करणारा होता. मी कादंबरी एकदा नाही दोनदा वाचली होती. ती प्रसिद्ध झाली तेव्हा पुण्याच्या रेडिओवर त्याचे परीक्षण केले होते.

ती अश्लील असल्याचे मला कुठेच जाणवले नव्हते !

मग हे प्रकरण होते तरी काय ? समोर गाडीच्या सीटवर 'तरुण भारत' चा अंक पडला होता. माझे मन विचारात गढून गेले !

सुरुवातीला माझी अशी कल्पना झाली की, मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशनच्या रामदास भटकळांनी गोडाऊनामध्ये पडलेले पुस्तक खपविण्यासाठी हा स्टंट केला असावा ! कारण पुणे विद्यापीठाने त्यांची 'हिरवे रावे', 'घरगंगेच्या काठी' ही पुस्तके दोन-तीन वर्षांपूर्वी लावली होती, तेव्हा 'मराठी'ला लावल्याने पुस्तके ती काय खपणार आणि त्यासाठी अख्खी नवी आवृत्ती काढण्याचे श्रम कोण घेणार असे म्हणून परीक्षा होऊन गेल्या तरी त्यांनी ती पुस्तके काढण्याचे श्रम घेतले नव्हते. प्रकाशन करायचे सोडून दिवाळी अंकात लेख लिहिण्याचा नाद लागल्याचा हा परिणाम, असे म्हणून ज्योत्स्ना देवधर हताश होऊन गप्प बसल्या होत्या. रॉयल्टी राहू द्या (भूतकाळात ती मिळत होती !) पण निदान पुस्तक तरी पोरीबाळींच्या हातांत जाऊ द्या, या विनंतीचा त्यांच्यावर काही परिणाम झाला नव्हता !

आता पुणे विद्यापीठात बी. ए. च्या पहिल्या वर्षाला ते पुस्तक लागल्यानंतर, कर्नाटकाप्रमाणे पुण्यातही 'मराठी' हा विषय अगदी कुठेच सक्तीचा नसल्यामुळे, मराठी घेणाऱ्या मूठभर विद्यार्थ्यांमुळे पुस्तकाची नवी आवृत्ती कशी खपणार या विचाराने त्रस्त (समंधा शांत हो !) होऊन त्यांनी हा एक नवा डाव टाकला असावा अशी आमची समजूत. कोणत्याही विद्यापीठाच्या अभ्यासमंडळावर गेल्यानंतर तज्ज्ञ मंडळी अगोदर आपले पुस्तक लावतात, हे त्यांना माहीत होते. तेव्हा पुस्तक लागण्याबद्दल त्यांना शंका नव्हती. परंतु लागल्यानंतर खपायची (खपवायची नव्हे, मराठी पुस्तकाला कोणी आपल्याला खपवील अशी धास्ती नसते.) खरी काळजी होती.

( पुण्यामध्ये ती कधी लपून राहू शकत नाही )

आताचे युग विद्यार्थ्यांच्या दारापर्यंत विद्यापीठाने जायचे आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या दारात येण्याचे दिवस संपले. त्यानुसार विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना अगोदरच प्रश्नमंजुषा पुरविल्या पाहिजेत, त्यांना अनपेक्षित प्रश्नांचे धक्के देऊन त्यांच्या कोमल अंतःकरणावर आघात करता कामा नयेत! या पद्धतीनुसार पुणे पिद्यापीठाने काढलेल्या प्रश्नमंजुषांना धडाधड उत्तरमंजुषा काढून पुण्यातील काही धंदेवाईक प्रकाशनसंस्था गब्बर झाल्या. सत्रपद्धतीमुळे दिवाळे निघाल्यानंतर जाग आलेल्या विद्यापीठाने आता ती बंद करावी अशी मागणी सुरू झाली आहे. दूरशिक्षणाची आणखी एक योजना राबविण्याचे ठरवून विद्यापीठाने लावलेल्या पुस्तकांचे मार्गदर्शक ( गाईडस् ) लिहून घेण्याचा धडाका सुरू केला आहे. विद्यार्थी पुस्तके वाचत नाहीत. यापुढे त्यांनी ती वाचता कामा नयेत असेही काही जणांना वाटते. त्यानुसार आता भर देण्यात येणार आहे दृक्श्राव्य योजनांवर. या योजनेनुसार ' गांधारी ' कादंबरीवर विद्यापीठाच्या दूरदर्शन योजनेतर्फे एक लघुपट तयार करावयाचे ठरले. चित्रपटकथा किंवा त्यांचे संवाद लिहिणाऱ्या एका प्राध्यापकांना आपण हे काम चांगले करू शकू असे वाटले आणि त्यांनी ते आग्रहाने मागून घेतले.

मागून घेतल्यानंतर मग ती कादंबरी वाचणे आले. वाचल्यानंतर तिच्यातील ग्रामीण जीवनाची काही आर्प चित्रे वाचून त्यांना कादंबरी भयंकर अश्लील असल्याचा साक्षात्कार झाला. त्या साक्षात्काराचे प्रासिद्धिक नाट्यपूर्ण रीतीने जनतेसमोर ओकण्यात आले. ' अश्लीलता हा कोणत्याही लेखनाचा गुण नसून तो फक्त आरोप करणाऱ्या मनाचा गुण आहे ' या र. धों. कर्वे यांच्या वचनाची ही आणखी एक प्रतीती !

थोडीशी विनोदबुद्धी शाबूत असती तर आपल्याला अश्लील वाटणाऱ्या दृश्यांचीच निवड करून त्यांचाच एक लघुपट तयार करण्यात आला असता तर कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी घडल्या असत्या. त्या लघुपटाला आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळणे अशक्य नव्हते ! नव्या लाटेचा विद्यापीठाने काढलेला चित्रपट म्हणून त्याचा गौरव झाला असता ! या सगळ्या सन्मानांना मुकण्याचे करंटेपण संबंधितांनी का दाखवावे ?

या सगळ्या उत्पातात अनेक गोष्टींची घरोघर चर्चा झाली. अशी चर्चा घडवून आणल्याचे ' तरुण भारत 'चे कार्य खरोखरच महत्त्वाचे आहे. त्या चर्चेकडे दुर्लक्ष करून या कादंबरीतील अश्लील वर्णने एका अंकात एकत्र छापण्याचे ' तरुण भारत 'ने जेव्हा जाहीर केले तेव्हा तो अंक केव्हा बाहेर पडतो, असे सर्वांना होऊन गेले.

मध्यंतरात धुळे–जळगावच्या प्राध्यापकांत दोन तट पडले आणि त्यांच्यांत असे पुस्तक लावायचे का असा वाद सुरू झाला. कोणाचे म्हणणे ते ' एम्. ए. 'ला लावले तर चालेल, एस् वाय् 'ला लावले तर चालेल, एफ् वायला नको.' कोणाचे म्हणणे, ते लावले तर बिघडले कुठे ? या उखाळ्यापाखाळ्यांत दहा वर्षांपूर्वी शंकर पाटलांचे 'ऊन'

हे पुस्तक विद्यापीठाने बी. ए.ला लावले होते, तेव्हा त्यातल्या ‘ वेणा ’ कथेबद्दल झालेल्या वादविवादाचा हवाला दिला जाऊ लागला. ती वाचताना यंदाचे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष शंकर पाटलांना करायचे की महानोरांना या भांडणामुळे हा विषय उकरून काढण्यात आला असावा असे वाटू लागले. हाच निकष लावायचा तर श्री. ज. जोशी काय वाईट ? असाही सूर निघाला.

दुसरे कुणी म्हणाले, ‘ पुस्तकात अमके अमके उतारे अश्लील आहेत आणि ते विद्यार्थ्यांनीं वाचू नयेत, असा फतवा काढावा म्हणजे काम झाले ! ’ आणखी कोणी म्हणाले,

‘ या सगळ्या उत्पातांत दोन गोष्टीं महत्त्वाच्या ठरल्या. पहिली म्हणजे बी. ए.च्या प्रथम वर्षाला ‘ गांधारी ’सारखे पुस्तक लावावे का ? त्याचे उत्तर शक्यतो लावू नये असे ठरले. परंतु एकदा लावल्यानंतर अभ्यासमंडळानेच त्याची चूक दुरुस्त केली पाहिजे. त्याच्या स्वायत्ततेवर आघात करता कामा नये. ’

‘ अभ्यासमंडळाच्या सदस्यांनी पुस्तके लावण्यापूर्वी वाचली पाहिजेत. ’ कोणी आणखी म्हणाले. अभ्यासमंडळाची रचना कशी होते, हे कळले तर मात्र असे कोणी म्हणणार नाही. अभ्यासमंडळाची रचना निवडणुकीने होते. विषयांच्या विभाग-प्रमुखांनी मते देऊन अभ्यासमंडळ निवडायचे असते. अशी मते मिळविणे हे अक्षरशः दिव्य असते. जातवारी, गटवारी, प्रदेशवारी या सर्वांचा निवडणुकीत गदारोळ होतो. काही संस्था प्राध्यापकांकडून सक्तीने कोऱ्या मतपत्रिका काढून घेऊन राजकारण लढवतात. काही प्राचार्यांना खूष करण्यासाठी नैवेद्य म्हणून त्यांच्या हातात कोरी मत-पत्रिका द्यावी लागते. भत्त्यांची चटक लागलेल्या कमिटीबाज सदस्यांचीही पूजा बांधावी लागते. विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाच्या निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी प्राध्यापक विद्यापीठाच्या आवारात कोऱ्या मतपत्रिका हातांत घेऊन सौदे करीत होते. दोन राज्य-शास्त्राच्या मतांना एक मराठीचे मत. तीन वाणिज्य कोऱ्या मतांसाठी एक इंग्रजीचे मत. शेवटी आपल्याजवळची इतर विषयांची कोरी मते घेऊन आपल्या विषयाचे कोणी मत देत नाही म्हणून एक प्राध्यापक घायकुतीला येऊन रडत होते.

अशा सदस्यांनी पुस्तके वाचायची म्हणजे ! न वाचायला काय झाले ? वाचण्या-साठी ती मिळाली तर पाहिजेत ?

विद्यापीठाच्या विद्वत-सभांतून साहजिकच हे पुस्तक अभ्यासक्रमातून काढून टाकण्याच्या प्रश्नाविषयी गरमागरम चर्चा सुरू व्हायला आणि अचानक वर्तमानपत्रांतून या पुस्तकासंबंधीची चर्चाच गायब व्हायला एकच गाठ पडली.

पुण्याची हवा पूर्ववत थंड झाली !

विद्यापीठाने पुस्तक अभ्यासक्रमातून काढून तर पाहावे, तर सारा बहुजनसमाज प्रचंड आंदोलन करून हा प्रश्न धसास लावील, असा ध्वनी उमटला. म्हणून हा सारा

आवाज बंद झाला अशी आमची समजूत झाली.

एवढ्यात कादंबरीची दुसरी आवृत्ती बाजारात आली. ती हाताशी लागण्यापूर्वीच उडू नये म्हणून आम्ही ती मुद्दाम मिळवून वाचली.

आम्हाला ती कुठे अश्लील वाटली नाही. दुसऱ्या आवृत्तीत पहिल्या आवृत्तीतील मजकूर गाळला असेल म्हणून आम्ही ती उलटीसुलटी केली. तसे काही झाले नव्हते !

परवाच्या शनिवारी डेक्कन क्वीनने आम्ही पुण्याला चाललो होतो. गाडीत कसलीच गर्दी नव्हती ! शासनाने पाच दिवसांचा आठवडा केल्यापासून शनिवारी प्रवास करण्यासारखा दुसरा आनंद नाही !

गाडीतच ओळखीचे एक प्राध्यापक भेटले. कुलगुरूंच्या आदेशानुसार 'गांधारी' हे पुस्तक अभ्यासक्रमातून काढून टाकल्याचा निर्णय मराठी अभ्यासमंडळाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्याची हवा या विषयावर गरम होईल अशी भीती वाटली !

पुण्याला उतरलो तर हवा अगदी थंड आणि आल्हाददायक होती !

%

# १३

# मास्तर मेला, शिक्षक जिवंत आहे !

सुमारे ४० वर्षांपूर्वी माटेमास्तरांनी 'झंकार' साप्ताहिकात 'शिक्षकाने केव्हा मरावे ?' नावाचा एक उपरोधपर लेख लिहिला होता. शिक्षकाची समाजात कदर राहिली नाही, तो उपेक्षेचा विषय झाला आहे, या जाणिवेची एक विषादपूर्ण किनार त्या लेखाला होती. मास्त्यांनी असे सुचविले होते की, शिक्षकाच्या नोकरीचा दिवस ज्या दिवशी संपेल, त्याच्या दुसऱ्या दिवशी त्याने मरावे हे त्याच्या दृष्टीने श्रेयस्कर ! माटे यांनी लेख लिहिला त्या काळात, नोकरीची २५ वर्षे किंवा वयाची ५५ वर्षे पूर्ण झाल्यावर शिक्षकाला सेवानिवृत्त व्हावे लागे ! आज त्याचे मरण आणखी तीन वर्षांनी पुढे ढकलण्यात आले आहे. शासनाची ही मेहेरबानी शिक्षकाच्या कुटुंबाला उपयुक्त असली तरी शिक्षकाच्या दृष्टीने हे जगणे मानसिक दृष्ट्या कितपत हितावह ठरते, हे ज्याच्या त्याच्या अनुभवावरून ठरण्यासारखे आहे !

कारण स्वच्छ आहे ! शिक्षकाने सन्मानाने जगावे असे त्याच्या आयुष्यात राहिले आहे काय ? कोणी म्हणेल, 'अहो, आज शिक्षकांचे पगार वाढले आहेत. त्यांचे राहणीमान वाढले आहे, मग तक्रार करण्यात काय अर्थ आहे ?'

शिक्षकाला विचारा, तो म्हणेल, 'अहो, शेकडो विद्यार्थ्यांसमोर रोजच्या रोज उभे राहून त्यांना काबूत ठेवण्याचे आणि त्यांना रस्त्यावर येऊ न देण्याचे आमचे कर्तृत्व व मनोधैर्य आणि त्यामुळे येणारा मानसिक ताण लक्षात घ्या. यांच्या तुलनेने आम्हाला मिळणारा पगार तुमच्या डोळ्यात का खुपावा ? बरे, तो तरी तुलनेने एल. आयसी, बँका, सरकारप्रणीत उद्योगधंदे इत्यादींच्या तुलनेने चांगला आहे का ? आमच्यापेक्षा वरीलसारख्या संस्थांतील शिपायांना जास्त पगार मिळत नाही काय ?'

जुन्या काळातही शिक्षकांचे आणि सरकारी शिपायांचे पगार सारखे असत. इंग्रजांनी

या देशात राज्य करावयास सुरुवात केल्यानंतर निरुपद्रवी मध्यमवर्ग एक कारकून तरी होणार किंवा मास्तर तरी होणार, त्याची फारशी कदर करण्याचे कारण नाही, कारण त्याला कसाही दाबा, चेपा, तो खाली मान घालून स्वतःला जुंपून घेईल, हे ओळखले होते. त्याचा ताठ मानेने उभा राहण्याचा कणा तेवढा काढून घेतला की, काम झाले, ही त्यांची पक्की समजूत होती. त्याप्रमाणे थोडे पैसे देऊन त्यांनी या लोकांकडून चोपून काम घेतले. ते राज्यकर्ते होते ना ? आणि त्यातही परकीय !

तेव्हा जुन्या काळात शासकीय पातळ्यावर शिक्षकाला कसली प्रतिष्ठा होती, असे मानण्याचे काही कारण नाही. जी काही प्रतिष्ठा या व्यवसायात असल्यामुळे बऱ्याच जणांना मिळाली, त्यातले काही कर्तृत्वसंपन्न होते, मातबर होते, व्यासंगी होते, गुरू म्हणून घेण्यासाठी जे जे गुण अंगी असावे लागत, ते त्यांच्या अंगी (इतर ठिकाणी त्या काळी त्यांना वाव नसल्यामुळे) भरपूर होते. फुले, चिपळूणकर, टिळक, आगरकर गोखले, परांजपे, कर्वे या प्रकारचे राष्ट्रनेते म्हणून कालांतराने ज्यांना मान्यता मिळाली असे लोक त्यात होते. ही परंपरा महाराष्ट्रात फार मोठी होती. या उज्ज्वल परंपरेचे त्या काळात अनेकांनी निष्ठेने संवर्धन केले. त्याचीच परिणती म्हणजे 'शिक्षक' हा सन्मानाचा विषय बनला. पुराणांतरी गुरू म्हणून, ज्या निष्ठा अनेक तपस्व्यांनी, ऋषिमुनींनी शास्त्री-पंडितांनी जपल्या होत्या. त्या परंपरेचे पुनरुज्जीवन आधुनिक काळात वरीलसारख्या शिक्षकांच्या तळमळीने, स्वार्थत्यागाने, राष्ट्रघडणीच्या ज्वलंत महत्त्वाकांक्षेने केले.

बदलत्या काळाबरोबर हे सारे संपले ! विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार ज्या श्रेणीने वाढला त्या श्रेणीने शिक्षकाची प्रतिष्ठा आणि शिक्षणाची गुणवत्ता खालावत गेली. 'गुरुजी' हा शब्द खेडोपाडी उपहासाचा विषय बनला. स्वातंत्र्य मिळूनही इतर कोठेही वाव नाही, स्थान नाही म्हणून या व्यवसायात शिरलेल्या ध्येयशून्य आणि व्यवहारवादी व्यक्तींनी या व्यवसायातील जुन्या निष्ठा झपाट्याने स्वतःच्या हाताने दूर सारल्या. त्यांना आजूबाजूच्या जीवनात जे चालले आहे ते उघड्या डोळ्यांनी दिसत होते. त्यांच्यातल्याच, परंतु शिक्षणाच्या दृष्टीने त्यांच्यापेक्षाही सामान्य अशा लोकांनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत एक नवी व्यवहारनीती वेगाने प्रसृत केली होती. तिचा त्यांना मोह पडला आणि त्यांनीही याच प्रवाहात स्वतःला झोकून दिले. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने शिक्षण हा एक केवळ व्यवसाय ठरला.

शिक्षकाने संस्कार करावयाचे, नागरिक घडवायचा, आहे त्यात समाधान मानून ज्ञानदानाच्या पवित्र कार्यात स्वतःला झोकून द्यायचे; या साऱ्या कल्पना म्हणजे राज्यकर्त्यांनी व इतरांनी आपली धुळफेक करण्यासाठी निर्माण केलेला मायावी शब्दजंजाळ आहे, हे त्यांनी ठरवून टाकले. शिक्षक हा एक सामान्य माणूस आहे आणि सामान्य माणूस पैसे मिळविण्यासाठी जे जे करतो ते ते, नव्हे तेच, शिक्षकाने आचारिले पाहिजे,

असे त्याने पक्के ठरविले. वकील फी दिल्याशिवाय साधे बोलायलाही तयार होत नाही, डॉक्टर अंगाला नुसता हात लावला की पैसे टाका म्हणतो, अधिकारी वजन ठेवल्याशिवाय कागदाला हात लावीत नाही, शिपाई चिरीमिरी दिल्याखेरीज स्टुलावरून उठत नाही, पोलीस, आमदार, खासदार, पुढारी यांची तर बातच सोडा. . .त्यांनी या जगात पैशालाच परमेश्वर मानले आहे. . .मग आपणच मागे का ?

परंतु शिक्षक मुळातूनच दुबळा असल्याने वरील व्यक्तींच्या पद्धतीने धावण्याचे बळ त्यांच्या पायांत असणे शक्य नाही. त्यामुळे त्याच्या शक्तीनुसार त्याने आपला मार्ग निश्चित केला. त्याने 'शिकवणी' हे सर्वांत मोठे शस्त्र आहे, हा आपला नवा बाणा ठरवून टाकला. 'शिकवणी लावणाऱ्याला परीक्षेत मरण नाही', अशी 'शरण आलेल्यास मरण चिंतू नये'च्या धर्तीवर नवी नीतिमूल्ये त्यामुळे प्रसृत झाली. या देशातील परीक्षेचे प्रचंड वेड लक्षात घेऊन या परीक्षाप्रकारांत जेवढी म्हणून छिद्रे पाडता येतील तेवढी पाडण्याचा काही मूठभर शिक्षकांनी उद्योग चालू केला. 'एक या दो बस'च्या आरोळीला बळी पडून अल्पसंततीवर समाधान मानणाऱ्या पालकांना त्यांची मुले मानसिक दृष्ट्या खेळवतात तर आपण त्यांना आणखी थोडे अधिक खेळवून त्यांचे कल्याण केले तर बिघडले कुठे, असे आज शिक्षकांना वाटू लागले आहे.

शिक्षकाच्या हातांतून शासनाने छडी काढून घेतली, त्याला विद्यार्थ्याला हात लावण्यास बंदी करण्यात आली. विद्यार्थ्याला उद्देशून जातिवाचक तर लांबच परंतु कसलीही शिवी देण्यास त्याला मज्जाव करण्यात आला ! हे सारे केले, ते त्याला मास्तरकीतून बाहेर काढून शिक्षकाच्या खुर्चीवर बसविण्यासाठी ! इंग्रजीत 'मास्तर' म्हणजे धनी. पूर्वीचा शिक्षक या 'मास्तर' शब्दाशी संबंधित ज्या ज्या गोष्टी होत्या त्या त्या बिनधास्त करीत असे. आमच्या लहानपणच्या शिक्षा तरी कशा वैचित्र्यपूर्ण आणि आकर्षक ! उलटे टांगणे, मिरच्यांची धुरी देणे, घोड्यावर उभे करणे, भर वर्गात मुलींसमोर खाली मान ठेवून उभे राहावयास लावणे, उठल्या उठल्या 'गाढव राखावयास जा म्हणणे', यांतले आज काही म्हणजे काही राहिले नाही. या सर्व गोष्टी हिंदी चित्रपटसृष्टीत नायकाने खलनायकाच्या वाट्यास आणून ठेवल्या ! परंतु हे सारे करूनही 'मास्तर'चा फक्त 'गुरुजी' झाला. ( कालांतराने 'गुर्जी' झाला. ) परंतु प्याद्याचा फर्जी व्हावा त्याप्रमाणे त्यातून आदर्श शिक्षक काही निर्माण झाला नाही.

परंतु शिक्षकाच्या व्यवसायाला अशी उतरती कळा लागली असली तरी अजूनही कित्येक ठिकाणी निष्ठेने काम करणाऱ्या शिक्षकांचे दर्शन होते. आणि अशा दर्शनाने आपले मन पुलकित होऊन उठते. अशा प्रकारचा एक उत्कट समारंभ पंधरवड्यापूर्वी मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान-समारंभगृहात पाहावयास मिळाला.

प्रोफेसर आत्माराम नारायण कोठारे यांचा त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या ८० व्या,

वर्षाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एक भव्य सत्कार-समारंभ आयोजित केला होता. अलीकडे क्वचित भरणारे हे भव्य सभागृह एका शिक्षकाच्या सत्कार-समारंभासाठी आडवारी गच्च भरून ओसंडत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रो. कोठारे यांच्याबद्दलचा आदराचा व आत्मीयतेचा भाव होता. व्यासपीठावर निरनिराळ्या विद्यापीठांचे कुलगुरू, विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधुरीबेन शहा आणि अनेक नामांकित व्यक्ती बसल्या होत्या.

सहा-सात व्यक्तींची भाषणे झाल्यावर अध्यक्षांचे भाषण व कोठारे यांचे सत्काराला उत्तर असा कार्यक्रम होता. हा सारा कार्यक्रम नियोजित वेळेत पुरा कसा होईल याची मनात चिंता होती. अशावेळी पहिला वक्ता सडकून म्हणजे तासभर बोलतो. मग इतर वक्त्यांवर नियंत्रणे घातली जातात. सगळ्या वक्त्यांची भाषणे लांबल्यामुळे सत्कार-मूर्तींचे भाषण येईपर्यंत लोक थांबतच नाहीत. वरील समारंभ हा या प्रकाराला अपवाद होता. सारे वक्ते ठरलेल्या वेळात नेमके, मोजके आणि नेटके बोलले! त्यानंतर प्रो. कोठारे यांना हार घालण्यातही योजकता होती. अध्यक्षीय भाषण म्हणजे वक्तृत्वाचा आणि लालित्यपूर्ण आत्मीयतेचा अभिनव विलास होता. डॉ. माधुरीबेन शहा या कोठारींच्या वयाच्या १२ व्या वर्षापासूनच्या विद्यार्थिनी, त्यांनी कोठारेंच्या निरलस ज्ञानदानाचे, विलक्षण कर्तव्यनिष्ठेने वर्णन केले. प्रो. कोठारे यांनी निरनिराळ्या संस्थांच्या कार्यकारिणीवर केलेल्या कार्याची माहिती दिली. विद्यापीठ कायद्याचे कोठारी यांचे सूक्ष्मज्ञान विवरून सांगितले आणि मुंबई विद्यापीठाच्या दूरशिक्षण योजनेतून कोठारे यांनी हजारोंना घरबसल्या शिक्षण देण्याची योजना कशी प्रभावीपणे कार्यान्वित केली याची माहिती दिली.

खरोखर आजही वयाच्या ८० व्या वर्षी प्रा. कोठारे दिवसभर तरुणाच्या उत्साहाने काम करतात. आपल्या हजारो विद्यार्थ्यांना ते नावाने ओळखतात आणि अगत्याने घरी बोलावून त्यांची विचारपूस करून त्याला खाऊपिऊ घातल्याखेरीज सोडत नाहीत. स्वतः ब्रह्मचारी असूनही!

त्यांचे वक्तृत्व म्हणजे जुन्या काळच्या प्राध्यापकाच्या वक्तृत्वाचा एक आदर्श. समोर ठेवलेला माईक दूर करून ते खड्या आवाजात पहिलेच वाक्य उच्चारतात तेव्हा आवाज टिपेला लागलेला असतो. गणपतराव जोशी किंवा नानासाहेब फाटक यांच्या यांच्या जातीचा तो आवाज असतो. तो क्षणात सारा प्रचंड हॉल भेदून जातो.

या वयात त्यांची श्रवणशक्ती दुबळी झाली असली तरी वक्तृत्वशक्ती सतेज आहे. सुडौल आहे. आणि गगनभेदी आहे. सत्कारादाखल ते अगदी मोजकेच बोलले परंतु भावपूर्ण बोलले. ते म्हणाले, वेदात 'एकोऽहं बहुस्याम्' असे जे ब्रह्माचे वर्णन करण्यात आले आहे तसे शिक्षकाचे आहे. मी एकच आहे, परंतु एकाचवेळी मी अणुशक्ती केंद्राचा अध्यक्ष आहे, विद्यापीठ अनुदान मंडळचाही अध्यक्ष आहे, अनेक विद्या-

पीठांचा कुलगुरू आहे, महाविद्यालयांचा प्राचार्य आहे, नौदल निगमाचा प्रमुख आहे. पण हे सारे माझ्या विद्यार्थ्यांच्या रूपाने. हे भाग्य या विद्यार्थ्यांनी माझ्या वाट्याला आणून दिले म्हणून मी त्यांचा कृतज्ञ आहे.

शिक्षक जिवंत असतो तो असा !

ॐ

१४

# जनासी पडे मोहन ऐसे लिहावे

बुधवारी चार वाजेपर्यंत मी भेटायला येतो म्हणून दुर्गाबाई भागवतांना निरोप दिला होता. कामे संपवून खेतवाडीत त्या राहतात, तेथे जाईपर्यंत साडेतीन वाजले. खेतवाडीच्या दिसेल त्या गल्लीतून आत शिरलो आणि आश्चर्य म्हणजे समोरून दुर्गाबाईच येताना दिसल्या. बरोबर प्रकाशक ह. अ. भावे होते.

'चला, एशियाटिक सोसायटीमध्ये.' त्या म्हणाल्या.

अर्थात मला जायचेच होते. मी त्यांच्याबरोबर निघालो. जाता जाता लिपिसंबंधीचे बोलणे निघाले. दुर्गाबाई उत्साहाने सांगू लागल्या. काही दिवसांपूर्वी त्यांनी कुठल्याशा नियतकालिकात 'शंखलिपी' ही जगातील पहिली लिपी असल्याचे वाचले होते. शंखाच्या वेगवेगळ्या आकृत्यांपासून प्राचीन लिपीची जडणघडण कशी झाली, हे सांगताना शंखांची जी मनोरम चित्रे छापली होती, ती पाहून दुर्गाबाईंमधील सौंदर्यसृष्टी जागी झाली आणि त्यांनी लगेच तशी चित्रे साडीवर काढून घेतली आणि ती भरून आपल्या मैत्रिणीला देऊन टाकली.

जगातला एक मोठा ठेवा आपणाला मिळाला आणि तो नाजूक हातांनी अधिक कलात्मक बनवून सहजगत्या दुसऱ्यात देऊन टाकल्याचा एक आगळा आनंद त्याच्या नजरेतून ओसंडत होता! दुर्गाबाई जातिवंत संशोधक असल्या तरी शेवटी स्त्री होत्या. सुंदर साडी, नवी पाकक्रिया म्हटली की त्यांच्यातल्या स्त्रीसुलभ भावना प्रकर्षाने प्रकट झाल्याच म्हणून समजावे!

'तुमच्या त्या आकृतिबंधाचे स्वतःकडे स्वामित्वहक्क ठेवायचे नाहीत काय? कोणीतरी व्यापारी ते प्रिंट्स् घेऊन हजारो रुपये कमावील.' मी म्हणालो.

'करू दे बापड्याला. आपल्याला काय त्याचे?' त्या म्हणाल्या, आणि चालू

लागल्या. चालता चालता एशियाटिक पुराण चालूच होते.

दुर्गाबाईंच्या तोंडून 'एशियाटिक सोसायटी' चा गेल्या ४० वर्षांचा इतिहास ऐकण्यासारखा असतो. गेल्या काही वर्षांतील या भारतातल्या अग्रगण्य संस्थेची झालेली दुर्दशा ऐकण्यासारखी असते. अनेक नतद्रष्ट माणसांनी चांगल्या संस्थांचे भजे कसे केलेले असते हे आपल्याला माहीत असते. एशियाटिक सोसायटीची हकीकत त्यापेक्षा वेगळी नसते.

सोसायटीमध्ये गेल्यागेल्याच त्याचा प्रत्यय येतो. कुणातरी उपद्व्यापी माणसाने ग्रंथालयाच्या कामात नसती खेकटी निर्माण केल्याने ग्रंथमोजणीच्या कामात कटकटी निर्माण होऊन एक फेब्रुवारीपर्यंत कुणालाही ग्रंथ घरी नेता येणार नाहीत, असा फतवा वाचायला मिळतो. आपणाला हवी असलेली पुस्तके आज काही मिळणार नाहीत, या कल्पनेने मनाचा चडफडाट होतो.

एशियाटिक सोसायटीच्या भव्य गॅलरीत प्रसिद्ध चित्रकार, कवी व सुलेखन-कलावंत ( Calligrapher ) र. कृ. जोशी यांच्या २० वर्षांच्या परिश्रमातून साकार झालेल्या भारतीय सुलेखनकलेचे एक कायमचे दालन उघडण्यात यावयाचे होते आणि त्याचा उद्घाटन-समारंभ सायंकाळी साजरा व्हावयाचा होता.

गेले वर्ष–दीडवर्षभर सोसायटीच्या पुराणमतवादी पदाधिकाऱ्यांना दूर सारून नवे नेतृत्व आणण्यासाठी खटपट चालू होती. सोसायटीच्या शैक्षणिक, सांस्कृतिक समितीची पुनर्रचना होऊन तिच्यामध्ये दुर्गाबाई-पुरस्कृत नव्या ताज्या दमाच्या तरुणांची योजना झाली होती. या समितीने सोसायटीच्या टाऊन हॉलमधल्या भव्य गॅलरीत काही मौलिक आणि चिरस्थायी स्वरूपाची दालने उघडावयाचे ठरविले होते. सोसायटीचेच एक सदस्य र. कृ. जोशी यांच्या हस्तलेखनकलेचे महत्त्व ओळखून त्यांच्या रचनांचे एक दालन उघडावयाचे ठरवून सगळी व्यवस्था करण्यात आली होती. त्याच्या उद्घाटनाची धावपळ सुरू व्हावयाची होती.

स्वतः जोशी आपल्या रचनांची मांडणी करण्यात गर्क होते. निरनिराळ्या दृष्टिकोणातून मांडलेल्या रचनांची ते पाहणी करून काही बदल करण्यात दंग होते. एका कलावंताचा होत असलेला हा गौरव त्यांनाही सुखावून गेला असणार ! वीस वर्षांच्या धडपडीचे चीज झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. वीस वर्षांपूर्वी इटलीतल्या अक्षरयोग्यांनी १७व्या शतकातील अक्षरलेखनकलेचे मांडलेले प्रदर्शन पाहून ते झपाटले गेले होते. अक्षरलेखनकलेची समृद्ध परंपरा भारतात असता, इथे त्याकडे दुर्लक्ष व्हावे, या कल्पनेने अस्वस्थ होऊन त्यांनी या कलेच्या अंगोपांगांचा शोध घ्यायला सुरवात केली आणि आज त्या माणसाने मनी बाळगलेला ध्यास सफल-संपूर्ण होऊन भारतीयांच्या अभिमानाचा विषय झालेला ते याचि देही याचि डोळा पाहत होते.

वास्तविक मुंबईतल्या फोर्ट विभागातील टाऊन हॉलची इमारत म्हणजे वास्तुकलेचा

केवढा देखणा प्रयोग होता. सुविद्य इंग्रज राज्यकर्त्यांनी प्रबोधनाच्या ज्या लाटा या देशात आणल्या, त्यांच्यावर आरूढ झालेल्यांनी गेली १८१ वर्षे या इमारतीत जमून विद्येची, संस्कृतीची उपासना केली. भारतातल्या नामवंत संशोधकांची, विद्वानांची, विचारवंतांची ही कर्मभूमी ! एलफिन्स्टन, माल्कम, अर्स्किन पेरी, जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी, झाला, पंडित, भांडारकर, रानडे, न्या. तेलंग, महामहोपाध्याय काणे यांच्यासारख्या सुपुत्रांनी येथूनच भारताच्या भावी उन्नयनाची स्वप्ने पाहिली. परंतु या इमारतीच्या गॅलरीत दुपारच्या वेळी स्टॅंपव्हेंडर्सनी ठाण मांडलेले, दारुडे झोपलेले, मध्यंतरीच्या आणीबाणीच्या काळात या जागेत नवनाट्याच्या तालमी व्हाव्यात, यासाठी खटपट करणाऱ्यांची कोण धडपड !

तिथल्या ऐसपैस खुर्चीत बसणाऱ्यांनी संस्थात्मक राजकारणात आपल्या साऱ्या शक्ती उधळावयास सुरुवात केली होती. या दालनाच्या उद्‌घाटनानिमित्त काढलेल्या अधिकृत पत्रकात संस्थेतील मौलिक ग्रंथसंग्रहाची पद्धतशीर वाताहत होत असल्याचा आरोप होता. पुस्तकांचे गठ्ठे बांधून ठेवून ते न उघडता उवऱ्यावर टाकून वाळवींनी खाऊन त्यांचा संहार झाल्याबद्दल खंत होती. काळजी न घेतल्यामुळे धूळ साठून हाताच्या स्पर्शाने तुकडे पडून नाहीशा होत असलेल्या ग्रंथसंपत्तीचा निर्देश होता. इतकेच नव्हे तर ताडीच्या गुत्त्यांच्या लीलावाचे निमित्त करून वाचकांना कित्येक दिवस ग्रंथापासून वंचित करण्यात येत असल्याच्या खेदजनक परंतु उपरोधपूर्ण भावना व्यक्त करण्यात आल्या होत्या.

दुर्मिळ ग्रंथांच्या संहाराचे हे एक विमनस्क करणारे चित्र होते. ते दूर करण्याची इच्छा पदाधिकाऱ्यांजवळ दिसली. एशियाटिक सोसायटीला केवळ ग्रंथसंग्रह करून ते आपल्या सभासदांना देणारी संस्था म्हणून जी अवकळा आली होती, ती दूर करून पूर्वीप्रमाणेच विद्या व कला यांचे माहेरघर म्हणून तिला प्रतिष्ठा यावी अशी धडपड होती. ती काहीशी केविलवाणी वाटली. कारण त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवाभावी व्यक्ती पूर्वीप्रमाणे लाभणे आता कठीण झाले आहे, याचा अनुभव मुंबईत सर्वत्र येत असल्याने 'उपद्यन्ते विलियन्ते...' असा प्रकार होणार नाही ना अशी आशंका मनात डोकावत होती. ह्या सगळ्या उपक्रमांना लागणारे द्रव्यसाहाय्य, हाही एक मोठाच प्रश्न आहे. शेवटी हे उपक्रम म्हणजे 'दरिद्राणां मनोरथः' असे होणार नाही ना ? पाहू या, काय होते ते !

श्री. र. कृ. जोशी यांनी ब्राह्मी, खरोष्ट्री लिपीपासून सुरूवात करून त्यांतली स्थित्यंतरे दाखविताना प्राचीनांनी या लिपींच्या रूपाने जी सौंदर्यदृष्टी दाखविली होती, त्यांचा ठायी ठायी शोध घेतल्याचे आढळून आले. या जुन्या अक्षरवाटिकांतील सौंदर्याबरोबरच नवी कलात्मक वळणेही त्यांनी सिद्ध केलेली आहेत. जुन्या पोथ्या, शिलालेख, ताम्रपट यांच्या लिपींतील चित्रमयता, त्यातील देखणी वळणे यांचे जोशी यांना विलक्षण

आकर्षण दिसले. ती वळणे घेऊन त्यांनी नव्या रचनाही केल्या आहेत. त्या अत्यंत वेधक आहेत. हे दालन मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर लॉर्ड स्टुअर्ट एल्फिन्स्टन याला अर्पण करण्यात संयोजकांनी कमालीचे औचित्य साधले आहे. इंग्रज गेले तरी एल्फिन्स्टनसारखे आधुनिक भारताचे द्रष्टे शिल्पकार मागे कसे राहिले हे त्यावरून लक्षात येते. प्रादेशिक भाषांतून आधुनिक शिक्षणाचे युग सुरू करणारा, पीतांबर नेसून ब्राह्मण भोजने घालणारा आणि 'तुमचा बाजीराव मीच आहे' म्हणून दिलासा देऊन मुंबई इलाख्यात नवे युग सुरू करणारा, प्रादेशिक भाषांतील ग्रंथसपत्ती गोळा करून त्यांच्यांत रमणारा एल्फिन्स्टन! त्याचे कधीतरी विस्मरण होणे शक्य आहे काय?

र. कृ. जोश्यांच्या या प्रदर्शनातील काही गोष्टी महत्त्वाच्या वाटल्या. शिलालेखांतील अक्षरवाटिका घेऊन त्या रचनांतून सारा ग्रंथ कसा लिहिता येतो हे त्यावरून लक्षात येते. संत तुकारामांचे हस्ताक्षर हाती लागल्यानंतर त्या हस्ताक्षरांत त्यांची सारी गाथा लिहिता येते, हे पाहून धन्यता वाटली. उद्या ज्ञानेश्वरांचे हस्ताक्षर मिळाले तर त्यांच्या हस्ताक्षरांतील ज्ञानेश्वरी सिद्ध होईल.

र. कृ. जोश्यांच्या या रचनांत भरपूर विविधता आहे. दालनाच्या सुरुवातीला समर्थ रामदासांनी लेखनक्रिया निरूपणाचा जो समास लिहिला होता तो आकर्षक स्वरूपात अक्षरबद्ध केलेला दिसतो. तो वाचून या कलेसंबंधाने समर्थांनी जे सांगितले आहे, त्यात क्वचितच भर घालता येते, हे पाहून आनंदाने आणि विस्मयाने मन भरून येते. केवढे त्या महापुरुषाचे जीवनांगांकडे बारकाईने लक्ष होते!

जोश्यांच्या रचनेमध्ये अजून वाढीला भरपूर वाव आहे. जुन्या हस्तलिखित ग्रंथांतील सर्व प्रकारच्या देखण्या अक्षरवाटिकांचा त्यांनी अद्याप उपयोग केल्याचे दिसत नाही. शंकराचार्यांची 'सौंदर्यलहरी' जुन्या हस्तलिखित पोथ्यांवरून न घेता त्यांनी १८ व्या शतकातील शिलामुद्रणावरून घेतलेली दिसते. त्या मानाने काही आधुनिक कवितांची मांडणी दृश्य रूपाने मांडण्यात त्यांनी अधिक लक्ष दिलेले दिसते. परंतु या कलावंताजवळ तळमळ आहे, धडपड आहे, जिद्द आहे आणि सामर्थ्य आहे हे मात्र पदोपदी जाणवते.

या कलादालनाचे उद्घाटन मुंबई महापालिकेचे आयुक्त जमशेटजी कांगा करणार होते. परंतु नगरसेवकांनी त्यांना महापालिकेबाहेर पडण्यास उसंत दिली नाही, म्हणून उपायुक्त राममूर्ती यांना त्याचे उद्घाटन करण्याचा सन्मान मिळाला. एकेकाळी पोलिस आयुक्त म्हणून कर्तबगारीने मिरविलेल्या या माणसाजवळ या विषयासंबंधी आस्था आहे हे लक्षात आल्याने झालेला बदल आनंददायक वाटला. त्यांचे भाषण चांगले होते. परंतु इतका आटापिटा करून उभ्या केलेल्या समारंभास उपस्थिती बेताची होती. मुंबई शहर स्वतःला कसे हरवत चालले आहे, याचे हे निदर्शक होते.

समर्थांनी म्हटल्याप्रमाणे, सुंदर अक्षर हे एक सामर्थ्य आहे. ते न येणाऱ्यांनी द्राक्षे

'आंबट'च्या धर्तीवर 'मोठ्या माणसाचे अक्षर वाईटच असते' अशी पद्धतशीर कंडी उठविली. हे लोक अकार्यक्षम परंतु दुसऱ्यावर सत्ता गाजविणारे अधिकारी असले पाहिजेत. 'टकल्या माणूस निर्धन क्वचित असतो' असे सुभाषित प्रसविणारा कोणीतरी लाळघोट्या हांजीहांजीखोर असला पाहिजे, हे जसे खरे आहे तसेच अक्षरांबाबतीतले वरील निदान खरे असले पाहिजे. 'जनासी पडे मोहन ऐसे लिहावे' हा समर्थांचा आदेश लहानपणापासून आपल्या मनावर बिंबवला पाहिजे.

ॐ

# १५

# चर्चासत्रांचे युग

सध्याचे युग हे चर्चासत्रांचे युग आहे. निरनिराळ्या विद्यापीठांतून आणि महाविद्यालयांतून ( बहुधा विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अनुदानाने ) नाना प्रकारची चर्चासत्रे देशभर चालू असतात. शासकीय पातळ्यांवर, औद्योगिक व सामाजिक संस्थातून आणि संशोधनपर संस्थांतून रोज या चर्चासत्रांच्या रूपाने मौलिक विचारमंथन चालूच असते, हे दूरदर्शनवरील बातम्यांतून समोरच्या टेबलांवर चहा-फराळ घेऊन बसलेल्या चर्चकांच्या रोजच्या दृश्यांनी लक्षात येते. असे दृश्य नाही असा दूरदर्शनवर एकही दिवस जात नाही. !

या चर्चासत्रांतून तज्ज्ञ मंडळी विद्वत्तापूर्ण व मौलिक स्वरूपाचे निबंध वाचतात. त्यांना 'पेपर वाचणे' असे म्हणतात. चर्चासत्राचे संयोजक चर्चागृहात प्रवेश करण्यापूर्वीच केवळ त्यासाठीच बसविलेल्या ललनांच्या हस्ते चर्चकांच्या हाती एक संचिका ठेवतात. या संचिकेमध्ये कार्यक्रमाची रूपरेखा आणि तदनुषंगिक कागदपत्र असतात. या संचिकांच्या स्वरूपावरून यजमानसंस्थेच्या दानतीची पहिल्याझूठ कल्पना येते. साधी दीडदोन रुपयांची संचिका, त्यात चारदोन कोरे कागद व चार-आठ आण्यांची कंदुकी लेखणी हे या चर्चासत्राच्या आर्थिक दृष्ट्या कनिष्ठ वर्णाचे लक्षण. संचिकेवर यजमानसंस्थेचे व चर्चासत्राचे आकर्षक नाव छापून आत भरपूर चक्रमुद्रित 'पेपर्स . असतील ते मध्यम वर्णाचे चर्चासत्र, भडक रंगांतील संचिका, आत इतरांची भोजनांची निमंत्रणे व भेटवस्तू असणे हे वैश्य वर्णाचे चर्चासत्र, संचिका ठेवण्यासाठी आकर्षक प्लॅस्टिकची हस्तपेटिका, आतमध्ये दैनंदिनी, दूरध्वनी-क्रमांक—नोंद-पुस्तिका, सुमारे चार-पाच रुपये किंमतीची लेखणी आणि हस्तपेटिकेवर व संचिकेवर सोनेरी मुद्रांकन असले की ती संस्था उच्चवर्णीय. कोणत्याही क्षेत्रात चातुर्वर्ण्य निर्माण

करण्याची किमया अशी सर्वच क्षेत्रांत दिसून येते.

मोठ्या विद्यापीठांतून चर्चेसाठी आलेले तज्ज्ञ लोक अगोदर आपल्या परतीच्या विमानाचे आरक्षण झाले आहे की नाही या काळजीत असतात. बहुतेकांच्या हातांत विमानांची रंगीबेरंगी तिकिटे झळकत असतात. आणि या व्यक्ती जर दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशातील असतील तर When I was in the states हे वाक्य त्या व्यक्ती चर्चेच्या संदर्भात एकदा तरी ऐकविल्याखेरीज राहत नाहीत. इतक्या सहजपणे त्यांच्या मुखांतून इतर राष्ट्रांची नावे येत नाहीत. त्यावरून त्या राष्ट्रांची या क्षेत्रातील–मागासलेपणाची कल्पना आल्याखेरीज राहत नाही. नाहीतरी चर्चासत्रांचे हे पिल्लू आणि शिक्षणक्षेत्रातील नव-नव्या अत्याधुनिक सुधारणांचे पक्षी आपण स्टेटस्‌मधूनच आयात केलेले असतात !

ही चर्चासत्रे कोणत्याही भाषेत असेनात का, त्यांची म्हणून एक परिभाषा ठरलेली असते. आलेल्या चर्चकांचा प्रवासभत्ता, निवासखर्च इत्यादी त्यांना कळेल अशा तऱ्हेचे शब्द वापरणे निखळ अडाणीपणाचे असते. त्यासाठी 'टीएडीए' 'हॉल्टिंग अलाउन्स', हेच शब्द वापरले पाहिजेत. या गोष्टी नीट पाहण्यातच यजमानसंस्थांच्या संयोजकांची सारी शक्ती खर्च होते. त्यामुळे त्यांना चर्चासत्रात जे काही विचारमंथन होते तिकडे लक्ष देण्यास फुरसतच सापडत नाही. नाहीतरी चर्चासत्रांचे यश त्यातल्या चर्चेवर अवलंबून नसतेच मुळी ! पार्टिसिपंटस्‌च्या हॉस्पिटॅलिटीचा प्रश्न फार महत्त्वाचा असतो. एक मोठे चर्चासत्र आयोजित करणाऱ्या संयोजकांनी, विद्यापीठ अनुदान मंडळाने हॉस्पिटॅलिटीसाठी रक्कम मंजूर केलेली पाहून, ही रक्कम, चर्चेत भाग घेणारे ऐनवेळी आजारी पडले तर औषधपाण्यासाठी आहे या कल्पनेने, एका शेजारच्या हॉस्पिटलमध्ये अगोदर सांगून तशी व्यवस्था केली होती. ही रक्कम आदरातिथ्यासाठी आहे, हे चर्चासत्र संपून गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आले !

या हॉस्पिटॅलिटीमध्ये कशाचाही समावेश करता येतो. चहापाणी, नाश्ता, चर्चेच्या मध्यंतरात द्यावयाचे कामचलाऊ उदरंभरण ( त्याला 'वर्किंग लंच' असे म्हटले पाहिजे ! ) आणि चर्चकांना चर्चेच्या वेळेत शहरातील प्रेक्षणीय स्थळे दाखविण्याची व्यवस्था, यांसारख्या पाहुण्यांच्या सुखसोयी पाहण्याची दक्षता त्यामुळे घेता येते. कोणतेही चर्चासत्र उद्‌घाटनसमारंभाखेरीज कधीही सुरूच होऊ शकत नाही. सर्वारंभे गणेशपूजनासारखेच ते असते. या समारंभासाठी विशेष पाहुण्यांची योजना असते. त्यांच्या उद्‌घाटनाच्या भाषणापूर्वी संयोजकांनी आपल्या प्राचार्यांचे वा संस्थाप्रमुखांचे मुक्तकंठात स्तवन करावयाचे असते व त्यांनीही 'वत्सा, तुजवर मी संतुष्ट असून तुझ्या साऱ्या कार्यक्रमाची निर्विघ्न सांगता माझ्या कृपेने होईल, याची मी हमी घेतो', असे म्हणावयाचे असते.

हा गणेशाध्याय आटोपल्यानंतर चर्चासत्राचे पहिले सत्र पूर्ण झालेले असते. त्यामुळे

साहजिकच चहापाणी होऊन उद्घाटकांना निरोप द्यावयाचा असतो. चर्चासत्रासाठी उद्घाटकांनी व प्राचार्यांनी थांबायचे नसते. उद्घाटकांनी निरोप घेतला पाहिजे व प्राचार्यांनी आपल्या ऑफिसमध्ये जाऊन सह्या करत बसले पाहिजे, या संकेतांचे त्यांनी पालन करावयाचे असते.

चर्चासत्रमध्ये निबंध वाचायचा नसतो तर 'पेपर प्रेझेंट' करावयाचा असतो. तो प्रेझेंट केल्यानंतर एकदोन किंवा अधिक चर्चकांनी त्याबद्दल आपली अभ्यासपूर्ण मते मांडायची असतात. विद्यापीठ अनुदान मंडळाने त्यासाठी 'रिसोर्स पर्सन्स्' नेमावेत असे म्हटले असल्याने आणि त्यांच्या वेगळ्या मानधनाची ('रेम्युनरेशन' बरे का!) सोय केल्याने अशी व्यवस्था करावी लागते. त्यांनी पेपर वाचणाऱ्यांच्या पेपरांतील मूलभूत आशय शोधून काढावयाचा असतो. त्याऐवजी आपल्या नेहमीच्या सवयीनुसार ते सुरवातीलाच त्या पेपरचा चांगला पंचनामा करतात. त्यानंतरच्या चर्चेला त्यामुळे रंगत यावी, अशी त्यांची समजूत असावी. !

या चर्चासत्रांतून आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करण्याची विद्वानांमध्ये अहमहमिका लागली असल्यास नवल नाही. 'स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्य' या विषयावर साहित्य अकादमीतर्फे मोठा परिसंवाद भरविला जातो. प्रत्येक भाषकाने आपला निबंध इंग्रजीत लिहावयाचा असतो. आता एवढ्या मोठ्या विषयाची चर्चा थोडक्यात कशी होईल? प्रत्येक विषयात कमीत कमी २०–३० चक्रमुद्रित पृष्ठे तरी हवीत! एकेका भाषकाने आपला पेपर वाचायला सुरवात केली की, बाकीचे जांभया देत झोपा तरी काढतात किंवा शेजारच्या उपाहारगृहात बसून भाषिक संपर्काची देवघेव करतात. अशावेळी दिल्लीतच राहणाऱ्या एखाद्या भाषिकतज्ञाने पेपर लिहिला असल्यास माडखोलकर–माडगूळकर यांच्यातले द्वैत संपुष्टात येते. ना. ह., ह. नां.चे, द. भि. भीमरावांचे सुपुत्र ठरून पिता-पुत्रांनी उज्ज्वल वाङ्मयनिर्मिती केल्याचा शोध लागतो! कथासंग्रह, कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे यांची अदलाबदल होते!

स्वातंत्र्योत्तर काळातील चर्चासत्रांचा हा अनुभव पाठीशी असल्याने अलीकडे पेपर प्रेझेंट करणाऱ्याने तो वीस मिनिटांत प्रझेंट करावा, चर्चकांनी दहा मिनिटांत आपले म्हणणे मांडावे अशी बंधने संयोजकांकडून घालण्यात येतात. परंतु पेपर वाचणाऱ्यांनी नियम धाब्यावर बसविले नाहीत असे कधी होत नाही! पेपर वाचता वाचता डोळ्यावरचा चष्मा हातात घेऊन ते अधूनमधून भाष्ये करीत तासभर बोलल्याखेरीज खाली बसत नाहीत. चर्चकांनाही मग स्फुरण येते. कमीत कमी अर्धा तास बोलल्याखेरीज खाली बसावयाचे नाही या प्रतिज्ञेने ते बोलावयास उभे राहातात आणि साऱ्या चर्चासत्राचा विचका होऊन चर्चा न होताच चर्चासत्र संपुष्टात येते आणि 'लंचनूडिनर'साठी तत्परतेने वेळेवर उठावे लागते.

वक्त्याने नेमक्या वीस मिनिटांत आटोपशीरपणे विषय मांडल्यानंतर चर्चकांनी त्या

संदर्भात चर्चा करावयाचे सोडून ' त्यात काय नाही ' हे सांगण्यात पुरुषार्थ दाखविला नाही असे घडत नाही. चर्चेसाठी जमलेल्या इतरांच्या हातात एकदा चर्चा गेली की, मग त्या विषयाचे काय हाल होतात हे सांगणे महाकठीण होऊन जाते. कोणीतरी एखादी लठ्ठ पुरंध्री उठते आणि ती म्हणते, ' चांगली कादंबरी कोणती आणि श्रेष्ठ कादंबरी कोणती हे अगोदर ठरविल्याखेरीज ही चर्चा करणे बरोबर ठरणार नाही. तेव्हा अगोदर या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे.' लगेच दुसरी एक व्यक्ती म्हणते, ' चांगुलपणा आणि श्रेष्ठत्व हे यच्चयावत् कादंबरीच्यामध्ये कुठेतरी दडलेले असतात. ते शोधले पाहिजेत. ' तिसरे एक गृहस्थ उठतात आणि म्हणतात, ' स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीचे विशेष तिच्या आधुनिकतेत आहेत. ही आधुनिकता मर्ढेकरांच्या नव्हे तर मार्क्सच्या विचारातून आहे हे लक्षात येते. तेव्हा मुख्य वक्त्याने त्याचा विस्ताराने खुलासा करावा. ' चवथी एखादी चवळीची शेंग उठते आणि म्हणते, ' भारतीय परंपरा आणि संस्कृती यांच्या यथार्थ आकलनाखेरीज मराठी कादबरी कळणार नाही. तेव्हा अगोदर ही संस्कृती काय आहे हे पाहिले पाहिजे. ' लगेच सहावे गृहस्थ उठतात आणि म्हणतात, ' श्रीमती कांचन म्हणाल्या ते बरोबर आहे. भारतीय संस्कृतीचे अस्सल प्रतिबिंब मराठीतल्या ग्रामीण कादंबरीत पडले आहे. ग्रामीण कादंबरी हीच मराठीतील खरी कादंबरी. बाकी सारे साडेतीन टक्क्यांचे मध्यमवर्गीयांचे थोतांड आहे. ' आता चर्चा ऐन बहरात येते. एक प्राध्यापक पेपरमध्ये नसलेल्या शंभर कादंबऱ्या व पन्नास कादंबरीकार यांची नावे घेऊन ही नावे पेपरमध्ये नसावीत हा अक्षम्य गुन्हा आहे, असे जोरात सांगतात. चर्चेमध्ये आपला गौरव होईल म्हणून उपस्थित असलेल्या काही कादंबरीकारांना हे मत अतिशय महत्त्वाचे वाटते. ते माना डोलवितात आणि टाळ्या वाजवितात. मुख्य वक्त्याला आता उत्तर द्यायचे असते आणि वेळ संपलेला असतो. उत्तर देण्यासाठी त्याला दोन मिनिटांचा अवधी देण्यात येतो. तो तावातावाने सगळ्यांचा दहा मिनिटांत समाचार घेतो.

चर्चासत्राच्या अन्त्य समारंभासाठी ( व्हॅलेडिक्टरी फंक्शन ) आणलेल्या महनीय व्यक्तीला ( डिग्नीटरी ) घेऊन संयोजक ताटकळत असतात.

हा अन्त्य-समारंभ झाल्याखेरीज चर्चासत्राला मुक्ती नसते!

# १६

# साहित्य-समीक्षेचा तोंडदेखला पंचनामा

झपाट्याने होत असलेल्या औद्योगिकरणामुळे पुणे शहराची पृथगात्मता तितक्याच झपाट्यानं लोप पावत चालली असली तरी सांस्कृतिकदृष्ट्या पुण्यानं आपलं अद्वितीयत्व अद्याप पूर्णतः घालविले नाही, याची साक्ष देणाऱ्या घटना अद्याप पुण्यात घडत आहेत. पुण्याची ' वसंत व्याख्यानमाला ' आणि गेली चौदा वर्षे पुणेकरांच्या प्रेमाचे निधान बनलेल्या ' मॅजेस्टिकच्या साहित्यिक गप्पा ' यांचा याबाबतीत आवर्जून उल्लेख करावा लागेल. व्याख्यानांचे आकर्षण, त्यातून होणारे वैचारिक अभिसरण आणि व्रतस्थ भावनेने करण्यात येणारे त्यांचे संयोजन ही पुण्याची खासियत आहे. ती ज्या दिवशी पूर्णतः लोप पावेल त्यादिवशी पुण्याच्या वाट्याला बाहेरच्या लोकांकडून जो उपहास येतो तो नाहीसा होईल. कारण त्यादिवशी पुणं आणि इतर शहरं यांतील सांस्कृतिक अंतरच पूर्णतः नाहीसं झालेले असेल. पुण्याची पुण्याबाहेर जोपर्यंत टिंगलटवाळी होत राहील तोपर्यंत पुण्याची प्रकृती चांगली आहे, असे खुशाल मानावे. परंतु पुण्याच्या बकालपणामुळं ही प्रकृती पूर्वीइतकी ठणठणीत राहण्याची चिन्हे कमी होत चालली आहेत. आंधळ्या औद्योगिकरणामुळं ' पुण्याची हवा बरी असते ' असे म्हणण्याचीही आता सोय राहिली नाही !

मॅजेस्टिकच्या साहित्यिक गप्पांत यावर्षी निखळ साहित्यिक म्हणता येईल असा कार्यक्रम फक्त शेवटच्या दिवशी झाला. ' साहित्य मराठी परंतु समीक्षा इंग्रजी ' असा एक अवखळ विषय त्या दिवशी चर्चेला ठेवला होता आणि त्यात गंभीर प्रकृतीचे प्राध्यापक भाग घेणार होते. त्यामुळे नेहमीपेक्षा उपस्थितीत फरक पडणे साहजिक होते. मॅजेस्टिक गप्पांचे स्वरूप हलकेफुलके असावे, करमणूकप्रधान असावे अशी तिथल्या श्रोत्यांची अपेक्षा असते. त्यामुळे गंभीर विषयांच्या चर्चेची अपेक्षा असणाऱ्यांनी वसंत

व्याख्यानमालेकडे झुकावे हाही एक संकेतच पडून गेल्यासारखे झाले आहे. स्पर्धेच्या वातावरणाला त्यामुळे आपोआपच काटशह बसतो.

आता ' साहित्य मराठी; समीक्षा इंग्रजी,' असे म्हटल्यानंतर साहजिकच त्याचे तीन पक्ष पडणार हे उघड होते. एक पक्ष म्हणणार, जगाबरोबर धावायचे असल्यास अशी परिस्थिती अपरिहार्य आहे आणि तिच्याकडे दुर्लक्ष केल्यास आणि केल्यामुळे मराठी भाषा आणि साहित्य करंटे राहणार आहे. दुसरा पक्ष म्हणणार, मराठीतील समीक्षा ही इतकी परप्रेरित आहे की, त्यामुळे ती टाकाऊ आहे; मराठीत मराठी समीक्षेचीच कास धरली पाहिजे. अर्थातच मराठी समीक्षा म्हणजे काय असा अडचणीत टाकणारा प्रश्न त्यास विचारू नये. तिसरा पक्ष अर्थातच आगरकरांप्रमाणे दोन्ही दगडीवर हात ठेवणार ! तो म्हणणार, भारतीयत्व किंवा मराठीतत्व कायम ठेवून मराठीने इंग्रजी समीक्षेचा डोळसपणे उपयोग करून घ्यावा, घेतला पाहिजे.

स. शि. भाव्यांसारख्या कुशल संयोजक या चर्चेच्या केंद्रस्थानी ठेवल्यानंतर वरील तिन्ही पक्षांचे पुरस्कर्ते आपापसांत झुंजून चर्चेला रंगत आणणार हे उघड होते.

परंतु चर्चेसाठी घेतलेला विषय फार व्यापक होता आणि चर्चकांची संख्याही जरूरीपेक्षा अधिक असल्याने केवळ खडाखडी होऊन प्रत्यक्ष झुंजीला अटीतटीचे रूप येऊ न शकल्याने, गप्पांपेक्षा परिसंवादाचे रूप या कार्यक्रमाला प्राप्त झाले.

मात्र गप्पांसाठी घेतलेला हा विषय केवळ कुतूहलजनक नव्हे तर महत्त्वाचा होता. असा विषय सुचण्यामागे गेल्या वर्षभरात मुंबापुरी घडलेल्या घटना कारणीभूत होत्या. मुंबईच्या नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठात मराठी विभागाने आधुनिक साहित्य-समीक्षेचे एक चर्चासत्र आयोजित केले होते आणि सौंदर्यशास्त्र, अस्तित्ववाद, आदिबंधात्मक समीक्षा, शैली विज्ञानांतर्ग समीक्षा, समीक्षेची संरचनाप्रणाली, विरचनावाद, स्त्रीप्रधान समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा, मानसशास्त्रीय समीक्षा, भाषाविज्ञानप्रणित समीक्षा इत्यादी जडजंबाल विषयांवर तीन दिवस तेथे जे काही रामायण घडले त्याचीच परिणती दूरदर्शनवरच्या याच विषयावरच्या एका सुगम चर्चेत झाली. त्याचेच आणखी एक अपत्य म्हणजे मॅजेस्टिक गप्पांत झालेला या विषयाचा समावेश.

मॅजेस्टिकच्या विषयात संयोजकांनी चांगलाच खट्याळपणा ठेवला होता. मॅजेस्टिक-मध्ये असा विषय यावयाचा म्हणजे तो आवश्यक असतो. गंभीर विषय देखील मुद्दाम खाजवून फोडणीस टाकला म्हणजे तो चविष्ट होतो. ' साहित्य मराठी ' असे म्हणून त्यांचा गौरव करावयाचा आणि साळसूदपणे त्याच्या विरोधात समीक्षा मात्र पूर्णतः बाटलेली आहे, ती इंग्रजी आहे, असे म्हणून समीक्षकांना धोबीपछाड मारावयाचा असा हा पुणेरी बेरका ( बारका नव्हे ) कावा होता.

परंतु हा बेरकावा फारसा टिकणारा नव्हता. विरोधी पक्षाने ' साहित्य मराठी ' म्हणणाऱ्यांना खरोखरच विशुद्ध मराठी म्हणता येईल, असे मराठीत साहित्य तरी

किती आहे असा उलट प्रश्न केला. शर्ट, पँट, सोन्याच्या काडीचा चष्मा घालून व्यासपीठावर बसलेल्या मराठीवाल्यांच्या पोषाखापासून मराठी रानातील पिके तरीं मराठी आहेत का. मराठी भाषेत अस्सल मराठी शिक्क्यांचे शब्द किती आहेत, साऱ्या भारतीय पक्वान्नात खास मराठी म्हणता येईल, असे कोणते पक्वान्न आहे काय ( झुणका, थालीपीठ असे श्रोत्यांतून कोणी म्हणाले ! ) अशासारख्या प्रश्नांच्या फैरी झडल्या आणि विषयातील पूर्वपक्षाची भंबेरी उडाली. चर्चेतील एवढीच काय ती जान आणणारी, गप्पांना शोभेशी खडाखडी. बाकी न सुटणाऱ्या कुस्तीप्रमाणे नुसतीच उभाउभी.

आजचे मराठी साहित्य ( अगदी ग्रामीण साहित्यदेखील ) आजच्या समीक्षेइतकेच आंग्लसाहित्यप्रेरित आहे आणि त्यामुळे साहित्य आणि समीक्षा एकाच तागडीत घातल्यावर त्यातले एखादे पारडे विशेष जड होईल, असे मानण्याचे काही कारण नाही.

परंतु या विषयाच्या संदर्भाने मराठीतील समीक्षेची वर्तमानस्थिती काय आहे, याचा थोडासा विचार केला पाहिजे.

मराठीतील एकंदर साहित्यसमीक्षा बरीचशी ढोबळ स्वरूपाची आहे. काही मोजक्या चांगल्या समीक्षकांची तिला विवेचनपरतेची व विश्लेषणपरतेची जोड देऊन तिला प्रतिष्ठा प्राप्त करू दिली आहे. परंतु आज युरोपमध्ये वेगवेगळ्या विचारप्रणालींनी साहित्यनिर्मितीमध्ये घेतलेली झेप व त्यांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या समीक्षाप्रणाली तिथल्या बौद्धिक सामर्थ्याची संपन्नता वाढवित आहेत. साहित्य-समीक्षेची जी संपन्न परंपरा तिथे निर्माण झाली आहे, त्याचा परिणाम साऱ्या जगावर होणे अटळ आहे. ही समीक्षा केवळ इंग्रजी आहे असे नव्हे, किंबहुना इंग्रजी समीक्षा हीच मुळातून ग्रीक, रोमन, फ्रेंच, जर्मन, रशियन, इटालीयन इत्यादी भाषांतील समीक्षाप्रणालींच्या स्वीकारानेच मोठी झाली आहे. कांट, हेगेल, हायडेगर, फ्रॉईड, युंग, मार्क्स, सार्त्र, फर्दिनांद सस्यूर इ. इंग्रज नसलेल्या विचारवंतांचा केवढा प्रभाव आज इंग्रजी समीक्षेवर आहे ! इंग्रजी समीक्षेने जर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले असते तर तिचीही अवस्था आजच्या मराठी समीक्षेसारखी झाली असती ! तेव्हा मराठी समीक्षेला पाश्चात्य समीक्षा अथवा इंग्रजी समीक्षा नीट भावली नाही, हे तिच्या सामान्यत्वाचे लक्षण आहे.

विवेचनपरता आणि विश्लेषणपरता यांबाबतीत मराठी समीक्षेने जी आज लक्षणीय भर घातली आहे, ती या क्षेत्रात मिरविणाऱ्या कुलकर्णीकुलाने ! डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना आपल्या वतनांचा त्याग करा असे निक्षून सांगितले; त्यातून मराठी साहित्यात दलितांचे एक वतन उशिरा का होईना सुरू झाले. त्याचप्रमाणे कुलकर्णीवतने नष्ट करण्यात आल्यामुळे खेड्यापाड्यांतून बाहेर पडलेल्या कुलकर्ण्यांनी समीक्षेच्या क्षेत्रात ‘ कुलकर्णीवतन ’ निर्माण केले. वाल, वदि, गोम, दभि अशी दबदबा निर्माण करणारी काही वतने. शिवाजीमहाराजांनी सरंजामजाही नाहीशी करण्याचे प्रयत्न त्यांच्या वंशजांनी जसे स्थिरपद होऊ दिले नाहीत, त्याप्रमाणे वतनाची चटक

लागलेल्यांना त्यांच्या मूळच्या वतनावरून हुसकावून लावले तर ते आणखी स्वतःची वतने कशी निर्माण करतात याचे हे प्रत्यंतर आहे. या वतनाला हुसकावण्यासाठी ठणठणपाळाने अधूनमधून काही मिष्कीलखोर वार केले. पुण्यात एका दगडाने किती कुलकर्णी पडतील याचे प्रयोग केले, परंतु वतने भक्कम राहिली दुर्दैवाने देशावरची पाटलांची वतने नाहीशी न झाल्याने ते सारे मराठी चित्रपटांचा तमाशापट करण्यास कारणीभूत झाले आणि त्यांनी प्रभातची परंपरा संपुष्टात आणली !

परंतु हे कुलकर्णीवतन आता साहित्याच्या सर्वांगीण समीक्षेला पुरेसे नाही. तिची घोडदौड सीमेपार, वतनाबाहेर गेली पाहिजे या भूमिकेतून आधुनिक साहित्यसमीक्षेच्या वाटचालीला सुरुवात झाली. मर्ढेकरांना त्याचे प्रमुख श्रेय दिले पाहिजे. मराठीत सौंदर्यशास्त्रीय म्हणजे रूपविमर्षात्मक समीक्षेचा त्यांनी पाया घातला आणि या दिशेने मराठीने गेल्या ४० वर्षांत बरीच वाटचाल केली आहे. प्रभाकर पाध्ये, मे. पु. रेगे. रा. भा. पाटणकर यांना त्यांचे श्रेय आहे.

त्या मानाने अस्तित्ववादी, संरचनात्मक, भाषाशास्त्रीय शैलीविज्ञान वगैरे ज्या इतर समीक्षाप्रणाली आहेत, त्यांच्या संकल्पना मराठीत रुजविण्याचा प्रयत्न हा गेल्या काही वर्षांतला होय. या प्रणाली मुळातूनच अत्यंत सखोल अशा ज्ञानशाखांचे प्रतिनिधित्व करीत असल्याने त्यांच्या पाठीमागचे संकल्पनाव्यूह तितकेच सूक्ष्म, गुंतागुंतीचे आणि जटिल स्वरूपाचे आहेत. त्या सुलभ रीतीने मराठीत आविष्कृत करणे शक्य नाही. त्यामुळे मराठीत झालेले त्या संबंधाचे लेखन अत्यंत दुर्बोध आहे, यात शंका नाही. मराठीच्या प्राध्यापकांच्या नव्या पिढीचा इंग्रजीशी अनुबंध सुटला आहे. जवळजवळ काहीही इंग्रजी येत नाही, अशी नव्या पिढीच्या मराठीच्या प्राध्यापकांची समीक्षा बव्हंशी बाळबोध, वर्तमानपत्रोपयोगी राहाते. आधुनिक वाङ्मयाच्या संदर्भात अत्यावश्यक अशी आधुनिक समीक्षाप्रणाली आत्मसात करण्याची क्षमता इंग्रजी येत नसल्यामुळे मराठीच्या प्राध्यापकांत राहिली नाही.

मराठी प्राध्यापकांनाही त्याची आवश्यकता वाटत नाही. जुन्या पिढीच्या काही प्राध्यापकांची अशी क्षमता असली तर आधुनिक वाङ्मयाचे प्रेम नसल्यामुळे 'कळते पण वळत नाही' अशा कोंडीत सापडल्यामुळे ते निरुपयोगी होऊन बसलेले. अशी एकंदरीत आजच्या मराठी समीक्षेची अवस्था आहे. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या समीक्षेच्या क्षेत्रात मौलिक कामगिरी करणाऱ्यांत ज्यांची नावे घेतली जातात ते मर्ढेकर, दि. के. बेडेकर, गंगाधर गाडगीळ, विंदा करंदीकर, माधव आचवल, रा. भा. पाटणकर हे सारे मराठी या विषयाबाहेरचे समीक्षक आहेत. ही यादी आणखी वाढविता येईल. एखादा गंगाधर पाटलांसारखा या क्षेत्रातला अपवाद म्हणून सांगता येईल.

मुख्य प्रश्न आहे तो मराठीने या समीक्षाप्रणाली चांगल्या रीतीने आत्मसात करण्याचा. रानातल्या झोपडीत बसून 'वशाट चाखीत, डोक्यावरून'. जाणाऱ्या अवकाशयानाकडे

डोळे किलकिले करून केवळ बघत राहून, त्याच्याकडे तुच्छतेने पाहण्याची आत्मसंतुष्ट वृत्ती आज कुठल्याही क्षेत्रात फारशी उपकारक ठरणार नाही. त्यात जटिल अशा समस्याप्रणाली आणखी जटिल करून मांडण्याचा समीक्षकांचा मराठीस एक वर्ग आहे. त्यात अर्थातच भूषण मानण्याचे काही कारण नाही. त्याची जागा नवे तरुण समीक्षक जरूर घेतील.

या नव्या समीक्षाप्रणालींचा विद्यापीठीय अभ्यासक्रमात कितीही समावेश केला तरी आणि त्यासंबंधाने कितीही मौलिक स्वरूपाचे प्रश्न विचारले तरी त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात येते. सध्यातरी समोर बसलेल्या ' बाळबोध ' विद्यार्थ्यांची देखभाल करीत राहणे हेच मराठीच्या प्राध्यापकांच्या नशिबी आहे.

कारण बहुतेक समीक्षकांचा तोच अन्नदाता आहे. त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात निरनिराळ्या चळवळी करण्यास भरपूर वेळ मिळतो आणि साठा उतरांची कहाणी सफळ संपूर्ण होण्यास मदत होते.

⁂

# १७

# आपण सारेच फार्साचे धनी

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत ' फार्स : काल आणि आज ' या विषयावर चर्चेचा एक कार्यक्रम झाला. चर्चेचे संचालन माझ्याकडे होते. चर्चेला आपण उपस्थित नव्हतो म्हणून एका गृहस्थांनी नंतर मला एका ठिकाणी गाठले आणि विचारले,

" काहो, फार्स या विषयावरचे संचालन तुम्ही केलेत म्हणजे नेमके काय केलेत ? "

मी थोडा बुचकळ्यात पडलो.

' त्याचे असे आहे...' कपाळावर आठ्या घालून मी पुढे बोलणार तितक्यात तेच पुढे म्हणाले.

' समजलो, समजलो...'

' काय समजलात ? ' मी उलटा प्रश्न केला. मलाही आता चेव आला होता.

' संचालन करणे म्हणजे वेगवेगळ्या तऱ्हेची नाटके करणे, ती तुम्ही केली असणार ? '

' ते कसं काय बुवा ? मी अशी कोणती नाटके केली ? ' आता मला खरोखरच राग आला होता. उघड उघड हा गृहस्थ माझ्या तोंडावर साळसूदपणे माझी निंदा करीत होता.

' तुम्ही रागवलात वाटतं ? ' ते म्हणाले आणि त्यांनी पुढे खुलासा करताना म्हटले, "अहो असे पाहा. एखादी चर्चा किंवा परिसंवाद किंवा साहित्यिक गप्पा म्हणजे संयोजकांनी जमवलेली आवळ्या-भोपळ्यांची मोट असते. त्यातले काही जाणकार आणि अभ्यासू असतात. काही अगदी बनचुके असतात. काहींना विषयातले काही म्हणजे काऽही समजत नसते. संयोजकांनी त्यांना नाइलाज म्हणून आणलेले असते. संचालकाला त्या

सर्वांना सांभाळून घ्यावे लागते. मध्ये बसून त्यांच्या बोलण्याकडे, मनात नसतानादेखील लक्षपूर्वक ऐकावे लागते. मध्येच माना डोलवाव्या लागतात. त्यांच्या कसल्याही विनोदाला हसावे लागते. एखादा वक्ता चऱ्हाट वळावे अशा प्रकारे बोलतो. त्याला शर्ट खेचून बसवावेसे मनात खूप वाटते. पण चरफडत त्याचे संपेपर्यंत अस्वस्थ चुळबुळ करीत गप्प बसावे लागते. या सगळ्याला तुम्ही नाटक म्हणणार की नाही ?'

'तुम्ही बरोबर बोललात. हे सगळे नाटक खरेच, परंतु त्याला 'नाटक' न म्हणता 'फार्स' म्हटलेले बरे !' मी चांगलाच वरमलो होतो. परंतु त्यांच्या बोलण्याला पुस्ती जोडण्याच्या हेतूने मी सूचना केली.

आता खरे तर विषय संपायला हरकत नव्हती. मलाही निघायची घाई होती. परंतु त्या गृहस्थांना सेवानिवृत्तीमुळे तशी काही घाई असण्याचे कारण नव्हते. ते पुढे उत्साहाने म्हणाले.

'मी प्रतिज्ञेवर सांगतो की, कोणा तरी वक्त्याने फार्स नाटकाच्या सुरूवातीस करण्यात येत असत असे सांगितले, होय ना ?'

'खरेच की, असे एक नाही दोन वक्ते बोलले. परंतु मराठी फार्साच्या बाबतीत ते बरोबर नव्हते. ही पाश्चात्त्य देशातील घटना झाली. शेक्सपियरच्या नाटकाला कुणीतरी अर्ल, ड्यूक किंवा लॉर्ड यायचा असायचा. तिसरी घंटा झाली तरी तो यायचा नाही. अस्वस्थ झालेल्या प्रेक्षकांना रिझविण्यासाठी सुरूवातीलाच एखादा गमतीदार फार्स करण्यात येत असे. महाराष्ट्रात असे कधी घडले नाही. वक्ते काही तरी इंग्रजीतले वाचून ते सारे मराठीला लावण्याचा प्रयत्न करतात. त्याचाच हा प्रकार !' मी उत्साहाने खुलासा केला.

'आणि विषय सोडून कुणीच वक्ता बोलला नाही काय हो ?' त्या गृहस्थाने खोचकपणाने विचारले, ते माझ्या ध्यानात आले.

'चालायचेच. साऱ्यांनीच विषयाला धरून बोलल्यावर जाणत्यांचे महत्त्व काय राहिले ?' मी उगीच वाद वाढवू नये म्हणून म्हटले.

'हे तुमचे म्हणणे मात्र बरोबर नाही हं ! अहो फार्सबद्दल सोडून एखादा वक्ता आजच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेबद्दल तर तुम्ही सहन कराल ?'

'अहो, सहन केलेच ना ! आपण काय करणार ! प्रत्येकाला थोडेच नेमके आणि महत्त्वाचे बोलता येते ?'

आतापर्यंतच्या त्या गृहस्थांच्या प्रश्नावलीवरून हे गृहस्थ चर्चेला उपस्थित असले पाहिजेत हे माझ्या लक्षात आले.

'काय महाराज ! तुम्ही त्या कार्यक्रमाला हजर होतात, खरे ना ?'

'हो तर ! हजर होतो म्हणूनच तर तुम्हाला पाहिल्यावर रस्त्यात अडविले आणि थोडी गंमत केली. संगीत नाटकांनी फार्सांना खाऊन टाकले असे एक वक्ता बोलला,

त्यावेळी तुम्ही नकळतच नकारात्मक मान हलविली ती मी अगदी जवळून पाहिली.'

मी त्या गृहस्थांना कोपरापासून नमस्कार केला आणि त्यांचा निरोप घेतला. परंतु त्यानंतरही त्या कार्यक्रमास हजर असलेल्या आणखी दोघा-तिघांनी मी भेटल्यावर 'फार्स'बद्दल काही प्रश्न कुतूहलाने विचारले.

'फार्स' हा शब्द मराठीत आला कुठून आणि त्याचा नेमका अर्थ काय, असा प्रश्न विचारणारेही काही निघाले.

फार्सविषयक चर्चेत एखाद दुसरा छोटा फार्स करून दाखविल्याने बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला असता असे एका गृहस्थाने आवर्जून सांगितले. त्यांचे म्हणणे बरोबर होते. 'सुस्त्रीचातुर्यदर्शन प्रहसन अथवा गुलाबछकडीचा मनोरंजक फार्स' किंवा 'वेड्या नाऱ्याचा फार्स' यासारखा एखादा फार्स करून दाखविला असता तर गंमत आली असती हे खरेच होते. पुण्यात सुमारे दहा वर्षांपूर्वी जोशी-लोखंडे मुद्रणालयाच्या हॉलमध्ये 'गुलाबछकडीचा फार्स' करून दाखविण्यात आला होता आणि तो पाहिल्यावर त्याची परिणामकारकता लक्षात आली होती. परंतु त्याचबरोबर 'गोहंबीचा फार्स' सारखा एखादा इरसाल फार्स करून दाखविला असता तर 'शांतं पापं' म्हणून खूपच आरडाओरडा झाला असता!

आता 'फार्स' हा शब्द नेमका कुठून आला याचा समीक्षकांनाही पत्ता लागला नाही. तिथे मी काय सांगणार? इटालियन आणि फ्रेंच भाषांमध्ये त्या शब्दाचे मूळ आढळते. त्याचा अर्थ मसाला भरणे किंवा पुरण भरणे असा आहे. इटलीच्या चर्चमधून ख्रिस्ती तत्त्वाचे आविष्करण करण्यासाठी धार्मिक विषयांवर प्रवचनांची योजना करण्यात येत असे. परिणामकारकतेसाठी त्यात संवाद घालत असत. त्यात रंग भरण्यासाठी त्यामध्ये काम करणारे नट स्वतःच्या पदरचे बरेच काही घुसडीत आणि त्यामुळे हे संवाद ऐकण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी लोटे. कालांतराने अशा रीतीने पदरचा घातलेला रंजक मालमसाला तेवढाच सादर करण्यात येऊ लागला. त्यातूनच हास्यप्रधान नाटकांचा जन्म झाला. इटलीतून फ्रान्समध्ये, फ्रान्समधून इंग्लंडमध्ये आणि एकोणिसाव्या शतकात सैनिकांची करमणूक करण्यासाठी आयात केलेल्या सामान्य दर्जाच्या इंग्रजी नाटक कंपन्यांतून फार्सची लागण केली. पारशी रंगभूमीने हे फार्स सर्वांत अगोदर उचलले. मुंबईतील मराठी नाटक कंपन्या मागे राहणे शक्य नव्हते. त्यांनी अल्लऽलडुर्र पद्धतीची पौराणिक नाटके पाहणाऱ्या प्रेक्षकांना मध्येच फार्स करून दाखवून त्यांची धमाल करमणूक करण्यास प्रारंभ केला.

केवळ धमाल करमणूक करण्यासाठी फार्साचा जन्म झाला तरी समाजातील विसंगतीचे दर्शन घडविण्यासाठी काहींनी फार्साचा उपयोग केला. त्यांतूनच 'फार्स' या शब्दाला मराठीत प्रतिशब्द देण्याचा प्रयत्न झाला. फार्स म्हणजे 'नक्कल', असे काही काळ म्हणण्यात आले. फार्समध्ये समाजातील विसंगतींची नक्कल करण्यात येत असे. त्या

अर्थाने भाषेमध्ये तो शब्द रूढही झालेला दिसतो. 'त्याने निवडणुकीचा फार्स केला.' 'त्याची बायको नं फार्स करण्यात पटाईत आहे,', 'त्याचा संसार म्हणजे केवळ फार्स उरला आहे.' असे आपण नित्य बोलतो तेव्हा 'फार्स' म्हणजे रंगभूमीवर जे काही करून दाखविण्यात येत असे, त्याचा गर्भितार्थच त्यातून आपण सूचित करतो.

'फार्स' म्हणजे पुरण भरणे या अर्थाने त्यांचे उपयोजन कशा रीतीने करण्यात येत असे त्याचे एक गंमतीदार उदाहरण प्रसिद्ध आहे.

१८६१ साली विनायक जनार्दन कीर्तने नावाच्या तरुणाने मराठीतले पहिले ऐतिहासिक नाटक लिहिले. 'नाटक थोरले माधवराव पेशवे यांजवर' हे त्याचे नाव. नाटक तत्कालीन आविष्कारणापेक्षा अगदी वेगळे होते. केवळ ४० पृष्ठांचे ते गद्य नाटक होते. त्या नाटकामध्ये माधवराव – रमाबाई यांचे एकमेकांवर निरतिशय प्रेम होते म्हणून माधवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाई त्या प्रेमापोटी सती गेली अशी कल्पना करण्यात आली होती. आता हे नाटक बसविणार कोण ! परंतु इचलकरंजी नाटक मंडळींच्या राघोपंतांनी ते बसवावयास घेतले. मूळ नाटकात पुरण भरून ते दोन तासांऐवजी पाच सहा तास चालावे म्हणून त्यांनी एक अभिनव युक्ती केली. त्यांनी पुण्यामध्ये दवंडी पिटवून असे जाहीर केले की, आमच्या नाटकामध्ये शेवटी रमाबाई सती जाते. तिची ओटी भरण्यासाठी पुण्यातील समस्त गृहिणींना निमंत्रण देण्यात येत आहे. फुकट.'

पुण्यातल्या सुवासिनींना ती एक मोठी पर्वणीच वाटली. कारण त्या काळात स्त्रियांना नाटक पाहता येत नसे. मध्यरात्री हंडाभर पाणी तापवून, न्हाऊन, बरोबर ओटीचे सामान घेऊन त्या बायका नाटकाला जाऊ लागल्या. तीन-चार तास हा ओटी भरण्याचा कार्यक्रम चालू झाला. त्याने नाटकाचे उत्पन्न कमालीचे वाढले. बाटवे नावाचा तरुण कोवळा मुलगा रमाबाईचे काम करीत असे सतीच्या ओट्यावर उंचावर उभा राहून समोर पेटलेल्या अग्निकुंडात तो उडी मारत असे, त्या वेळी समोर बसलेल्या बायका भीतीने किंचाळत. नाटक संपल्यावर परत जाऊन, न्हाऊन, त्या सतीच्या कुंडाची खापरी गोळा करण्यासाठी परत येत. ही खापरी घरी ठेवल्याने आपल्या नवऱ्याचे आपल्यावर प्रेम वाढते अशी त्यांची समजूत होती.

१८६२ साली रंगभूमीवर आलेले हे नाटकाचे कथानक बरोबर शंभर वर्षांनी कादंबरीच्या रूपाने मराठीत अवतरले. त्याचे नाव 'स्वामी.' या स्वामीनेही त्या नाटकाप्रमाणेच बायकांना वेड लावले. कादंबरीच्या रूपाने आविष्करण काय ते बदलले. मूळ मध्यवर्ती आशय नाटकाचाच राहिला. परंतु मूळ कथानक ही एका तरुणाला स्फुरलेली केवळ कल्पना होती. त्याचा इतिहासाशी काही संबंध नव्हता ! नक्कल अस्सलाला कशी खाऊन टाकते त्याचे हे एक लक्षात राहण्यासारखे उदाहरण. आजची ऐतिहासिक नाटके – कादंबऱ्या म्हणजे वाचकांचे रंजन व धूळफेक करणारे फार्सच होत.

'फार्स'मध्ये म्हणून लोकमानसात रूढ असलेली एखादी गंमतीची लोककथा

संवादरूपाने मांडण्यात येते. समाजात अनेक गमतीचे किस्से असतात. त्या साऱ्या किश्श्यांचे फार्समध्ये रूपांतर करण्यात आले आहे. भरीला अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक कथांचा भरपूर उपयोग करून घेतला जात असे. शाहूनगरवासी मंडळी करीत असत आणि प्रख्यात नट गणपतराव जोशी त्यात भूमिका करीत तो 'झोपी गेलेला जागा झाला' हा फार्स अरबी भाषेतील कथेवरूनच घेतण्यात आला आहे.

१९३० पर्यंत फार्सांची चलती होती. मराठी रंगभूमीस ओहोटी लागली आणि त्यामध्येच फार्सांना तिलांजली मिळाली. परंतु फार्सांची जागा ग्रामीण विनोद कथांनी व वगांनी घेतली. 'गुलाबछकडीचा फार्स' आणि द. मा. मिरासदारांची 'दळण' ही कथा हे दोन्ही 'अरेबियन नाईट्स'मधल्या एकाच कथेची रूपांतरे होत. ग्रामीण कथा उदयाला आल्यानंतर फार्सांचे काही प्रयोजनच उरले नाही. १९५८ नंतर इंग्रजीतील फर्सांची रूपांतरे येऊ लागली. बबन प्रभूंनी त्याची सुरूवात केली. सध्या रंगभूमीवर अशा फार्सांचेच युग सुरू आहे.

जीवनात आपण सारेच रोज काही ना काही फार्स करीत असतो. मनाविरुद्ध संसारात रमावे लागते. एकमेकावर प्रेम करीत असल्याचा फार्स करावा लागतो. प्राचार्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी सांगितले तर व्याख्यात्यांना किंवा कारकुनांना 'एस. सर'चा फार्स करावा लागतो. मंत्र्यांच्या भाषणाला माना डोलवाव्या लागतात.

एकूण काय, आपण सारेच फार्सांचे धनी.

# १८

## ॥ अथ लग्नपत्रिका पुराणम् ॥

काही दिवसांपूर्वी आमच्या एका स्नेह्याने पाठविलेली निमंत्रणपत्रिका अनेकांच्या चर्चेचा विषय झाली होती. आजकाल निघणाऱ्या अनेक प्रकारच्या अभिनव लग्नपत्रिकांमध्ये तिचा निश्चितच समावेश केला पाहिजे. लग्न होते कोल्हापूरचेच आणि दोन्हीकडची व्याही मंडळी मूळची कोल्हापूरचीच असल्याचा त्यात कौतुकाने उल्लेख केला होता. पत्रिकेची कल्पना निश्चितच नावीन्यपूर्ण होती. दर्शनी भागावर मंगलमूर्ती गणपतीची स्थूलाकृती रेखाटलेली होती आणि अंतर्भागांमध्ये वरपित्याच्या लग्न-मुंजीत काढलेल्या पत्रिकांतील तसेच नियोजित वराच्या व्रतबंधप्रसंगी काढलेल्या निमंत्रणातील मजकूर दिला होता.

पत्रिकेतील मजकूर लक्षवेधी होता. तो असा :

॥ श्री मल्हारी म्हाळसाकांत प्रसन्न ॥

सप्रेम नमस्कार विनंती विशेष

आमच्या चि....चा विवाह दि. १९ नोव्हेंबरला व्हायचा आहे. वधू आहे चि. सौ. कां...कोल्हापूरचेच श्री....यांची ज्येष्ठ कन्या.

हा लग्नसोहळा म्हणजे आमच्या आयुष्यातील अमृतसिद्धीयोग होय. आम्हाला हे चिरजीवनाचं आश्वासन, तर वधूवरांना नवजीवनाचं आवाहन. या मंगलप्रसंगी आपण आलंच पाहिजे.

कळावे लोभ आहेच. आपले,

ज्यांच्यामुळे वधूवरांना बोहल्यावर चढण्याची संधी मिळाली ते

**श्री. पंडितराव कुलकर्णी**

**सौ. आशा पंडितराव कुलकर्णी**

आम्हाला या शुभविवाहप्रसंगी हजर राहता आले नाही. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करताना अभीष्टचिंतनपर पत्र पाठवून आम्ही आमच्या स्नेह्यांच्या चिरजीवनाच्या आश्वासनाची फलश्रुती लवकरच पाहावयास मिळेल अशी आशा व्यक्त केली. वधूवरांना नवजीवनाचे आवाहन वगैरे ठीक होते. परंतु रॉकेलच्या, गॅसच्या टंचाईने, रोजच्या होणाऱ्या रेल्वेएस्टयांच्या आणि अन्य वस्तूंच्या भाववाढीने या आवाहनाचे आव्हानात रूपांतर होऊ नये, अशी मनातच परमेश्वराची प्रार्थना केली होती.

ही प्रार्थना करीत असताना लग्नपत्रिकेवरील मंगलमूर्तींच्या चित्राकारात छापलेल्या मजकुरांकडे आमचे वारंवार लक्ष जात होते. मंगलमूर्तींची सोंड आणि त्यांचे दोन्ही पाय यांच्यामध्ये थोडी जागा शिल्लक होती. तेवढीच का शिल्लक ठेवण्यात आली? तीही भरून काढावयाचे ठरविले असते तर तिच्यामध्ये कोणता मजकूर यावयाला हव होता? आमच्या मनात सारखी एक कल्पना येत होती. ती ही की, वरपित्यांच्या वडिलांच्या मंगलविवाहप्रसंगी लिहिलेला मजकूर त्यामध्ये लिहिला असता तर? परंतु त्यावेळी विवाहपत्रिका काढली असेल काय? आमच्या नात्यातील गेल्या पिढीतील एका व्यक्तीची पन्नास वर्षांपूर्वीची मंगल विवाहपत्रिका माझ्याकडे आहे. साध्या दोन पैशांच्या पोस्टकार्डावर मोडीमध्ये मजकूर लिहिला असून, त्यावर हळदकुंकू ओले करून शिडकावले आहे. त्यातला मजकूर थोडक्यात असा आहे.

माड्डीसिद्दाप्पा प्रसन्न

आमचे घरी श्रीकृपेकरून चि. सौ. कां...ऊर्फ...हिचा शरीरसंबंध चिकोडीचे...यांचे कनिष्ठ चिरंजीव...यांच्याशी निश्चित केला आहे. कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहे. तरी आपण आपल्या लेकी, सुना–मुले–बाळे आणि समस्त परिवार या मंगल कार्यास हजर राहून कार्यास शोभा आणावी, अशी विनंती आहे.

आता प्रश्न असा आहे की, या दोन पत्रिकांमधील कोणती अधिक वस्तुनिष्ठ? गेल्या पन्नास–शंभर वर्षांत या निमंत्रण-पत्रिकांत जो आमूलाग्र बदल झाला, अनेक स्थित्यंतरे झाली आणि आकर्षकता अनेक पटीने वाढली असली तरी वस्तुस्थितीचे निदर्शन जुन्या पत्रिकांमध्ये जितके असे, तितके आजच्या पत्रिकांमध्ये राहिले नाही. आज आढळणाऱ्या अनेक शब्दांऐवजी ‘ शरीरसंबंध ’ हा शब्द फार महत्त्वाचा. अगदी खराखुरा, सरळ, स्वच्छ या एका शब्दाने आपल्या वैवाहिक जीवनाचे सारे ब्रह्मांड डोळ्यांसमोर एकदम उभे राहते!

या पत्रिकेनंतर काही दिवसांनी रेखा आणि अमिताभ यांच्या विवाहाची पाचशे शब्दांची चार पृष्ठांची आणखी एक अभिनव लग्नपत्रिका मला मिळाली. या पत्रिकेमध्ये वरपित्याने आपल्या रेखा नावाच्या नियोजित सुनेच्या सौंदर्याचे, कर्तृत्वाचे आणि तिच्या आगमनाने आपले घर कसे उजळून निघेल, याचे मोठे नाट्यपूर्ण, भावपूर्ण

वर्णन केले आहे. ते वाचून आमच्या घरी जी करमणूक झाली, त्याचे वर्णन करणे कठीण आहे. अजूनही त्याची आठवण झाली की, आम्हाला हसू येते आणि अर्धा तासभर आम्ही मनसोक्त हसून घेतो. घरी बायको काही निमित्ताने रुसली–रागावली असली की, मी विषयांतर करून त्या पत्रिकेचा विषय काढतो आणि तिचा एकदम नूर पालटतो. ती ऐकदम हसायला लागते. या आनंदामुळे तिचा सगळा रूसवा–राग क्षणार्धात वितळून जातो.

अशा प्रकारच्या अनेक लग्नपत्रिका मी जपून ठेवल्या आहेत. नमुन्यादाखल ही एक पाहा :

॥ श्री गणेशाय नमः ॥

॥ श्री लक्ष्मी-पुरुषोत्तम प्रसन्न ॥

स. न. वि. वि.

आजवर अनेकदा भेटलो, खूप बोललो, कधी हवापाण्याबद्दल, एकमेकांच्या प्रकृतीबद्दल, चालू घडामोडींवर आणि न समजणाऱ्या राजकारणावर, तर कधी खूप जिव्हाळ्याच्या, आपलेपणाच्या. मध्येच कोणत्या तरी भेटीत तुम्ही विषय काढलात...

चि. रा. प्रकाश (श्री शां. वि. वैद्य यांचा ज्येष्ठ पुत्र). याचा. 'मग कधी?' तेव्हा म्हणालो, 'एवढ्यात?' आणि...आता तुम्ही म्हणणार एवढ्यात? कोण? कोणाची?...

अहो, मुलगी गावचीच चि. सौ. कां. आशा (रा. शं. देव यांची कनिष्ठ कन्या)

शुभाशीर्वाद देण्यासाठी ज्येष्ठ शु. ७ श. १९०४, दि. २९ मे १९८२ रोजी सकाळी १० वा. ६ मि. आर्यन हायस्कूल गिरगाव येथे तुम्ही यायलाच हवं. कॅलेंडर पाहूच नका. शनिवार आहे, आम्ही तुमची सायंकाळी ५-३० ते ८-३० च्या दरम्यान वाट पाहात आहोत.

आपले स्नेहाभिलाषी, स्वागतोत्सुक

अ. आ. भावे, सौ. लता भावे

फावल्या वेळात अशा लग्नपत्रिका काढून पाहात असताना एक वेगळाच आनंद होतो. वेळ कसा निघून गेला ते कळत नाही. त्या पाहाताना कै. दत्तो वामन पोतदारांची मला नेहमी आठवण येते. त्यांनी हजारो लग्नपत्रिका आपल्या संग्रही जपून ठेवल्या होत्या. ब्रह्मचाऱ्याचा हा मुलखावेगळा नाद पाहून गंमत वाटत होती वाटत होते, प्रत्येक लग्नपत्रिका पाहून त्यांना काय वाटत असेल! वयाच्या ७५ व्या वर्षीही, 'अजूनही मी लग्न करण्याची शक्यता आहे. दरवर्षी पाडव्याला तशी शक्यता अजमावून पाहातो! पाडवा गेल्यावर वर्षभर निश्चिंत राहातो.' असे ते गमतीने म्हणत.

पोतदारांच्याजवळ किती प्रकारच्या लग्नपत्रिका होत्या! गरीबांच्या, श्रीमंतांच्या, लक्षाधीशांच्या, कोट्याधीशांच्या, संस्थानिकांच्या, आमदार, नामदार आणि मंत्र्यांच्या. राजाराम महाराजांच्या, सयाजीराव महाराजांच्या लग्नपत्रिका तुम्ही पाहिल्या आहेत? नाना फडणीसांनी सवाई माधवरावांच्या विवाहाप्रसंगी निजामाला हाताने लिहून पाठविलेल्या पत्रिकेचा मजकूर तुम्हाला माहीत आहे? कित्येक संस्थानिकांनी आपल्या लग्नपत्रिकादेखील इंग्लंड, पॅरिस आणि जपानमधून छापून आणल्या होत्या. उंची परदेशी कागद, रंगीबेरंगी मोहक छपाई. त्यांना लावलेल्या सुवर्णफिती! तासन्तास बघत रहावे, असा तो खजिना होता. उत्तरेतील काही संस्थानिकांनी आपल्या कुत्र्याच्या, कबुतराच्या, पोपटाच्या लग्नपत्रिका काढलेल्या होत्या. त्यांतील मजकूर मोठा गमतीचा असे. नेत्रसुख, श्रवणसुख आणि मजकुरातील विविधतेमुळे मनोसुख असे विविध आनंद देण्याची त्यामध्ये शक्ती होती. अशा लग्नपत्रिकांवर एखादे सुंदर पुस्तक लिहावयाचे ठरविले तर? राजा केळकर संग्रहालयाच्या दिनकरराव केळकरांनी हा उद्योग करून पाहण्यासारखा आहे. परंतु तेच कशाला? कुणालाही हा उद्योग करता येईल. छपाई आणि चित्रकला यांचे संस्मरणीय नमुने त्यातून जगापुढे मांडता येतील.

प्रवासात गाडीत काही वेळा इतकी गर्दी होते की, बराच वेळ एका पायावर उभे राहून पाय थकतात. उभे राहत सहज शेजाऱ्याशी लग्नपत्रिकांचा मी सहज विषय काढतो. मी बोलायला लागलो की साऱ्यांचे लक्ष जाते. लगेच काही जण उभे राहून मला बसायला जागा देतात!

कोणी विचारते, 'शिवाजी महाराजांची लग्नपत्रिका कशी होती हो?' मी सांगतो, 'पूर्वी मराठा क्षत्रिय राजेरजवाड्यांच्या लग्नपत्रिका संस्कृतातून लिहून काढीत. पहिली आपल्या गावातील मंगलमूर्तीच्या पुढे ठेवीत. (तेवढ्यासाठीच तर जिजाबाईंनी कसब्याच्या गणपतीची स्थापना केली.) दुसरी राजस्थानात मेवाड–जयपूरला पाठवीत. आपला शिसोदे वंशाशी संबंध आहे हे दाखविण्यासाठी! त्यांच्या लग्नपत्रिका उपलब्ध नाहीत. पेशवाईत गोपिकाबाईने विश्वासरावांचे लग्न सगळ्यात थाटात केले होते, परंतु त्याचा सारा तपशील उपलब्ध नाही. परंतु नाना फडणीसाने सवाई माधवरावांचे लग्न कशा प्रकारे केले त्याचा तपशील 'पेशवे बखरी'त उपलब्ध आहे.

सवाई माधवराव नऊ वर्षांचा असताना (शके १७०४) त्याचा विवाह झाला. वधू त्याच्यापेक्षा तीन-चार वर्षांनी लहान होती. हा विवाहसोहळा दीड महिना चालू होता. त्या अगोदर महिनाभर देशोदेशीच्या, दिल्ली हैदराबादपर्यंतच्या राजेरजवाड्यांना वैयक्तिक निमंत्रणपत्रके पाठविण्याचा उद्योग चालू होता. त्यासाठी शेकडो दूतांची योजना करण्यात आली होती. नाना फडणीस व त्यांचे सहकारी यांना दोन–तीन महिने लग्नाखेरीज दुसरे कोणतेच काम नव्हते. देवस्थापना झाल्यापासून शहरातील प्रत्येक घरास दहा दिवसपर्यंत पंचपक्वान्नासाठी शिधा पोचविण्याची परिपूर्ण व्यवस्था

होती. त्यातला निम्मा शिधा अधिकाऱ्यांच्या घरी गेला अशी आपल्यासारखी त्यावेळी परिस्थिती नव्हती! असा शिधा रोज एक लाख होता.

दीड महिन्यांच्या काळातील लग्नसमारंभाचा सगळा तपशील जनतेस समजण्याची वेगवेगळ्या प्रकाराने व्यवस्था होती. निरनिराळ्या जातीजमातींसाठी वेगवेगळे मुदपाकखाने होते. जनतेला ही एक मोठी पर्वणी होती. आजूबाजूच्या प्रदेशातील लक्षावधी जनता सोहळा पाहाण्यात उपस्थित होती. व्यवस्थेच्या बाबतीत नाना फडणीस म्हणजे समर्थांच्या सोनेरी, रुपेरी काड्यांपासून जमलेल्या साऱ्यांची बारीकसारीक व्यवस्थेचा अद्ययावत आराखडा तयार करून कामाला लागणारा माणूस! एवढीसुद्धा गैरव्यवस्था त्याला खपायची नाही.

जेवल्यानंतर दात कोरण्यासाठी लाखभर टोकदार लवंगा तयार होत्या. हात धुण्यासाठी दळलेली साखर आणि गुलाबपाणी होते. वाढणाऱ्यांचे घाम पुसण्यासाठी मागे हातात पंचा घेऊन शंभरवर शिष्या होते.

परंतु या समारंभाची निमंत्रणपत्रिका कशी असेल?

विवाहसमारंभाचा सारा तपशील त्यात दिला असेल का?

निमंत्रणपत्रिकाच उपलब्ध नसल्याने काही सांगता येत नाही.

नाना फडणिसाने नियोजनपूर्वक तयार केलेली साऱ्या समारंभाची कार्यक्रमपत्रिका तयार असली पाहिजे. परंतु ती केवळ अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी! सर्वसामान्य जनतेसाठी नव्हे!

निमंत्रणपत्रिका जनतेला उपलब्ध होऊ लागल्या त्या १९ व्या शतकात मुद्रणयंत्राचा या देशात उदय झाल्यावर. सुरुवातीला श्रीमंत-जहागीरदार व सरदार–दरकदार यांच्यापुरत्या त्या मर्यादित होत्या, परंतु हळूहळू त्यांचे लोण सामान्य जनतेपर्यंत पसरले. ते इतके वाढत गेले की, आता साखरपुड्याच्याही निमंत्रणपत्रिका निघू लागल्या. एकोणिसाव्या शतकात रुपयाला शंभर पत्रिका छापून मिळत, अलीकडे मी शंभर रुपयाला एक पडेल अशी लग्नपत्रिका पाहिली आहे. बावनकशी चार तोळ्यांच्या सोनेरी पत्र्यावर काढलेली पत्रिका तुम्ही पाहिली आहे? आणि तिला बाहेर माणके जडविले असतील तर? तिची किंमत काय असेल? सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये ठेऊन मुलाच्या किंवा जवळच्या नातेवाईकाचा लग्नसमारंभात पाहण्यासाठी ती केवळ बाहेर काढायची!

मोठमोठ्या संस्थानिकाच्या विवाहाच्या कार्यक्रमपत्रिका कशा असतील त्याची चुणूक दाखविण्यासाठी ही एका अगदी छोट्या संस्थानिकाने काढलेली, तीही वैभव गेलेल्या दिवसांतील पाहा:

|| श्रीगणराज प्रसन्न ||    || श्रीकरंजेश्वरी प्रसन्न ||

## श्रीमंत राजकुमारी पद्मिनीराजे तथा मंगलाराजे महाराज राजकुमारी कुरुंदवाड ज्यूनियर यांच्या विवाहसमारंभाचा

### कार्यक्रम

| | |
|---|---|
| | बुधवार दि. ३ मे १९६७ |
| सायंकाळी ४ वाजता | सोजीचा मुहूर्त |
| | शुक्रवार दि. ५ मे १९६७ |
| सकाळी १० वाजता | राजवाड्यातील देवघरांत श्रीगणपती व श्रीकरंजेश्वरी देवीची पूजा व सहस्रनाम. उभयतां श्रीमंत हुजूर स्वाऱ्यांचेकडून. |
| सकाळी ११-३० वाजता | देवघरातील देवापुढे अक्षत ठेवणे, उभयता श्रीमंत हुजूर स्वाऱ्यांचेकडून राजकुटुंबासमवेत. |
| | सोमवार दि. १५ मे १९६७ |
| रात्रौ ८-३० वाजता | केळवणानिमित्त मेजवानी राजवाड्यांतील मागील चौकामध्ये ( पाऊस आल्यास आर. पी. डी. कॉलेजमध्ये ). गुच्छ, अत्तर, गुलाब, पुरुषांकरिता राजवाड्यातील लाऊंजमध्ये व स्त्रियांकरिता राजवाड्यातील दिवाणखान्यामध्ये गुच्छ, अत्तर, गुलाब. |
| | मंगळवार दि. १६ मे १९६७ |
| सकाळी ७ ते १०-३० पर्यंत | घाणा भरणे, मंगलस्नान, पुण्याहवाचन, देवकप्रतिष्ठा, मुहूर्तमेढ, ग्रहमख. |
| दोनप्रहरी १ वाजता | श्रीमंत हुजूरस्वाऱ्या, आप्तमंडळी व राजवाड्यातील इतर उपस्थित पाहुणे मंडळी यांचे समवेत श्रीमंत गोगटेसाहेब यांचे बंगल्यावर व्याही भोजन. |
| सायंकाळी ५ वाजता | गावातील सर्व ग्रामदेवतांना अक्षत. |
| सायंकाळी ७ वाजता | सीमांत-पूजन, श्रीमंत गोगटेसाहेब यांचे बंगल्यावर |
| रात्रौ ८-३० वाजता | वाङ्निश्चय व तेलसाडी राजवाड्यांतील लाऊंज. |

| | |
|---|---|
| | मध्ये हारतुरे, अत्तर, गुलाब, पानसुपारी, ओट्या भरणे वगैरे. |
| | सनई-वादन. |
| रात्रौ ९–३० वाजता | भोजन राजवाड्यांतील चौकामध्ये. |
| | बुधवार दि. १७ मे १९६७ |
| सकाळी ६ ते ७ वाजता | उष्टी हळद, घटिकापूजन, पत्रिकापूजन, श्रीमंत हुजूरस्वारीकडून. गौरीहर पूजन श्रीमंत राजकुमारी मंगलाराजे महाराज यांचेकडून. |
| सकाळी ७ ते ८ वाजता | रुखवत श्रीमंत गोगटेसाहेब यांचे बंगल्यावर |
| सकाळी ८ ते ८–१५ वाजता | राजजामातांचे राजवाड्यांत आगमन |
| सकाळी ८-३० ते १०-१५ वाजता | मधुपर्कपूजन, कन्यादान, कंकणबंधन, अक्षतारोपण, मंगळसूत्रपूजा व बंधन, विवाहहोम व सप्तपदी. |
| सकाळी ११ वाजता | राजजामातांचे दरबारमंडपात आगमन. श्रीमंत युवराजमहाराज त्यांचेबरोबर येतील व दरबार मांडवासमोर राजजामातांचे स्वागत श्रीमंत हुजूर स्वारी करतील व राजजामातांचे हातात नारळ-विडा देऊन श्रीमंत हुजूरस्वारी राजमातांचा हात धरून बोहल्यावर घेऊन येतील. |
| सकाळी ११–२५ वाजता | विवाहसमारंभ. दरबार पुरुषांकडील निमंत्रित पाहुणे मंडळींना हारतुरे, अत्तर गुलाब, व पानसुपारी दरबार मांडवात. स्त्रियांकडील निमंत्रित पाहुणेमंडळींना हळद-कुंकू ओट्या भरणे, हारतुरे, अत्तर, गुलाब, पानसुपारी दरबार मांडवात. |
| दोनप्रहरी १२–३० ते १ वाजता | सुनमुख व ऐरणीदान |
| दोनप्रहरी १ वाजता | विवाहसमारंभानिमित्त मेजवानी, राजवाड्यांतील मधल्या चौकात. ब्राह्मण–भोजन राजवाड्यातील मागील व्हरांड्यांत. पुरुषांकडील गुच्छ, अत्तर गुलाब, पानसुपारी राजवाड्यांतील लाऊंजमध्ये. स्त्रियांकडील–गुच्छ, अत्तरगुलाब, पानसुपारी राजवाड्यातील दिवाणखान्यामध्ये. |

| | |
|---|---|
| सायंकाळी ५ ते ६ वाजता | टिळकवाडी येथील गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स कॉलेजचा नामकरण समारंभ. या समारंभास श्रीमंत हुजूरस्वाऱ्या हजर राहतील. |
| सायंकाळी ६-३०ते ८-३० वाजता | श्रीमंत गोगटेसाहेब यांचे बंगल्यावर वरपक्षाकडील स्वागतसमारंभ |
| रात्रौ ९ वाजता | विवाहसमारंभानिमित्त मेजवानी राजवाड्यातील चौकामध्ये. (पाऊस आल्यास आर. पी. डी. कॉलेजमध्ये ) |
| रात्रौ ११ वाजता | गृहप्रवेश व लक्ष्मीपूजन श्रीमंत गोगटेसाहेब यांचे बंगल्यावर. |
| | गुरुवार दि. १८ मे १९६७ |
| सकाळी ८ वाजता | तोंड धुण्याचे पाणी, श्रीमंत गोगटेसाहेब यांचे बंगल्यावर नेणे. |
| दोनप्रहरी १२ वाजता | वरपक्षास मेजवानी, हारतुरे, गुच्छ, अत्तरगुलाब, आहेर वगैरे. |
| दोनप्रहरी १ ते १–३० वाजता | राजजामात, श्रीमंत सौ. राजकुमारी मंगलाराजे महाराज व इतर वरपक्षाकडील पाहुणे मंडळी यांना समारंभाने निरोप. उभयता श्रीमंत हुजूर-स्वाऱ्या, श्रीमंत युवराजमहाराज, श्रीमंत दिलीपकुमार देशमुख, श्रीमंत सौ. राजकुमारी ताईसाहेबमहाराज, श्रीमंत राजकुमारी इंदुमती-राजे महाराज, श्रीमंत राजकुमारी नंदिनीराजे-महाराज, आप्तमंडळी, अधिकारीवर्ग, भालदार चोपदार व इतर नोकरवर्ग हजर राहतील. |
| सायंकाळी ६-३० ते ८-३० वाजता | स्वागतसमारंभ, गुच्छ, अत्तर गुलाब वगैरे राजवाड्यातील आवारात. |
| रात्रौ ९–३० वाजता | भोजन. |
| | शुक्रवार १९ मे १९६७ |
| सकाळी १०–३० वाजता | पुण्याहवाचन आणि देवक उत्थापन. |

**रमा प्रासाद**
माधवपूर ( बेळगाव ).
दिनांक ४–५–१९६७

**बंडोपंत नारायण कुलकर्णी**
दिवाण टू
श्रीमंत राजेसाहेब, कुरुंदवाड ज्यूनियर

संस्थाने विलीन झाल्यानंतर ३० वर्षांनी एका छोट्या संस्थानिकांच्या लग्नसमारंभाचा एवढा थाटमाट, तर ही संस्थाने वैभवात असताना त्यांनी काय काय केले असेल याची कल्पनाच केलेली बरी !

लिहिता लिहिता आणखी एक लग्नपत्रिका हाती आली :

कोणीही प्रसन्न नाही

सप्रेम नमस्कार

आम्ही दोघांनी आमच्या आईवडिलांच्या मनाविरुद्ध लग्न करण्याचे ठरविले आहे. नोंदणी कार्यालयात गुरुवार दि. १७ रोजी आम्ही विवाहबद्ध झाल्याच्या सह्या केल्यानंतर आम्ही दोघेही ' हॉटेल पूनम 'मध्ये जेवणार आहोत. लग्नासाठी आमचा खर्च एवढाच. या प्रसंगी आपण कृपया आपले आशीर्वाद पाठविले की आम्ही पावलो. या प्रसंगी आमच्याबरोबर भोजनास येण्याची आपली इच्छा असल्यास अगोदर कळवावे. भोजनोत्तर आपले बिल आपणच द्यावयाचे आहे.

आहेर आणू नये. फुलेसुद्धा आणू नयेत.

आपले

**पिंकी आणि बंड्या**

या पत्रिकेला जी चौकट दिली आहे ती खजुराहोच्या मंदिरातील कामशिल्पांची आहे.

मी या भोजनाला जाणार आहे.

*

# १९

# कावळ्यांची शाळा

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चौथ्या प्रादेशिक संमेलनातील प्रा. वसंत कानेटकरांचे भाषण वादग्रस्त ठरले तरी वैचारिकतेच्या दृष्टीने एक सुखद धक्का देऊन गेले यात शंका नाही. ' अखिल भारतीय ' म्हणून पुणेरी बाण्याचे मोठे बिरुद बाळगणाऱ्या मोठ्या संमेलनांतील गेल्या काही वर्षांतील अध्यक्षांची काही भाषणे अगदीच निराशाजनक होती. त्या पार्श्वभूमीवर या छोट्या संमेलनातील भाषणाने तेथे हजर राहिल्याचे चीज झाल्यासारखे वाटले. त्यामुळे मोठ्या संमेलनातील भावी अध्यक्षांची जबाबदारी वाढली आहे, याची त्यांना जाणीव राहील अशी आशा करावयास हरकत नाही. मात्र शासकीय नाट्यपरीक्षण मंडळाचा समाचार घेताना वसंतरावांचा आवाज चढत गेला आणि या मंडळाच्या अध्यक्षांना चार आकडी मानधन मिळते हे सांगताना त्यांचा आवाज अगदी सीमेला चढला. त्यावरून ते संतापले अशी काही जणांची समजूत झाली. त्याचा समाचार घेताना समारोपाच्या भाषणांत कानेटकरांचा आवाज पुन्हा जसजसा चढू लागला तसतसे त्यांच्या प्रकृतीच्या काळजीने आम्ही अस्वस्थ होत गेलो. परंतु प्रादेशिक मंत्र्यांकडे आवेशाने पाहात सुनाविलेले ( तेच ) भाषण पुन्हा त्याच आवेशाने ते केंद्रीय मंत्र्यांना सुनावीत आहेत, हे लक्षात आल्याने आमची अवस्थता कमी झाली. कानेटकर हे केवळ श्रेष्ठ नाटककार नसून ते उत्तम अभिनेतेही आहेत, हे त्यामुळे पुण्याच्या प्रेक्षकांना कळून चुकले. मंत्र्यांच्या बाबतीतल्या लेखकांच्या मनातील गैरसमजासंबंधाने विठ्ठलराव गाडगीळांनी परोपरीने खंत व्यक्त करूनही, त्यांना आपले भाषण चांगल्या रीतीने समजावून देण्याचा कानेटकरांचा अभिनय वाखाणण्याजोगा होता. अगदी मुळापासून समजावून देण्याची इतकी कळकळीची दक्षता वर्गात शिकवणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांनी कधी घेतली होती की नाही कुणास ठाऊक ! आज

ना उद्या ते मोठ्या संमेलनाचे अध्यक्ष होणारच! त्यावेळी त्यांच्याबद्दल लिहिलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांच्या गौरवपर लेखांतून त्यावर काही प्रकाश पडण्याची शक्यता आहे.

वसंतरावांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला आपल्या मनातील झाडावर दोन पक्षी असल्याचे सांगून ते विश्राम बेडेकरांच्या झाडावरील पक्षी नसल्याचे सांगितले. त्यांच्या चेहऱ्यावरचा मिष्किल भाव छायाचित्रकारांना टिपता आला नाही तरी अनेकांच्या नजरांनी तो नेमका टिपला. अर्थातच बेडेकरांचे झाड ज्यांच्या ओळखीचे आहे ते सारे मनात म्हणाले की, कानेटकरांच्या वायुगोलाचा या झाडावर काही परिणाम होणार नाही, परंतु या प्रच्छन्न मान्यानंतर त्यांनी काहींच्या झाडांवर गिधाडे, घारी असल्याचा जो उल्लेख केला तो मात्र नेमक्या ठिकाणी जाऊन पोहोचला आणि ते झाड छद्मी हसून गप्प राहिले. कानेटकरांनी आपल्या झाडावरील दोन पक्ष्यांपैकी वक्र दृष्टीच्या छिद्रान्वेषी आणि सदैव चोच मारण्यासाठी टपून बसलेल्या कावळ्याचा उल्लेख केला, परंतु त्यांच्या मनातल्या त्या निर्मितिक्षम पक्ष्याच्या नावाचा काही उल्लेख केला नाही. गगनभेदी असा तो पक्षी कोणता असावा बरे! तो कोणता का असेना, आम्हाला मात्र ज्यांच्या झाडावर मिठू मिठू पोपट बसला आहे अशी अनेक झाडे आठवतात. काहींच्या झाडावर मोर आणि लांडोर समोरासमोर बसले आहेत, तर काहींच्या झाडांवर डोळे मिटून बसलेला बगळा आणि समोर करकोचा आहे. एकाच्या झाडावर एका फांदीवर चक्क घुबड आहे आणि वर त्याच्याकडे पाहत राजहंस बसला आहे. ज्या झाडांवर परदेशी पक्षी आहेत अशी झाडे तर दिसामासी वाढताहेत आणि गावरान पक्ष्यांनी गजबजलेली झाडे त्यांच्याकडे पाहून कोलाहल करीत आहेत अशीही दृश्ये आम्हाला ठायी ठायी दिसतात. या झाडावर कावळे नसल्याने त्यांच्यावरच्या पक्षांची जी बेबंद स्थिती झाली आहे, त्यामुळेच मराठी साहित्य विश्वसाहित्याच्या पातळीवर जाऊ शकत नाही आणि मराठीत अभिजात साहित्याची निर्मिती थंडावली आहे! तेव्हा श्रेष्ठ साहित्याच्या निर्मितीसाठी कोणत्याही झाडाच्या वरच्या फांदीवर एखादा तरी कावळा हवाच याची आम्हाला प्रकर्षाने जाणीव होत आहे. वेदांत सारे काही आहे म्हणणाऱ्या एका आधुनिक संशोधकाशी बोलण्याचा प्रसंग आला तेव्हा आम्हाला कळले की आर्य भारतात येण्यापूर्वी या देशात कावळे नव्हते. त्यांनी भारतात येताना आपल्याबरोबर जशी गीर्वाण वाणी आणली तशीच मनुष्याच्या निर्वाणाची सोय करण्यासाठी कावळाही बरोबर आणला. पिंडाला कावळा शिवला नाही की निर्वाण हातातून निसटलेच म्हणून समजावे! कानेटकरांच्या झाडावरील कावळा दिसेपर्यंत या कल्पनेवर विश्वास ठेवण्याची आमची तयारी नव्हती!

कानेटकरांच्या झाडावर असा एकटादुकटा कावळा असल्याने, त्यांचे साहित्य महत्त्वाचे असले तरी त्याला, आजच्या समीक्षकांच्या परिभाषेत बोलायचे तर, अनेक प्रकारच्या मर्यादा का पडल्या आहेत हे लक्षात येते. आम्ही ज्या निर्मितीच्या वसाहतीत

लिहायला लागल्यापासून राहतो आहोत, त्या वसाहतीत एक वडाचे प्रचंड झाड आहे· या झाडावर ठराविक वेळी कावळ्यांची प्रचंड शाळा भरते. या झाडावर निर्मितिक्षम साऱ्या कावळ्यांना मुक्त प्रवेश आहे. हे सारे कावळे न बोलविता तिथे येतात. ज्याच्या त्याच्या फांद्या ठरलेल्या आहेत, त्यांवर ते बसतात. सर्वांत उंच मात्र एक कावळा शांत चित्ताने बसलेला असतो. त्याला विचारण्यात येते त्यावेळी तो तितक्याच शांतपणाने सल्ला देतो. पंचतंत्रातील शहाण्या म्हाताऱ्या वानराच्या सल्ल्याप्रमाणे उसळणाऱ्या तरुण रक्ताच्या कावळ्यांना त्याचा सल्ला रुचत नाही, आणि मग वाऱ्याप्रमाणे येणाऱ्या आकस्मिक संकटाने वानरतेलाप्रमाणेच त्यांचेही काकतेल निघून काही काळ सन्नाटा माजतो. याच झाडाच्या एका मधल्या फांदीवर आम्हालाही बसण्यापुरती थोडीफार जागा मिळाली आहे. या झाडावरील काही कावळ्यांच्या हालचालींने आम्ही अधून-मधून कमालीचे अस्वस्थ होतो, परंतु वरचा कावळा म्हणतो की, ‘ बाबारे, हा कावळ-स्वभाव आहे, चालायचेच. ’ तेव्हा आम्ही गप्प राहतो. या झाडावरील काही कावळ्यांच्या स्वभावाचे नमुने आमच्या इतक्या लक्षात राहिले आहेत की ते आमच्याबरोबरच नाहीसे होतील ! आणीबाणीच्या काळात त्यांतल्या काहींनी असा काही बाणेदारपणा दाखविला की त्याने आम्ही पुलकित होऊन उठलो, परंतु आणीबाणी संपल्यानंतर त्यातले बरेच शासकीय गोटात वावरण्यासाठी धडपडताना पाहून आम्ही पुलकित झाल्याची आम्हाला लाज वाटली. स्नेहभोजन करता करताच एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढून त्यांनी एकमेकांच्या चेहऱ्यावर आपल्या हातातील वस्तू भिरकावण्यास सुरुवात केली, तेव्हा वरच्या कावळ्याला बोलावून त्यांना आवरण्याचा आम्ही प्रयत्न केला, परंतु त्याचा काही उपयोग नव्हता. या कावळ्यांनी ही शाळा सोडून आता निरनिराळ्या झाडावर वस्ती केली आहे. शासकीय अनुदान, व्यासपीठावर मंत्री आणण्याचे प्रकार यासंबंधाने या आमच्या शाळेत इतकी उलटसुलट चर्चा झाली आहे आणि इतक्या आडव्यातिडव्या भिरक्या काहींनी मारल्या आहेत की, आम्हाला त्यामुळे कोणाची मूळची भूमिका कोणती व का व आताची कोणती व का हे कळेनासे झाले आहे. यांतले काही महाभाग शासनावर अशी कडक टीका करतात की, झाडा-वरच्या नियतकालिकांतून, वर्तमानपत्रांतून त्यांचे पंख फडफडविणारे फोटो सकौतुक प्रसिद्ध होतात. परंतु शासकीय समित्यांवरही हेच महाभाग पुन्हा मिरविताना पाहून अनेक जणांना शरमेने आपली कातडी काळी पडावी असे वाटते. परंतु मूळच्या काळया गडद रंगामुळे त्यांच्या मनाची वेदना शरीरावर दिसू शकत नाही, याची त्यांना खंत वाटते. यातल्या काही महाभागांच्या पुस्तकांवर चांगली परीक्षणे यावीशी वाटतात. त्यावेळी ते आमच्याशी ज्या सलगीने वागतात ती पाहून क्षणभर त्यांच्या-आमच्या गतजन्मीचा ऋणानुबंध असावा असे वाटून आमचे अंतःकरण अगदी दाटून जाते. आम्हाला अधूनमधून काहीजण प्रेमाने पोस्टकार्डे आणून देतात तेव्हा पोस्टखात्याने

ती फुकट वाटायला सुरुवात केली आहे का असा संभ्रम पडतो. परंतु साहित्य अकादमीच्या किंवा ज्ञानपीठाच्या पारितोषिकासाठी किंवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी किंवा निदान ललित शिफारशींसाठी त्याचा उपयोग करावा म्हणून, त्यांच्या खर्चाने उडप्याकडे इडलीसांबार खाताना, ते ज्यावेळी हळूच सुचवितात त्यावेळी लागलेला ठसका कमी व्हावा म्हणून ते ज्या प्रेमाने पाण्याचा पेला पुढे करतात त्या प्रेमळ नजरेचे वर्णन आमच्या लेखणीला करण्याचे अद्यापपर्यंत जमलेले नाही! या आमच्या झाडावर काहीजण जोडप्याने राहतात. त्यातली एक व्यक्ती शासनावर आसूड उगारीत सभेमध्ये गर्जना करीत असते त्याचवेळी दुसरी व्यक्ती दूरदर्शनवर थंड नजरेने बातम्या देत असते. काही महत्त्वाच्या जागी आपली वर्णी लागावी म्हणून शासनाच्या निरनिराळ्या कमिट्यांवर दोघेही जीव तोडून काम करीत असताना दुसऱ्याच जोडप्याने ती जागा पटकावल्याचे पाहून त्यांची होणारी तगमग आमच्याने पाहवत नाही. दुर्दैवाने शासकीय सेवेत नशिबाने गुंतविल्यामुळे आपल्या स्वाभिमानाला मुरड घालावी लागते अशांची संख्या या वसाहतीत फार मोठी आहे. त्या बिचाऱ्यांची कीव येते. त्यांच्या तुलनेने परकीय शासनांच्या सांस्कृतिक कार्यालयांतून सेवा करणाऱ्यांचा शासनाच्या विरुद्धचा आवाज फार मोठा असतो. परंतु वरच्या कावळ्याने त्याचे इंगित लक्षात आणून दिल्यानंतर शासकीय सेवेतील लाजिरवाण्या सेवावेतनाला लाथ मारून परकीय शासनांच्या भरभक्कम वेतनाचा स्वीकार करून स्वाभिमानाने स्वकीय शासनाला भरभरून सुनवावे असे आमच्यापैकी अनेकांना फार फार वाटते. परंतु हे मांडे आपल्या लहान चोचीच्या वाट्याला कधीच येणे शक्य नाही या कल्पनेने अनेकांचे चेहरे कसनुसे होऊन जातात. त्यामुळेच आपल्या एखाद्या फांद्यावर धीटपणे येऊन बसलेला एखादा उत्साही कावळा कर्कशपणे आमचे साहित्य साडेतीन टक्क्यांचे म्हणून हिणवितो त्यावेळी आमच्या पायाखालची वाळूच सरकत असल्याचा भास होतो! अलीकडे तर शेकडो वर्षे आम्ही ज्यांना आमच्या फांद्यांवर येऊ दिले नव्हते, त्यांनी संघर्ष करून आमच्या झाडाची एक फांदीच बळकावलेली आहे. इतर फांद्यांपेक्षा सध्या तरी ती हिरव्यागार पानांनी डवरलेली दिसते. आमच्यापैकी बरेच जण त्यामुळे कमालीचे अस्वस्थ आहेत. आमचा वरचा कावळा, 'हेही दिवस जातील', म्हणून अनेकांची समजूत घालतो तेव्हा आमची काही समजूत पटत नाही.

परंतु झाडावर राहून फांद्यावरच्याशी वैर करता येत नाही, हे त्या कावळ्याचे शहाणपण मात्र आम्हाला पटले आहे.

त्यामुळे मृत्यूनंतर काहीही धार्मिक संस्कार करू नयेत हे आम्ही जे मृत्युपत्रात लिहून ठेविले आहे, त्याबद्दल आमचे मत डळमळू लागले आहे. आमच्या पूर्वजांनी इतक्या दूरदर्शीपणाने आपल्याबरोबर आणलेल्या या शहाण्या कावळ्यांचे काय होईल आणि वसंत कानेटकरांसारख्यांना जी असमाधानाची टोचणी आहे ती नाहीशी झाल्याने त्यांचे काय होईल या कल्पनेने आमची झोप उडाली आहे.

❦

# २०

# मराठी मरणार काय, तरणार कशी ?

सुमारे ५० वर्षांपूर्वी एका ऋषितुल्य विद्वानाने पुण्यात भरलेल्या शारदोत्सव संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनात एक जळजळीत शापवाणी उच्चारली आणि सुशिक्षित मराठी माणसांना कमालीचे अस्वस्थ करून सोडले.

काय होती ती शापवाणी ?

‘ मराठी भाषा मरू घातली आहे. तिच्या नाकासमोर आजच्या आंग्लशिक्षितांनी सूत धरले आहे. तिची स्थिती अशीच फार काळ राहिल्यास तिची तिरडी बांधण्यास फार काळ लागणार नाही. ’

अशी शापवाणी उच्चारणाऱ्या त्या तापसाचे नाव काय ?

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे.

राजवाड्यांनी अशी अभद्र भविष्यवाणी उच्चारावी याचे कित्येक विद्वानांना कमालीचे वैषम्य वाटले. ‘ छे, छे, मराठी भाषा मरते कशी ! तिला संजीवनी देण्यासाठी आम्ही आहोत ना ? आम्ही लवकरच प्रादेशिक विद्यापीठे स्थापन करणार आहोत. त्या विद्यापीठांतून मराठी भाषा आणि मराठ्यांचा इतिहास यांचा अभ्यास होणार आहे. अमृताशी पैजा जिंकणारी आमची ही मायमराठी मरायला अशी लेचीपेची थोडीच आहे ! ’

त्या वृद्ध तापसाने या असल्या बडबडीकडे फारसे लक्ष दिले नाही. मराठी भाषा का मरायला घातली आहे, यासंबंधी उदाहरणे देऊन त्यांनी जे विचार मांडले होते, तिकडे लक्ष न देता केवळ स्वाभिमानापोटी ही वायफळ बडबड चालली आहे, हे लक्षात घेऊन त्याने अशा लोकांकडे एक जळजळीत नेत्रकटाक्ष टाकला.

‘ मूर्खांनो, तुमच्या अंगावरच्या इस्त्रीच्या कपड्याने तुम्हाला तुमच्या माऊलीचे

विस्मरण झाले. बूट पाटलून आणि स्टॉकिण्यांनी तुमची मने भ्रष्ट झाली. आपल्या आईचे नाव घेण्यास तुम्हाला लाज वाटू लागली. ' तो वृद्ध कपी गरजला.

लोकांनी त्याच्या म्हणण्याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले.

आपल्या त्या लिहून आणलेल्या महत्त्वाच्या भाषणात राजवाड्यांनी कशाच्या आधारे वरील शापवाणी उच्चारली होती ?

राजवाड्यांच्या हातात पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाची निमंत्रण-पत्रिका होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, न्यू इंग्लिश स्कूल अशी इंग्रजी नावे मिर-विणाऱ्या संस्थांच्या इंग्रजधार्जिण्या वृत्तीवर उतारा म्हणून मातृभाषेच्या अभिमानाने फुरफुरणाऱ्या आणि त्यामुळे 'नूतन मराठी विद्यालय', 'शिक्षण प्रसारक मंडळी' अशी शुद्ध लोणकढी मराठी वापरणाऱ्या या संस्थेच्या निमंत्रणपत्रिकेत निम्म्यापेक्षा अधिक शब्द इंग्रजी होते. राजवाड्यांनी इंग्रजी भाषा आत्मसात करण्यासाठी धड-पडणाऱ्या आणि इंग्रजी शिकल्यानेच स्वर्गप्राप्ती होईल. या भावनेने पछाडलेल्या आपल्या परधार्जिणेपणाचे परखड विच्छेदन करून निष्कर्ष काय काढला ?

तर मराठी ही महाराष्ट्राची सामान्य व्यवहाराची भाषा आहे. तुम्ही मंडईत जा, मराठी माणसं भाजीवाल्याशी मराठीत बोलतील, खेड्यापाड्यातील शेतकरी–कामकरी मराठी बोलत असताना दिसतील. परंतु त्यांच्या शिक्षणाची भाषा कोणती ? राज्यकार-भाराची भाषा कोणती ? न्यायदानाची भाषा कोणती ? उच्च शिक्षणाची भाषा कोणती ? शिष्टाचाराची भाषा कोणती ?

अशासारख्या हजारो प्रश्नांची उत्तरं मात्र एकच : इंग्रजी.

राजवाड्यांच्या या शापवाणीपूर्वी ५० वर्षे अगोदर विष्णुशास्त्री चिपळूणकर नावाच्या एका तीस वर्षांच्या तरुणाने अशा इंग्रजाळलेल्या वृत्तीचा खरपूस समाचार घेतला होता. त्यावेळी राष्ट्रप्रेमाने मुसमुसलेल्या काही तरुणांना आपल्या या प्रवृत्तीची लाज वाटली होती. खाविंदचरणी मिलिंदायमान होण्याच्या लाचारी प्रवृत्तीचे जे थैमान तत्कालीन सुशिक्षितांत माजले होते आणि वाघिणीचे दूध पिऊन अजागलस्तनासारखे स्वाभिमान-शून्यतेने लोंबणाऱ्या या तरुणांच्या पाटलुणी पाहून त्यांच्यापेक्षा शेळ्या मेंढ्या बऱ्या असे वाटू लागले होते. त्यांच्यावर केलेल्या आघाताचा परिणाम म्हणून राष्ट्रीयतेची ज्वलंत दीक्षा घेतलेले काही तरुण मायमराठीच्या उद्धारासाठी कटिबद्ध होऊन, इंग्रजी शिक्षणाच्या योगाने प्राप्त होणाऱ्या सोन्याच्या बेडीच्या त्याग करून, देशबांधवांसाठी झगडण्यात कृतार्थता मानू लागले होते. राजवाडे हे त्यातलेच एक ज्वलंत उदाहरण.

परंतु पन्नास वर्षांत सारेच काही बदलले होते. इंग्रजी मनोवृत्ती वाढीस लागली होती. या काळात इंग्रजी विद्याविभूषितांचा मूठभरांचा जो एक नवा वर्ग निर्माण झाला होता, त्याने स्वतःसाठी एक हस्तीदंती मनोरा निर्माण केला होता आणि या मनोऱ्यात बसल्यामुळे त्याला आपल्या मातृभाषेचे विस्मरण होऊ लागले होते. स्त्रिया फारशा शिकत

नव्हत्या. अर्थार्जन करीत नव्हत्या. त्यामुळे केवळ त्याला घरीदारी मराठी बोलावे लागत होते. परंतु तेवढा आणि तशासारखा व्यवहार नाइलाजाने मराठीत करून शक्य तितक्या लवकर आपल्या इंग्रजी मनःकोषात दंग राहण्याचा तो प्रयत्न करीत होता.

म्हणून तर राजवाड्यांनी ती जळजळीत शापवाणी उच्चारली. त्यांच्या मताशी प्रतिवाद करणाऱ्यांना त्यांनी आपल्या भाषणातच उत्तर दिले होते.

मराठी भाषेतील व्यवहाराला प्रतिष्ठा कितपत आहे ? मराठी भाषेचा व्यवहार स्वाभिमानापोटी किती होतो आहे ?

राजवाड्याच्यानंतर पन्नास वर्षांनी काय दिसते ?

या पन्नास वर्षांत स्त्रिया शिकल्या, अर्थार्जन करू लागल्या, पारतंत्र्य नष्ट झालं, प्रादेशिक विद्यापीठे निघाली, लोकशाही आली आणि वसंतदादा पाटलांसारखी माणसं राज्यकारभार करू लागली. परंतु मराठीचे काय झाले ?

मराठीची सर्व क्षेत्रांत पीछेहाट झाली. इंग्रजी शाळा भरभराटल्या. प्रत्येक सुशिक्षिताची आपल्या मुलांना इंग्रजी शिकविण्याची महत्त्वाकांक्षा वाढीला लागली. आज परिस्थिती अशी आहे की ज्याच्याजवळ ऐपत आहे अशा सर्वांची मुले आज इंग्रजी माध्यमाच्या शाळांत शिकत आहेत. आणखी दहा वर्षांनी सुशिक्षितांच्या घरातील एकही व्यक्ती उत्तम मराठी बोलू वा लिहू शकणार नाही. मग मराठी भाषेचे काय होणार ?

ती मरणार हे निश्चित. ज्या भाषेच्या वाट्याला स्वाभिमान नाही ती असून नसल्यासारखीच. त्यामुळे आजच मराठी भाषा मृत्युपंथाला लागली असे कुणाला वाटल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

काही दिवसांपूर्वी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ठाकूरद्वार शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त पाडगावकर, बापट, करंदीकर यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम ठरविण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या जुन्या इमारतीचा कोनशिला समारंभ सयाजीराव गायकवाड यांच्या हस्ते इंग्रजी भाषणाने पार पडला. त्यांचे पाहून इतरांनीही इंग्रजीत भाषणे केली. या ठिकाणी काही वाचकांमध्ये चर्चा सुरू होती.

‘काय हो, इंग्रजीचे प्रस्थ काय भयंकर वाढले आहे. माझ्या नातवाला कॉन्व्हेंटच्या शाळेत घातले आहे. त्याचा महिन्याचा खर्च सातशे रुपये आहे. अशाने आमच्या मराठीचे काय होणार ?’

‘काय होणार म्हणजे ती मरणार – एक पाचपन्नास वर्षे आणखी वाट पाहा.’

‘नाही हो. अजून कमीत कमी शंभर वर्षे तरी त्याला लागतील.’

‘माझ्या मते आणखी दोनशे वर्षे त्याला जावी लागतील.’

वाचकांच्यामध्ये यासंबंधाने चर्चा चालू असता, कोणीतरी शेजारी उभ्या असलेल्या कविवर्य विंदा करंदीकरांना विचारले,

‘काय हो, तुमचे काय मत आहे ?’

करंदीकरांनी गंभीरपणाने विचारले,

‘ गड्यांनो, मराठी माणसाचे दारिद्य किती वर्षे टिकेल असे तुम्हास वाटते ? पन्नास वर्षे ? शंभर वर्षे ? पाचशे वर्षे ?

‘ नाही हो, महाराष्ट्राचे दारिद्य हजारो वर्षे काही संपणार नाही.” कोणीतरी म्हणाले.

‘ मग जोपर्यंत महाराष्ट्राचे दारिद्य अबाधित राहील तोपर्यंत या भूमितलावर मराठी भाषा अक्षय्य राहील. ’ करंदीकरांनी भुवया उंचावून निर्णय दिला.

‘ ते कसं काय ! ’ कोणीतरी विचारले.

‘ गड्यांनो, त्याचे असे आहे. मी ‘ साहित्य सहवासा ’त राहतो. आता ‘ साहित्य सहवास ’ म्हणजे मुंबईतील मराठी साहित्यिकांचा बालेकिल्ला. एकदा मला सणक आली आणि मी शोध घेतला तेव्हा मला काय आढळले. समस्त मराठी साहित्यिकांची मुले आज इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत आहेत. गंगाधर गाडगीळांची मुले कुठे शिकली ? राजाध्यक्ष पतिपत्नींची मुलं कुठे शिकली ? दलित साहित्यिकांची मुले कुठे शिकताहेत ?

‘ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत. ’ सगळे एकदम ओरडले.

‘ आता आमच्या घरी किंवा आमच्या सर्वांच्या घरी भांडी घासणाऱ्या ज्या बाया आहेत किंवा शेजारी जी झोपडपट्टी आहे त्यातली दादांची मुलं सोडली तर बाकीची सारी महापालिकेच्या शाळांत जातात. कारण काय ? दारिद्य. गरिबांनाही आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवावेसे वाटते, परंतु परवडत नाही म्हणून ही मुले मराठी शाळेत जातात. या गरिबांची परिस्थिती सुधारली की मुले इंग्रजी माध्यमाकडे वळली म्हणून समजावे. हे दारिद्य जोपर्यंत चिरंतन आहे तोपर्यंत मराठी भाषा अमर आहे. ’

करंदीकरांना पुढे काही बोलायचे होते; परंतु कार्यकर्त्यांनी त्यांना कार्यक्रमासाठी हटकले.

गरिबांच्या मुलांनी मराठी शाळेत जावे आणि पैसेवाल्यांच्या मुलांनी इंग्रजी शाळेत जावे हा आता नियम झाला आहे. मंत्र्यांची मुले, आमदारांची मुले, व्यापाऱ्यांची मुले, कारखानदारांची मुले, शिक्षकांची, प्राध्यापकांची ( अगदी मराठीच्यासुद्धा ), महापालिकेच्या सदस्यांची मुले सारी सारी इंग्रजी शाळेत जातात. आज महापालिकेच्या शाळांतून काय परिस्थिती आहे ? कशा तऱ्हेची मुले शिकतात हे सांगण्याची गरज आहे काय ?

याला उपाय काय ? उपाय खरा काही नाही. हा सगळा जो आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ चालला आहे त्याला अनेक कारणे आहेत. सगळ्यांत महत्त्वाचे कारण म्हणजे आजच्या बुद्धिवंतांची प्रवाहपतित वृत्ती. त्यांच्या बुद्धिमत्तेला भयंकर स्वरूपाचे खग्रास ग्रहण लागले आहे.

त्याला एक उपाय सुचविण्यासारखा आहे.

महापालिकेच्या, विधानसभेच्या, लोकसभेच्या निवडणुकीत उभे असलेल्यांना जनतेने विचारले पाहिजे. 'तुमची मुले, नातवंडे कुठे शिकताहेत?' महापालिकेच्या शाळेत शिकत असतील तर त्यांना मते द्यायचे लोकांनी ठरवावे.

मराठी साहित्य संमेलनाच्या, नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभे असणारांना हाच प्रश्न विचारा आणि मग त्यांना मत द्यायचे की नाही ते ठरवा.

निदान त्यामुळे महापालिकेच्या शाळा तरी सुधारतील!

हेही नसे थोडके!

—आणि मराठी माध्यमाच्या शाळा चालतील.

७६

२१

# पिकतं तिथं विकत नाही !

महाराष्ट्रात साहित्यिक गप्पांची लाट कै. केशवराव कोठावळयांच्या कल्पक प्रतिभेतून निर्माण झाली. पुण्यात १ मे १५ मे या काळात ललित सभागृहाच्या गच्चीवर गेले कित्येक वर्षे साहित्यिक गप्पांचा जो कार्यक्रम होतो त्याची गोडी अवीट असते. पुण्याच्या सांस्कृतिक जीवनातले ते एक अविभाज्य अंग होऊन बसले आहे.

मुंबईत केशवरावांच्या चिरंजीवांनी–अशोक कोठावळे यांनी-विलेपार्ल्याच्या लोकमान्य सेवासंघाच्या पटांगणावर गेली दोन–तीन वर्षे साहित्यिक गप्पांचा असा फड उठविला. तेथे पुण्यापेक्षाही जास्त गर्दी जमते, परंतु पुण्याच्या कार्यक्रमात जी जान आहे ती मुंबईत जाणवत नाही मुंबईच्या कार्यक्रमात परात्मता व निर्जीवता येते.

मुंबईच्या मुंबई मराठी साहित्य संघात श्री. रमेश मंत्री यांनी तीन-चार वर्षांपूर्वी साहित्यिक गप्पांचा कार्यक्रम सुरू करण्याचे प्रयत्न केले होते. त्याला यावे तितके यश आले नव्हते.

साहित्य संघाने कै. नाथ माधवांचा स्मृतिदिन व्याख्यानाने साजरा न करता साहित्यिक गप्पांच्या रूपाने साजरा करावा असे ठरविले आणि ‘शल्यकौशल्य’ या आत्मचरित्राचे लेखक डॉ. भा. नी. पुरंदरे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम ठेवला. मुलाखत घेण्यासाठी वसुंधरा पेंडसे–नाईक, डॉ. बाबा कलगुटकर, रवींद्र पिंगे आणि मी अशी योजना केली.

ही मुलाखत माफक श्रोत्यांसमोर रंगावी तितकी रंगली नाही तरी ती अत्यंत उद्बोधक ठरली.

डॉ. पुरंदरे हे महाराष्ट्रातील फार मोठे नामांकित स्त्री-रोग व शल्यचिकित्सक. रक्त न सांडता शल्यकर्म करण्याच्या त्यांच्या कौशल्याने जागतिक कीर्तीच्या शल्यविशारदांनी

कौतुकाने मान डोलावली. त्यांच्या 'शल्यकौशल्य' या आत्मनिवेदनाने मराठी रसिकांचे लक्ष त्यांनी वेध घेतले. आजही डॉक्टरांच्या घरी जावे तर आया आपल्या मुलांना घेऊन डॉक्टरांच्या भेटीस आलेल्या दिसतात. 'शल्यकौशल्य' वाचून डॉक्टरांना भेटण्याची इच्छा मुलांना झालेली असते. डॉक्टरांना पाहून त्यांना अतिशय आनंद होतो.

डॉक्टरांची मुलाखत आहे म्हटल्यावर अनेक जाणकार व्यक्ती त्यासाठी आवर्जून उपस्थित राहिल्या होत्या.

डॉक्टरांनी शल्यचिकित्सा आणि शल्यकर्म यांच्यात जे अपूर्व यश संपादन केले आहे त्याचे मर्म समजावून घेण्याची इच्छा प्रश्नकर्त्यांत व श्रोत्यांत मोठ्या प्रमाणात दिसली.

स्त्री–दाक्षिण्य म्हणून नव्हे तर डॉक्टरांशी दीर्घकाळ परिचित असलेल्या वसुंधरा पेंडसे-नाईकांनी प्रश्नांच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. डॉक्टरांना इंजिनिअर व्हायचे होते परंतु वडिलार्जित व्यवसाय म्हणून ते वैद्यकीकडे वळले. परंतु डॉक्टरांच्यामधला इंजिनिअर आपणास कसा दिसतो हे त्यांनी सांगितले. इंजिनिअर न होता डॉक्टर झाल्याची त्यांना खंत वाटते का असा प्रश्न त्यांनी विचारला.

डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्यापूर्वी आपण फटाफट चित्रे काढून शस्त्रक्रियेची कल्पना कशी देतो ते सांगितले. शस्त्रक्रियेसाठी नवीन प्रकारची उपकरणे, हत्यारे निर्माण करण्याचे श्रेय आपणाला मिळविता आले ते अभियांत्रिकीच्या आवडीमुळे. त्या सर्व नव्या उपकरणांचे पेटंट मात्र आपण घेतले नाही. कारण लोकोपयोगी शोधांचा बाजार करू नये असे आपणास वाटल्याचे त्यांनी सांगितले.

रवींद्र पिंगे यांनी आनुवंशिकतेचा तुमच्या यशात वाटा किती ? असा मार्मिक प्रश्न विचारला. डॉक्टरांनी त्यांना दिलेले उत्तर विचार करण्यासारखे होते.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार कोणत्याही व्यवसायात आनुवंशिक गुण मोठ्या प्रमाणात कार्यरत असतात. ज्ञानेश्वरांच्या काळात डॉक्टरांचे पूर्वज पुणतांबे येथे वैद्यकी करीत. ते राजवैद्य व राजज्योतिषी होते. त्यांच्या वंशजांनी हा व्यवसाय निष्ठेने जोपासला. डॉ. पुरंदरे यांचे वडील हेही नाणावलेले स्त्री-रोग चिकित्सक. आपल्या परंपरागत पूर्वजांचे रक्त आपल्यात आहे. आपल्याला शस्त्रक्रिया फार लवकर जमते याचे कारण आपली बोटे सहजगत्या हालचाल करतात. हा आनुवंशिकतेचाच परिणाम होय असे त्यांना वाटते. त्यामुळे ज्याला आपण 'हातगुण' म्हणतो तो काही व्यक्तींमध्ये निश्चितच असतो. तो त्यांच्या रक्तामध्येच असतो व आनुवंशिकतेचाच भाग असतो याची डॉक्टरांना खात्री वाटत असल्याचे दिसले.

मी थोडा खट्याळ प्रश्न विचारला, 'डॉक्टर, आता तुम्ही किती शस्त्रक्रिया केल्या आहेत ?'

'सुमारे २४००० ते २५०००'—डॉक्टर म्हणाले.

'त्यांतल्या बहुसंख्य शस्त्रक्रिया स्त्रियांच्याच आहेत. होय ना ?'

'होय' डॉक्टर म्हणाले.

'मग इतक्या स्त्रियांशी तुमचा संबंध आल्यावर तुम्ही आत्मचरित्रात न लिहिलेल्या काही गोष्टी घडल्या असणार?'

मध्येच बाबा कलगुटकर म्हणाले.

'नानासाहेब, तुम्ही तरुणपणी फार देखणे होता. अजूनही दिसता. नक्कीच तुमच्यावर खूप स्त्रिया भाळलेल्या असणार!'

"भाळल्या असतील तर मला माहीत नाही, परंतु स्वतःच्या स्त्रीखेरीज दुसरा विचार काही माझ्या मनात कधी आला नाही."

"मग ज्यांच्या मनात आला असेल तो सारा फिफ्टी परसेंटचाच प्रकार म्हणायचा काय?"

"तसे म्हणा हवे तर!" डॉक्टर दिलखुलास हसत म्हणाले.

"डॉक्टर, आज गर्भावस्थेतच लिंगपरीक्षा केली जाते त्याबद्दल तुमचे काय मत आहे?"

"जन्मापूर्वी गर्भाचे लिंग कळून येण्यासाठी आज चार प्रकारे परीक्षा केली जाते. त्यांतील पहिली म्हणजे आल्ट्रा साऊंडच्या साहाय्याने केलेली परीक्षा. एक्स-रे प्रमाणे पोटावरून अल्ट्रासाऊंडच्या किरणाने गर्भाचे लिंग ओळखले जाते. दुसरा प्रकार म्हणजे गर्भाशयातील पाणी काढणे, ते इंजेक्शनच्या सुईने काढले जाते. त्यामुळे गर्भाशयाला इजा होण्याची शक्यता असते. बाऑक्सी हा तिसरा प्रकार. गर्भाशयाचा तुकडा काढून घेऊन परीक्षा करतात. परंतु खरे सांगायचे तर यांतील अनेक प्रकार धोक्याचे असतात. त्यांतील पहिला सोडून बाकीचे धोकादायक आहेत."

"परंतु गर्भाचे लिंग ओळखण्याची ही प्रथा तुम्हाला कितपत मान्य आहे?"

"मला मान्य असण्याचा प्रश्नच नाही. त्यामुळे स्त्रीजातीवर एकप्रकारे अन्याय होतो हे मला मान्य आहे. परंतु ठाण्यापासून गुजरातपर्यंतचे कित्येक लोक गर्भ मुलीचा आहे हे कळल्यानंतर परत जाऊन काय करणार आहेत हे मला ठाऊक असते. मुलगी जन्माला आली की पाण्यात बुडवून तिला मारण्याऐवजी ती जन्माला येऊ देऊ नये हे बरे नाही का?"

एकंदरीत प्रसूतिपूर्व गर्भलिंगपरीक्षा करण्यास डॉक्टरांचे मत काहीसे अनुकूल दिसले.

डॉक्टरांनी स्त्रीशल्यचिकित्सेच्या कार्यात जी क्रांती केली त्यासंबंधाने डॉ. कलगुटकरांनी विचारलेल्या प्रश्नाचे पुरंदऱ्यांनी विस्तृत उत्तर दिले. डॉ. पुरंदऱ्यांनी यांतले कित्येक प्रकार स्वतः शोधून काढले. डॉक्टरांच्या रूपाने स्त्रियांना एक वरदानच मिळाले अशी त्यामुळे अनेकांची भावना झाली.

"डॉक्टर तुम्ही किती वेळेत शस्त्रक्रिया करता?" या प्रश्नाचे डॉक्टरांनी दिलेले उत्तर श्रोत्यांना आश्चर्यचकित करणारे होते. ते म्हणाले,

" सात ते आठ मिनिटांत. डॉक्टर लीडस नावाचा प्रख्यात शल्यविशारद के.इ.एम हॉस्पिटलात आला होता. त्याने हॉस्पिटलची फेरी मारायच्या आत माझी तिन्ही ऑपरेशन्स, विद्यार्थ्यांना ती स्पष्ट करता करता, पुरी झाली होती. ती पाहून त्याने जागतिक वैद्यकीय पत्रकात लेख लिहून जगाला त्याची माहिती दिली होती. "

" डॉक्टर, तुमचा या क्षेत्रातील गुरू कोण ? "

" इंग्लंडच्या डॉक्टर व्हिक्टर बॉनी यांच्या हाताखाली मी शिकलो. परंतु त्यांना मी एक चांगले शिक्षक मानतो. गुरू नव्हे. गुरू माझे वडील अण्णा हे होते. ते उत्तम स्त्रीरोगतज्ज्ञ होते. परंतु ते शस्त्रक्रियेमध्ये खूपच स्लो होते. मी त्यांच्याकडून शिकून घेऊन ही विद्या परिणतावस्थेत पोहोचविली इतकेच. "

" डॉक्टर, तुम्ही विज्ञानाचे इतके मोठे उपासक परंतु तुम्हाला फलज्योतिषाचा नाद कसा आणि तो तुमच्या शास्त्राच्या दृष्टीने विसंगत नाही का ? "

" मुळीच नाही. " डॉक्टर ठासून म्हणाले.

" मी फलज्योतिषाचा अभ्यास केला. फलज्योतिष तुमच्या पत्रिकेवरून संभाव्य धोक्यांची कल्पना देते. त्यामुळे तुम्हाला ती टाळता येतात. आता प्रसिद्ध नट अशोककुमार व मी या दोघांची पत्रिका अगदी सारखी आहे. एकदा नेपच्यून हा ग्रह विशिष्ट ठिकाणी आल्याने आपल्या शरीराची फाडाफाड होण्याची शक्यता लक्षात आली. आम्ही दोघे एकाच वेळी गंभीर आजाराने अंथरूण धरले. अशोक उपचारासाठी परदेशात गेला. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली, ती अयशस्वी झाली म्हणून पुन्हा त्याला फाडले. तीही यशस्वी झाली नाही म्हणून डॉक्टरांनी तिसऱ्यांदा फाडले. आणखी फाडण्याच्या भयाने तो विकट अवस्थेत परत आला तेव्हा मी नुकताच आजारातून बरा होऊन विमानतळावर त्याला भेटलो. त्याने सारे ऐकून कपाळाला हात लावला. फलज्योतिष हे अवलोकनावर आधारलेले प्रायोगिक शास्त्र आहे. ते भविष्य सांगण्याचे साधन नव्हे. फलज्योतिषाचा अभ्यास न करता त्याविरुद्ध बोलणारे आपल्या देशात फार. त्यांच्याशी वादविवाद करण्याचे मला अनेक प्रसंग आले. " तू अभ्यास केला आहेस का ? मग बोल ' म्हटल्यावर त्यांची वाचा बंद होते. "

डॉक्टरांच्या हरियानातील दोन मुलाखतींची माहिती रंजक होती. हरयनामध्ये एका स्त्रीबरोबर अनेक पुरुषांची लग्ने होतात. या पांडवधर्मामुळे संततिनियमन साधते असे म्हटल्याने तिथल्या लोकांना बरे वाटले, परंतु त्यामुळे सारे घर गुप्तरोगाने ग्रासले जाण्याची शक्यता आहे म्हटल्यावर गदारोळ माजला.

डॉक्टरांची ही मुलाखत ऐकताना केवढ्या मोठ्या कर्तबगार माणसाशी आपण बोलत आहोत हे जाणवत होते.

परंतु त्या मानाने त्यांचे कौतुक किती झाले ?

पिकते तेथे विकत नाही हेच खरे !

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२७
नोंदणी क्र. २५३६६
२३/१०/७५
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

# २२

# साहित्य-संमेलनाध्यक्षांची निवडणूक

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे हीरक महोत्सवी अधिवेशन यंदा मुंबईस भरत आहे. मुंबई मराठी साहित्य संघाकडे त्याचे यजमानपद आहे. महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य संस्थांचे सांघिकीकरण होऊन या सर्व संस्थांचे व्यापक प्रतिनिधित्व ' मराठी साहित्य महामंडळ ' नावाची संस्था करते. सर्व महत्त्वाच्या संस्थांप्रमाणे तिची उद्दिष्टे व्यापक आहेत. विशेषतः महाराष्ट्रातल्या वाङ्मयीन स्थिति-गतीचा शोध आणि वेध घेण्याचे, संशोधनविषयक मोठमोठ्या प्रकल्पांचे आयोजन करण्याचे कार्य या संस्थेचे ठरते. परंतु दुर्दैवाने गेल्या पंचवीस वर्षांत महामंडळाने केवळ साहित्यसंमेलने भरविण्याचे कार्य केले आहे. हे कार्य करण्यासाठी जी यंत्रणा किंवा जे अर्थसहाय्य आवश्यक असते तेही महामंडळाजवळ नाही. आपल्या ज्या घटक संस्थेच्या प्रदेशक्षेत्रात संमेलन भरविले जाते, त्या घटक संस्थेची जबाबदारी संमेलन भरविण्यात प्रमुख मानली जाते. या घटक संस्थाही मर्यादित प्रमाणात वाङ्मयीन कार्य करणाऱ्या असतात आणि त्यांचीही आर्थिक ऐपत संमेलन भरविण्याइतकी असू शकत नाही. परिणामी ज्या ठिकाणी संमेलन भरविले जाते त्या ठिकाणच्या स्थानिक दातृत्वाला आवाहन करूनच संमेलनाचा प्रचंड उत्साहाचा डोलारा उभा करावा लागतो. परंतु मोठ्या साहित्य संमेलनाचे एक विलक्षण आकर्षण सर्वसामान्य जनतेला आहे. विशेषतः प्रादेशिक परिसरात ज्यावेळी संमेलने भरतात त्यावेळी आजूबाजूच्या परिसरातील ग्रामीण जनता संमेलनाला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहते. संमेलनाबद्दलचे मराठी माणसाचे आकर्षण हे संमेलन भरविण्यामागची प्रमुख प्रेरणा असते.

या संमेलनाचे वातावरण तयार करण्याचे कार्य अध्यक्षीय निवडीपासूनच सुरू होते. संमेलनापूर्वी सुमारे आठदहा महिने ते वर्षभर अगोदर अध्यक्षीय निवडणुकीचा

नारळ फुटतो. महामंडळाच्या बैठकीतून अध्यक्षपदासाठी नावे सुचविण्यास सांगितले जाते. वर्तमानपत्रातून घटक संस्था मग या नावांसाठी आवाहन करतात.

परंतु या अध्यक्षीय निवडणुकीला कोणते वळण लागेल ते काही सांगता येत नाही. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद लाभणे हा मोठा सन्मान असतो. परंतु हा सन्मान काही साहित्यिकांकडे सहजासहजी चालून येत नाही. त्यासाठी झगडावे लागते, निवडणूक लढवावी लागते, मतदारांकडे याचना करावी लागते, प्रसंगी आर्थिक झीज सोसावी लागते. राजकीय निवडणुका लढविणाऱ्यांची उदाहरणे डोळ्यांसमोर असतात. साहित्यिक अशा निवडणुकांपासून दूर राहावेत असे म्हटले जाते. परंतु राजकारण्यांना काय यातना सोसाव्या लागतात याची अंशमात्र कल्पना या निवडणुकीमुळे साहित्यिकांना आल्याखेरीज राहत नाही. विशेषतः गेल्या दहा वर्षांत संमेलनाध्यक्षांच्या निवडीमध्ये जे जे प्रकार झाले, ते पाहता या निवडणुकीमध्ये आपण पडावे की नाही, असा संभ्रम साहित्यिकांमध्ये निर्माण होतो, परंतु साहित्यिकांच्या आयुष्यातील कृतार्थतेच्या या क्षणाची वाट पाहावी असे महत्त्व या प्रसंगाला आले असल्याने त्याचे एक आकर्षणही असते. 'धरले तर चावते, सोडले तर पळते' अशी अवस्था त्यामुळे होते. कोर्टकचेऱ्यांच्या दिव्यातून जाणे, दलितांच्या प्रश्नांवर संमेलने उधळली जाणे, मोर्च्यांना सामोरे जाणे, शासकीय सेवेत असल्यास आणीबाणीसारख्या प्रसंगी नामुष्की वाट्याला येणे, मानापमानांच्या प्रसंगी तडजोडीची भूमिका स्वीकारणे इ. अनेक प्रकारच्या अनुभवांनी अध्यक्ष झालेल्या कित्येकांची तोंडे कडू झालेली आहेत.

संमेलनासाठी निवडणूक लढविणे हा एक लक्षात राहण्यासारखा प्रसंग असतो. अध्यक्षीय निवडणूक लढविणारे सारे आपल्या परिचयाचे असतात. त्यांच्याबद्दल आपल्या मनात आदर व प्रेम असते. परंतु त्यापैकी एकालाच मत देता येते. आणि इतरांना नाराज करावे लागते. दरवर्षी त्यामुळे कोणा ना कोणाची तरी निष्कारण नाराजी पत्करावी लागते. त्यामुळे साहित्य संमेलनाध्यक्षांची निवडणूक म्हटली की माझ्या पोटात गोळा उठतो. दरवर्षी हटकून कोणाला तरी दुखवण्याचा हा एक अप्रिय प्रकार वाटतो.

तो टाळायचा कसा?

वास्तविक तो टाळणे कठीण असते. संमेलनाध्यक्षांच्या निवडीबाबत जेवढे म्हणून प्रकार अवलंबिता येणे शक्य आहे, तेवढे सगळे प्रकार अवलंबिण्यात आले आहेत. संमेलने महामंडळाकडे येण्यापूर्वी ती पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे भरविली जात. त्यावेळी परिषदेच्या साऱ्या सभासदांना अध्यक्ष निवडता येत असे. या साऱ्या सभासदांकडे मतपत्रिका जात, त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात ज्याची लोकप्रियता अधिक तो अध्यक्ष निवडला जात असे. फडके–खांडेकर–अत्रे इ. साहित्यिकांच्या वाट्याला त्यामुळे तुलनेने खूपच उमद्या वयात अध्यक्षपद उपभोगता आले. ही पद्धत बंद करून

साहित्यसंस्थांच्या निवडून आलेल्या सभासदांनाच मतदानाचा हक्क देण्यात आला. महामंडळ निर्माण झाल्यानंतर काही काळ महामंडळाच्या सदस्यांनी अध्यक्षीय निवडीची सूत्रे आपल्या हातात ठेवली होती. त्यामुळे केवळ लोकप्रियतेच्या जोरावर अध्यक्ष निवडण्यापेक्षा विचारवंत साहित्यिकांना, समीक्षकांना अध्यक्ष म्हणून सन्मानित करता आले.

साहित्य-संमेलन भरविणे म्हणजे मोठ्या प्रमाणात नियोजन आले. पैसा उभे करणे आले. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यामुळे बरीच संमेलने संस्थानिकांच्या आश्रयाने उभी राहिली. त्यामुळे साहित्यिक नसलेल्या काही संस्थानिकांना अध्यक्ष करणे भाग पडले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संमेलनाच्या उभारणीसाठी राजकीय कार्यकर्त्यांचा आश्रय घेतल्याशिवाय गत्यंतर नाही अशी परिस्थिती झाली. १९६८ मध्ये वर्धा येथे जे साहित्य संमेलन पु. शि. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यावेळी संमेलनाचा खर्च भागविण्यासाठी स्वागताध्यक्ष रामेश्वर बजाज नावाच्या सद्गृहस्थांना आपले शेत विकावे लागले. त्यामुळे १९६८ पासून १९७३ पर्यंत आर्थिक कारणांपोटी संमेलन भरणे दुरापास्त झाले.

१९७३ मध्ये यवतमाळच्या जिल्हा परिषदेचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. सुधाकर नाईक यांनी संमेलन घ्यायचे चर्चेनंतर ज्यावेळी मान्य केले, त्यावेळी त्यांना अध्यक्ष कोण हवा असे विचारण्यात आले. कारण संमेलनासाठी पैसा उभा करणाऱ्यांना निदान हवा तो अध्यक्ष मिळावा ही त्यामागची कल्पना होती. त्यामुळे अध्यक्ष स्थानिक मंडळींना निवडता यावा अशी सोय घटनेमध्ये करण्यात आली. महामंडळाने अध्यक्षीय निवडीसाठी तीन नावे स्थानिक स्वागत समितीकडे पाठवावी. या तीन नावांमध्ये त्यांना हव्या त्या अध्यक्षाचे नाव ठेवण्याची दक्षता घ्यावी आणि गावामध्ये ठराविक शुल्क भरून जेवढे स्वागत सभासद होतील, त्या सर्वांनी मतदानाने अध्यक्ष निवडावा, अशी व्यवस्था होती. त्याचे परिणाम पुणे येथे नगर वाचन मंदिरातर्फे काही वर्षांपूर्वी भरलेल्या साहित्य संमेलनात दिसून आले. प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ व पु. भा. भावे हे तीन मातबर साहित्यिक त्यावेळी अध्यक्षपदासाठी उभे होते. स्वागत सभासदांची नोंदणी ज्यांच्या बाजूने जास्त होईल तो अध्यक्ष म्हणून निवडला जाईल असे चित्र असल्याने या निवडणुकीत जेवढी चुरस निर्माण झाली, तेवढी यापूर्वी क्वचितच निर्माण झाली असेल. हेच संमेलन उधळले गेले आणि त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात कायदेबाजी होऊन कोर्ट-कचेऱ्यांनी दूषित वातावरण निर्माण झाले.

या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर मुंबईस भरणाऱ्या साहित्य संमेलनासाठी अध्यक्षीय निवडीचा गदारोळ कसा माजतो याबद्दल बऱ्याच जणांच्या मनात एक कुतूहल होते. अध्यक्षीय निवडणुकीमध्ये किंवा साहित्य संस्थांच्या निवडणुकांमधून जी परस्पर विरुद्ध पत्रके काढली जातात, त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात साहित्यिक व साहित्यसंस्था

यांच्याबद्दल काही विकल्प निर्माण होतात. उपहासाने या निवडणुकांची ते म्युनिसिपालिटीच्या आणि राजकीय निवडणुकींच्या आखाड्यांची तुलना करतात. आणि साहित्य-संस्थांच्या कार्यकर्त्यांना छेडतात.

यंदा असे प्रकार होऊ नये यासाठी काही प्रमाणात सुरुवातीसच प्रयत्न करण्यात आले. महामंडळाच्या साऱ्या घटक संस्थांनी महामंडळाच्या बैठकीमध्ये एकमताने या बाबतीत काही निर्णय घेण्यासंबंधी विचारविनिमय झाला. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्यांची निवड व्हावी असे वाटत होते, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मनाचा कल आजमावण्यात आला. बऱ्याच ज्येष्ठ साहित्यिकांना निवडणूक न होता सन्मानाने अध्यक्षाची निवड व्हावी असे वाटत असल्याचे लक्षात आले. असा प्रयत्न एका महत्त्वाच्या साहित्यिकाबाबतीत करावयाचे ठरविले तर लोकशाहीत निवडणूकही हवी, परंतु मी ती लढविणार नाही, असे सांगितले. लोकशाही म्हटल्यानंतर जर निवडणूक अपरिहार्यच असेल तर साहित्यिकांनी मतदारांचा कौल घेण्यात कमीपणा कसला आणि त्यांनी निवडणुकीला तरी का घाबरावे, असे विचारले असता या साहित्यिकांनी आपली दुहेरी भूमिका पुनःपुन्हा उच्चारून दाखविली. त्यामुळे नाईलाज झाला.

परंतु निवडणुकीमध्ये म्हणून जे प्रकार होतात त्यामुळे नामवंत साहित्यिक निवडणुकी-संबंधाने अतिशय उदासीन दिसले. निवडणूक म्हटले की पत्रके आणि त्यासाठी आपल्या प्रकाशकांना शरण जाणे आणि परिणामी त्यांच्या मिंध्यात राहिल्याने ओशाळणेही आले. अशा वेळी काही प्रकाशकांचा जाच स्वाभिमानी साहित्यिकांना नकोसा वाटतो. झालेल्या खर्चाची जाणीव देऊन त्याची वसुली करण्यासाठी धडपडणाऱ्या प्रकाशकांच्या वार्ता कानी पडल्यामुळे साहित्यिकांच्या अवस्थेत भर पडलेली दिसते.

अशा वेळी खूप वर्षांनी का होईना यंदा अध्यक्षांची निवडणूक बिनविरोध झाली, याचे समाधान फार मोठे आहे. श्री. द. मा. मिरासदारांसारख्या लोकप्रिय साहित्यिकाने सुजाणपणाने ज्येष्ठ साहित्यिकाचा सन्मान राखावा म्हणून माघार घेतली आणि त्यामुळे एक चांगला पायंडा पडला.

महामंडळ यंदापासून मुंबईला गेल्याचा हा पायगुण म्हणावा काय ?

७६

# २३

# या ज्वालामुखीचा स्फोट होणार का ?

भारतातील जातिभेद इतिहासजमा झाले पाहिजेत असे भारतातील प्रत्येक सुविद्य व्यक्तीला वाटते. परंतु आपण आपल्या हातांनी स्वातंत्र्योत्तर काळात काही जटिल समस्या निर्माण करून ठेविल्या आहेत की त्यामुळे जातिभेदनिर्मूलन, विशेषतः दलितांचा प्रश्न मोठा बिकट होऊन बसला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी द्रष्टेपणाने काय अपेक्षिले होते आणि आज आपल्याला काय पाहायला मिळते, या कल्पनेने मन चिंताग्रस्त होते. बाबासाहेबांनी आपल्या 'जातिभेदाचे निर्मूलन (ॲनायहिलेशन ऑफ कास्ट)' या छोट्याशा ग्रंथात यासंबंधाने मोठे मूलगामी विवेचन केले आहे.

गेल्या शंभर-दीडशे वर्षांत भारतात समाजसुधारणेचे जे जे प्रयत्न हिंदू समाजसुधारकांनी केले, ते सारे आपल्या कुटुंबसुधारणेचे होते, असे या ग्रंथात बाबासाहेबांनी मोठ्या मार्मिकपणे दाखविले आहे- सुधारकांना आपल्या घरची स्त्री शिकायला हवी, तिची विटंबना थांबायला हवी होती, बालविवाहासारख्या दुष्ट रूढींचा त्यांना नायनाट व्हावयास हवा होता. समाजातील स्पर्शास्पर्शविचार त्यांना अस्वस्थ करीत होता आणि सप्तबंधांपैकी अनेक बंधांना त्यांना तिलांजली द्यावयाची होती. समाजसुधारणेचे त्यांचे विचार यापेक्षा अधिक व्यापक असले तरी ते केवळ वैचारिक होते. त्यांना आपल्या घरच्या मुली दुसऱ्या जातींत द्यायच्या नव्हत्या आणि दुसऱ्या जातींतल्या आपल्या घरी घ्यायच्या नव्हत्या. अगदी नाईलाज म्हणून थोडीशी तडतोड करायला त्यांची मने तयार होती. परंतु आपण होऊन आपल्या कृतीने जातिभेद निश्चयाने तोडण्याची धमक त्यांच्यांत नव्हती. त्यामुळे जातिभेदावर प्रहार होणे फार कठीण होते. आजही त्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. पुण्या-मुंबईतील किंवा महाराष्ट्रातील सुधारक म्हणविणाऱ्या दहा व्यक्तींची उदाहरणे घेतली तर ती पुरेशी आहेत. या व्यक्तींनी

आपल्या मुली किंवा सुना आपल्याच पोटजातीत जातील आणि येतील याची दक्षता घेतली आहे.

साम्यवादी विचारवंतांचा तर बाबासाहेबांचा फारसा भरवसा नव्हता. आर्थिक सत्तेच्या विचाराने सामाजिक परिवर्तन करू पाहणे म्हणजे या देशाच्या हजारो वर्षांच्या लोकमानसाकडे दुर्लक्ष केल्याने भयानक अपयशाच्या गर्तेत पडणे होय असे त्यांना वाटत होते. या देशात धर्म आणि समाज ही प्रतिष्ठेची सर्वांत प्रबळ शस्त्रे आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याने या देशात साम्यवाद दुबळा राहिला. सामाजिक प्रतिष्ठा ही कर्तृत्वावर, गुणावर अधिष्ठित पाहिजे. चातुवर्ण्याच्या मूळ संकल्पनेत ती तशी होतीही. कालांतराने वर्णव्यवस्थेतील मूळ लवचिकता नष्ट होऊन तिला जन्मजात जातिव्यवस्थेचे रूप प्राप्त झाले.

समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणल्याखेरीज या देशातील जातिभेदांच्या विशेषतः दलितांचा प्रश्न कदापि सुटू शकणार नाही आणि हा बदल या देशात लोकशाही मार्गाने कदापि घडून येणार नाही, हे उघडच आहे. त्यासाठी आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे क्रांतीच हवी. परंतु ही क्रांती आजच्या प्रतिष्ठित समाजाकडून होणार नाही, हे उघड आहे आणि दलित इतके दुबळे आहेत की, त्यांच्या हातूनही क्रांतीचे चाक गतिमान होऊ शकणार नाही.

व्यक्तिहितविरोधी आणि लोकशाहीविरोधी भावनांची प्रखर जाणीव व्यक्तिमात्रात निर्माण करणे हे जातिसंस्थेचे सर्वांत मोठे कार्य आहे. या जातिसंस्थेने सर्वंकष हिंदुसंघटन अशक्यप्राय करून सोडले आहे. तिने समूहमूल्यांची कदर केली नाही. मात्र आत्यंतिक धार्मिक वृत्तीमुळे हिंदुसमाज सहिष्णू राहिला आहे. ही धर्मभावना त्यांच्यातील कमी झाली की, त्यांच्यातील सहिष्णुता लोप पावेल आणि नवे प्रश्न निर्माण होतील, असे भाकित बाबासाहेबांनी केले होते. दुर्दैवाने ते भाकित आज खरे ठरले आहे. धर्माच्या नावाखाली जातिभेद स्थिरावत असतील आणि धर्मभावना लोपून केवळ जातिभेदांचेच वर्चस्व वाढत राहत असेल तर हिंदुधर्माचे काय राहील? आंबेडकरांनी एकेकाळी तो तो मोडीत काढण्याची कल्पना व्यक्त केली होती. परंतु तो एक सामाजिक संतापाचा उद्रेक होता. धर्मविरहित समाजरचना या देशात अशक्य आहे, हे जाणवल्यामुळे दलितांची बौद्धधर्माच्या आधाराने संघटना करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. त्यामुळे हिंदुधर्म मोडीत काढण्याची त्यांची संकल्पना त्यांच्या मूलभूत विचारसरणीचा भाग नव्हती हे उघड आहे.

आमच्या घटनेने मागासवर्गीयांना त्यांच्या उद्धारासाठी काही विशेष सवलती देऊ केल्या आहेत. त्या आज दलितेतरांच्या डोळ्यांत खुपत आहेत आणि खुपत राहणार यात शंका नाही. काही प्रमाणात अस्पृश्यतेचा प्रश्न सुटला आहे, परंतु तो पूर्णपणे सुटलेला आहे असे नाही. ग्रामीण भागात ज्या ठिकाणी भूमिहीन दलितांना उदर-

निर्वाहासाठी गावातील प्रतिष्ठित जमीनदारांकडे मिळणाऱ्या मोलमजुरीवर राहावे लागते, तेथे अद्यापि काही प्रमाणात अस्पृश्यता टिकून आहे. 'एक गाव, एक पाणवठा' या चळवळीत दलितांना गावातील विहिरीवर पाणी भरण्यास जो प्रतिबंध झाला आणि अनेक ठिकाणी दलितांना जिणे नकोसे करून टाकणारी पावले गावकऱ्यांनी टाकली, त्यावरून कायद्याने अस्पृश्यता हा गुन्हा मानला गेला असला तरी भारतीय मनाने तो अद्याप मानलेला नाही, हे त्यावरून स्पष्ट होते. परंतु मोठ्या औद्योगिक शहरांतील परिस्थितिजन्य रेट्यामुळे आज अस्पृश्यतेचे प्रमाण बरेच कमी झाले आहे, हे लक्षात येते. मात्र त्यामुळे अस्पृश्यांचे प्रश्न सुटलेले आहेत असे काही म्हणता यावयाचे नाही.

वर दलितांना मिळणाऱ्या सोयीसवलती इतरांच्या डोळ्यात खुपत असल्याचा जो उल्लेख केला, त्याची असंख्य उदाहरणे रोज अनुभवावयास मिळतात. मराठा महासंघाने शैक्षणिक क्षेत्रातील रोस्टर पद्धतीविरुद्ध उठविलेला आवाज हे त्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे, किंवा मंडल आयोगाच्या उपाययोजनेबद्दल जो काही गदारोळ माजला, तोही याच विरोधी भावनेचा निदर्शक होता. दैनंदिन जीवनात कुठेही जा, दलितांच्या सवलतींबद्दल कुत्सेने बोलले जात नाही अशी ठिकाणे आपणास क्वचितच आढळतील. दलित हे सरकारचे जावई आहेत, हा आक्षेप सर्रास घेतला जातो. दलितांची अकार्यक्षमता नेहमीच उपहासाने उल्लेखिली जाते. त्यांनी काही काम करून घोटाळे निर्माण करण्यापेक्षा काही काम न करता त्यांना पगार कसा दिला जातो, हे उपहासाने सांगितले जाते. अकार्यक्षमता हा काही केवळ दलितांचा विशेष नव्हे. आजच्या नोकरशाहीला लागलेले ते एक खग्रास ग्रहण आहे.

दलितांबद्दल सहानुभूती असणाऱ्यांनाही त्यांच्यामुळे स्वतःस चटका बसण्याचा प्रसंग आला तर त्यांच्या मनातील सहानुभूती लोपते आणि तेही इतराप्रमाणेच विचार करायला लागतात. आपल्या मुलांचा इंजिनियरिंग किंवा मेडिकल कॉलेजातील प्रवेश एका टक्क्याने हुकतो आहे आणि तो केवळ दलितांना मिळणाऱ्या सवलतींमुळे, असे वाटून तोंडे कडवट झालेल्या सुधारकांची अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. किंवा स्वतःच्या पत्नीची शिक्षिकेची नोकरी दलितांच्या राखीव अग्रहक्कामुळे जाते म्हटल्यानंतर आपल्या पत्नीची नोकरी जाऊ नये व ती दलित शिक्षकाला मिळू नये यासाठी केविलवाणी धडपड करणाऱ्यांनाही मी पाहिले आहे. वयाची ६० वर्षे पुरी झाली, आता आपल्या हाताखालील दलितांना ती जागा मिळू द्यावी, असे एका प्रख्यात दलितोद्धाराची भावना बोलणाऱ्या प्राध्यापकांना वाटले नाही, हे अलीकडचे ताजे उदाहरण आहे. त्यामुळे दलितोद्धाराची भाषा व कृती यांत महदंतर आहे आणि दलितोद्धाराची भाषा करणारे दलितेतर सुधारक स्वतःवर प्रसंग आल्यावर गडबडून जातात आणि तसे ते गडबडून जाणे साहजिकच आहे. कारण गेल्या शतकातील बोलक्या सुधारकांचे ते आजचे वारस आहेत.

दलितांना आणि तत्सम मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलती घटनेने कालबद्ध होत्या. चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून घटनेच्या कलमात वारंवार दुरुस्त्या होत राहून या सवलती टिकविण्यात आल्या आहेत आणि आणखी कित्येक वर्षे त्या तशाच राहणार आहेत, राहिल्या पाहिजेत. ठराविक काळात दलितांचे उन्नयन होईल ही जी राष्ट्रपुरुषांची दृष्टी होती ती लघुदर्शी ( Short sighted ) होती, यात, शंका नाही. घटनेने दिलेले हक्क दलितांना आजपर्यंत पूर्णपणे बजाविता किंवा उपभोगता आले नाहीत. त्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागला आहे आणि हा संघर्ष अद्याप संपलेला नाही. दलितांची पांढरपेशा नोकऱ्यांत जी टक्केवारी अपेक्षित आहे ती पुरी होऊ न देण्याची खबरदारी वरच्या वर्गाने सदैव घेतलेली आहे. दीर्घकाळ अशीच वस्तुस्थिती राहिली तर दलितेतरांचा प्रतिकार वाढता राहील हे गुजराथमधल्या गेल्या दोन वर्षांच्या उद्रेकावरून लक्षात घेण्यासारखे आहे. मराठवाड्यातील वातावरण आणि गेल्या महिन्यात फलटणला घडलेला प्रकार दुर्लक्षिण्यासारखा खास नाही. दलितांनाही या वस्तुस्थितीची नीट जाणीव असावयास हवी. सुदैवाने ती तशी त्यांस आहे, हे काही उदाहरणांवरून लक्षात येते.

दलितांना या सवलतींची खंत आहे का ? निश्चित आहे. परंतु अशा तऱ्हेचा प्रश्न त्यांच्या बाबतीत निर्माण करणे निर्घृणतेचे आहे. जेव्हा इतर प्रतिष्ठित जातीजमाती आपला मागासलेल्या जमातींत समावेश व्हावा आणि आपल्यालाही सवलती मिळाव्यात म्हणून प्रयत्नशील राहतात तेव्हा दलितांनाच याबाबतीत दोष देण्यात काय अर्थ आहे ? सामाजिक परिस्थितीमुळे शिक्षणाच्या सोयी दलितांना कितीही मिळत असल्या तरी, नोकऱ्यातील कार्यक्षमतेच्या बाबतीत ते अजून काही काळ मागेच राहणार. सामाजिक परिस्थिती बदलत गेल्यानंतर ही कार्यक्षमता निश्चितपणे इतरांच्या बरोबरीने निर्माण होईल. तशी परिस्थिती निर्माण होण्यासाठी इतर घटकांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

आज स्वातंत्र्योत्तर काळात आम्ही ज्या चुकीच्या मार्गाने चाललो आहोत, त्याचे दुष्परिणाम आपणाला दीर्घकाळ भोगावयास लागणार आहेत. ‘जात’ ही आज राजकीय सत्तेची एक मोठी शक्ती निर्माण झाली आहे. कोणत्याही बहुसंख्य असलेल्या जातीच्या हातांत, जातीला आवाहन केल्यामुळे, सत्ताकेंद्रे हस्तगत करता येतात. त्याचे फार मोठे दुष्परिणाम आज आपणाला भोगावे लागत आहेत. परिणामी आज जातिभेद आणखी बंदिस्त, तीव्रतर होत असलेले दिसून येतात. एकीकडे आपली नावे, आडनावे यातून आपली जात दिसू नये अशी आमची इच्छा कितीही असली तरी व्यवहारतः पुन्हा एकदा जातिविशिष्टता, जातिपृथगात्मता यांचे मोठे थैमान प्रत्यक्ष व्यवहारात सुरू आहे. हे सर्व लोकशाहीला मारक आहे. डॉ. आंबेडकरांनी घटनासमितीच्या सभेत भाषण करताना, स्वातंत्र्य मिळते आहे या आनंदात घटनेमध्ये मूलभूत मानवी हक्कांच्या

तरतुदीकडे समाजाचे दुर्लक्ष होईल आणि कालांतराने त्यांची जाणीव झाल्यानंतर हाच भारतीय समाज घटना पायदळी तुडविण्यास मागेपुढे पाहणार नाही, अशी भीती व्यक्त केली होती. आज त्याचे प्रत्यंतर येत आहे.

समाजाच्या मनाचे संतुलन झाले नाही तर घटनात्मक तरतुदी पोकळ ठरतात आणि जुनी कर्मकांडे नव्या स्वरूपात राक्षसी रूपे धारण करतात. आज असे होत आहे, झाले आहे.

आज जातिभेद वाढले आहेत, प्रांतभेद तीव्र झाले आहेत. कडव्या धर्मप्रेरणेने अतिरेकी चळवळी जोमात आहेत. मागासलेल्यांना केवळ सोयीसवलतींसाठी आपले मागासलेपण हवे आहे. यामध्ये मार्क्सने सांगितला तो ‘आर्थिक घटकांचे सामाजिक प्राबल्य’ हा विचार पराभूत होऊन कोपऱ्यात बसला आहे.

ही सर्व परिस्थिती बरोबर उलटी झाली तरच सामाजिक क्रांती शक्य आहे. ती शक्य होण्यासाठी, आहे ही परिस्थिती असहाय्यतेच्या ज्वालामुखीवर उभी राहिल्याने, ज्यावेळी त्याचा प्रचंड स्फोट होईल, त्यावेळी वेगळे काही तरी घडेल.

असे घडण्यासाठी वाट पाहायची का आपणच हा स्फोट घडवून आणायचा ? फक्त वाट पाहणे तेवढे हातात आहे. स्फोट घडवून आणण्याचे नाही.

%

# २४

# भोजन म्हणजे भांडणेच !

जवळजवळ आता सारा एप्रिल महिना संपत आला, परंतु माधवरावांचे गाजणे काही संपत नाही. त्यामुळे मुंबईच्या साहित्यिक वर्तुळात मी मी म्हणणारे मुंबईचे साहित्यिक सध्या कमालीचे अस्वस्थ झाले आहेत. माधव मनोहरांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने फेब्रुवारी महिन्यामध्ये त्यांच्या गौरवाच्या नौबती झडू लागल्या. वास्तविक एखाद्या साहित्यिकाची साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करणे किंवा षष्ठ्यब्दिपूर्तीनिमित्त सत्कार करणे म्हणजे, 'बाबा, आता पुरे! राहिलेले तुझे आयुष्य आता सेवानिवृत्तीचे! सरकारी नोकरीप्रमाणे जरी तुला पेन्शन मिळणार नसली तरी तुला आता विश्रांती घेणे हे तुझ्या दृष्टीने श्रेयस्कर,' असे जणू काही त्याला सुचवायचे असते. अर्थातच वृद्धपणाच्या सबबीवर कोणा मंत्र्यांच्या मेहेरबानीने नियमित शासकीय आर्थिक मदत मिळविण्यासाठी यानंतर अशा साहित्यिकाला किंवा कलावंताला अधिकार प्राप्त होतो. पण ही गाजराची पुंगी वाजेलच याची शाश्वती नसते.

परंतु ७५ वर्षे पूर्ण झाली म्हणून माधव मनोहरांनी लेखनसंन्यास घ्यावा आणि इंग्रजी नाटके वाचत राहून समस्त मराठी नाटककारांचे चौर्यकर्म उघडकीस आणण्याचे बंद करावे असे चुकूनही कुणास वाटले नाही! कारण माधव मनोहरांना गेली तीस-चाळीस वर्षे पाहणाऱ्या त्यांच्या चाहत्यांना वृद्धपणाची कोणतीही लक्षणे त्यांच्या शरीरावर उमटलेली दिसत नाहीत. महाभारतातला भीम जसा सदैव ऐटीत खांद्यावर गदा घेऊनच येताना दिसावा किंवा एखाद्या तालमीतला दादा अंगाला तांबडी माती लागलेल्या अवस्थेत स्वतःच्या पीळदार शरीराकडे पाहत उभा असावा, तसे माधवराव आजही दिसतात आणि तशाच कुर्रेबाजीने साहित्याच्या क्षेत्रात वावरतात. पण म्हणून काय झाले? त्यांच्या नावाचा दुंदुभी तीन-चार महिने झडत राहाव्यात आणि त्याला

खंड म्हणून पडूच नये ! हे फार म्हणजे फारच झाले ! मुंबईच्या अलाण्याने पुण्याच्या फलाण्याला पत्र लिहून दोघांनीही आपली पोटदुखी त्यामुळे व्यक्त केली तर आश्चर्य वाटावयास नको. माधवराव कोणत्या गिरणीचे पीठ खातात किंवा त्यांचा रोजचा खुराक काय असावा, यासंबंधी कमालीचे कुतूहल निर्माण होऊन त्याचा शोध घेण्याचे कार्य सध्या जारीने चालू आहे.

माधवरावांच्या शरीराने ' अंगं गलितं पलितं मुडम् दशनविहितं जातं तुडम् ' ही निसर्गाची साहजिक अशी क्रीडा थोपवून धरली असली तरी त्यांच्या मनाच्या भिंती पूर्वीसारख्या भक्कम राहिल्या नसाव्या, हळवेपणाने त्यांना ग्रासले असावे हे लक्षात येण्याइतपत पुरावा अलीकडेच त्यांच्या पत्रव्यवहारावरून आमच्या हाती आला आहे.

या हळव्या भिंतीची लागण एक नाही, दोन नाही पाच वर्षांपूर्वीच झाली आहे हे लक्षात आल्यामुळे तर त्यांचे सारेच चाहते हबकून गेले आहेत. वयाची सत्तर वर्षे पुरी झाल्यानंतर म्हणजे पाच वर्षांपूर्वी म्हणे, त्यांच्या मनाने आपण वृद्ध होत आहोत या जाणिवेने राहिलेले आयुष्य साऱ्यांशी गुण्यागोविंदाने काढावे असे ठरविले ! बापरे ! आमचा काही या गोष्टीवर विश्वास बसत नाही. परंतु मराठी रंगभूमीवर गेल्या पाच वर्षांत जी अनागोंदी चालू आहे ती पाहिल्यावर माधवरावांच्या या प्रतिज्ञेवर विश्वास ठेवावासा वाटू लागतो. कारण त्यांच्या भीतीने ब्रिटिश वा अमेरिकन लायब्ररीमधील नाटकांची पुस्तके बायकोच्या वा मेहुणीच्या नावाने आणणारी मंडळी आता बिनदिक्कत स्वतःच्या नावावर ही पुस्तके आणीत आहेत ! रंगभूमीवरची आजची सारी नाटके मूळ लेखकाच्या नावाचा उल्लेख न करता मराठी नाटककार स्वतःच्या नावाने बेधडक पुढे आणीत आहेत. माधवरावांनी अशी प्रतिज्ञा केली नसती तर असे करण्याची त्यांची काय हिंमत होती ?

माधवरावांनी आपल्या लेखणीने ज्यांच्या ज्यांच्यावर प्रखर वार केले, त्यांच्या जखमेवर हळूवार फुंकर घालून साऱ्यांशी दिलजमाई करण्याचे कार्य छुपेपणाने गेली पाच वर्षे चालू ठेवले आहे. १९८० च्या मे महिन्यामध्ये पश्चात्तापदग्ध वृत्तीने माधवरावांनी प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांना पत्र लिहून ' झाले गेले विसरून जाण्यापोटी ( पक्षी विसरून गेलेल्या, भुकेल्या नव्हे ) दोघे मिळून माझ्याकडे जेवू या व आयुष्यभर निर्माण झालेल्या कटुतेवर पडदा टाकू या ' असे खिलाडूपणाने आवाहन केले. तेंडुलकरांवर माधवरावांनी इतके जहरी वार केले होते की, त्या जखमा बुजल्या तरी वण कायम राहिल्याने तेंडूलकर पाच वर्षे त्यांच्याकडे जेवायला जावे की नाही, या दोलायमान विचारात होते.

माधवराव मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने, नातवाच्या बारशाच्या निमित्ताने, इतकेच नव्हे तर स्वतःच्या पंचाहत्तरी पुरी झाल्याच्या निमित्ताने तेंडुलकरांना जेवायला बोलवीतच राहिले, परंतु माधव मनोहर जेवायला बोलावणार याची कुणकुण लागल्या-

मुळे तेंडुलकर दरखेपेस त्या त्या दिवशी मुंबईबाहेर राहण्याची दक्षता घेत राहिले आणि परत येऊन माधवरावांना दिलगिरीची पत्रे पाठवीत राहिले.

माधवरावांनी पंचाहत्तरी पुरी झाल्याच्या निमित्तानं मुंबईत आपल्या इष्टमित्रांना एक मोठे जेवण दिले. त्याला आम्हालाही आमंत्रण मिळेल या आशेत आम्ही होतो. निमंत्रणच न आल्याने आम्हाला फार वाईट वाटले. परंतु हे जेवणाचे आमंत्रण आपण ज्यांच्यावर वार केले त्यांच्याचसाठी, त्यांच्याशी दिलजमाई व्हावी म्हणून, असल्याचे लक्षात येऊन आमचा जीव भांड्यात पडला. परंतु या जेवणाच्या कार्यक्रमास ७५ जणांना बोलावून फक्त ७३ च आले. विजयपंत व मोहनराव ( वाघ ) तेवढे आले नाहीत माधवरावांच्या हळव्या मनाला त्यामुळे फार वाईट वाटले. त्यांनी विजयपंतांना अजिजीने पत्र लिहिले की, 'तुम्ही तर माझ्या घरी यायचे नाही असे पक्के ठरविलेले दिसते. त्यामुळे मी अतिशय अस्वस्थ आहे. आता निदानपक्षी तुम्ही मला आपल्याकडे जेवायला बोलवा. तुमची सारी भांडणं विसरून मी आनंदाने येईन. एकदा तुमच्याशी दिलजमाईचे हस्तांदोलन केले की, शंभराव्या वर्षी मी मरायला मोकळा झालो!' तेंडुलकरांना पत्र पाहून आपण जिंकल्याचा आनंद झाला असावा. कारण माधवराव यापुढे तरी खाल्ल्या मिठाला जागतील आणि त्यामुळे यापुढची आपली सारी नाटके आणि दूरदर्शनवरील चित्रमालिका सुरक्षित राहतील असे त्याना निश्चितपणे वाटले असले पाहिजे.

तेंडुलकरांकडे माधवराव जेवले. सामिष का निरामिष, वैदिक का पौराणिक हे दोघांनीही जगाला कळू न देण्याची दक्षता घेतली. परंतु जेवणाच्या निमित्ताने हाताला काही वास दरवळत होता, तो कमी होण्याच्या आधीच माधवरावांनी दूरदर्शनवरच्या मुलाखतीत तेंडुलकरांचे 'श्रीमंत' नाटक हे लुईजी पिरँदेल्लो ह्या फेंच नाटककाराच्या नाटकावर केवळ डल्लाच नव्हे तर चक्क त्या नाटकाचे मर्डर होते, असा आरोप केला. माधवरावाच्या लिहिण्या-बोलण्यात जोरदारपणा येण्यासाठी इंग्रजी शब्दाची बेसुमार पेरणी असते. इंग्रजी शब्द चालतात तर नाटके चालविल्याने ते चौर्य का ठरावे! इंग्रजी नाटकातील 'सेक्स' आणि 'व्हायोलन्स' वापरल्याने मराठी नाटकात जोरदारपणा नाही का आला? नाही तर मराठी नाटक वयात आले असते काय? विजयपंतांनी मराठी नाटक वयात आणले नाही का? मग त्यांना सदैव धारेवर धरून त्यांच्या मनाचा कोपरा कटुतेने त्यांनी का भरून टाकावा?

माधवरावांकडे पाहिल्यानंतर ते चवीने व भक्कम जेवत असले पाहिजेत आणि ते तेंडुलकरांकडे तसेच चवीने भरपेट जेवले असतील यात काही शंका नाही. मात्र विजयपंत स्वतःच्या घरी जेवत असूनही समोर माधवराव असल्याने ते पोटभर जेवले असतील असे काही म्हणवत नाही.

आता माधवरावांचे सारेच काही भक्कम व भरपेट असावयाचे. त्यांचे साधे वर्तमान-

पत्री परीक्षण असले तरी ते अनेक स्तंभी, बहुपृष्ठी असावयाचे. कादंबरी लिहिली तरी ती सहज हजार–बाराशे पृष्ठांची असावयाची. नाटकही सहजगत्या ते दोन–अडीचशे पृष्ठांचे बसल्या बैठकीला लिहितील, पण ते कोणी करणार नाही, या भीतीने केवळ भाषांतरे करण्यावर त्यांनी समाधान मानले! घरदार, संसार, पत्नी, मुले–नातवंडे आणि मित्रपरिवार या साऱ्या बाबतीत माधवराव मनाने संतृप्त आहेत, परंतु ते लिहायला लागले की, वाङ्मयचौर्य उघडकीस आणण्याच्या अनावर मोहाने ते किती-जणांना संतप्त करतील याचा नेम नाही. मराठी माणसाला ज्याप्रमाणे कोटी करण्याच्या मोहापायी मुंबईत पांढरपेशा नोकऱ्यांतच आयुष्य कंठावे लागते त्याप्रमाणे माधवरावांना चौर्यकर्म उघडकीस आणण्याच्या मोहापायी भल्याभल्या मित्रांना मुकावे लागले. नाही-तर नाट्यपरिषदेच्या अध्यक्षपदी त्यांची केव्हाच निवड झाली असती!

माधवरावांच्या आत्मतृतीच्या आनंदात भर पालण्यासाठी त्यांना व्हावयाचे होते असा नाटककार त्यांना त्यांच्या जावयाच्या रूपाने मिळाला. मराठीतला तो सर्वश्रेष्ठ नाटककार असल्याचा माधवरावांचा सार्थ विश्वास आहे. अशा नाटककारांवर वाङ्मय-चौर्याचा आरोप करण्याची माधवराव सासरे असताना कोणाची हिम्मत तरी होईल काय? अर्थातच वाङ्मयचौर्य नाहीच तर आरोप कसला? जर काही साम्य असेल तर ते योगायोगाचे. दोन मोठ्या प्रतिभावंतांमध्ये नाही तर साम्य असतेच ना? गडकरी शताब्दीच्या वेळी, ज्ञानेश्वरांनंतर त्यांच्या प्रतिभेचे फक्त गडकरीच होत, असे कोणीतरी ज्येष्ठ समीक्षक म्हणाले. माधवरावांनी त्यावेळी अर्थपूर्ण मौन पाळले!

माधवरावांचे लेखन, पिंग्यांच्या क्लासमधले महिला विद्यापीठाच्या विद्यार्थिनींसाठी तासन् तास शिकविणे, त्यांची नाटकांसाठी होणारी जागरणे, त्यांचा अखंड सगळी-कडचा संचार इ. गोष्टी पाहिल्यानंतर इतक्या गोष्टी करून या माणसाची प्रकृती अशी मजबूत कशी याचा अनेकांना संभ्रम पडतो. त्यांचे देखण्या अक्षरांतले एखादे साधे पत्रदेखील आळस न करता मोकळेपणाने लिहिलेले. त्यांची सारी पत्रे जमविली आणि ती छापायाची ठरविली तर महाराष्ट्रातल्या कोणत्याही प्रकाशकाची गंगाजळी संपुष्टात येईल. मग त्यांचे सारे लेख पुस्तकरूपाने छापण्याचे धाडस कोण करील? निदान त्यांच्या लेखांची–लेखनाची विस्तृत सूची तयार व्हावी म्हणून आमच्या एका स्नेह्याने एका विद्यार्थिनीला पीएच. डी साठी 'माधव मनोहर' हा विषय दिला आहे. त्यामुळे स्वतःच्या हयातीत आपल्यावर कोणीतरी प्रबंध लिहावा म्हणून धडपडणारे परंतु जिवंत व्यक्तीवर पीएच. डी. करण्यास परवानगी देऊ नये असे मानभावीपणे सांगणारे अनेक महाभाग आणखी अस्वस्थ होतील यात शंका नाही.

आता माधव मनोहरांनी मराठी सोडून इंग्रजीत लेखन करण्याकडे मोहरा वळविला आहे. मार्गने प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र या इंग्रजी ग्रंथातील त्यांच्या नाटकविषयक लेखना-तील इंग्रजीचे वाभाडे काढण्याचे उद्योग सुरू झाले आहेत. तर्खडकरांच्या भाषांतराच्या

तालमीत तयार झालेले माधवराव त्यामुळे नामोहरम होतील असे कोणी समजू नये. आजकालच्या व्याकरणदृष्टया सैल इंग्रजीची माधवरावांकडून अपेक्षा कोणी आणि कशासाठी करावी ?

माधवरावांच्या अमृत महोत्सवी समारंभानिमित्त झालेल्या सत्कारात त्यांना जो लालभडक, गलेलठ्ठ आणि देखणा हार घालण्यात आला तो त्यांच्या समग्र व्यक्तिमत्त्वास साजेसा होता. त्यांच्या या समारंभास एक केंद्रीय मंत्री आवर्जून आले होते. आता साहित्यिकांच्या मेळाव्यात मंत्र्याचे काम काय असे माधवराव कधीमधी जर लिहून गेले असतील तर, ते वयोमानाप्रमाणे आपण सर्वांनी विसरून गेले पाहिजे.

भोजन म्हणजे माणसांना एकत्र आणून त्यांची मने सांधण्याचे महत्त्वाचे साधन. परंतु अलीकडे सारीच भोजने वादग्रस्त ठरताहेत. अकलूजकरांनी लक्षभोजन घातल्याने वादळ उठले. महापौरांकडे मुख्यमंत्री जेवायला जाऊन शिवसेनेनेला डिवचून आले. निलंगेकरांकडे जेवायला गेले म्हणून काही मंत्र्यांची शेवटच्या क्षणी मंत्रिपदे गेली. माधवरावांनी विजयपंतांकडे जेवायला जाऊन असेच एक प्रचंड वादळ उठविले. त्यामुळे आता कोणाकडे जेवायला जाण्याची अनेकांनी धास्ती घेतली आहे. उगीच वाद नकोत म्हणून आम्हीही हल्ली कुणाला जेवायला बोलावीत नाही.

मात्र या भोजनामुळे माधवरावांचे नाव सारखे गाजतच राहिले आहे. माधवरावांनी वयोमानाप्रमाणे दुसऱ्यांस संधी देण्याचे धोरण स्वीकारायला नको का ? म्हातारपणीही इतके गाजण्याचे म्हणजे काय ? ते बरे नव्हे !

८९

# २५

# उंदीर धावपळीचे बळी !

गाडीत खूप गर्दी होती. हातांतील वर्तमानपत्रे दुमडून अडचणीने वाचली जात होती. वाचणाऱ्यांचे लवकर वाचून केव्हा होते आणि आपण केव्हा ते मागून घेतो असे शेजारी बसलेल्यांना वाटत होते वाचणाऱ्यांची मालकी असली तरी त्यांनी ते लवकर वाचले पाहिजे आणि ते मागून घेऊन वाचणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशी प्रत्येकाचीच भावना होती. त्यामुळे विकत घेऊनही लवकर वर्तमानपत्र हातावेगळे न करणे हा सामाजिक गुन्हा आहे, याबद्दल कुणाच्या मनात कसली शंका नव्हती. हातांत वर्तमानपत्र घेऊन सावकाशीने वाचणाऱ्यांविरुद्ध मनात कडक संताप दाटत होता. आणि त्यामुळे इतरांचा सूक्ष्म प्रमाणात का होईना रक्तदाब वाढत होता.

इतक्यात, ' इंजिनियरिंगच्या परीक्षेत दहाही विषयांना एटीकेटी ' असे कोणीतरी जोराने म्हटले, त्याबरोबर सगळ्यांच्या नजरा त्यांच्याकडे वळल्या.

पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील कित्येक अभियांत्रिकी महाविद्यालयांचा निकाल शून्य होता. अशा विद्यार्थ्यांचे काय करायचे ?

अर्थातच आम्हाला-तुम्हाला पडणारा हा प्रश्न विद्यापीठातल्या खेळियांना कधीच पडत नसतो. बहुमताच्या जोरावर विद्यापीठात हवे ते घडवून आणण्याची त्यांची ताकद असाधारण असते.

पहिल्याच वर्षी सारेच विद्यार्थी नापास झाले तर महाविद्यालय चालणार कसे ? पुन्हा पहिल्या वर्षी नवे विद्यार्थी आले पाहिजेत. कारण त्याच्या प्रवेशासाठी आठ ते पन्नास हजारापर्यंत जबर शुल्क-आकारणी केल्यानेच कॉलेज चालू शकते. नापास झालेल्यांना पुन्हा त्याच वर्गात बसविल्याने हे नापास विद्यार्थी काही पुन्हा अशी जबर फी देणार नाहीत. अगोदर अशी जबर फी देणारी विद्यार्थीमंडळी म्हणजे आवळ्याभोपळ्यांची

मोट असते. १२ वीच्या परीक्षेत उच्च प्रकारचे गुण न मिळाल्याने त्यांनी विज्ञान विभागाकडे जाऊन ' बीएस्सी ' करणे योग्य झाले असते. परंतु त्यांच्या आईवडिलांना आपला मुलगा किंवा मुलगी ' इंजिनियर किंवा डॉक्टर ' होणे फार महत्त्वाचे वाटते. मुलांच्या जन्मापूर्वीपासूनच पतिपत्नींनी एकमेकांचे हात हातात घेऊन शय्यागृहामध्ये तशी स्वप्ने पाहिलेली असतात. त्यामुळे भरपूर पैसे घेऊन प्रवेश देण्यासाठी राजकारण्यानी काढलेली वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये म्हणजे अशा स्वप्नाळू पालकांना एक मोठी पर्वणी असते. त्यांच्यापुढे, कुत्र्यांच्या छत्र्यांसारख्या निघालेल्या वसंतदादाप्रणीत महाविद्यालयांचे आमिष असते. पुढाऱ्यांकडे तर काळा पैसा या त्या मार्गाने भरपूर असतोच, त्यांना तो आपल्या पोटच्या गोळ्यांच्या शिक्षणासाठी लावणे हे आपण एक पवित्र कार्य करतो आहोत असे वाटते. त्यामुळे ते चुटकीसरशी आपल्या मुलांना प्रवेश मिळवून मोकळे होतात. असा प्रवेश एकदा मिळाला की आपला पाल्य पदवीधर झालाच आणि मग त्याला शासकीय नोकऱ्या मिळविणे म्हणजे अशा लोकांच्या हातचा मळ असतो.

उच्च मध्यमवर्गीयाच्या हातांतही हल्ली बऱ्यापैकी पैसा खेळत असतो. त्यामुळे त्यांनाही आपल्या मुलांना कुठेही प्रवेश घेता येतो. साधारण मध्यमवर्गीयांना मात्र या साऱ्या प्रकारांचा चांगला चटका बसतो. ते मग कर्ज काढून, पोटाला थोडा बऱ्यापैकी चिमटा काढून, परंतु स्वप्नाळूपणानेच या भलत्या उंदीर धावपळीत ( रॅट रेस ) सामील होतात आणि नियतीने लावलेल्या सापळ्यांत सापडून हयातभर चडफडत राहतात.

या सगळयाचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे गुणवत्तेचे चांगले भजे किंवा भरीत होण्यात होतो.

दहाही विषयांत नापास झालेल्यांना पुढच्या वर्गात बसू दिले जाणे याचा अर्थ मूळ पाया कच्चा ठेवून कोणत्याही इमारतीची त्यावर उभारणी करणे. यंदा दहा विषयांत नापास झालेले यच्चयावत विद्यार्थी पुढच्या वर्षात २० विषयांत निश्चितच नापास होतील. मग पुढच्या वर्षी त्या सर्वांना पुढच्या वर्गात ढकलावे असा ठराव करून घेण्यात येईल मग त्याच्या पुढच्या वर्षी तीस विषयांत विद्यार्थी नापास होतील. मग एकच मार्ग उरतो.

तीन वर्षे एखादा विद्यार्थी कॉलेजला गेला असेल तर तो इंजिनियरिंगची परीक्षा उत्तीर्ण झाला असे समजावे, असा ठराव करणे.

विद्यापीठातील मडळी तसाही ठराव करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.

एकविसाव्या शतकाची उभारणी करणारे हे देशाचे आधारस्तभ विद्यापीठांतून या प्रकारे तयार होत आहेत.

साऱ्या जगात विज्ञानाचे, तंत्रज्ञानाचे काहीही होवो, भारतीय विद्यापीठांतून मात्र प्रगतीची जी घोडदौड चालली आहे, त्याला जगात कुठे तोड सापडणार नाही अशा

घोडदौडीचे महत्त्वाचे प्रवर्तक म्हणून विद्यापीठ अनुदान मंडळाने पुणे विद्यापीठाचा जाहीर रीतीने गौरव करावयास काही हरकत नाही.

विद्यापीठ अनुदानमंडळ तेही करील.

या भारतात काय होईल आणि काय होणार नाही, हे कुणालाच सांगता येणार नाही. जय भारत, जय पुणे विद्यापीठ आणि जय वसंतदादा पाटील.

वसंतदादा पाटलांनी चार वर्षांपूर्वी कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यात अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालये काढून महाराष्ट्राच्या शिक्षणाच्या क्षेत्रात जी अभूतपूर्व क्रांती करून टाकली, त्याची फळे आता महाराष्ट्राच्या गल्लीबोळांतून दिसून येत आहेत.

कर्नाटकाने मराठी पालकांच्या आशाआकांक्षा लक्षात घेऊन या क्षेत्रात स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर प्रचंड प्रमाणात धंदा केला. महाराष्ट्र शासन खूप उशिरा जागे झाले. परंतु मराठी माणसाला कधी धंदा करता आला नाही. ते त्याच्या रक्तातच नाही. परिणामी करू नये ते चांगल्या तयारीनिशी करायला गेल्यानंतर, त्याचे परिणाम काय होतात ते दिसून आले.

वर्तमानपत्रातल्या बातमीने माझ्या मनात विचारांचे असे मोहोळ उठले आणि त्यामध्ये काही काळ हरवून बसलो होतो. परंतु त्याचवेळी शेजारच्या सहप्रवाशांमध्ये चर्चेचे एक मोहोळ उठले होते.

"त्याचे काय झाले" त्यातल्या एका व्यक्तीने चर्चेचे नेतृत्व स्वतःकडे घेतले आणि जणू काही आतल्या गोटाची माहिती असल्याप्रमाणे सांगावयास सुरुवात केली.

"पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आहेत ना?"

"कोणते? हा हा, वि. ग. भिडे यांच्याबद्दल म्हणताय ना?"

"होय. तेच ते! मोठा विद्वान माणूस. विज्ञानाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त झालेली व्यक्ती. दिल्लीतून ते पुण्यास कुलगुरू म्हणून आले तेव्हा खूप वर्षांनी पुणे विद्यापीठाला एक विद्वान माणूस भेटल्याचे समाधान लाभले."

"का बुवा, यापूर्वीचे कुलगुरू विद्वान नव्हते का?"

"हूं." त्या व्यक्तीने तुच्छतादर्शक उद्‌गार काढून मान झटकली.

"पगारी कुलगुरू नेमण्याची पद्धत सुरू झाली आणि गेल्या पंधराएक वर्षांत काय एकेक कुलगुरू आले म्हणून सांगू..."

"बरे, त्या भिड्यांचे काय झाले?" मध्येच कोणीतरी प्रश्न केला.

"भिडे आले आणि कामावर रुजू झाले. काही झाले तरी शिक्षणक्षेत्राची प्रतिष्ठा ओळखणारा तो मनुष्य. पुणे विद्यापीठातल्या खेळियांनी त्यांना आपले एकेक रूप दाखवायला सुरुवात केली. तेव्हा ते एकदम अस्वस्थ झाले आणि त्यांनी एकदम राजीनामा देण्याची तयारी दाखविली."

" मग ? "

" मग काय ? काही शहाण्या लोकांनी त्यांची समजूत घातली. आणि त्यांनी राजीनामा खिशात परत ठेवून दिला. "

" पण राजीनामा देण्यासाठी घडले होते तरी काय ? "

" ही अशीच एटीकेटीची प्रकरणे. "

" हे एटीकेटी म्हणजे काय हो ? " कोणाचा तरी मध्येच भाबडा प्रश्न.

" अलाउड टू किप टर्मस म्हणजे काही विषयांत नापास झाला असता पुढच्या वर्गात ढकलण्यास परवानगी. "

" मग भिड्यांनी त्याला हरकत का घ्यावी ? "

" अहो, किती विषयांत नापास असले तरी परवानगी द्यावी ? "

" किती ? "

" जास्तीत जास्त दोन. फार तर तीन. "

" मग तेवढ्या विषयांना परवानगी द्यायला भिड्यांचे काय गेले ? "

" अहो, धुळ्याच्या इंजिनियरिंग कॉलेजचा निकाल पहिल्या वर्षीच असा तसाच लागला. तिथल्या राजकारणी मंडळींनी चार विषयांत एकीकेटी मिळालीच पाहिजे असा आग्रह धरला. ते मुंबईस वसंतदादांकडे जाऊन बसले. तुम्ही आमच्या मुलांना मुकाट्याने पुढे ढकला, नाहीतर विधान परिषदांच्या निवडणुकीत आम्ही तुम्हाला मते देणार नाही, असे त्यांनी साकडे घातले. "

" त्याचा परिणाम म्हणून त्यांनी भिड्यांना चार विषयांत नापासांना पुढे ढकला असा आदेश दिला. होय ना ? "

" होय ना ? "

मला राहावले नाही. मी मध्येच म्हटले.

" तसे नसेल हो. वसंतदादा बिचारे या प्रकरणात कशाला लक्ष घालतील ?"

" अहो शहाणे, मी प्रतिज्ञेवर सांगतो ना काय घडले ते. " त्याने मला अशा शब्दांत दबकावले की सारे लोक माझ्याकडे भलत्याच नजरेने पाहायला लागले. राजकारण्यांची बाजू घेणारा त्यांच्यातलाच कोणी हा चमचा असला पाहिजे अशी त्यांची भावना झाली.

मी गप्प बसलो.

" धुळ्याच्या कॉलेजची हकीकत माहिती आहे तुम्हाला ? " पुन्हा त्या व्यक्तीने मलाच प्रश्न केला.

" अहो, धुळ्याला इलेक्ट्रॉनिक्स हा विषय काहीही तयारी नसताना सुरू केला. दहा हजार भरणाऱ्यांना मुक्त प्रवेश. माझ्या एका नातेवाईकाच्या मुलाला पन्नास टक्के मार्क पडले. त्याला फर्ग्युसनमध्ये एफवायबीएस्सीला प्रवेश मिळायला मारामार त्याला धुळ्याला प्रवेश मिळाला. कोणत्या विषयाला माहिती आहे ? इलेक्ट्रॉनिक्स. अहो,

पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्सला प्रवेश मिळण्यासाठी एकशे पाच टक्क्यांच्या पुढे मार्क पडावे लागतात.

"१०५ टक्के ?"

"हो हो, १०५ टक्क्यांच्याही पुढे !"

"कसे पडतील हो."

"पहिल्या दहांत येणाऱ्या मुलांना ९८ ते ९९ टक्के मार्क पडतात. कबूल ?"

"होय !"

"त्यामध्ये नॅशनल्समधून खेळला म्हणून ४ टक्के वाढ. वक्तृत्वस्पर्धेत किंवा सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला म्हणून एक टक्का. त्याखेरीज शेतातून सरकारने कालवा काढला म्हणून एक टक्का. ओबीसी असल्यास आणखी काही टक्के..."

"बाई बाई बाई, हद्द झाली बाई ! एवढ्या सगळ्या सवलती मिळण्यासाठी खरोखर या मुलांनी कर्तृत्व गाजविले असते काय हो ?"

"अहो, सगळा कागदांचा खेळ. हा खेळ खेळण्यात अलीकडचे पालक अगदी तयार झाले आहेत."

"होय बाई, खरेच आहे. आमच्या शेजारच्या एका मुलाला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी एक गुण कमी होता. संततिनियमनाचे ऑपरेशन करून घेतले तर एक गुण मिळतो म्हणून !"

"मग त्या मुलाच्या आईने असे ऑपरेशन करून घेतले काय ?"

"इश्श, पंचेचाळीस वर्षांची बाई ती. तिने सरळ ऑपरेशन केल्याचे सर्टिफिकेट मिळविले आणि काम झाले !"

डब्यातील सगळी मंडळी आत्मखुशीत येऊन हसत होती !

विषयाला फाटे फुटलेले पाहून मला दबकावणारे गृहस्थ चुळबुळत होते.

"अहो, मी म्हणते, यात चुकले काय ?" आता शेजारच्या दुसऱ्या एका बाईला कंठ फुटला. "सारे जगच अशा गोष्टी करते तर आपण तरी मागे कशाला राहा ?"

"होय बाई, सरकारी कॉलेजातून प्रवेश मिळाला नाही तर पालकांनी करायचे काय ? आता पुण्यात आणखी दोन इंजिनियरिंग कॉलेजे निघाली आहेत. त्यांच्यामध्ये सरकारी कॉलेजातील बरेच प्राध्यापक शिकवितात. सरकारी कॉलेजपेक्षा इथे चांगले शिकवितात म्हणे हो."

या बाईचा मुलगा पुण्याच्या खासगी इंजिनियरिंग कॉलेजात शिकत असला पाहिजे. नाहीतर एवढ्या आत्मविश्वासाने आणि आपलेपणाने ती बोलली नसती !

तिला विचारल्यावर तिने ते कबूल केले. तिचाही मुलगा यंदा चार विषयांत गचकला होता.

"भिड्यांनी चारच विषयांत एटीकेटी द्यावी असे आम्हांला वाटत होते. त्यांनी दहा

विषयांत एटीकेटी द्यावी हे मात्र त्यांचे चुकलेच हो. अशाने शिक्षणाचे वाटोळे होणार नाही तर काय होणार ?'

आता त्या बाईच्या अंतःकरणातील मातेबरोबरच न्यायबुद्धीही जागी झाली होती.

" बाई, तुमच्या मुलाला चार विषयांत अपेक्षित गुण मिळाले नाहीत, तर त्याला पुढे कशासाठी ढकलायचे ? नियम दोनच विषयांचा आहे ना ? "

" नियम एकाही विषयासाठी नाही. करणाऱ्यांनी दोन विषयांपुरते करण्याची परंपरा ठेवली आहे इतकेच. "

त्या बाईला आपला अपमान झाल्यासारखे वाटले. तिने आपलेच म्हणणे बरोबर कसे हे तावातावाने सांगायला सुरुवात केली.

त्यातून चारी बाजूंनी तापलेले आवाज निघू लागले.

" अहो, मी भिड्यांच्या बद्दल काही महत्त्वाची बातमी सांगत होतो. ती ऐकणार आहात का ? "

आता सारे शांत बसले.

" हं, मी काय सांगत होतो. भिड्यांनी चार विषयांत एटीकेटी द्यावी म्हणून पुण्याच्या विद्यार्थी संघटनांनी मोर्चे काढले. आता भिडे काय करतात इकडे साऱ्यांचे लक्ष लागले. ते पुन्हा राजीनामा देतील असे वाटले. भिड्यांना शिष्टमंडळाबरोबर चीनला जायचे होते. त्यांनी त्यापूर्वी निर्णय घ्यावा असा आग्रह सुरू होता. त्यांनी जाण्यापूर्वी चार विषयांना एटीकेटी देण्यात येत आहे या मसुद्यातील 'चार' या आकड्यावर काट मारली आणि तेथे 'दहा' लिहून ते हसतमुखाने विमानतळावर जाण्यासाठी गाडीत बसले. "

" वा, वा, आपण भिड्यांना मानले बुवा. तीन वर्षांत पुण्यास राहून भिडे इतके तयार होतील असे वाटले नाही. अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक कथेप्रमाणे हे झाले ! "

" म्हणजे कसे ? "

" एका सावकाराच्या मुलाला एका सज्जन व गरीब मास्तराची शिकवणी लावण्यात येते. मुलगा तयार असतो. धूम्रपान, तंबाखू, तमाशा, इतकेच नव्हे तर त्याने एक बाईही ठेवलेली असते. गरीब मास्तर त्याच्याबरोबर वावरताना कावरेबावरे होतात. मुलगा त्यांना सगळीकडे हिंडवतो. मास्तर संकोचाने दूरदूर राहतात. पुढे तो मुलगा सहा महिने बाहेरगावी राहतो तर मास्तर सगळ्या विद्येत तरबेज झालेले असतात. त्याने ठेवलेली बाई आता मास्तरांकडे असते. "

" हां, या कल्पनेवर मिरासदारांची गोष्ट वाचल्याची आठवते. 'गुरुदक्षिणा' म्हणून त्यावर चित्रपटही निघाला होता. "

एवढ्यात शिवाजीनगर स्टेशन येते. सगळे उतरण्याची घाई करू लागतात.

# २६

## त्यांच्यापुढे आम्ही किस झाडकी पत्ती !

'तुमच्या पुण्याला मराठीतील सर्व प्रकारच्या ग्रंथांचा संग्रह करणारे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारखे एखादे अद्ययावत संग्रहालय का असू नये ?' कोणी तरी मला नेहमी विचारतं.

"त्याचं काय आहे, आणि असं पाहा की..." या प्रकारे घोळवत घोळवत मी पुण्याला अशा प्रकारच्या ग्रंथालयाची गरज नाही, हे पटवून देण्याचा प्रयत्न करतो.

"आपापल्या विषयात गाडून घेणारी मंडळी पुण्याला का थोडी थोडकी आहेत ? त्यांचा एकेकाचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह मोठमोठ्या ग्रंथालयाला लाजविण्यासारखा असतो हे तुम्हाला माहीत आहे काय ? मराठीतील सर्व प्रकारची पुस्तके तर लांब राहू द्यात, आपल्याकडे आलेले प्रत्येक वर्तमानपत्र, प्रत्येक लग्नपत्रिका, निमंत्रणपत्रिका आणि आलेले पत्र आणि हस्तपत्रिका ( हँडबिले ) जिवापाड जपून ठेवणारी दत्तो वामन पोतदारासारखी व्यक्ती जगात कुठे पाहिली आहे काय ? विश्रामबागवाड्यासमोर लोकहितवादींचे नातू देशमुख राहत, त्यांचा ग्रथसंग्रह कधी तुम्ही पाहिला आहे ? दाते, कर्वे, आबासाहेब मुजुमदार, शं. ना. जोशी, श्री. ना. बनहट्टी, हर्षे, ग. ह. खरे, डॉ. वाळिंबे, प्र. न. जोशी, रा. चिं. ढेरे, खिस्ती वाङ्मयाचे संग्राहक भास्करराव जाधव..."

"बास्स, बास्स, पटले तुमचे म्हणणे !" समोरची व्यक्ती या माऱ्यामुळे शरण येते.

"शिवाय असे पहा" आता मला चेव आलेला असतो. मी पुढे चालू ठेवतो : "पुण्याला एकेका विषयाला वाहिलेली स्वतंत्र ग्रंथालये कितीतरी आहेत. इतिहासाच्या पुस्तकासाठी भाइसं मंडळामध्ये जावे, संस्कृत हवे असेल तर भांडारकर आहेच, अर्थशास्त्र-राज्यशास्त्रासाठी गोखल्यांच्या संस्थेमध्ये जावे, ज्योतिषशास्त्र, युद्धशास्त्र,

वैद्यकशास्त्र, आयुर्वेदशास्त्र, नाट्यशास्त्र, संगीतशास्त्र, चित्रपटविद्या, शिक्षणशास्त्र इत्यादी विषयांना वाहिलेली समृद्ध ग्रंथालये तर पुण्यात अनेक आहेत. शिवाय किताबमिनार वाचनालयासारख्या ठिकाणी इतरत्र न मिळालेले दुर्मिळ ललित पुस्तक हटकून मिळते असा अनुभव आहे. पुण्यात विद्वत्तेप्रमाणेच ग्रंथालयाचीही विभागणी केली आहे. एकोऽहं बहुस्यात् हा पुण्याचा मंत्र आहे."

माझ्या या युक्तिवादामध्ये बरेच तथ्य असते आणि काहीशी आत्मवंचनाही असते. पुण्यास मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारखे मध्यवर्ती ग्रंथालय असू नये, हे त्यास भूषणावह नाही, याची मनामध्ये एक खंत असते. आणि मुंबईला वैयक्तिक समृद्ध ग्रंथसंग्रह असणाऱ्या व्यक्ती का थोड्या आहेत? अ. का. प्रियोळकर, रावसाहेब सावंत, न. र. फाटक, स. गं. मालशे, इतिहासकार बेंद्रे, संशोधक रा. म. आठवले, गं. दे. खानोलकर, चरित्रकार धनंजय कीर...

अर्थातच पुण्या-मुंबईच्या नामवंत ग्रंथसंग्रहकांची जी नावे सहजगत्या जिभेवर येतात त्यातील नामांकित व्यक्ती आज हयात नाहीत. पोतदार, दाते, कर्वे, मुजुमदार, खरे, बनहट्टी, हर्षे, प्रियोळकर, फाटक, देशमुख...

याबाबतचा आणखी एक श्लेष काढता येण्याजोगा आहे तो म्हणजे आर्थिक प्राप्तीच्या दृष्टीने मुंबईला पुण्यापेक्षा अनुकूलता अधिक आहे. आणि तरीही स्वतःचा ग्रंथसंग्रह असणाऱ्या व्यक्तींची संख्या मुंबईपेक्षा पुण्यात अधिक आहे. विद्येच्या माहेरघराला ते साजेसे आहे.

अशा नामांकित ग्रंथसंग्रहकारांच्या प्रभावळीत अहंकाराने वा समाधानाने मिरवावे अशी माझ्याबाबतची काही परिस्थिती नाही. मलाही ग्रंथसंग्रहाचा नाद आहे, एक प्रकारचे वेड आहे. माझ्या अभ्यासविषयात त्यामुळे मला कित्येकदा इतरांच्या तुलनेने ग्रंथसंग्रहालयावर कमी अवलंबून राहावे लागते, हे खरे आहे. स्वतःला आवश्यक असलेल्या किंवा आज ना उद्या अभ्यासास उपयोगी पडू शकणाऱ्या ग्रंथांचा संग्रह करता आला नाही तर चैन पडत नाही, मनाला बरे वाटत नाही, हेही सारे खरे आहे. त्यासाठी आर्थिक अनुकूलता नसते आणि ग्रंथसंग्रहाच्या नादाने आपण आपल्या संसाराची सतत ओढाताण करीत राहतो, याची बोचणी मनाला कुठेतरी खात असते. मंडईला भाजी आणण्यासाठी जावे आणि रस्त्यावर पुस्तके दिसली की, कामाचे विस्मरण होऊन पुस्तके घेऊन घरी यावे आणि अपराधी मुद्रेने घरात प्रवेश करावा. बायकोला त्याची आगाऊ कल्पना असल्याने तिला त्यात काहीही वाटू नये, (ही शिक्षा तर फारच मोठी असते!) असे बऱ्याचवेळा घडते.

'आमच्या घरात अगोदर पुस्तके राहतात आणि राहिलेल्या जागेत आम्ही राहतो.' असा विनोद आमच्या बहुतेकांच्या बायका नेहमी करीत असतात, (पोतदार, खरे सोडून) तसा आमच्याही घरी होतोच. त्याला काही इलाज नसतो. नवऱ्याचा

पुस्तकाचा नाद ही गृहिणीची मोठी कसोटी असते. ही पुस्तके वारंवार घासूनपुसून ठेवली नाहीत, तर त्यांचा विनाश ठरलेलाच असतो. मला वाटते, लग्नापूर्वी पुस्तकांचा नाद आहे हे त्यांच्या गृहिणींना कळले असते तर कदाचित त्यांनी, या स्थळाकडून हुंडा मिळेल, असे सांगितले असते तरी या स्थळाला निश्चितपणे होकार दिला नसता ! ग्रंथसंग्रहाचा नाद असणारा नवरा भेटावा, हे या गृहिणींचे मोठं दुर्दैवच. पोतदार, खरे हे त्या दृष्टीने खरे शहाणे पुरुष होत. ग्रंथसंग्रहाचा हा भलता नाद स्वतःला लावून घेण्यापूर्वी 'तुम्हाला संसार पाहिजे का ग्रंथ पाहिजेत ?' या प्रश्नाचा नीट विचार त्यांनी केला. कोणत्या तरी एकाच पर्यायाची निवड केली पाहिजे, हे अनुभवावरून मला सांगायला दिक्कत वाटत नाही ! ग्रंथसंग्रहाच्या नादाची कल्पना नसल्याने अशा नादिष्ट लोकांना चुकून चांगली बायको मिळून जाते, परंतु 'असावे घरटे आपुले छान' या स्वप्नाची पूर्ती होणे अवघड होऊन बसते. स्वतःची प्रशस्त घरे बांधून त्यामध्ये स्वतःचा ग्रंथसंग्रह ठेवणारा अभ्यासक हा मला तर द्विभार्यापतीसारखा वाटतो. ग्रंथाची त्याची आवड ही दुसऱ्या दर्जाची किंबहुना नावडतीच्या जातीकुळीची असते. या व्यक्तींची गणना पट्टीच्या, जातिवंत ग्रंथसंग्रहाकांत करता यावयाची नाही ! त्यांच्या ग्रंथसंग्रहाला बेकनने म्हटल्याप्रमाणे गृहशोभेची कळा अधिक असते !

ग्रंथसंग्राहकांमध्येही चातुर्वर्ण्य असतात ! मध्ययुगीन काळातील मूळ हस्तलिखित प्रती ( नकला नव्हे ! ) शिलालेख, ताम्रपट अभ्यासासाठी मिळवून मूळ मालकांना काही केल्या परत न करणारे ते ब्राह्मण, एकोणिसाव्या शतकातील पुस्तके, विशेषतः ज्यांना दोलामुद्रिते असे म्हणतात अशांचा संग्रह करणारे आणि या काळातील नियतकालिके संग्रही बाळगणारे ते क्षत्रिय. विसाव्या शतकातील पहिल्या पन्नास वर्षांतील पुस्तके, नियतकालिके संग्रही असणारे ते वैश्य आणि अलीकडच्या पंचवीस-तीस वर्षांतील पुस्तके, नियतकालिके जवळ बाळगणारे ते शूद्र. दलित साहित्यासारखी त्यांची प्रतिष्ठा असली तरी असली संग्रहकाराच्या दृष्टीने ते पंक्तिबाह्यच

ग्रंथसंग्रहाचा नाद हा प्रेयसीच्या नादाने वेडावलेल्या प्रियकरापेक्षाही भयंकर असतो. तहानभूक विसरून प्रेमी जीवांच्या नादात गावोगावी हिंडणाऱ्या रंगेल इसमांप्रमाणे त्याची अवस्था होऊन जाते. अमक्या ठिकाणी अमके दुर्मिळ पुस्तक आहे, जुन्या वर्तमानपत्राच्या फाईली आहेत, हे त्याच्या कानावर पडले की, ती हस्तगत करीपर्यंत ताटातले अन्न गोड लागेनासे होते. स्वयंवरामध्ये आपली पाळी येण्यापूर्वीच दुसऱ्या कोणाच्या तरी गळ्यात राजकन्या वरमाला घालील या कल्पनेने धास्तावलेल्या राजांप्रमाणे, आपल्यापूर्वी कोणीतरी तेथे उपटून ही साधने बळकावतील या कल्पनेने त्याला रात्रभर झोप लागत नाही.

अशा ग्रंथसंग्रहकाराला नव्या पुस्तकांच्या दुकानांचे फारसे आकर्षण वाटत नाही. रस्त्यावर उभ्या असलेल्या वारांगनेप्रमाणे त्यांची प्राप्ती त्यांच्यावरच्या किंमतीइतकी

रक्कम फेकल्यास केव्हाही होऊ शकते, याची त्याला खात्री असते. जुने पुस्तक आणि तेही दुर्मिळ असलेले मिळणे म्हणजे घरंदाज घराण्यातील सुशील कन्येच्या प्राप्तीसारखे देवदुर्लभ असते. पुस्तक किंवा पोथी किंवा वृत्तपत्र जितके जुने तितके त्याचे मोल अधिक. आणि दुर्मिळ साधने एकच प्याल्यातील सिंधूप्रमाणे 'कशी या त्यजू पदाला'चे सूर आळवीत पातिव्रत्याच्या हट्टाने नाहीशी होतील, परंतु आपल्यावर जिवापाड प्रेम करू शकणाऱ्याच्या चुकूनही हाती लागणार नाहीत. संग्रहकार अशा सिंधूच्या शोधात असतो आणि असे एखादे पुस्तक हाती लागले की सखाराम बाइंडरला चंपा गवसावी, तसा त्याला ब्रह्मानंद होतो!

आपल्याला हवे ते दुर्मिळ पुस्तक मिळविण्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा अवलंब करावा लागतो. प्रेमात किंवा युद्धात सारे काही क्षम्य असते, ही उक्ती दुर्मिळ पुस्तके मिळविण्याबाबतीतच अधिक खरी असते. Buy, Borrow, Steal हे तर ही पुस्तके मिळविण्याचे राजमार्ग. कोणाकडून विकत घेताना आपणाला अमूक पुस्तक हवे याचा मागमूस लागू न देता, ते पुस्तक सोडून दुसऱ्या कुठल्यातरी पुस्तकासाठी घासाघीस करावयाची, शेवटी काहीतरी घेतलेच पाहिजे म्हणून आपणाला हवे ते पुस्तक, अगदी नाईलाजाने घ्यावे लागते, असे कडवट तोंड करीत थोडक्यात उपटावयाचे, असे करावे लागते. अलीकडे अशा विक्रेत्यांना त्याची कल्पना असल्याने तेही आता कठीण होऊन बसले आहे.

ग्रंथसंग्रहकाराला थेंबाथेंबाने जिवापाड गोळा केलेल्या आपल्या ग्रंथसंग्रहाचे आपल्या नंतर काय होणार याची निश्चित कल्पना असते. इतिहासाचार्य राजवाड्यांना ज्या प्रमाणे आपल्या घराण्याची ऐतिहासिक कागदपत्रे न देणारे विधवेजवळचे कागद लवकरच रद्दीच्या दुकानी मिळतील याची बालंबाल खात्री होती, त्याप्रमाणे कुठल्याही संग्रहकारांच्या ग्रंथाकडे पाहत असताना ते आज ना उद्या रस्त्यावर नक्की येतील, याची आपल्याला खात्री असते. किंबहुना प्रत्येक ग्रंथसंग्रहकाराला तो मोठाच दिलासा असतो. पुण्यातील अनेक नामांकित अभ्यासकांची मौलिक पुस्तके त्याखेरीज आमच्यासारख्यांकडे कशी आली असती? या अभिज्ञानामुळे बरेच संग्राहक स्थितप्रज्ञ बनलेले असतात. आपण हयात असेपर्यंत आपल्या जवळचा संग्रह जिवापाड जपायचा, नंतर त्याचे काय होणार याची त्यांना कल्पना असते. आपली मुले ही पुस्तके रद्दीच्या भावाने विकून तरी टाकतील, नाहीतर अभ्यासकांवर उपकार करण्याचा पुळका येऊन कुठल्यातरी ग्रंथसंग्रहालयाला किंवा विद्यापीठ संग्रहालयाला दान करतील. फारतर आपले कुटुंबीय या ग्रंथाच्या याद्या करून ते विकून चार पैसे गाठी मारतील इतकेच.

अगदी परवाची गोष्ट. मी एका रद्दीवाल्याकडची पुस्तके चाळीत होतो. इतक्यात एक तरुण जोडपे स्कूटरवरून आले. आपल्या जवळची पिशवी रद्दीवाल्याकडे दिली, रद्दीवाल्याने निर्विकार मनाने ती तागडीत घालून पाच-सहा रुपये त्या तरुणाच्या

हातावर टिकविले.

मला पाहून त्या तरुणाने नमस्कार केला,

" गुड मॉर्निंग सर, मला ओळखलेत का ? "

मी ओळखले नव्हते. तो माझ्या वर्गात १५–१६ वर्षांपूर्वी पी. डी. सायन्सला होता. त्यांच्या वडिलांचे नुकतेच निधन झाले होते. आज चौदावा दिवस होता. तेरावे संपल्यानंतर नव्या फ्लॅटमध्ये अडचणींची वाटणारी वडिलांची पुस्तके त्याने मिसेसच्या सांगण्यानुसार आणली होती. ' कोणाला तरी फुकट दिली असती, परंतु कुठे कुणाला विचारीत बसा म्हणून सरळ रद्दीत घातली. ' तो सांगत होता.

ते जोडपे निघून गेल्यानंतर मी ती पुस्तके चाळली. राजवाड्यांची ज्ञानेश्वरी, गीतारहस्य, ब्रह्मसूत्र शांकरभाष्य आणि उपनिषद्संग्रह अशांसारखी मौलिक पुस्तके त्यामध्ये होती. मी त्यांतली चारपाच निवडून घेतली तर रद्दीवाल्याने माझ्याकडून एकतीस रुपये घेतले !

आणखी एकदा असाच रद्दीवाल्याकडे उभा असता, एक इसम जुनी रद्दी घेऊन आला. रद्दीवाला ती घ्यावयास तयार नव्हता. कारण ती खूप जुनी असल्याने पिवळी पडून निरुपयोगी झाली होती.

" मोठ्या आवडीने ही वर्तमानपत्रे आतापर्यंत मी जपून ठेवली, आता काय करायची म्हणून रद्दीत घालतोय. " तो म्हणत होता. मी ती हातात घेऊन पाहिली तर पं. नेहरूंच्या निधनाच्या दिवशीच्या सर्व प्रकारच्या वर्तमानपत्राचा तो संग्रह होता. मी त्याला दोन रुपये देऊ केले.

" साहेब, तुम्हाला आवड दिसते, तशीच घ्या." म्हणून तो मला ती देऊन निघून गेला. मी ती आणून एका संग्रहालयाला भेटीदाखल दिली. वर्षानंतर चौकशी केली तेव्हा ती रद्दीत घातलेली आढळली !

दुर्मिळ ग्रंथसंग्रहाच्या, साधनसामग्रीच्या जमवाजमवीच्या अशा किती कडू–गोड आठवणी !

कित्येक दुर्मिळ साधने कशी योगायोगाने हाताशी आली ! कित्येकांना आपल्या घरातून आपल्या डोळ्यासमोर पाय फुटलेले पहावे लागले...

" पुस्तकं, वनिता वित्त–परहस्ते गतं गतः ' असे एक मौलिक सुभाषित आहे आणि ' तैलाद्रक्षेत, जलाद्रक्षेत, रक्षेत वा शिथिल बंधनत्,' म्हणजे आपल्या जवळची पुस्तके तेलापासून, पाण्यापासून आणि शिथिल बांधणीपासून रक्षावीत, असाही शहाणपणाचा संदेश एका जुन्या अनुभवी संग्रहकाराने देऊन ठेवला आहे. आज परिस्थती अशी आहे. वित्त वा वनिता दुसरीकडे गेलेली एखादे वेळेस परत येतील, परंतु दुर्मिळ पुस्तक गेले की गेलेच !

आपल्याजवळच्या पुस्तकाचे धनी असतात आपल्याकडे येणारे संशोधक, अभ्यासक

आणि आपल्याच वर्गात शिकणारे विद्यार्थी.

एखाद्या प्रथितयश संशोधकाने किंवा ज्येष्ठ प्राध्यापकाने तुमच्याकडून महत्त्वाचे पुस्तक नेले की, ते परत मागण्याचा आततायीपणा करावयाचा नसतो. असे करणे म्हणजे परंपरेची कदर न बाळगल्यासारखे असते. तुम्ही ते परत मागण्याचा चुकून प्रमाद केला तर ते परत तर मिळणार नसतेच, परतु कृतघ्नतेचे खापर तुमच्या माथ्यावर फोडले जाते. या पापाला क्षमा नसते ! माझ्याकडून नेलेली पुस्तके कुणाकुणाजवळ आहेत, याचे माझे स्मरण पक्के असते. एखाद्या मुलींच्या आईला आपल्या जावयांच्या नावाचे एखाद्या वेळेस विस्मरण होईल, परंतु पुस्तके नेणाऱ्यांचे मला कधीच विस्मरण होत नाही. तुमच्याकडच्या ललित साहित्यावर खरी सत्ता असते तुमच्या शेजाऱ्यांपाजाऱ्यांची आणि नातेवाईकांची. तुमच्याकडची कादंबरी, नाटक वा कथासंग्रहासारखे पुस्तक एकदा वाचायला गेले की, चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूप्रमाणे त्याची अवस्था असते. चुकून परत आले तर ते धड स्वरूपात हाती लागायचे नाही. तेलाने माखून, पावसाने भिजून, पहिली शेवटची पाने गळून, अर्धमेल्या अवस्थेतच ते हाती लागायचे. सुभद्रेप्रमाणे तुम्ही शोकच करायचा.

माझ्याजवळची पुस्तके हाताळताना, आई नुकत्याच जन्मलेल्या आपल्या अर्भकाला काय सांभाळील इतकी काळजी मी घेतो. त्यात चुकूनही कधी खुणा करींत नाही. माझ्या विद्यार्थ्यांनी माझी पुस्तके नेली, तर त्यात इतक्या खुणा, इतके त्यांचे संस्कार झालेले असतात की, ते उघडताना, धसमुसळ्या व्यक्तींच्या हाती दिलेल्या आपल्या मुलाचे हाल पाहून होणाऱ्या मातेसारखी माझी अवस्था होते. करणार काय !

लो. टिळकांच्या वडिलांनी लिहिलेले १८३६ चे व्याकरणाचे पुस्तक आज एका व्यक्तीने माझ्याकडून नेले आणि पुढच्या आठवड्यात हृदयविकाराने त्याला मृत्यू आल्याचे वाचून माझ्या हृदयाचा ठोका चुकल्याचा अनुभव मी घेतला आहे. ‘ आता तासाभरात दाखवून आणून देतो ’ म्हणून नेलेल्या नारायणरावाच्या वधाचा माझ्याजवळचा शिळामुद्रित फार्स परत येण्याची मी विठ्ठलाप्रमाणे विटेवर उभे राहून गेली अठ्ठावीस वर्षे वाट पाहतो आहे ! माझ्याकडे असलेले माझेच दुर्मिळ पुस्तक फुटपाथवरच्या विक्रेत्याकडून मी अनेकदा विकत घेतले आहे. एकदोन वाक्यांचा संदर्भ नोंदविण्यासाठी माझ्याकडून नेलेली दुर्मिळ पुस्तके पाच-सात वर्षांच्या पीएच. डी. च्या अभ्यासानंतर परत करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अनुभव नित्याचाच. एम. ए. च्या अभ्यासानंतर माझ्याच एका विद्यार्थिनीने नेलेल्या वीस पुस्तकांची मी अनेक वेळा आठवण केल्यानंतर परत केली, ती फक्त तीन पुस्तके. पुस्तकं तर राहूद्याच परंतु परीक्षा झाल्यानंतरचे पेढे द्यावयास गेल्या आठ वर्षांत तिला अद्याप सवड झाली नाही !

एका नामांकित डॉक्टरची पत्नी एकदा हौसेने एम. ए. चा अभ्यास करीत होती. नवऱ्याची जंगी प्रॅक्टिस होती. परंतु पुस्तके विकत आणण्यास तिला सवड नव्हती

आणि बहिःस्थ विद्यार्थिनी असल्यामुळे कोणा प्राध्यापकांची शिकवणी लावणे किंवा क्लासला जाणे म्हणजे प्राध्यापकांचा अपमान करणे, अशी तिची समजूत असावी. वर्षभर माझ्याकडची पुस्तके नेऊन तिचा मजेत अभ्यास चालला होता. डिफिकल्टीज विचारण्यासाठी तिने माझा किती वेळ घ्यावा, याला कसलीच मर्यादा नव्हती. घरी आल्यावर दर वेळी तिला कॉफी दिली नाही तर आमच्या गृहस्थपणाला बट्टा लागेल, असे तिच्या हालचालीवरून सतत जाणवायचे. एकदा उन्हाळ्यात टिळक तलावात पोहावयास गेलो असता कानात पाणी जाऊ नये म्हणून वापरलेली रबरी कॅप कानात जास्त आत गेली, काढता येईनाशी झाली म्हणून या विद्यार्थिनीच्या नवऱ्याच्या दवाखान्यात गेलो. तिच्या नवऱ्याने हातात एक बारीक चिमटा घेऊन क्षणात ती कॅप बाहेर काढल्यानंतर त्यानं मागितलेले दहा रुपये मी मुकाट्याने काढून दिले आहेत. अगदी त्याच्या बायकोसमोर ! तिच्याकडून माझी कितीतरी पुस्तके अजून परत यायची आहेत !

आता या गोष्टींची सवयच झाली आहे. मी अनेकांना मुक्त हस्ताने माझ्याकडची पुस्तके देतो. परत आली की ती माझी म्हणतो. नाहीतरी जन्माला आलो त्यावेळी ती माझ्याजवळ कुठे होती ? आणि जाताना थोडीच बरोबर घेऊन जाणार आहे ?

दत्तो वामन पोतदारांनी इतक्या पोटतिडकीने जमविलेल्या साधनसामग्रीचे आणि ग्रंथसंग्रहाचे काय झाले ? त्यांच्यापुढे आम्ही म्हणजे किस झाडकी पत्ती !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. . . . . . .
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## २७

# हे पुण्यपत्तन, ही पुण्यनगरी....

'पुणे' म्हटले की मनात अनेक संमिश्र भावना जाग्या होतात. तुलनेने भारतातले ते एक मध्यम आकाराचे शहर आहे हे मी विसरून जातो.

काल-परवापर्यंत ते दिसायला भारतातील इतर शहराप्रमाणे, नव्हे एखाद्या अस्ताव्यस्त पसरलेल्या मोठ्या खेड्याप्रमाणे दिसत होते.

परंतु या पुण्याचा दरारा साऱ्या भारतात जेवढा आहे, तेवढा दुसऱ्या कोणत्याही शहराचा नाही.

हा दरारा त्याच्या विद्यादानाबद्दल आहे, त्याच्या निर्भयतेबद्दल आहे, त्याच्या बुद्धिवादी दृष्टिकोणाबद्दल आहे, आणि...

आणि त्याच्या हवेबद्दल आहे.

त्याला गेल्या दीडदोनशे वर्षांचा उज्ज्वल इतिहास आहे. पेशव्यांनी दिल्लीपर्यंत धडक मारून त्याचे आकर्षण न वाटता पुन्हा इथेच यावेसे वाटावे असे एक आकर्षण या पुण्यात आहे

पुणक, पूनक, पुण्यपत्तन, पुण्यनगरी, मोहियाबाद आणि पुणे अशी त्याच्या नावांची स्थित्यंतरे झाली आहेत. मध्यंतरी साहेबाला त्याचा उच्चार नीट करता येत नव्हता. (मराठी माणसाखेरीज दुसऱ्या कुणालाही तो करता येत नाही) म्हणून त्याने त्याचे 'पूना' केले होते. आता परत ते 'पुणे' झाले आहे. दुर्दैवाने 'मुंबई'ला हे भाग्य प्राप्त होऊ शकत नाही. ते 'बॉंबे' असेच भ्रष्ट राहिले पाहिजे असे दिल्लीपतींना वाटते. पुण्याच्या धाकाने त्याला त्याचे नाव परत मिळाले. धाक वाटावा असे मुंबईत काय आहे?

तसे पाहिले तर आजचे 'पुणे' जवळजवळ १३०० वर्षांचे जुने आहे. १३०० वर्षांपूर्वी हल्ली पुणे आहे, त्या ठिकाणी एक लहानशी वाडी होती. तिच्या पूर्वेस कुंभारली

व कासारली ही दोन खेडी होती. पश्चिमेस व उत्तरेस शेती होती.

ही वाडी आजच्या कसब्याच्या काही भागांमध्ये वसली होती. तीत सुमारे दहा-पंधरा घरे होती. त्यात ब्राह्मणांची दोन, बाकीची कोळी, वाजत्री यांची होती. मारुती, बहिरोबा, पुण्येश्वर आणि नारायणेश्वर अशी चार देवळे होती.

पुणे विद्येचे माहेरघर तर आहेच, परंतु खऱ्या अर्थानं महाराष्ट्राची ती सांस्कृतिक राजधानी आहे. पुण्याबद्दल कोणाचे काही मत असले ही वस्तुस्थिती आहे.

हे वैभव प्राप्त होण्यामागे अनेक घटक जबाबदार आहेत. त्या सर्व घटकांचा विस्तृत समाचार घेणे अशक्य नाही, परंतु एखाद-दुसऱ्या लेखाद्वारे ते करणे इष्ट नाही. मात्र सर्व घटकांच्या स्थूलरूपाने शोध घेण्याचा प्रयत्न मात्र जरूर केला पाहिजे.

हजार वर्षांपूर्वी यादवांच्या काळात विदर्भ-मराठवाडा हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र होते. हे केंद्र पश्चिम महाराष्ट्राकडे सरकण्याचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांचे आळदीच्या सिधोपंत कुलकर्णींच्या मुलीशी झालेले लग्न. या लग्नाने पुणे जिल्ह्याला अचानक महत्त्व प्राप्त झाले. आळंदीचे सिद्धेश्वर मंदिर हे या भागातले जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध होते. परंतु निवृत्ति ज्ञानदेवादी भावंडे आळंदीस जन्माला आली, त्यांचे बालपण तेथेच गेले आणि धर्मचक्रप्रवर्तनाचे महत्त्वाचे कार्य या भावंडांच्या हातून पुरे होऊन, ज्ञानेश्वरांनी आळंदीस समाधी घेतली, या घटनेने साऱ्या महाराष्ट्राचा मोहराच आळंदीकडे वळला.

इथे आळंदीसच ज्ञानेश्वरादी भावंडांच्या अभंगरचनेचे कार्य होऊन भागवतरूपी धर्ममंदिराचा म्हणजे वारकरीपंथाचा पाया घातला गेला.

विठ्ठल हे महाराष्ट्राचे आदिदैवत. त्याची वारी ज्ञानेश्वरांपूर्वीपासूनच प्रचलित होती. महाराष्ट्र कर्नाटक आणि आंध्र यांच्या सीमारेषेवर वसलेले पंढरपूरचे हे दैवत अखिल महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने दैवत बनले ते संतमंडळींच्या कार्यामुळे. ज्ञानेश्वरांच्या समाधी-मुळे विठ्ठलाकडे जाणारी पालखी आळंदीहून जाणे ही एक महत्त्वाची व अपरिहार्य अशी घटना घडली. साऱ्या महाराष्ट्राचा केंद्रबिंदू विदर्भ–मराठवाड्याकडून पुण्याकडे वळण्यास ही घटना कारणीभूत घडली आणि पुणे जिल्हा हे संस्कृतीचे केंद्र ठरण्यास ही घटना प्रेरक ठरली, यात कसली शंका नाही.

तेव्हा पुण्याच्या घडणीमध्ये ज्ञानदेवांचा वरदहस्त आहे, ही पहिली गोष्ट आपण सतत लक्षात ठेविली पाहिजे.

आणि तुकाराममहाराजांच्या रूपाने जवळच देहू गावालाही असेच महत्त्व प्राप्त झाले. तुकारामांच्या अभंगवाणीने ज्ञानेश्वरादिकांनी उभे केलेले कार्य कळसास पोचविले आणि परिणामी, त्याचे फळ म्हणून लगोलग पुण्याच्या परिसरातच स्वराज्य-प्रस्थापनेच्या हालचालींना सुरुवात झाली.

तुकाराममहाराजांनी आपल्या अभंगांनी साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष ज्यावेळी वेधिले

होते, त्याच वेळेस पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यात छत्रपती शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. या घटनेने तर पुण्याच्या घडणीवर कायमचे शिक्कामोर्तब केले. त्याच सुमारास समर्थांचे पश्चिम महाराष्ट्रात आगमन झाले आणि इजा-बिजा-तिजा अशा क्रमाने पुण्याच्या सांस्कृतिक घडणीचे पक्के बीज रोवले गेले.

ज्ञानेश्वर जन्माला आले, त्यावेळी पुण्याची काय अवस्था होती हे आपण पाहिलेच आहे.

ज्ञानेश्वर नेवाश्याला बसून ' पैस ' नावाच्या मोठ्या दगडावर कोळशाने ज्ञानेश्वरी लिहीत होते व सच्चिदानंद बाबा ते निष्ठेने उतरून घेत होते. त्याच वर्षी ( इ.स.१२९० ) दिल्लीहून सय्यद इसा मोहोद्दिन खताल वगैरे पाच अवलिया मुसलमान पुण्यास आले व त्यांनी नदीकाठची पुण्येश्वर व नारायणेश्वर ही मंदिरे काढून त्यांचे दर्गे केले. पुणेश्वराच्या मंदिराचे दगड ज्यासाठी वापरले गेले त्याला धाकटा शेखसलबाबा दर्गा व नारायणेश्वराचे मंदिराच्या दगडांनी थोरला शेखसलबाबाचा किंवा शेख दिस्सामोहदिनचा दर्गा उभा राहिला.

मुसलमानांच्या आमदानीत या पुण्याची नावे अनेक वेळा बदलली गेली, परंतु वरील कारणांमुळे पुणेश्वर व नारायणेश्वर यांच्या पुरंदरवर हलविल्या गेलेल्या मूर्तीपैकी पुण्येश्वराची मूर्ती परत आणून या गावाचे पुणे हे नाव चिरस्थायी करण्यात आले. साक्षात शंकराचे पुण्य पाठीवर घेऊन पुणे उभे राहिले आणि त्या पुण्याइने ते वाढतच गेले. मात्र पुण्येश्वर पुण्यामध्ये जबरेश्वर, ओंकारेश्वर, अमृतेश्वर या नावाने विभागला गेला.

सोळाव्या शतकाच्या शेवटी व सतराव्या शतकाच्या सुरुवातीला पुण्यास मलिकंबरच्या वतीने सिद्दी याकुतराय हा ठाणेदार होता. त्याच्या जुलमाने पुणे ओस पडले व आदिलशाही दिवाण मुरार जगदेवराव याने शिवाजीमहाराज जन्मले त्याच साली पुणे गाव जाळून, पांढरीवर गाढवाचा नांगर फिरविला. त्यामुळे पुणे गाव आठ वर्षे ओस पडले होते.

इ. स. १६३५ मध्ये शहाजीराजांना पुणे जिल्ह्याची जहागिरी मिळाली. त्यांचा विश्वासू सरदार दादोजी कोंडदेव मलठणकर याने चिमुकल्या शिवाजीच्या हाताने पुणे गावच्या परिसरात सोन्याचा नांगर धरवून या गावाची पुन्हा वहिवाट सुरू केली आणि त्या दिवसापासून या पुण्याच्या उत्कर्षाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

तेव्हा पुण्याचा परिसर संत ज्ञानदेव–तुकाराम–रामदास यांच्या पुण्याईने भारलेला आहे. शाहिस्तेखानाने पुण्याच्या लाल महालात मुक्काम करून पुण्याची नाकेबंदी करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा सुरक्षिततेसाठी सह्याद्रीच्या डोंगरकपारींचा आश्रय घेतला पाहिजे हे जाणून शिवाजी महाराज पुरंदर–राजगड–रायगडच्या बाजूने उत्तर कोकणात पाय पसरत गेले. समर्थांनी या अगोदरच ते जाणले होते आणि म्हणूनच त्यांनी

सह्याद्रीच्या दुर्गम घळींचा आश्रय घेतलेला होता. पुण्याला मध्यवर्ती ठेवून छत्रपतींनी राजकारण केले आणि पुण्याच्या परिसरातील मंदिरांची अवस्था पाहून 'मराठा तितुका मेळवावा' हा मंत्र समर्थांनी घुमविला.

वयाच्या बाराव्या वर्षी शिवाजीमहाराज बंगळूरहून पुण्याला आले आणि त्यांनी पुण्यात राहून वेचक मराठी माणसे एकत्र करण्याचा उद्योग आरंभिला. दक्षिणेतून द्राविडी ब्राह्मण महाराष्ट्रात स्थायिक होतच होते. स्वराज्य प्रस्थापनेनंतर दक्षिणेबरोबरच पश्चिमेकडून विशेषतः कोकणपट्टीतून द्राविडेतर ब्राह्मण पुण्यास येऊन स्थायिक झाले. तीच गोष्ट इतर वर्णीयांची. पुण्याच्या परिसरातील कुणबी–मराठ्यांबरोबरच कोकणातील कुणबी-मराठे भगव्या झेंड्याखाली आले. वैश्य व शूद्र जातीजमातीही पुण्याच्या परिसरातच नव्या राजकीय परिस्थितीमुळे झपाट्याने एकत्रित झाल्या आणि अठराव्या शतकामध्ये पेशव्यांच्या कारकीर्दीत पुण्याला राहून पेशवे साऱ्या हिंदुस्थानच्या राजकारणाची सूत्रे हालवू लागले.

पुणं काय किंवा मुंबई काय ? या शहरांना सांस्कृतिक महत्त्व येण्यास बाहेरून येऊन येथे स्थायिक झालेल्या व्यक्तीच कारणीभूत आहेत.

ज्ञानदेवांनी आळंदीला घेतलेली समाधी, सोपानदेवांनी सासवडला घेतलेली समाधी यामुळे आळंदी ते पंढरपूर असा पंढरीच्या वारीचा क्रम अबाधित ठरला आणि पुण्यग्रामाच्या सांस्कृतिक कार्याची मुहूर्तमेढ रोविली गेली.

बहामनी काळात आणि आदिलशाही काळात अस्मानीसुलतानीमुळे पुण्याला काही बरे दिवस लाभले नाहीत. परंतु शिवकाळात त्याच्या खऱ्या अभ्युदयाला सुरुवात झाली आणि चढत्यावाढत्या क्रमाने पुणे मोठे होत गेले.

या त्याच्या मोठेपणात त्याच्या परिसरात झालेल्या साहित्यनिर्मितीचा वाटा फार मोठा.

ज्ञानेश्वर–तुकाराम–बहिणाबाई यांच्या अभंग-रचनेबरोबरच पंडिती काव्याचा झरा पुण्याच्या परिसरातच समृद्ध व संपन्न झाला. शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकी रघुनाथ पंडिताने 'दमयंती-स्वयंवर' हे काव्य लिहून एक नितातसुंदर आख्यानकाव्याची निर्मिती केली. त्याच्या पूर्वी जुन्नर येथे राहणाऱ्या लोलिंबराज नावाच्या कवीने भागवताच्या दशमस्कंधावर मराठीत टीका लिहिली होती व संस्कृतात 'वैद्यजीवन' नावाचा ग्रंथ लिहून त्याचे श्लोकबद्ध मराठीत भाषांतर केले होते. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत राजगुरूनगरचे सत्पुरुष कचेश्वर महाराज यांना छत्रपतींचे राजगुरूपद मिळाले. त्यांची व त्यांच्या शिष्यांची आख्यानकाव्ये उपलब्ध आहेत.

श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब यांच्या आश्रयाने राहणारा निरंजनमाधव हा एक फार मोठा कवी पुण्याला राहून काव्यरचना करीत असे. 'कृष्णानंदसिंधु', 'सांप्रदाय-परिमल', 'चिद्‌बोध रामायण' हे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. दौंड शहरापासून चार

कोसांवर भीमा नदीचे काठी असलेला मुद्‌गल या गावचा ‘ सामराज ’ नावाचा आणखी एक प्रसिद्ध कवी. या घराण्याकडे साताऱ्याचे राजोपाध्येपण होते. ‘ मुद्‌गलपुराण ’ आणि ‘ रुक्मिणीहरण ’ ही त्याची प्रसिद्ध काव्ये. त्याखेरीज आणखी काही त्याचे ग्रंथ आहेत.

श्रीधर कवीचा ‘ शिवलीलामृत ’ हा ग्रथ शके १२४० मध्ये ब्रह्मकमंडलूच्या तीरी म्हणजे बारामतीस लिहिला आहे. बारामतीची आठवण झाल्यानंतर पंडितकवी मोरोपंतांची आठवण होणार नाही हे कसे शक्य आहे ?

बारामतीकर जोशी यांचे पदरी राहून मोरोपंतांनी भारत, भागवत, रामायण, यांसारखी प्रचंड ग्रंथरचना केली. रामायण तर १०८ वेळा लिहिले. मोरोपंतांमुळे ‘ आर्या ’ हे वृत्त आबालवृद्धांच्या तोंडी जाऊन बसले. पंतांच्या ‘ केकावली ’चे कोणाला विस्मरण होईल ?

भागवतावर रचना करणारे जसे मोरोपंत प्रसिद्ध आहेत, तसेच सबंध भागवतावर टीका लिहिणाऱ्या ज्योतिपंतदादा महाभागवत यांना ‘ एक सहस्र विठ्ठलाची देवालये बांधण्याची ’ प्रेरणा व मदत पुण्याने दिली. आपल्या शिष्यपरिवारासह पुणे मुक्कामी राहून त्यांनी पेशव्यांच्या मदतीने साडेसातशे विठ्ठल मंदिरे बांधली. लकडी पुलावरील व विठ्ठलवाडीतील देवालयापासून त्यांनी या कार्याला सुरुवात केली होती. त्यांना ‘ महाभागवत ’ ही उपाधी पुण्यानेच दिली.

पंडित कवींप्रमाणेच पेशवाईच्या उत्तर काळात शाहीरी कवितेचा जो उत्कर्ष आढळतो, तो पुण्याच्या प्रेरणेने व प्रोत्साहनाने. शाहीर प्रभाकर, अनंतफंदी, होनाजी बाळा, रामजोशी, सगनभाऊ यांची शाहिरी कविता पुण्याच्या वातावरणात घुमली व प्रसिद्धीला आली. शाहिरी कवितेचा जन्मच मुळी पुण्याचा. अज्ञानदास नावाचा शिवकाळातला पहिला पुण्याचा शाहीर. त्याने अफझलखानाच्या वधावर पोवाडा रचून लाल महालात जिजामाता व शिवबा यांच्यापुढे गायिला व महाराजांनी प्रसन्न होऊन त्याला सोन्याचे कडे बहाल केले. त्याच वेळी पुण्याच्या मंडईच्या परिसरात राहणारा ‘ तुळसीदास ’ नावाचा कवी त्याने ५५ चौकांचा तानाजीचा पोवाडा लिहिला. ‘ शूर मर्दाचा पोवाडा, शूर मर्दाने ऐकावा. त्याने नवे स्फुरण होईल व ऐकल्याला पुण्यप्राप्ती होईल’ ही त्याची भूमिका. वीररसप्रणीत शाहिरी कवितेची बैठक या शाहिरांनी घातली. पेशवाईच्या उत्तर काळात तिला शृंगारिक काव्याची जोड मिळाली. ‘ अस्सल मराठी बाण्याची व शिक्क्याची कविता ’ म्हणून शाहिरी कवितेचे गोडवे अच्युत बळवंतराव कोल्हटकरांनी गायिले आहेत.

ऐतिहासिक गद्य वाङ्मयाचा पायाही पुण्यानेच घातला. शिवाजी महाराजांच्या दरबारात बसून राजनीतीचे धडे गिरविणारा राजनीतिज्ञ कृष्णाजी अनंत सभासद याने शिवाजीमहाराजांचे पहिले चरित्र लिहिले व ऐतिहासिक चरित्रलेखनाचा आदर्श निर्माण केला. ‘ सभासदी बखर ’ या नावाने ही कृती ओळखली जाते ‘ चित्रगुप्ताची बखर ’,

'भाऊसाहेबांची कैफियत', पेशव्यांची शकावली' इत्यादी कृतीही पुण्याच्या परिसरात साकार झाल्या आहेत.

इतिहासकाळात पुणे हे महाराष्ट्राची राजधानी म्हणून प्रख्यातीला आले. इंग्रजांनी पुण्याच्या शनिवारवाड्यावर आपला झेंडा फडकविल्यानंतर राजकीयदृष्ट्या पुण्याचे महत्त्व कमी झाले. मुंबई शहराने ते आपल्याकडे खेचून घेतले.

इंग्रजी शिक्षणाकडे मुंबईइतके पुण्याने लक्ष दिले नाही आणि इंग्रजांस मुंबईप्रमाणे साथ दिली नाही. त्याचेही पुण्यावर सर्वदूर परिणाम झाले. इंग्रजी शिक्षणाची, पाश्चात्त्य विद्येची व प्रबोधनाची लाट मुंबईवर पहिल्याने आली व ती पुण्यापर्यंत पोचण्यास कालावधी लागला व एकदा ती लाट पुण्याला पोचल्यावर पुण्याने झपाट्याने मुंबईला मागे टाकले.

पेशवाई गेल्यानंतर पुण्यात लष्कराच्या छावण्या पडल्या आणि त्याच्याबरोबर खिस्ती धर्मप्रसारकांनी म्हणजे मिशनऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पुणे व्यापिले. त्यामुळे एका पुण्याचे बघता बघता 'दोन पुणे' होऊन गेले. सदाशिव, नारायण, कसबा, शनिवार, गणेश, रविवार या जुन्या पेठांच्या पलीकडे खिस्ती, पारशी, मुसलमान व इंग्रज यांच्या नव्या वसाहती. झाल्या. त्यांच्यासाठी भराभर इंग्रजी शाळा निर्माण झाल्या. इंग्रजी वर्तमानपत्रे निघाली. उन्हाळ्याच्या सुटीत व पावसाळ्यात खिस्ती मिशनरी व इंग्रज अधिकारी पुण्यास मुक्काम ठोकू लागले. त्यांच्याबरोबर कोश-व्याकरण लिहिणारे, गॅझे-टिअर्स लिहिणारे युरोपियन पंडित पुण्यात वावरायला लागले. त्यांची सारी कामे पुण्यात सिद्ध व्हावयाची व ग्रंथ मात्र मुंबईस सरकारी मुद्रणालयात छापले जायचे, त्यामुळे पुण्याचे श्रेय आयते मुंबईला मिळू लागले. परंतु १८३६ साली मुंबईच्या व्याकरण रचणाऱ्या दादोबा पांडुरंगांनी मात्र मराठी भाषेचे व्याकरण मुंबईत राहून रचायचे तर पुण्याच्या मराठी भाषेतच रचले पाहिजे हे बरोबर ओळखले; कारण मुंबईची मराठी घेडगुजरी ( cosmopolitan ) आहे, हे त्यांना बरोबर ठाऊक होते.

पुण्याच्या कँपात इंग्रजीचे प्रस्थ होते तर इकडे शनिवार, नारायण, सदाशिवमध्ये संस्कृतचे प्रस्थ होते. इंग्रजांनीही पुण्याच्या पेशवाईत वावरलेल्या पुण्याच्या ब्राह्मणांना दुखवायचे नाही म्हणून पुण्यास संस्कृत पाठशाळा स्थापिली.

पेशव्यांनी दरवर्षी दक्षिणेसाठी म्हणून काढून ठेविलेल्या ५० हजार रकमेपैकी २० हजार बाजूस काढून त्यातूनच १८२१ मध्ये 'पाठशाळा' सुरू झाली. या पाठशाळेवर देखरेख करण्याकरता १८३७ मध्ये मेजर कँडीची योजना झाली. पाठशाळेत हिंदूंचे धार्मिक सण मोठ्या प्रमाणात होत. गणपति–उत्सवासाठी २०० रुपये खर्च होत. दिवाळीच्या वेळी विद्यार्थ्यांना चारी दिवस फराळ मिळे. श्रावण महिन्यातली धावपळ तर बघायलाच नको.

कँडीला या पाठशाळेचे काम बघताना खूप त्रास झाला. त्याला बूट घालून पाठ-

शाळेत येता येत नसे. जाजमावर बसावे लागत असे. पाठशाळेच्या वास्तूत नास्ता चालत नसे. चहा-बिस्कुटाचे तर नावच नको. परंतु त्याच्या कारकीर्दीत पाठशाळेला शिस्त लागली.

या पाठशाळेतूनच एकापाठोपाठ एक अशा नामांकित शास्त्र्यांचा उदय झाला. त्यांनी मराठी भाषा; व्याकरण, कोश इत्यादिकांच्या निर्मितीकडे आणि संस्कृत ग्रंथांची मराठी भाषांतरे करण्याकडे लक्ष पुरविले. दुसऱ्या बाजीरावाची इंग्रजांनी ब्रह्मावर्ती रवानगी केल्यानंतर शनिवारवाड्यात व फडणिशी दप्तरात काम करणाऱ्या अनेक ब्राह्मणांची वाताहत झाली. त्यांपैकी काही बाजीरावाबरोबर उत्तरेत गेले. राहिले त्यांपैकी काही पाठशाळेत जाऊ लागले. पाठशाळेत मोरशास्त्री साठे नावाचे विद्वान शास्त्री होते. त्यांना लोक बृहस्पती म्हणत. दुसऱ्या बाजीरावाबरोबर जायला न जमल्यामुळे पुण्यात अफूचे दुकान घालून कशीबशी गुजराण करणाऱ्या हरिपंत चिपळूणकरांचा कृष्णा हा मोठा बुद्धिवान मुलगा वयाच्या २५ व्या वर्षी पुण्याच्या पाठशाळेतून शास्त्री होऊन बाहेर पडला. त्याच्या अंगावर शालजोडी टाकून मोरशास्त्री साठे म्हणाले, "कृष्णा, तू कृष्णशास्त्री झालास. परंतु ही शालजोडी आता तुला तारणार नाही. संस्कृत विद्या आजच्या युगात तुला पोटाला देणार नाही. त्यासाठी इंग्रजी शीक." त्याप्रमाणे १८४८ साली कृष्णशास्त्री चिपळूणकर इंग्रजी शिकू लागले. बाजीरावाबरोबर न गेलेल्या आणखी एका हरिपंतांच्या मुलाने (गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी), पाठशाळेची वाट न धरता बुधवारच्या वाड्यातील इंग्रजी शाळेत शिकून सरकारची नोकरी धरली व तो पुण्याहून मुंबईला गेला. स्वतःच्या प्रयत्नाने तो मोठ्या अधिकारावर चढला.

इंग्रजी–मराठी शाळांमुळे विद्येच्या क्षेत्रात पुण्याने भरारी मारली. १८३०–५०च्या सुमारास पुण्यामध्ये भिकाऱ्यांचे प्रस्थ फार होते. अनेक धष्टपुष्ट पुरुष व स्त्रिया राजरोस रस्त्यारस्त्यांतून भीक मागत हिंडत. त्याकाळी पुणे गुलजारीबद्दलही प्रसिद्ध होते. ही गुलजारी म्हणजे दुसऱ्या बाजीरावाने पुण्याला दिलेली देणगी होती. 'आधीच पुणे गुलजार तयामधी आदितवार' अशी शाहीर प्रभाकरची रंगाची लावणीच आहे. पेशवाई गेल्याने भिकारी, पोळ आणि निरुपयोगी लोक मोकाट सुटले होते. परंतु पुण्यात एकदा विद्येचे वारे लागले आणि पुणे झपाट्याने बदलले. स्वार्थत्यागी आणि देशप्रेमी लोकांचे ते लवकरच माहेरघर बनले. पुण्यातच वासुदेव बळवंतांनी बंड केले. पुण्यातच पुढे चिपळूणकर–टिळक–आगरकर–गोखले–परांजपे निर्माण झाले. पुण्यातच चाफेकर बंधूंनी रँडचा खून केला. सावरकरांनी विदेशी वस्तूची होळी केली.

कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, कृष्णशास्त्री तळेकर, परशुरामपंत तात्या गोडबोले, महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी अव्वल इंग्रजीत मराठीत स्वच्छ व शुद्ध मराठी लिहिण्याचा पाया घातला. प्रमाण मराठीची पायाभूत घडण या पुण्याच्या शास्त्री मंडळींनी केली. अव्वल इंग्रजीतील ओबडधोबड व इंग्रजी भाषेकडे झुकणाऱ्या मराठीला या शास्त्रीमंडळींनी थोपवून धरले. कृष्णशास्त्री चिपळूणकर व परशुरामपंत-

तात्या गोडबोले यांची मराठी भाषा ही नव्या आकर्षक व तेजस्वी मराठी भाषेची सुरुवात होय.

१८६१ च्या सुमारास एका वीस वर्षांच्या मुलाने, विनायक जनार्दन कीर्तने याने एक ऐतिहासिक गद्य नाटक लिहून ते कॉलेजातील प्राध्यापकांसमोर वाचून दाखविले. ' नाटक थोरले बाजीराव पेशवे यांजवर ' असे त्याचे नाव होते. या नाटकाने आधुनिक मराठी नाट्यवाङ्मयाचा पाया घातला. ते लिहिले गेले नसते तर रणजित देसाई यांची ' स्वामी ' ही कादंबरी आहे या स्वरूपात कधीच लिहिली गेली नसती !

आधुनिक नाट्यवाङ्मयाचा पाया घालण्याचे श्रेय जसे पुण्याचे त्याप्रमाणे त्यानंतर १९ वर्षांनी आधुनिक मराठी रंगभूमीचा पायाही किर्लोस्करांच्या ' शाकुंतल 'च्या रूपाने पुण्यातच घातला गेला.

शासकीय अनुदानाने पुस्तके लिहिली जावयाची व प्रसिद्ध केली जावयाची ही मुंबईची परंपरा, तर स्वतंत्र बाण्याने ग्रंथरचना करून महाराष्ट्राची अस्मिता जागवायची ही पुण्याची परंपरा.

विनायक जनार्दन कीर्तने यांचे थोरले बंधू नीलकंठ जनार्दन कीर्तने यांनी डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असतानाच ' मराठ्यांच्या इतिहासावर टीका ' नावाचा महत्त्वाचा निबंध लिहून तो धाडसाने डेक्कन कॉलेजच्या इंग्रज प्राध्यापकांसमोर वाचून दाखविला. ग्रँट डफने लिहिलेला मराठ्यांचा इतिहास हा पूर्वग्रहदूषित असून आम्हा मराठ्यांची बदनामी करणारा आहे. कोणत्याही राष्ट्राचे व भाषेचे सत्त्व त्या राष्ट्रात व भाषेत जन्मलेल्या व्यक्तीलाच चांगल्या रीतीने समजते. या नियमाने मराठ्यांचा रास्त इतिहास इंग्रजांना कधीच लिहिता येणार नाही. त्यासाठी मराठी माणूसच पाहिजे. या त्यांच्या विधानाने इंग्रज प्राध्यापक गरम झाल्याची आख्यायिका आहे. कीर्तन्यांच्या या निबंधाने मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची प्रेरणा तरुण मनात उद्भवली आणि पुण्यात ' काव्येतिहाससंग्रह ', ' भारतवर्ष 'सारखी मासिके निघून का. ना. साने, बाळाजी जनार्दन मोडक, द. ब. पारसनीस, खरेशास्त्री व इतिहासाचार्य राजवाडे यांनी या प्रेरणेतून मराठ्यांच्या इतिहासाचे अस्सल स्वरूपाचे शेकडो कागदपत्र उभे केले.

एकीकडे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रेरणेचे हे महान कार्य चालू असता सामाजिक स्वातंत्र्यासाठी कृतिप्रवण लढा देण्यासाठी महात्मा जोतीबा फुले अवतरले. त्यांनी लिहिलेल्या ' गुलामगिरी ', ' सार्वजनिक सत्यधर्म ' व ' शेतकऱ्याचा असूड ' इत्यादी ग्रथांनीच मराठी भाषेचा उर्जस्वल आविष्कार स्वयंभू व आर्ष शैलीने युक्त असल्याने मोठा आकर्षक आहे. दुर्दैवाने जोतीबांच्या शैलीचा व भाषेचा विकास घडवून आणणारे लेखन जोतीबांच्या नंतर फारसे कोणी केले नाही. मराठी भाषा विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या जोरदार, डौलदार व पल्लेदार अशा आविष्काराने अत्यंत प्रभावी व परिणामकारक बनली.

मराठी समीक्षेच्या कार्यातही पुणे सदैव अग्रेसर राहिले. का. बा. मराठे यांनी १८६८ मध्ये ' नावल व नाटक यांजवर निबंध ' लिहून मराठीत लागलेली अद्भुतरम्य नावलांची कीड व कृत्रिम नाट्यवाङ्मयनिर्मिती यांजवर जोराचा हल्ला केला.

लोकहितवादी, न्या. रानडे यांच्या प्रयत्नामुळे पुण्यात प्रबोधनाकडे नेणाऱ्या संस्था-जीवनाची मुहूर्तमेढ अतिशय वेगाने रोविली गेली. ज्ञानप्रकाशादी दैनिके, नगरवाचन मंदिरासारखी ग्रथालये, आणि मराठी ग्रंथकार सभेसारख्या वाङ्मयीन चळवळी यामुळे पुण्याचे सांस्कृतिक जीवन झपाट्याने गतिमान होत गेले.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेच्या तडाख्याने परकीय राज्यकर्ते आणि त्यांचे हस्तक हे क्षणोक्षणी घायाळ होऊ लागले. त्यातूनच स्वातंत्र्यनिर्भर अशा नव्या संस्थांचा, वृत्तपत्रांचा, शैक्षणिक संस्थांचा जन्म झाला आणि पुणे हे स्वातंत्र्यप्रेमाचे आगर बनले. भारताच्या स्वातंत्र्यसमराची नांदी पुण्यातच गर्जून उठली.

उत्तर पेशवाईतील दुर्गुणांचा या नांदीमध्ये नायनाट होऊन गेला होता. स्वार्थत्यागाची एक विलक्षण झळाळी पुण्याच्या मुखावर झळकत होती. त्या झळाळीच्या प्रकाशात पेटून उठलेल्या मनांनी १८८५ नंतर मराठीमध्ये विलक्षण जिवंत स्वरूपाच्या वाङ्मयाची निर्मिती केली. सामाजिक सुधारणेचा गदारोळही उठला. विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांच्यासारख्यांनी स्वतः पुनर्विवाह करून एक नवा आदर्श घालून दिला. लोकशाही मार्गाने एका बाजूने स्वातंत्र्य लढा तीव्र झाला तर दुसऱ्या बाजूने तरुण, पेटलेल्या मनातून दिव्यदाहक असे कर्तृत्व गाजविणारे क्रांतिकारकांचे नेतृत्व उभे राहिले.

परंतु अलीकडे पुण्याचा विद्येच्या व स्वार्थत्यागाच्या क्षेत्रातील दरारा कमी होत चालला आहे. ' पुण्यपत्तन ' ऐवजी पुण्याचे पतन सुरू झाले आहे. पुणे झपाट्याने बकाल होत चालले आहे. ' पुणे हे महाराष्ट्राचे पोसणे आहे. पुण्याला मोठी माणसं लागतात पण ती झाडाला लागतात तशी नव्हे तर बंदराला जहाजे लागतात तशी ' असे दत्तो वामन पोतदार म्हणाले होते. परंतु हल्ली पुण्याला माणसे लागत नाहीत.

कारण पुण्यालाच बाहेरच्या माणसांची लागण होत आहे.

पुणं हरवते आहे आणि त्यामुळे मनाला एक प्रकारची हुरहूर लागून राहिली आहे.

*

# २८

# निवडणुका !

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुका काही दिवसांपूर्वी पार पडल्या. या निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारांच्या प्रचार-पत्रिकांच्या सभासदांवर अक्षरशः पाऊस पडला ! आता पुण्याची साहित्य–परिषद ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात महत्त्वाचे कार्य करीत आहे, यात कसलीही शंका नाही. परंतु साहित्यसेवा, स्वार्थत्याग यांना ज्या ठिकाणी महत्त्व आहे, अशा ठिकाणीही निवडणुकांचा इतका गदारोळ व्हावा ? राजकीय निवडणुकांचे एक प्रकारे ठीक आहे. त्या जिंकणे म्हणजे आयुष्यातील सिंहस्थ पर्वणीपेक्षाही एक फार मोठी पर्वणी असते. त्या जिंकून पुन्हा वर मंत्रिपद मिळविणे, ही गोष्ट इतकी कठीण असते की; त्याच्यापुढे भगीरथाने स्वर्गातून गंगा खाली आणण्याचा प्रकार काहीच नव्हे ! भगीरथाच्या कार्यामुळे त्याचे सारे पितर तरून गेले, परंतु मंत्रिपद मिळाल्याने पुढच्या कित्येक पिढ्यांची सोय होऊन जाते, हा त्यातला फरक तर सहजपणे कोणाच्याही लक्षात यावा.

साहित्य-परिषदेची निवडणूक जिंकल्याने या पार्थिव जगामध्ये जी काही थोडीबहुत नावनिशाणी उमटेल तेवढीच. अर्थातच चांगल्या साहित्यिकाला त्याच्या लेखनामुळे मिळणारी कीर्ती ती खरी सत्कीर्ती. साहित्यपरिषदेत गेल्यामुळे त्याच्या साहित्याचा कस वाढणार आहे थोडाच ?

मग साहित्य–परिषदेसारख्या सेवाभावी संस्थेत कसलीही तादृश फलप्राप्ती नसताना निवडून येण्याचा अनेकांचा अट्टाहास कशासाठी ?

या निवडणुकीमध्ये उभे राहिलेल्या उमेदवारांनी दिलेली आश्वासने पाहण्यासारखी आहेत. या सर्वांना साहित्यपरिषदेला ती आहे त्यापेक्षा अधिक सन्मानाला चढवायचे आहे. तिची आर्थिक परिस्थिती सुधारावयाची आहे, पत्रिका तीन महिन्यांतून एकदा

निघते, ती काही जणांना दर महिन्याला काढावयाची आहे. परिषदेच्या ग्रामीण विभागातील शाखांच्या अडचणी काही जणांना सोडवायच्या आहेत. ग्रामीण विभागात जिकडे तिकडे चर्चा, परिसंवाद, शिबिरे यांचा सुकाळ करावयाचा आहे. नवोदित साहित्यिकांना उत्तेजनार्थ विविध उपक्रम हाती घेऊन त्यांना प्रकाशात आणावयाचे आहेत. विद्यापीठामध्ये मराठीकडे दुर्लक्ष असल्याने काही उमेदवारांना विद्यापीठ व शासन यांना सरळ करावयाचे आहे. काही जणांना महामंडळ सुधारून वठणीवर आणावयाचे आहे. घटनादुरुस्ती करून साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीत सन्मान्यता आणावयाची आहे. आणखी या उमेदवारांना खूप खूप करावयाचे आहे.

त्यासाठी पत्रिका छापणे, वर्तमानपत्रांतून स्वतःबद्दल मजकूर छापून आणणे, गाड्या काढून घरोघरी जाऊन प्रचार करणे व जमल्यास कोऱ्या मतपत्रिका गोळा करण्यासाठी जिवाचे रान करणे, अशा अनेक प्रकारांचा अवलंब अशावेळी उमेदवार सर्रास करतात !

या सगळ्या पत्रिकांतील मजकूर पाहिल्यानंतर माझ्या मनात एक विचार आला की या सर्व उमेदवारांना बोलावून खरोखरच ही आश्वासने पुरी करण्याचे जे प्रतिज्ञेवर सांगत असतील त्यांच्या हाती परिषदेच्या कारभार सन्मानाने का सोपवू नये ? त्यासाठी या निवडणुकांची काय गरज आहे ? वर्षभर त्यांचा कारभार पाहिल्यानंतर सर्वसाधारण सभेत आश्वासनानुसार किती कामे कोणी कोणी पुरी केली आहेत, हे पाहावे. ज्यांनी आश्वासनानुसार कामे चालविली आहेत, त्यांनाच पुढे काम चालू ठेवण्यास सांगावे. बाकीच्यांची सन्मानाने बोळवण करावी.

असे का करू नये ? परंतु हे होणे शक्य आहे काय ?

कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपले सारे जीवन निवडणुकीमय झाले आहे. लोकसभेच्या निवडणुका, विधानसभेच्या निवडणुका, राज्यसभेच्या निवडणुका, म्युनिसिपालिटीच्या निवडणुका, ग्रामपंचायतीच्या निवडणुका, साखरकारखान्यांच्या निवडणुका, सहकारी सोसायट्यांच्या निवडणुका, विद्यापीठांच्या निवडणुका, फलाण्या निवडणुका, सटाण्या निवडणुका ! दगड आणि धोंडे, दुसरे काय ?

विद्यापीठासारख्या विद्येच्या क्षेत्रात आता विद्येपेक्षा निवडणुकांचेच राज्य आहे. अभ्यासमंडळाच्या, सिनेटच्या, अधिष्ठात्यांच्या, विधिसभेच्या, कार्यकारी मंडळाच्या आणि विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुका ! या निवडणुकांच्या मोसमाच्या काळात प्राध्यापक काय काय करतील, याचा नेम नाही. पत्रके, दौरे काढणे, प्रत्येक उमेदवाराला समक्ष भेटणे हे प्रकार सुरू झाले म्हणजे कॉलेजकडे कोण लक्ष देतो ? विद्यापीठावर निवडावयाच्या विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षाचे मातबर पुढारी रणांगणात उतरतात आणि निवडणुकीच्या दिवशी विद्यापीठाचे आवार हजारो वाहनांनी भरून जाते. निवडणूक निकालानंतर विद्यापीठामध्ये उधळला गेलेला गुलाल पाहून डोळे दिपून जातात.

विद्यापीठांतील प्रतिनिधी त्यांच्या गुणवत्तेनुसार वा त्याच्या शैक्षणिक अनुभवांच्या कसोटीवर निवडावयाचे, का केवळ निवडणुकांच्या कसोट्यावर ? या निवडणुकांच्या काळात विद्यापीठातील इतर कामे ठप्प होतात. परीक्षांना तर कोणी म्हणजे कोणी विचारीत नाही. प्राध्यापक कोर्टाकडे धाव घेतात. निवडणुकांवर कोर्टाकडून स्थगिती मिळतात. पुणे विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणुकांवर एका शिक्षकाने आणलेल्या स्थगितीमुळे पुणे विद्यापीठाची सिनेट स्थगित झाल्याने कित्येक महिने विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर एकही शिक्षकांचा प्रतिनिधी राहिलेला नव्हता ! त्यामुळे विद्यापीठाचे काही बिघडले नाही.

विद्यापीठांच्या कारभारात या निवडणुकांनी काय धुमाकूळ घातला आहे, हे पाहिले की मन खेदाने भरून येते. विद्यापीठाच्या खर्चाचा मोठा वाटा या निवडणुकीवर खर्च होतो. त्यातून कमिट्यांवर कमिट्या निर्माण होतात. अहवाल-प्रतिअहवाल यांच्या कागदाचे भारे निर्माण होतात. आणि धूळ खात पडतात. त्यामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यासाठी स्टेशनरीच राहत नाही. गेल्या वर्षी पुणे विद्यापीठात पाठविण्यासाठी पाकिटे शिल्लक नव्हती आणि चक्रमुद्रणासाठी कागद नव्हता. परिणामी परीक्षांची सर्व बिले थकतात, तपासलेल्या उत्तरपत्रिकांची किरकोळ बिले विद्यापीठाकडे वर्षानुवर्षे देऊ शकत नाहीत. पुणे व नागपूर विद्यापीठांची अशी पाच-पाच वर्षांची बिले तुंबून राहिली आहेत.

या उलट निवडणुकांची बिले ! ती लगेच मिळतात !

विद्येच्या क्षेत्रांची निवडणुकांनी ही अवस्था जिथे करून टाकली आहे तिथे साहित्य परिषदेच्या निवडणुकांनी धमाल उडविली तर त्यात आश्चर्य ते काय ?

निवडणुकीची एक झिंग असते, नशा असते. साऱ्या राष्ट्राला या नशेने झपाटले आहे.

लोकशाहीमध्ये हे अपरिहार्यच ठरते काय ? नव्हे काय ? काय काय ?

## २९

# एक मोती गळत

३ ऑक्टोबरचा तो दिवस मला फार मोठा धक्का देऊन गेला. विद्यापीठात येऊन मी माझ्या खुर्चीत बसतो न बसतो इतक्यात लागोपाठ दोन-तीन ठिकाणांहून फोन आले.

" स. शि. भावे यांचे पुण्यात निधन झाले. "

" ह्याऽ ! काहीतरी काय सांगताय ! परवा तर आम्ही दोघे मुंबईत एकत्र दिवसभर होतो ! " मी फटकन् फोन करणाऱ्यांना सुनावले.

फोन घेता घेता मी माझ्या टेबलावर पाहिले तर यापूर्वी हाच निरोप देणारे दोन फोन येऊन गेले होते !

कुणीतरी माझी गंमत करण्यासाठी काहीतरी सांगत आहे अशी माझी सुरुवातीची भावना होती. भावे इतक्या लवकर जाईलच कसा, जाणे शक्य नाही असेच मनाने घेतले होते !

परंतु वस्तुस्थितीच्या जाणिवेने मनातली ही भावना झरझर ओसरली आणि मन कमालीचे सुन्न होऊन गेले.

काल-परवा आपल्याबरोबर हसत खेळत वावरणारा, येत्या साहित्यसंमेलनात आपण काय काय बोलणार हे उत्साहानं सांगणारा आपला जवळचा मित्र अचानक आज या जगातून उठून गेला म्हटल्यावर आपल्या मनाची फार विचित्र अवस्था होते. आपल्या मनाची उभारी कोणीतरी काढून नेल्यासारखे वाटायला लागते. आशाआकांक्षांचा बुडबुडा विरायला लागतो...

भावे गेला हे सत्य स्वीकारल्याखेरीज गत्यंतर नव्हते ! त्याला इतक्या लवकर जाण्याचा अधिकार काय, अशांसारखे प्रश्न भावनेच्या भरात स्वतःशीच विचारीत

बसण्यात काही अर्थ नव्हता. माणूस केव्हातरी जाणारच आणि इतर अनेकांचे जाणे अनुभवावे लागते तसाच हाही एक अनुभव अशी मनाची समजूत घालण्याच्या प्रयत्नाने मनाचे काही केल्या समाधान होणार नव्हते.

भावेनं अशावेळी जाणं हा एक त्याला ओळखणाऱ्यांच्या दृष्टीनं आघात होता, परंतु नियतीनं त्याच्या स्वतःवर केलेला सर्वांत मोठा आघात होता. आघात पचविण्याची, कुणाला न सांगता त्यांना स्वतःशी खेळवत राहण्याची त्याला सवय होती. त्यातून तो आता कायमचा सुटला! भावे कसा अलीकडे सर्वांगाने फुलत होता, वाढत होता आणि मराठी साहित्याबद्दलची समज वाढवीत होता...

भावे माझा एक घनिष्ठ मित्र होता. मैत्रीच्या संबंधातील ही घनिष्ठता तशी अलीकडेच गेल्या काही वर्षांत वाढीला लागली होती. अगदी बरोबर सांगायचं म्हणजे गेल्या दहा वर्षांत ती खूप वाढली होती. त्यापूर्वी आम्ही दोघे एकमेकांसंबंधात बरेच पूर्वग्रह बाळगून नुसत्या तोंडदेखल्या ओळखीनं एकमेकांशी वागत होतो.

भावेला १९४५ नंतरच्या मराठी वाङ्मयाचे प्रेम विशेष होते आणि बखरी वगैरे प्राचीन वाङ्मयाचे संपादन मी करीत असल्यामुळे मी जुन्याचा भोक्ता आहे अशी त्याची समजूत होती. पुण्याच्या साहित्य परिषदेमध्ये हीरक महोत्सवापासून भावेचा गट मागे पडत गेला आणि परिषदेची सूत्रे माझ्या हातात येत गेली तेव्हा साहजिकच आम्ही दोघे एकमेकांच्या विरुद्ध गटातले आहेत अशी आम्ही दोघांनीही स्वतःची सोईस्कर समजूत करून घेतली होती.

साहित्य-संस्थांमधील लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यात आपला चांगलाच काला-अपव्यय होतो हे लक्षात आल्यामुळं मी १९७६ मध्ये निग्रहानं साहित्य परिषदेपासून दूर झालो आणि काही चर्चासत्रांमधून दोघांना जाणवत राहिले की, आमच्या दोघांच्या आधुनिक साहित्यासंबंधीच्या विचारात विरोध नसून समानधर्मित्व आहे. त्यामुळे सगळे नातेच बदलून गेले!

भावे फर्ग्युसन महाविद्यालयाचा उपप्राचार्य झाला आणि त्याच्या प्रयत्नाने एम. ए.चे मराठीचे केंद्र फर्ग्युसनमध्ये सुरू झाले. या काळात वाङ्मयीन चर्चेला त्याच्या महाविद्यालयात त्याने एक मुक्त व्यासपीठाचे स्वरूप दिले. श्री. पु. भागवत, व्यंकटेश माडगूळकरांच्या व्याख्यानमाला, दर आठवड्यात विद्यार्थ्यांच्या समवेत झडलेली चर्चासत्रे यांनी त्याने महाविद्यालयाच्या वाङ्मयीन वातावरणात एक चैतन्य निर्माण केले होते. या काळात आम्ही दोघेही पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य होतो त्याच्या प्रयत्नाने विद्यापीठाच्या मराठीच्या अभ्यासक्रमाला नवीन वळण मिळण्यास निश्चितच मदत झाली.

भावेच्या कर्तृत्वाला अचानक ग्रहण लागले आणि महाविद्यालयाने त्याला बहुमताने कामावरून दूर करण्याचा निर्णय केला.

वार्ता वाचून मी त्याला भेटायला गेलो. वाटले होते भावे या प्रकाराने मोडून पडलेला असणार ! नाही, त्याने हसत हसत माझे स्वागत केले. म्हणाला,

‘ बरे झाले, तू आलास ! ’

‘ का बाबा ! ’

“ मला एकटे वाटत आहे. रोज माझ्याकडे येणारी नित्याची माणसं सावधगिरीने कुंपणावर उभी आहेत. महाविद्यालयानं मला दूर केलं याचं मला वाईट वाटत नाही, परंतु ज्यांना मी मित्र म्हणून मानत होतो. त्यांना झालेला आनंद पाहून मी अंतर्यामी खरा दुखावलो आहे. ” भावेचे म्हणणे खरे होते. ‘ भावे संपला, उद्ध्वस्त झाला. ’ या कल्पनेने त्याच्या मित्रपरिवारातली बरीच मंडळी सुखावली होती !

माधव जूलियनांना पन्नास वर्षांपूर्वीच्या महाविद्यालयातून बाहेर पडताना काय यातना झाल्या असतील त्याचा अनुभव आपण घेत आहोत, या समाधानाचा एक दिलासा उरी बाळगून भावे ‘ काही घडले नाही ’ अशा निर्विकारतेने वावरत होता.

एकदा त्याची या काळात सुंदर अक्षरात लिहिलेली एक छोटी डायरी माझ्या पाहण्यात आली. ती त्याने दाखविली नव्हती. माझ्या घरी कॉफी घेता घेता तो ती विसरून गेला होता.

मी सहज उघडून पाहिले.

त्याच्या प्रतिकूल परिस्थितीत त्याच्या बाजूनं उभी असलेल्या माणसांची त्याने यादी केली होती. अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी ! आणि आश्चर्य म्हणजे त्यांत माझे नाव होते ! मला आश्चर्य वाटले.

थोड्या वेळाने त्या डायरीच्या शोधात तो परत आला. मीही निर्विकारतेने त्याला ती परत दिली.

त्याच्या अगदी जवळच्या स्नेह्यांत माझा अंतर्भाव केला होता हे मला अशा रीतीने कळण्यासाठी त्याने डायरी विसरल्याचे नाटक केले होते का ? मला तसे वाटत नाही. परंतु काही सांगता येत नाही. मात्र त्यानंतर त्याचे अगत्य सतत वाढत असल्याचे मला जाणवत राहिले.

भावे तसा स्वतःच्या वैयक्तिक जीवनासंबंधाने क्वचितच बोलायचा. किंबहुना आमच्यामध्ये त्याच्या खाजगी जीवनासंबंधाने काही बोलायचे नाही, असा अलिखित नियम होता. त्याच्या खाजगी जीवनासंबंधाने इतरांकडून खूप काहीबाही समजायचे परंतु त्याला त्याबद्दल मी काही विचारायचा नाही.

भावेच्या विचारात एक काटेकोर तर्कनिष्ठता होती. आपल्या मतांना ठामपणे तो चिकटून राहायचा. कुणाशी त्याने शत्रुत्व घेतले तर त्याच्याशी चार हात करण्यासाठी त्याने स्वतःच्या मनाशी पुरेपूर सगळा व्यूह रचलेला असायचा. अशावेळी तो वरून कितीही शांत, थंड दिसला तरी आतून तो पुरा धगधगलेला, पेटलेला असायचा. वरचे

दात खालच्या ओठावर घट्ट आवळून आपल्या मनातला सारा क्रोध तो क्षणभर चेहऱ्यावर आणायचा. हे त्याचे रूप फर्ग्युसनबाहेर राहिलेल्या काळात मला अनेक वेळा दिसले. आपल्या वडिलांचा तो वारसा आहे असे त्याला वाटे.

आपले वडील अतिशय कर्तव्यकठोर आणि बुद्धिवादी कसे होते हे सांगता सांगता त्यांना मुंबईत अपघाती मरण आले हे सांगताना त्याच्या डोळ्यात अश्रू तरारले. ते व्हिक्टोरियातून जात असता लोखंडी सामान वाहून नेणाऱ्या ट्रकमधील लोखंडी सळ्यांनी त्यांचा बळी घेतला होता. त्यावेळी श्री. पु. भागवतांनी त्याला जो दिलासा दिला होता, ते सांगताना तो गहिवरला होता

त्याच काळात रस्त्यात मला त्याच्या वडिलांनी लिहिलेले, 'जकात्याच्या भाऊचे लग्न' ही कादंबरी मिळाली आणि मला शोध लागला की त्याचे मूळ आडनाव 'जकाते' असे होते. आनंद यादवांचेही तेच मूळचे आडनाव होते. आणि त्यामुळे त्याची थट्टा करण्याचा एक नवा विषय मला मिळाला.

मी त्याला त्यामुळे 'सदाशिवरावभाऊ' असे म्हणू लागलो. मी संपादित केलेली 'भाऊसाहेबांची बखर' त्याला भेट म्हणून देताना त्यावर मी लिहिले.

'सदाशिवरावभाऊंची ही बखर सदाशिवरावास भेट' तो मनोमन सुखावला आणि चटकन म्हणून गेला, "त्या सदाशिवरावभाऊंप्रमाणे माझ्या आयुष्याचे पानपत होणार नाही ना?" मी त्याला पुढे बोलू दिले नाही!

परंतु त्या दिवसापासून आम्ही दोघेच बोलत असू त्यावेळी सहजपणाने मी त्याला 'अरे सदाशिव' म्हणू लागलो.

फर्ग्युसनच्या बाबतीत सदाशिवनं स्वतःच्या आयुष्याचे पानिपत होऊ दिले नाही. त्याला पुन्हा कामावर घ्यावे लागले!

परंतु मने दुभंगली होती. त्यानंतर कॉलेजमध्ये त्याचे मन रमले नाही, पत्नीच्या विनयभंगाचे निमित्त होऊन त्याने आपण होऊन अनेक वर्षांचे महाविद्यालयाचे दोर कापून टाकले. माधव ज्यूलियनांच्याच शब्दात तो म्हणाला, 'प्रेम होईना तुझ्याने, प्रेम माझे राहू दे.'

फर्ग्युसनचे दोर कायमचे कापून काढल्यानंतर त्याच्या लेखनाला एक बहर आला. तो अमेरिकेत जाऊन आला आणि त्याने 'माणूस' मधून लिहिलेली 'अमेरिका नावाचे प्रकरण' ही लेखमाला त्याच्या वैचारिक सामर्थ्याबद्दल खूपच सांगून गेली. त्यापूर्वी 'विवेक' साप्ताहिकातून लिहिलेली लेखमाला 'बिकट वाट' या नावाने पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाली. आयुष्याच्या बिकट वाटेतून जावे लागल्याच्या काळातील त्याच्या मनाचे प्रतिबिंब त्यात पडले होते. ते त्याचे पहिले पुस्तक असावे. त्यानंतर 'अमेरिका ...' ही पुस्तकरूपाने बाहेर पडले.

सदाशिवच्या नावानं ग्रंथसंपदा नसली तरी समीक्षक म्हणून त्याचा अधिकार मोठा

होता आणि महाराष्ट्रानं तो मानला होता. स्पष्ट, रेखीव आणि मार्मिक कसे बोलावे हे त्याने वेळोवेळी दाखविले. त्याचे वाचन चांगले होते. तशीच जाणकारी सखोल होती. स्मरणशक्ती तल्लख होती. परंतु तिला त्याने आपल्यावर कुरघोडी करू दिली नव्हती! त्यामुळे गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात निरनिराळ्या चर्चासत्रांत त्याचे वर्चस्व अबाधितपणे जाणवत होते.

त्याला फापटपसाऱ्याचा तिटकारा होता. त्याचे विचार, अक्षर कसे स्फटिकासारखे स्वच्छ, पारदर्शक होते. त्याचा लेख हाती आला की मुद्रणालयातल्या जुळाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा चमकून जात असे.

स्वतःचे खासगी जीवन त्याने कुलुपबंद करून ठेवले होते तरी आपल्या स्नेह्यांच्या कुटुंबियांबाबतीत त्याने दाखविलेला अकृत्रिम जिव्हाळा विशेष रीतीने जाणवत असे. माझ्या वाढदिवसाची मला कधी आठवण नसायची परंतु सकाळी उठून तो फुले आणि मिठाई घेऊन हजर राहायचा आणि आनंदाश्चर्याचा धक्का द्यायचा. त्या तारखेवर जन्मलेल्यांची इंग्रजी वर्तमानपत्रांची वार्षिक भविष्याची कात्रणे तो पाकिटातून माझ्या हाती देई. वर्षभरात घडणाऱ्या चांगल्या घटना कोणत्या हे त्यामधून तांबड्या शाईने त्याने अधोरेखित केलेले असे. अशावेळी त्याच्या चेहऱ्यावरच्या मोकळ्या हास्याने तो घरचे सारे वातावरण भरून टाकीत असे.

त्याच्या चेहऱ्यावरचे मनमोकळे हास्य घरच्या मंडळींवर नेहमीच चेटूक करून जात असे. त्याच्यासारखे प्रसन्न हसणारी फारच थोडी माणसं आपल्याला आढळतात.

कोणतेही चर्चासत्र, व्याख्यानमाला असली की अलीकडे काही वर्षांत मी 'सदाशिव'च्या नावानं ओंकार घालीत असे. साहित्य-संमेलनातील परिसंवादासाठी पहिले नाव त्याचे टाकून मी पुढील यादी तयार केली होती. पहिल्या परिसंवादातील पहिला वक्ता तो होता. सदाशिवला लिहावे म्हणजे तो नक्की येणार हा भरवसा होता. त्याने निबंध पाठवितो म्हटले की, सुवाच्य अक्षरांत तो अगदी वेळेवर पाठविणार. त्याचे व्याख्यान म्हणजे एक प्रकारचा बौद्धिक आनंद असायचा. भेदक, लक्षणीय, रसोद्ग्रही आणि अतिशय गंभीर विषयही खेळकरपणाने तो सहजगत्या मांडायचा. सारे व्याख्यान नीट चिंतिलेले, नियोजिलेले! त्याला बोलावल्याबद्दल मला कधीही निराशा वाटली वाटली नाही. गेल्या वर्षी ठाकरसी विद्यापीठात तो ज्ञानेश्वरीवर बोलला. फार चांगले बोलला. त्या दिवशी तो माझ्या खोलीवर राहिला. दुसऱ्या दिवशी पहाटे आम्ही मुंबईच्या मरीन लाईनवर फिरायला गेलो.

फूटपाथवरच्या झाडावर अतिशय देखणी अशी मोठ्या आकाराची फुले येतात. त्यांतले एक काढून मी त्याला दिले. हातात पडल्यावर हळूहळू त्या फुलातला केसर गळायला लागतो. तो गळू नये म्हणून त्याने ते हलक्या हाताने धरले व बराच वेळ त्यातील सौंदर्य तो निरखीत राहिला.

थोड्या वेळाने एक नाजूक, देखणी तरुणी फिरावयास आली. त्याने अलगदपणे तिच्या हातात ते ठेवले. तिला फार आनंद झाला. ती पारशी तरुणी होती. नुकतीच अमेरिकेला जाऊन आली होती. सदाशिव तिच्याबरोबर अमेरिकेसंबंधाने बोलत राहिला. तिने पत्ता देऊन चहाला आमंत्रण दिले.

मी यंदा जून महिन्यात मुंबईत राहायला आलो. महिनाभरात ऐतिहासिक भाषेत लिहिलेले, जिव्हाळयाने भरलेले त्याचे एक पत्र आले. सदैव जपून ठेवावे असे ते पत्र होते.

१२१४ शिरोळे रस्ता
पुणे ४११००४,
१४ जुलै, ८६

मित्रवर्य प्रिय डॉ. भीमराव
यांसी सदाशिवचा
सप्रेम नमस्कार,

सांप्रत मुंबई मुक्कामी भगिनीशिक्षणाचे, मातृभाषेचे, राष्ट्रीय संस्थांचे अशी विविध कार्ये करून विराजमान झालात. पुण्यात प्रतिपक्ष 'सकाळ'चा डंका वाजतोच आहे. अज्ञात खबर मिळाली की खर्ड्यानंतर इतके वर्षांनी प्रथमच एकत्र आलेल्या मराठी महामंडळाची मुख्य सुभेदारी आपणांकडेच सोपविण्यात आली आहे.

वर्धिष्णू प्रतापाने हर्ष जाला. किंतु सांप्रत दर्शनभेट दुर्मिळ झाल्याची खंत अधिकच तीव्र जाली. तरी विज्ञप्ति ही की पत्रदेखत घोडियास खोगीर करावे व तडक पुणे मुलखी यावे. सवडीने भेटी जालियावर काही कार्य काही हितगुज असे जैसे सवडीने व्हावयाचे तैसे होईल. हे अशक्यच भासल्यास जासुदा हस्ते तातडी करून खलिता पाठविण्यास चुको नये.

वज्रचूडेमंडित सौभाग्यवती वहिनीसाहेब यांची सविनय खबर आमची सौ. इने पुशिली आहे. ती त्यांचे सुपूर्द करावी.

ही लेखनसीमा

त्यानंतर तो पुण्याच्या माटे शताब्दीच्या कार्यक्रमात भेटला. पहिल्या दिवशी अचानक त्याला बोलावे लागले. फार मार्मिक बोलला आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच बोलावे लागू नये म्हणून काहीतरी निमित्त काढून गैरहजर राहिला.

त्याला औचित्याचे, विवेकाचे मोठे भान होते. त्यानेच त्याला समीक्षकांत एक स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिले होते.

२९/३० सप्टेंबरला माझ्या विद्यापीठातील चर्चासत्रातला त्याचा सहभाग सगळयांच्या लक्षात राहिला. हरिभाऊंच्या कथेवर त्याने टिपण वाचले आणि नंतरच्या चर्चेत त्याने

घेतलेल्या भूमिकेने सगळ्यांवर मात केली. शांत, संथ राहूनही आक्रमक कसे राहावे हे त्याने दाखविले. त्याने कधीही आक्रस्ताळेपणा केला नाही.

२९·चे चर्चासत्र संपल्यानंतर कांदिवलीच्या माझ्या नव्या घरी त्याच दिवशी येण्याचा त्याने आग्रह धरला. चर्चगेटला आम्ही चुकून अंधेरीच्या गाडीत बसलो. तेथून पुढे जाणाऱ्या गाड्यांत मरणाची गर्दी होती. माणसं गुरासारखी डब्यांतून कोंबली होती. बायकादेखील निर्भयपणे लोंबकळत होत्या. हे दर्शन त्याला नवीन होते. बोरीवलीकडे जाणाऱ्या लागोपाठ पाच गाड्या सोडल्यानंतर सहाव्या गाडीत भयंकर गर्दीच्या गाडीत आम्ही कसेबसे घुसलो. मी अगोदर आत गेलो, तो दिसेना.

" सदाशिव चढलास का रे बाबा ? " मी आतून विचारले.

" होय रे बाबा, एका पायावर उभा राहून साक्षात मृत्यूचे दर्शन घेतो आहे —" तो म्हणाला. आजूबाजूचे लोक हसून पाहू लागले व त्याला त्यांनी आत ओढून घेतले. त्या दिवशी रात्री एक वाजेपर्यंत आमच्या अखंड गप्पा झाल्या.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्याने मरीनलाइनच्या चौपाटीवर जाण्याचा हट्ट धरला. मागच्या खेपेस जिथे इराण्याकडे चहा घेतला होता तेथेच चहा घेण्याचा आग्रह धरला. ज्या फुलाच्या झाडाजवळ त्याला ती पारशी ललना भेटली होती तेथे तो उभा राहिला आणि म्हणाला, ' तिने दिलेला पत्ता मी टाकून दिला. आता ती कुठे असेल बरे ! ' तो बराच हळवा झाला होता.

त्या दिवशी चौपाटीवर आम्ही बराच वेळ बसून होतो. त्याने त्या दिवशी स्वतः-बद्दल मला माहीत नसलेल्या खूपच गोष्टी सांगितल्या. मी संकोचाने ऐकत होतो.

साहित्य-संमेलनाच्या ' साहित्यातील सवतेसुभे ' या विषयाची मांडणी आपण कशा रीतीने करणार हे त्याने उत्साहाने सांगितले. आता ते सगळे संपले !

सदाशिवरात्र भाऊसाहेब पेशव्यांच्या पानिपतच्या निधनाची वार्ता कळविणाऱ्या पत्रात लिहिले होते—

" एक मोती गळत...दसवीस अश्राफत...

सदाशिवच्या निधनाची वार्ता ऐकल्यावर सहजपणे माझ्या तोंडून बाहेर पडले—

' एक मोती गळत... '

# ३०

# १४ वर्षांच्या दोन लेखिका

पुण्याच्या मुक्कामात ‘ वाङ्मयशोभे ’चे संपादक मनोहरपंत केळकर यांना भेटायला जायचे म्हणजे काहीतरी धारदार ऐकण्याची मनाची तयारी ठेवून जायचे ! ‘ वाङ्मय-शोभे ’च्या खुंटावर धोपटी घेऊन आपल्या लेखनाची सुरुवात करणारे अनेक लेखक आता ‘ पॉश सलून ’ काढून बसले आहेत आणि त्यामुळे त्यांना वाङ्मयशोभेचे विस्मरण झाले आहे ’, असे काही त्यांच्या तोंडून ऐकले की, त्यांच्या जळजळत्या अंतःकरणाची कल्पना येते. यांचे आत्मचरित्र म्हणजे एका बाजूने त्यांच्या कौटुंबिक गहिवरांचे हृद्य दर्शन घडविणारे परंतु अशा जळजळत्या स्फोटक भावनांचे प्रदर्शन करणारे एक विलोभनीय मोहोळच आहे.

अपेक्षेप्रमाणे भेटीत त्यांनी पहिल्या वाक्यात फैलावर घेतले.

“ तुम्हाला साहित्य संमेलनात गिरिजाबाई केळकरांची आठवण झाली नाही ! ”

केळकरांचा पहिलाच फटका माझ्या चांगलाच वर्मी बसला. खरेच, साहित्य संमेलनात गिरिजाबाई केळकरांना अभिवादन करावयास हवे होते. नुसते गिरिजाबाईंचेच नव्हे तर, गुरुवर्य रा. द, रानडे, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री. म. माटे व गिरिजाबाई केळकर या चौघांचे १९८६ हे शताब्दी वर्ष. त्या सर्वांची आठवण ठेवून त्यांना अभिवादन करण्याची योजना करावयास हवी होती. १९७४ मध्ये इचलकरंजीला सुवर्ण-महोत्सवी साहित्यसंमेलन भरले होते. त्यावेळी चक्रधरांचा ७०० वा प्रयाण दिन व ज्ञानदेवांची ७०० वी जयंती येत होती. त्यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम मीच आखला होता. यंदाही तसेच करावयास हवे होते, ते राहून गेले ! संमेलनातील ही आणखी एक उणीव होय !

या चौघांपैकी माट्यांची शताब्दी पुण्याने चांगल्या रीतीने साजरी केली. त्यांच्या

जन्मदिनी शिवाजी मंदिरात सभा झाली. साहित्य परिषदेने सप्टेंबरच्या ४, ५, ६, या दिनांकांना व्याख्यानादिकांचा कार्यक्रम आखून व साहित्यपत्रिकेचा 'माटे विशेषांक' काढून त्यांच्या वाङ्मयाची व कार्याची यथार्थ जाणीव करून दिली. डॉ. मंगुडकरांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने लगेच ऑक्टोबरमध्ये पुण्यात तीन दिवसांचे माटे शताब्दीनिमित्त चर्चासत्र ठेवून अनेक नामवंतांचे विचार ऐकविले. माटे हे आजच्या ग्रामीण व दलित साहित्याचे उद्गाते वा जनक असे म्हटल्याने त्या त्या साहित्याच्या आजच्या पालखीपदस्थांनी ते नाकारण्याचे काही प्रकार या चर्चासत्रातून घडले. परंतु कोणत्याही मठाधिकाऱ्याची आपल्या स्वतःच्या गादीची प्रतिष्ठा राखण्याच्या प्रयत्नातून संपूर्ण सत्य नाकारण्याची वृत्ती असते.

अशा प्रकारच्या मताची गांभीर्याने दखल घ्यावयाची नसते, हे लक्षात घेऊन तिकडे अभ्यासकांनी दुर्लक्ष केले. माटे आपले महत्त्वाचे कार्य करून गेले, कोणी काही म्हटल्याने त्यांचे महत्त्व तिळमात्रही कमी होणार नाही! मात्र माट्यांच्याबद्दल लिहिताना या मठाधिकाऱ्यांनी, 'वत्सा, तू थोडे बऱ्यांपैकी काम करून गेलायस बरं का!' म्हणून त्यांना डाव्या हाताने प्रशस्तिपत्र देण्याचा जो प्रकार केला त्याच्याकडे 'बाळक्रीडा' म्हणून पाहावे व सोडून द्यावे झाले!

गुरुदेव रा. द. रानडे म्हणजे आधुनिक काळातील भारतीय तत्त्वज्ञान्यांचा मेरुमणी. त्यांची शताब्दी साजरी करण्यासाठी सांगलीच्या अध्यात्म विद्यामंदिराने एक तत्त्वज्ञान परिषद आयोजित केली आहे. कर्मवीरांची शताब्दी तर आता महाराष्ट्रात ठिकठिकाणी साजरी होत आहे. त्यांच्या कार्याने ग्रामीण विभागात स्वावलंबी शिक्षणाचे साऱ्या महाराष्ट्रात एक जाळेच विणले गेले आहे. साहित्य संस्कृती मंडळ पुण्यामध्ये कर्मवीरांच्या स्मरणार्थ एक चर्चासत्र आयोजित करीत आहे. महाराष्ट्र शासनही या कार्यार्थ पुढाकार घेत आहे.

परंतु वरच्या महत्त्वाच्या व्यक्तींप्रमाणे गिरिजाबाईंचे स्मरण महाराष्ट्रात व्हावे तितके झाले नाही. जुन्या पिढीच्या एक कर्तबगार आणि अनुभवसंपन्न लेखन करणाऱ्या लेखिका म्हणून त्यांचे महत्त्व विशेष आहे. १८८६ साली जन्मलेली एक स्त्री उपजत प्रेरणेने लिहायला लागते आणि समाजसेवेच्या जाणिवेने आर्य स्त्रीच्या बाण्याने संसार करता करता पतीच्या सावलीत राहून ती जेथे जाईल तेथे काही ना काही लोकोपयोगी कार्य करीत राहते! विशेषतः ती ज्या कालखंडात हे कार्य करून गेली तो कालखंड अशा कार्याच्या दृष्टीने किती प्रतिकूल होता! स्त्री सभासमारंभांत भाग घेऊ शकत नव्हती, घेणे शक्य नव्हते! साहित्य-संमेलनांतून त्या काळी हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या स्त्रिया वावरत. संमेलनात भाग घेणे म्हणजे शांतं पापम्! काशिताई कानिटकर ही संमेलनात भाग घेणारी पहिली स्त्री. त्यापूर्वी म्हणजे गिरिजाबाईंच्या जन्मापूर्वी वर्षभर अगोदर दादोबा पांडुरंगांची कन्या अहिल्या तर्खडकर न्या. रानड्यांचा हात धरून

संमेलनास उपस्थित राहिली म्हणून आगरकरांना केवढे कौतुक वाटले होते! १९१२ च्या अकोले येथे भरलेल्या साहित्य संमेलनात गिरिजाबाई केळकर पाचच मिनिटे बोलल्या आणि फड मारून गेल्या. नंतरच्या साहित्य संमेलनांतून कोल्हापूरच्या माहेर-वाशिणी इंदूरच्या सासूवाशिणी बनून कुठल्याही पुरुषापेक्षा काकणभर सरस बोलणाऱ्या कमलाबाई किबे किंवा नोव्हेंबरच्या पहिल्यां आठवड्यात त्यांचे दुःखद निधन झाले त्या आनंदीबाई शिर्के यांच्या नावाचे स्मरण होते. १९२६ साली कवी माधव जूलियन यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्ष म्हणून आनंदीबाई शिर्के यांची निवड करण्याचे औचित्य जळगावकरांनी दाखविले व त्याच जळगावकरांनी शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाचे व जळगाव येथे माधवराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या नाट्यसंमेलनाचे स्वागताध्यक्षपद व कार्याध्यक्षपद गिरिजाबाईंना देऊन त्यांचा सन्मान केला. १९२८ सालच्या मुंबईच्या नाट्यसंमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या.

या दोन्ही प्रसंगांच्या आठवणींचे चित्रण या दोघींनीही आपापल्या आत्मचरित्रांतून केले आहे. 'तुमच्या संमेलनाचे सुरत होईल' अशा धमक्यांनी अनेकांनी आनंदीबाईंना त्रस्त केले व जळगावातील एक ज्येष्ठ साहित्यिक तिवारी यांची स्वागताध्यक्षपदी निवड न झाल्याने ते संमेलनाकडे फिरकलेसुद्धा नाहीत. आनंदीबाईंनी 'सांजवात' या आपल्या आत्मचरित्रात या संमेलनाचे साग्रसंगीत वर्णन केले आहे. आपल्या 'द्रौपदीची थाळी' या आत्मचरित्रात गिरिजाबाईंनी जळगावच्या नाट्य संमेलनासंबंधाने लिहिताना एवढेच म्हटले आहे की, "बालगंधर्वांना स्वागताध्यक्ष म्हणून बोलाविले होते. मी कार्याध्यक्ष होते. ते संमेलन स्थानिक भांडणतंट्यांनी बरेच गाजले, पण त्यात आपल्या समाजाच्या प्रवृत्तीची गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली. ती अशी की, कोणाही जवळच्या माणसाचा फार गाजावाजा समाजाला नको असतो."

गिरिजाबाईंचे सारे लिहिणे असे आटोपशीर परंतु आपल्या अनुभवांचे केवळ सार सांगणारे. या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांचे आत्मचरित्र फुलले नाही. आपल्या कौटुंबिक घडामोडीत त्या विशेष रमलेल्या व सार्वजनिक कार्याची विशेष वाच्यता न करणाऱ्या वृत्तीच्या दिसतात. ६ डिसेंबर १९२० च्या 'विदूषक' या 'हिंदूपंच'च्या अस्तानंतर फडक्यांनी काढलेल्या व्यंगचित्र-साप्ताहिकात गिरिजाबाईंचा गौरव करणारे एक व्यंगचित्र छापले आहे. गिरिजाबाईंचे आत्मचरित्र मी त्यासाठी उत्साहाने वाचावयास घेतले, परंतु स्वतःच्या गौरवाचे प्रसंग सांगावयाचे नाहीत, या निरहंकारी वृत्तीमुळे गिरिजाबाईंच्या आत्मचरित्रात त्यांच्या सार्वजनिक व लेखनकार्यासंबंधाने फारच थोडी माहिती मिळते व त्यामुळे हे आत्मचरित्र आपली कमालीची निराशा करते.

गिरिजाबाईंची ६ नाटके, ३ कथासंग्रह, ३ लेखसंग्रह, संसारोपयोगी ३ पुस्तके व आत्मचरित्र असे वाङ्मय आहे. त्यांना व आनंदीबाई शिर्क्यांना गुजराती उत्तम येत असे. आनंदीबाई शिर्के या गिरिजाबाईपेक्षा ६ वर्षांनी लहान होत्या. त्या ९४ वर्षे जगल्या.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी त्यांच्या लेखनाचे कौतुक करून त्यांना अधिक लिहिण्याची प्रेरणा दिली. गिरिजाबाई या साहित्यसम्राट केळकरांच्या भावजय, परंतु त्यांच्या लेखन-कार्याची प्रेरणा स्वयंभू होती. १९८० मध्ये पुण्यास त्यांच्या मुलाकडे त्यांचे निधन झाले. म्हणजे त्याही आनदीबाईप्रमाणे ९४ वर्षे जगल्या. जळगावच्या साहित्यविश्वाला जागविणाऱ्या या दोन महिलांच्या इतक्या मोठ्या व्यक्ती त्यानंतर जळगावला लाभल्या नाहीत ! साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षा म्हणून कुसुमावती देशपांडे व दुर्गा भागवत या दोघा महिलांची निवड झाली. वास्तविक त्यापूर्वी कितीतरी वर्षे अगोदर गिरिजाबाई केळकर व आनंदीबाई शिर्के यांची निवड अध्यक्ष म्हणून व्हावयास हवी होती. मराठी साहित्यसंमेलने ही पुरुषप्रधान आहेत हे सिद्ध करण्यास एवढी एकच घटना पुरेशी आहे.

१९७६ नंतर गिरिजाबाई केळकर जळगाव सोडून कायमच्या पुण्यास येऊन राहिल्या होत्या. त्यावेळी मनोहरपंत केळकरांकडे मी त्यांच्याशी एकदा गप्पागोष्टी केल्या होत्या. झाल्यागेल्या दिवसाबद्दल त्यांच्या मनात कसलीही विशेष जाणीव नव्हती. त्या सर्वांच्या पलीकडे त्या गेल्याचे जाणवले होते. चेहऱ्यावर पिकले म्हातारपण होते आणि स्निग्ध कोमल मातृत्वाची मन वेधून घेणारी झळाळी होती. माझ्या लेखनाची चौकशी करून त्या म्हणाल्या की, तुमच्या लेखनाला सामाजिक अधिष्ठान असू द्या.

लक्षात राहिले ते इतकेच !

REFBK-0025396

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२९
नोंदणी क्र. २९३५६६
निबंध २७।८।८५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

आपल्या अवतीभवतीच्या वाङ्‌मयीन व सांस्कृतिक घडामोडींचे हे मर्मभेदक व खेळकर असे भाष्य आहे. त्याचे अंतरंग नितळ गुणग्राहकतेचे व आविष्कार जिव्हाळ्याचा व रोखठोक असा आहे.

मर्मभेदकतेमुळे ते काही ठीकाणी खोचक झाले असले तरी कुठल्याही अर्थाने ते निंदाव्यंजक नाही. लेखकाच्या या क्षेत्रातील दीर्घकालीन अनुभवाचे त्यातून ठायीठायी नाट्यपूर्ण दर्शन घडते.

काही ना काही निमित्ताने हे लेखन झाले तरी त्याचे निमित्तकारण हे सदैव पार्श्वभूमीसारखे राहते. त्यामुळे त्याच्या अंतरंगात कुठूनही डोकावले तरी वाचकांना आपल्या समाज जीवनातील काही महत्त्वाच्या घडामोडीं-मध्ये आपण गुंतून गेल्याचा आनंद निश्चितच मिळतो.